समाजमनाचा ध्येयतारा

: लेखक :

' स्व यं से व क '

मूल्य ५ रुपये.

प्रकाशक :

श्री. वा. त्र्यं. करंदीकर,

कार्यवाह

'शांतता प्रकाशन'

६४९ दक्षिण कसबा, सोलापूर.

—०—

अधिकृत विक्रेते :

(१) श्री. गो. वा. कुलकर्णी,

प्रोप्रा. महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

(२) श्री. वा. त्र्यं. करंदीकर,

कार्यवाह

'शांतता प्रकाशन'

६४९ दक्षिण कसबा, सोलापूर.

—०—

म. गांधी पुण्यतिथि, १९४९

—०—

मुद्रक :

श्री. कृ. ह. सहस्रबुद्धे

प्रोप्रा. श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

—०—

आत्मकथन

समाजानं दिलेले विचार समाजाला अर्पण करण्यांत आज मला मनापासून आनंद होत आहे. जनताजनार्दनाच्या प्रेमळ सहानुभूतीशिवाय हें शक्य झालं नसतं.

ह्या ग्रंथाचं संपूर्ण लिखाण १९४७ सालांतच झालेलं असल्यानं ग्रंथांतील कांहीं विधानं जुनीं वाटण्याचा संभव आहे. ह्यामुळं व अपुऱ्या ज्ञानामुळं ग्रंथांत जे कांहीं दोष राहिले असतील त्या दोषांकडं मित्रांच्या नजरेनं पाहून वाचकांनीं क्षमा करावी.

साहित्यसम्राट् कै. तात्यासाहेब केळकर यांनीं ग्रं[illegible] प्रस्तावना देण्याचं आश्वासन दिलं होतं. पण योगायोग तसा नव्हता? म्हणून नाइलाजानं, प्रस्तावने ऐवजीं, त्यांनीं दिलेला त्यांच्याच हस्ताक्षरांतील आशीर्वाद छापून, हा ग्रंथ जनताजनार्दनाच्या सेवेला सादर करीत आहे.

पुस्तक वाचून वाचकांनीं पुस्तकावरील आपला अभिप्राय थोडक्यांत कळविल्यास आभारी होईन. उत्तम ठरणाऱ्या गुणदोषविवेचनाकरितां दहा दहा रुपयांचीं दोन बक्षिसं दिलीं जातील. चढाओढीकरितां तरी निदान विद्यार्थ्यांनीं व विद्यार्थिनींनीं पुस्तकाचा अभ्यास करावा ही मनापासूनची इच्छा. अभिप्राय खालीं दिलेल्या कोणत्याहि पत्त्यावर, पुस्तकांत मुद्दाम अभिप्रायाकरितां राखून ठेवलेल्या कागदावर एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत लिहून, ३० जून १९४९ अखेरपर्यंत पाठवावा. १ ऑगस्ट १९४९ रोजीं बक्षिसें जाहीर होतील.

पत्तेः–(१) महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर. (२) 'शांतता प्रकाशन' ६४९ दक्षिण कसबा, सोलापूर.

माझ्या सर्व मित्रांनीं मला दिलेल्या उत्तेजनाशिवाय माझ्या हातून हें लिखाण झालंच नसतं. माझे मित्र श्री. बा. ना. ताटके व श्री. के. पं. मंगळवेढेकर, माझे बंधू श्री. ना. व्यं. करंदीकर व श्री. म. द. खाडिलकर व माझे चाहते श्री. बाबा पंडित, श्री. बागेवाडीकर शास्त्री श्री. ब. ग.

राजोपाध्ये, श्री. वा. शि. आपटे व श्री. कृ. ना. पिले यांनीं ग्रंथ लिहिला जात असतांना मला ज्या बहुमोल सूचना केल्या त्या सर्वांबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

ग्रंथप्रकाशनाच्या बाबतींत माझे विद्यार्थी कॅप्टन मोहनसिंग बायस व विद्यार्थिनी सौ. इंदूताई देव यांनीं मला अत्यंत आपलेपणानं मदत केली. त्याचप्रमाणं श्री. वंकटसिंग बायस व श्री. नानासाहेब देव यांनीं ग्रंथ-प्रकाशनाबद्दल आग्रह धरला नसता तर ह्या ग्रंथाचं प्रकाशन झालंच नसतं. त्याचप्रमाणं श्रीज्ञानेश्वर प्रेसचे मालक श्री. कृ. ह. सहस्रबुद्धे आणि 'महाराष्ट्र ग्रंथ भांडार कोल्हापूर'चे मालक श्री. गो. वा. कुलकर्णी यांनीं आपलेपणानं मला साहाय्य दिलं. माझे सोलापुरांतील साहित्यक्षेत्रांतील कांहीं मित्र प्रो. बेंद्रे, श्री. द. प्र. भावे, कवि कुंजविहारी आदिकरून साहित्यिक मित्रांनीं ग्रंथप्रकाशनाच्या बाबतींत पुढाकार घेतला. या सर्वांचा मी आभारी आहे.

माझ्या वैयक्तिक विनंतीला मान देऊन माझ्या विद्यार्थ्यांनीं, माझ्या शिक्षक मित्रांनीं व माझ्या सर्व चाहत्यांनीं मला दाखविलेल्या हार्दिक सहानुभूतीबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

आजच्या व्यक्तिपूजनाच्या कालांत ह्या ग्रंथांत कांहीं छायाचित्रं असणं आवश्यक होतं, असं साहजिकच वाटण्याचा संभव आहे. तरी पण बुद्धि-वाद्यांनीं प्रसिद्धिपराङ्मुख राहून निःस्वार्थी सल्लागाराच्या भूमिकेंत सतत सेवा करावी हें तत्त्वच ह्या ग्रंथांत अट्टाहासानं सांगितलं असल्यानं ह्या ग्रंथांत छायाचित्रं टाळलीं आहेत. त्याचप्रमाणं कांहीं कांहीं गोष्टी अधिक विस्तारानं आणि पुनःपुन्हा मांडण्यांत आल्या आहेत. पुनःपुन्हा मांडलेली गोष्ट आत्मसात् व्हावी हा उद्देश. ह्या व अशा तऱ्हेच्या इतर सर्व दोषांबद्दल उदार अंतःकरणानं क्षमा करून ही सेवा सहृदय समाज मान्य करून घेऊन पुढील सेवेला उत्तेजन देईल असा विश्वास आहे.

दि. ३०–१–१९४९.

आपला नम्र,
'स्वयंसेवक.'

विषय-प्रवेश

जीवनाचं तारू; वाट चुकलेला वाटसरू; शिक्षकाची निराश मनस्थिति; बालमनांकडे दुर्लक्ष; पगारवाढ कीं कर्तव्यनिष्ठा ?; महत्त्व दिलेला नसून कार्याला.

नवीन विचारसरणी; सध्यांची शांतता; खंडराज्यांचं अस्तित्व; स्वयंपूर्ण, स्वयंशासित आणि स्वयंतुष्ट राष्ट्रांचा उदय; ईश्वरा, त्यांना क्षमा कर; अद्वितीय इतिहास; छोट्यामोठ्या राष्ट्रांना मार्गदर्शन; सामर्थ्यटिकाव (Survival of the Fittest); त्याची पूर्तता; बुद्धिवाद्यांचा त्याग; निःपक्षपाती सल्लागार; एकतानतेचं सुख; सत्ताधाऱ्यांचा त्याग; आंतरिक बोचण्या; उलट्या काळजाचे अधिकारी; न्यायदानाचं आद्यतत्त्व; भांडवलदाराचा त्याग; आमूलाग्र पालट; असीम ह्व्यास; मागणी मागून मागणी; न थांबणारीं वर्गयुद्धं; कर्तव्याची आच; समाजाची इमारत; ध्येयवादी राष्ट्र; मानसिक सामर्थ्यासंबंधीं मुख्य प्रधानांना पत्र; जेत्यांनीं काय मिळविलं ?; नव्या तत्त्वज्ञानाला पूर्ण वाव; मानसिक आघाडी; बंगालमधील लाखो मृत्यू; समाजाला स्पर्श; हातरहाट नी हातमाग; सुख, शांति नी समाधान.

खेडुतांची मनोभूमि; शहरी नी खेडेगांवी तरुणतरुणींची तुलना; यांत्रिक भुतानं न पछाडलेला हिंदुस्थान; जालीम उपायांचे दुष्परिणाम; समाजवादी तत्त्वज्ञानाचा देखावा; मयासुरी माया; नागरिकांच्या तात्कालिक गरजा; संघटित शेती; देवाणघेवाण; पोषणाची जबाबदारी; वस्त्रकला; औषधालयं; प्रत्येक व्यक्ति ईश्वरी अंश; निवासस्थानांची पुनर्रचना; प्रार्थनामंदिरं; बालमनांचा विकास; बागखेड्यांतील कारखाने; कामधेनुवाड्या; कागदी पावत्यांवर व्यवहार; कारखानी केंद्रं; स्वयंपूर्णतेकरितां आवश्यक वस्तूंचं उत्पादन; खेड्यांचे प्रतिनिधि; प्रतिनिधींची निवड; वयोवृद्धांच्या स्वार्थाला मुरड; वयोवृद्ध प्रतिनिधि; निरोगी जीवन जगण्याची कला; समाजाची आज्ञा; साक्षरतेला जागरूक; लग्नाचा अवास्तव खर्च; सोऽहं आणि कोऽहं; यांत्रिक सुधारणांची आग; राष्ट्रीय तपस्व्यांचा

—*—

शुद्धिपत्र

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१०	वि. प्र. ४	२२४	२४४
१४	,, १५	Wales	Wells
२५	८	अशुद्ध न्हाइलेला	न्हाइलेला
२५	११	Neudism	Nudism
३१	प्रकरणाचें नांव	अभ्यास	आभास
३७	२७	चातुर्वर्ण्यांतील	चातुर्वर्ण्यांतील
४५	४	आताताई	आतताई
७३	२६	तपश्चर्यचं	तपश्चर्येचं
७४	५	शिवरावांच्या	शिवरायाच्या
८१	२२	गीसमधील	ग्रीसमधील
९७	१६	खात्रीहि	खच्चीहि
९८	१०	राष्ट्राची	राष्ट्राची
१०४	१६	आली	झाली
१०८	२३	एकचालत्कवाचा	एकचालकत्वाचा
११३	१३	चौवीस	चोवीस
१५३	२१।२२	समा-समाजांत	समाजांत
१५४	११	परिपूर्ण	परपूर्ण
१६६	४	चौवीस	चोवीस
१६९	६	ती	नी
१८२	८	इस्लामी यांच्या	इस्लामियांच्या
१८३	२१		,
१९७	२४	प्रत्यन	प्रयत्न
२०५	८	अनिष्ठ	अनिष्ट
२१०	१४	कुलगुरु, श्रेष्ठ	कुलगुरुश्रेष्ठ,
२१७	११	लिहिहावाचता	लिहितावाचता
२३४	८	सुवर्णतुला	सुवर्णतुला होईल
२३५	२१	वृत्तीतं	वृत्तीनं
२४१	२५	सभेत	सभेनं

ग्रन्थनिर्मितीला चालना देणाऱ्या ज्ञानसागरांतील लेखकाच्या मनावर उडालेले तुषार

१	महात्मा गांधी	(दा. न. शिखरे)
२	गांधीवाद	(शं. द. जावडेकर)
३	ऋग्वेदाचें संपूर्ण मराठी भाषान्तर	(चित्रावशास्त्री)
४	मनुस्मृति	(वे. शा. सं. विष्णुशास्त्री बापट)
५	गीतारहस्य	(बा. गं. टिळक)
६	संस्कृतिसंगम	(द. के. केळकर)
७	दासबोध	(श्रीसमर्थ रामदासस्वामी)
८	ज्ञानेश्वरी	(साखरे प्रत)
९	मानसोपचार	(गणपुले)
१०	टिळक चरित्र	(न. चिं. केळकर)
११	भगवान् बुद्ध	(कोसंबी)
१२	पाश्चिमात्य शिक्षणपद्धति	(ग. श्री. खैर)
१३	प्राचीन भारतीय शिक्षणपद्धति	(अळतेकर)
१४	श्रीसमर्थ चरित्र	(आजगांवकर)
१५	आधुनिक जर्मनीची उत्क्रांति	(ना. कृ. आगाशे)
१६	बालकांचा मनोविकास	(म. ल. आठवले)
१७	आर्यलोकांचें मूलस्थान	(ओगले)
१८	वेदकालनिर्णय	(,,)
१९	अध्यापन व मानसशास्त्र	(कर्वे)
२०	मानवीसंस्कृतीचा इतिहास	(,,)
२१	शिक्षक आणि शिक्षण	(म. का. कारखानीस)
२२	निःशस्त्रांचें राजकारण	(श्री. व्यं. केतकर)
२३	भारतीय समाजशास्त्र	(,,)
२४	महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास	(शं. दा. पेंडसे)
२५	भारतीय समाजस्थिति (वात्स्यायनकालीन)	(वि. पां. दांडेकर)
२६	मध्ययुगीन भारत	(चिंतामणराव वैद्य)

27 The Truth about Soviet Russia (Webb)
28 Constructive programme for students (S. N. Agarval)
29. The educational needs of Democracy
30 Muhamad the Prophet (Ali Maulana)
31 Mind Concentration (Anderson)
32 Education in U. S. S. R. (Beatrice King)
33 The psychological method (V. G. Bhave)
34 How to win friends (Carnegie. D.)
35 History of Education (Graves.)
36 Origin of Religion (Lang. A.)
37 What is wrong with our education (Usuf.)
38 Europe in the nineteenth Century (Lipson. E.)
39 Hinduism at a glance (Nirvedanand.)
40 The struggle of Modern Man (Pearce F. G.)
41 History of the world (H. G. Wales.)
42 Men on the Moon (")
43 Arctic Home of the Vedas (B. G. Tilak.)
44 Ancient Civilisation
45 Heroes and Hero worship (Carlyle.)
46 My struggle (Adolph Hitler.)
47 Democracy and its rivals (Lloyd. C.)
48 The Discovery of India (Panditji.)
49 The Mind of Mahatma Gandhi (Prabhu & Rao)
50 The Growth of Freedom (H. M. Nevinson)
51 In Woods of Self-Realisation (Swami Ramtirth)
52 Swami Vivekanand on India & Her Problems.

अर्पण-पत्रिका

★

समाज स्फूर्ति देतो. समाज शिक्षण देतो. समाजच सामर्थ्य देतो. समाजाला, सुख, शांति नी समाधान मिळवून देण्याला समाजच समर्थ आहे. अशा ह्या सर्वसामर्थ्यवान समाजाची पुन्हां नव्यानं उभारणी करण्याचं कंकण, ज्या त्यागी स्वयंसेवकांनीं व स्वयं-सैनिकांनीं आपल्या हातीं बांधलं आहे, त्यांना त्यांच्याच स्वार्थनिरपेक्ष समाजसेवेंतून स्फूर्त झालेलं हें समाजमनाच्या उठावणीचं शब्दचित्र सादर अर्पण.

स्वयंसेवक.

साहित्यसम्राट् कै. तात्यासाहेब केळकर यांनीं दिलेला आशीर्वाद

न. चिं. केळकर

[illegible]
पुणे २

श्री   ३०।५।५०

रा. रा. वामन व्यंकटेश करंदीकर (स्वयंसेवक) यांनी समाजमनाचा ध्येयतारा या नावाचें समाजरचना संस्कृति व शिक्षण या विषयावर नवीन पुस्तक लिहिलें आहे. त्याची माहिती ग्रंथकर्त्याने मला करून दिली तिजवरून हें पुस्तक विचार प्रवर्तक व अभ्यसनीय होईल असें वाटतें तरी [illegible] प्रकाशक लोकांनी यास या ग्रंथाने सामाजिक वाङ्मयात भर पडेल.

न. चिं. केळकर

१ : अनुसंधान

पृथ्वीवरील मानवीसमाज हें एक कोडं आहे. दहा हजार, पंचवीस हजार, पन्नास हजार; मानवीसमाजाला सुरवात होऊन किती वर्षं झालीं हें आपल्याला नक्की माहीत नाहीं. त्याचप्रमाणं, हा मानवीसमाज ह्यापुढं किती वर्षं पृथ्वीच्या पाठीवर वावरणार आहे, हेंहि आपल्याला नक्की सांगतां येणार नाहीं. गतकाळांत मानवजात होती, आजहि आहे, आणि भविष्यकाळांतसुद्धां ती अस्तित्वांत राहणार आहे, हें मात्र निश्चित. जगाच्या सुरवातीपासून आतांपर्यंत, हा मानवीसमाज संख्येनं वाढतोच आहे. ह्या संख्येच्या वाढीबरोबर, मानवजातींतील आधिभौतिक सामर्थ्यंहि वाढतंच आहे. मानवीमनाचं सामर्थ्यसुद्धां एकसारखं वाढतंच आहे. कालच्यापेक्षां आजचा मानवसमाज अधिक प्रगत झाला आहे, आणि आजच्यापेक्षां उद्याचा समाज अधिक प्रगत होईल, हीच सर्वांची भावना आहे. सतत प्रगतीची चढण चढत रहायचं, हा मानवतेचा एकमेव प्रयत्न आहे. कालचं ज्ञान पायाखालीं घालायचं, आणि आजच्या ज्ञानावर पुढलं पाऊल ठेवून, उद्याच्या ज्ञानाची पाऊलवाट निर्माण करायची, हा मानवीमनाचा मंत्र आहे. पण ह्या ज्ञानाचा उद्देश काय आहे? कशाकरितां ही सारी मानवजातीची धडपड आहे? नवे नवे शोध कशाकरितां लावायचे? 'मानवीसमाजाच्या सुखाची वाढ' हेंच जर साऱ्या प्रगतीचं ध्येय असेल, तर खरोखर जगाच्या पाठीवरील समाज सुखी होत चालला आहे, हें तरी सत्य आहे का? असे विचार आपोआपच मनांत येऊं लागतात. नवीं नवीं धर्ममतं प्रस्थापित होतात, नवे नवे शोधहि लागतात, यंत्रानं मानवीसमाजाला लागणाऱ्या वस्तूंची उमाप निर्मितीहि होते. असं असूनहि मानवीसमाजांतील प्रत्येक घटक सुखी झाला आहे, असं दिसून येत नाहीं. सर्व समाज सुखी होत नसेल, तर निदान सुधारणांच्या शिखरावर असलेल्या राष्ट्रांतील व्यक्ती तरी सुखी आहेत का? जित राष्ट्रांतील समाज दुःखी असणं साहजिक

आहे. पण निदान जेत्यांच्या चेहऱ्यावर सुखाचं हास्य फुललेलं असतं, तरीसुद्धां मानवीसमाज सुखी आहे असं मानतां आलं असतं. पण जेताहि सुखी नाहीं, जितहि सुखी नाहीं; रानटी समाज सुखी नाहीं, आणि सुसंस्कृत समाजहि सुखी नाहीं; लोकशाही राष्ट्रहि सुखी नाहीं, आणि समाजसत्तावादी मानवताहि सुखी नाहीं; हें असं निराशामय वातावरण पाहिलं, म्हणजे असं वाटूं लागतं, कीं कांहीं तरी कुठं तरी चुकतं आहे. वेदकालापासून आतांपर्यंतच्या समाजाचा, स्थूलमानानं अभ्यास केल्यास, ह्या समाजांत आजवर जीं स्थित्यंतरं झालीं आहेत, त्यावरून कोणत्या काळीं समाज सुखी होता, त्या काळावर जरी अचूक बोट ठेवतां आलं नाहीं, तरी समाजाच्या दुःस्थितीचं आणि सुस्थितीचं तुलनात्मक विवेचन करतां करतां, मानवीसमाजांत कांहीं खुणा करून ठेवणं शक्य आहे. हा अभ्यास करतांना, पाश्चात्य संस्कृति आणि पौर्वात्य संस्कृति, ह्या दोन्हींचा विचार करणं जरूर आहे. तरी पण पाश्चात्य संस्कृतीपेक्षां, पौर्वात्य संस्कृति अधिक जवळची असल्यानं, जास्त लक्ष पौर्वात्य संस्कृतीकडंच वेधलं जाण्याचा संभव आहे. शिवाय आज ह्या विसाव्या शतकांत कळसाला पोचलेल्या पाश्चिमात्य यांत्रिक सुधारणांविरुद्ध, यशस्वी पौर्वात्य मानसिक आघाडी निर्माण झाली असून, आधिभौतिक सामर्थ्य नी आध्यात्मिक सामर्थ्य, ह्यांच्या युद्धांत आध्यात्मिक सामर्थ्याचा जय होण्याचीं चिन्हं दिसूं लागलीं आहेत. अशा वेळीं ह्या नव्या सामर्थ्यावर नजर खिळून राहणं साहजिक आहे. ह्या सामर्थ्याचा, गेलीं बरींच वर्षं मानवीसमाजाला विसर पडला असल्यानं, सारं सामर्थ्य आधिभौतिक सुधारणांत, शरिराच्या धडधाकटपणांत, यंत्रांच्या वाढींतच सामावलेलं आहे, अशी समाजमनाची कांहीं काल दिशाभूलहि झाली. पण भूमींत गाडलेला ज्वालामुखी, जसा एकदम उफाळून बाहेर पडतो, ढगाआड दडलेला सूर्य, ज्याप्रमाणं एकदम ढगाबाहेर येऊन, आपल्या तेजानं साऱ्या पृथ्वीला तजेला आणतो, चोहोंकडून निराशेनं वेढलेल्या वातावरणांत, अंधुक आशेचा एकच किरण, ज्याप्रमाणं निराश मनांत उल्हास उत्पन्न करतो, त्याचप्रमाणं आध्यात्मिकतेंत सामर्थ्य आहे, आणि तें सामर्थ्य आधिभौतिक सामर्थ्यावर मात करूं शकतं, ही आशा आज

मानवीमनांत उत्पन्न झाली आहे. पण लागलीच, अशा ह्या आशामय मनःस्थितींत, फिरून निराशेचा अंधकार थैमान घालूं लागतो. आध्यात्मिकतेंत जरे खरखुरं सामर्थ्य असेल, तर अध्यात्मवाद कळसाला पोचलेल्या काळांतसुद्धां, मानवीसमाज आधिभौतिक सामर्थ्यापुढं लुला पडल्याचीं, निस्तेज झाल्याचीं, होरपळून काळाठिक्कर पडल्याचीं उदाहरणं, मनश्चक्षूंसमोर उभीं राहतात. आध्यात्मिक सामर्थ्यानं व्यक्ति सुखी होत असल्या, तरी समाज सुखी होत नाहीं. आधिभौतिक सामर्थ्यानं, समाजांतील एक गट, कांहीं काल सुखी झाल्याचा भास झाला, तरी अखिल मानवीसमाजाचं सुख, त्यानंहि साधलं जात नाहीं. अशा परिस्थितींत मानवीसमाजाचं सुख साधण्याकरितां कोणत्या गोष्टींचा आधार घेतला पाहिजे, ह्याचा विचार करणं अस्थानीं होणार नाहीं.

एवढ्याचकरितां, वेदकालापासून तों तहत आधिभौतिकज्ञानाचा आर्यावर्तांतील समाजमनाशीं संघर्ष उत्पन्न होईपर्यंतच्या कालांत, नुसतं आध्यात्मिक सामर्थ्य केव्हां प्रबळ ठरलं, नुसत्या आधिभौतिक तत्त्वज्ञानाला केव्हां जोर आला, आणि आध्यात्मिक नी आधिभौतिक तत्त्वज्ञानांचा मधुर मिलाफ झालेल्या कालांत, समाजाची परिस्थिति काय होती ह्याचा स्थूलमानानं आधीं अभ्यास करावा. नंतर ज्याला आपण ' आज ' म्हणू शकूं अशा कालांत कोणती परिस्थिति निर्माण झाली, त्या परिस्थितींतून वेगवेगळीं आंदोलनं होऊन अखेर कोणत्या विचारसरणीचा समाजमनावर पगडा बसला, आधिभौतिक वादावर खिळलेल्या विचारसरणीचा मध्य कसा ढासळूं लागला, आधिभौतिकतेमुळं समाजमनावर खरोखरच अनिष्ट परिणाम झाला असल्यास, त्याचीं मूळ कारणं कोणतीं, ह्याचा विचार करणं जरूर आहे. ह्या दोन्ही काळांचा अभ्यास करीत असतांना, मध्येंच जीं वेगवेगळीं धर्ममतं प्रस्थापित झालीं, त्या त्या धर्मप्रवर्तकांच्या नजरेपुढं कोणतं ध्येय होतं, ह्याचा विचार करून, साऱ्या मुख्य धर्ममतांचं सारसर्वस्व काय आहे, याचाहि उहापोह करावा लागेल. ' आज ' ह्या कालखंडांत झालेल्या यांत्रिक सुधारणांचा आत्मा कोणता, ह्या यांत्रिक सुधारणांनीं समाजमनं भारून जाण्याचीं कारणं कोणतीं, आणि अखेर ह्या यांत्रिक सुधारणांच्यामागं लागलेल्या समाजालासुद्धां ह्यांचं भय कां वाटूं

लागलं, ह्याचीं कारणं शोधून काढणं आवश्यक आहे. इतकी अव्यत तयारी झाल्यानंतर, उद्यांचा मानवीसमाज कशा तऱ्हेचा असला पाहिजे, त्याचा विचार करणं सोपं जाईल. ह्या साऱ्या गोष्टींचा अभ्यास करतांना, व्यक्तिनिष्ठेनं भारून जाणं जितकं अयोग्य आहे, तितकंच त्या त्या काळच्या प्रौढ समाजमनाबरोबर वाहवत जाणंहि अनिष्ट आहे. समाजांत रूढ असलेल्या विचारप्रवाहांचा अभ्यास, प्रौढमनावर अवलंबून असला, तरी हीं प्रौढमनं, बाळपणीं ज्या वातावरणांत वावरत होतीं, त्या वातावरणाचे ठसे, त्यांच्या मनावर उमटल्यानं, वेळोवेळीं निर्माण झालेली परिस्थिति बाळमनांच्या आरशांत कशीकशी प्रतिबिंबित झालेली आहे, हें दृश्य पाहणंसुद्धां विचारप्रवर्तकच होईल. अशा तऱ्हेनं दृष्टीस पडेल तें समाजमनाचं प्रतिबिंब पहात, मानवीसमाजांत होत असलेल्या आंदोलनांचा मागोवा घेत, समाजाचं आत्यंतिक सुख कशांत आहे ह्याचा शोध लावीत, धिमेपणानं समाजमनाच्या ध्येयताऱ्याच्या दिशेनं जाण्याचा प्रयत्न, कशा तऱ्हेनं केला पाहिजे, ह्याचा ऊहापोह आपल्याला करावयाचा आहे.

हें जग म्हणजे मायेचा पसारा आहे, असं म्हणून, आपलं खरंखुरं समाधान होत नाहीं. जगाच्या सुरवातीला निर्गुणनिराकार परब्रह्माच्या हुंकाराबरोबर पुरुष नि प्रकृति असं पहिलं जोडपं जगांत निर्माण झालं असं म्हणा, आदम नी ईव्ह हे अखिल जगाचे निर्माते आहेत असं म्हणा, अगर डार्विनच्या संशोधनाच्या अनुरोधानं, माकडांतून माणसांची उत्पत्ति झाली असं माना. माणसाची उत्पत्ति कशी झाली ह्या विचाराला महत्त्व नसून, जगाच्या पाठीवरील मानवीसमाजांत, सुख, शांतता नी आनंद, ह्यांची समृद्धि कशी होईल, ह्याचा विचार करणं अधिक महत्त्वाचं आहे. मानवाला मिळालेल्या बुद्धीच्या जोरावर, मानवानं, आजवर, जगांत एकाहून एक, असे बुद्धीचे चढते विक्रम करून दाखविले आहेत. पहिल्या मानवाला बोलायचं कसं ह्याचासुद्धां शोध लावावा लागला. पण आज पृथ्वीच्या ह्या टोकावरील माणूस, पृथ्वीच्या दुसऱ्या टोकावरील माणसाशीं बोलूं शकतो. हवेंत तरंगणं, पाण्याखालीं कित्येक तास सुखानं वावरणं, वाळवंटांत रम्य बगीचे उभारणं, अणुशक्तीच्या

जोरावर ज्वलंत ज्वालामुखी निर्माण करणं, अशा तऱ्हेच्या, अगदीं अशक्य वाटणाऱ्या कित्येक गोष्टी, आज मानवीसमाजाच्या रोजच्या व्यवहारांतल्या सामान्य गोष्टी झाल्या आहेत.

•

जगांतला पहिला मानव, किंवा जगांतलं पहिलं जोडपं कुठून आलं, तें जोडपं जगांत आल्यावर लहानाचं मोठं झालं, का एकदम एक मोठं जोडपं जगांत अवतीर्ण झालं, खगोलांतील एका गोलावर, मानवानं एकसत्ता प्रस्थापित केल्यानंतर, सुधारणेच्या कळसाला पोंचलेल्या त्या गोलावरील सुधारणेंतून निर्माण झालेल्या नखशिखांत गुलामगिरीचा वीट येऊन, निसर्गनिर्मित स्वातंत्र्यांत पुन्हां एकदां पहिल्यापासून आयुष्याला सुरवात करण्याच्या निष्ठुर निश्चयानं बाहेर पडलेले, ते दोघे हताश प्रवासी होते, का लवकरच अस्तित्वांत येणाऱ्या रानटी मानवजातीचे ते जनक होते, रामायणांतील रामसीतेच्या वर्णनाप्रमाणं ते सात ताड उंच होते, कां दशमुखी रावणाप्रमाणं त्यांना खरोखरच दहा तोंडं होतीं, कां लिलिपुटमधल्या रहिवाशांप्रमाणं ते अंगुष्ठमात्र होते, ह्याचा काथ्याकूट करण्याचा आपला उद्देश नाहीं.

आतांपर्यंतचा, मानवीसमाजाचा काल, एका प्रचंड कालयंत्रावर मोजला जात आहे, अशी आपण कल्पना केली, तर वैदिक कालापासून आतांपर्यंतच्या कालांत, त्या कालयंत्राच्या लंबकाचा एक झोका पूर्ण होत आला आहे, असं आपल्याला म्हणतां येईल. 'वैदिक काल' हें त्या लंबकाचं एक टोक मानलं तर 'बुद्ध काल' हें त्या लंबकाचं विरुद्ध टोक मानावं लागेल. दरम्यानच्या स्मृतिपुराणकालीन समाजांत कोणतीं आंदोलनं झालीं, ह्या आंदोलनांचा समाजमनावर विपरीत परिणाम होऊन ह्यांतूनच वैदिक धर्माविरुद्ध बौद्धधर्मीय विचारसरणीची प्रचंड लाट निर्माण होऊन, त्या लाटेसरशीं सारा वैदिकधर्म पृथ्वीवरून नामशेष होतो कीं काय ' अशी भीति निर्माण होण्याइतकं सामर्थ्य ह्या नव्या तत्त्वज्ञानांत कसं निर्माण झालं, पण थोड्याच काळांत, ह्या बौद्धधर्माची लकाकी लयाला कां गेली, आणि फिरून वैदिकधर्माची विचारसरणी, समाजमनाला पटतांच, आर्यावर्तांत वैदिकधर्माचा, त्यागाचा भगवा झेंडा, डौलानं कसा फडकूं लागला,

ह्याचा विचार करतांना मनाला उल्हास वाटेल. ह्याच वैदिक विचार-सरणीच्या समकालीन आणि सारख्या तोलाच्या क्रीट व ग्रीक तत्त्वज्ञानाच्या विचारसरणीनंतर, पाश्चात्य देशांत उत्पन्न झालेल्या ख्रिस्त तत्त्वज्ञानाच्या विचारसरणीनं, मानवी मनावर विशिष्ट पकड कां घेतली नाहीं, आणि त्यामुळं, आधिभौतिक विचारसरणीचं प्राबल्य, समाजांत कसं निर्माण झालं ह्याचा उहापोह मनोरंजक नी मार्गदर्शक होईल.

ह्या विसाव्या शतकांत, आर्यावर्तांत निर्माण झालेलं नवं तत्त्वज्ञान, कितपत सामर्थ्यवान् आहे, ह्याचा अभ्यास करण्यानं, आपल्याला पुढला मार्ग आखतां येईल. विचारपद्धतीची नवी पाऊलवाट निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. ही विचारसरणी निर्दोष होणार आहे अशी खात्री नाहीं. पण नव्या विचारसरणीची मांडणी झाली, म्हणजे त्यांतून शुद्ध विचार-सरणीला चालना मिळेल, आणि मग मानवी समाजाचं आत्यंतिक सुख नजरेपुढं ठेवून, समाजमनाची उठावणी करण्याचा योग्य प्रयत्न समाजा-कडून होईल. सुरवातीपासून अखेरपर्यंत, समाजमनविकासाचा आढावा घेतल्यानंतर अध्यात्म श्रेष्ठ, कां आधिभौतिकता श्रेष्ठ, बालमनविकास महत्त्वाचा, कां प्रौढमनांत बदल घडविणं अधिक महत्त्वाचं, 'परत निसर्गाकडं' ही घोषणा आचरणांत आणली पाहिजे, कां यांत्रिक सुधारणा कळसाला पोचविली पाहिजे, हें समाजमनानं ठरवायचं आहे. गतकालांत " असं होतं, आज हें असं आहे, आणि उद्यां हें असं होणं इष्ट आहे. ह्या त्रिकालीन विचारसरणींतल्या ग्राह्य गोष्टी, समाजानं वाढीला लाव-ल्यास, समाजमनांत क्रान्ति होईल, आणि ह्या क्रान्तीमुळं, अखिल मानव-जात सुखी होईल अशा आशेनं मानवीसमाजांतील अगदीं सुरवातीपासून अखेरपर्यंतच्या साऱ्या स्थित्यंतरांचा अभ्यास करण्याकरितां, पृथ्वीवरील पहिल्या मानवाच्या वेळेपासून प्रारंभ करूं या.

—*—

२ : प्रगतिपथ

पृथ्वीवरील पहिला मानव कसाहि असो, कुठंहि असो, तो आजच्या-पेक्षां अधिक सुखी असावा. भूक लागल्यावर खावं, तहान लागल्यावर प्यावं, आणि झोप येतांच झोपावं. खरोखर असं वाटतं, कीं आपल्याला, ह्या अफाट पृथ्वीवर, निसर्गाच्या सहवासांत असं एकाकी राहतां येईल, तर किती बहार होईल! खायला झाडावरील पिकलेलीं फळं, प्यायला झऱ्याचं स्वच्छ नी मधुर पाणी, आणि बागडायला चौफेर फुललेलं नी निसर्गसौंदर्यानं नटलेलं अमर्याद रान! किती असीम आनंद हा!

सूर्योदयाच्या वेळीं उगवत्या सूर्याची वाट पहात बसावं, आकाशांतील रुपेरी ढगांची सोनेरी किनार पाहून आनंदानं उल्हसित व्हावं. निर-निराळ्या आकाराचे रंगीबेरंगी ढग, सूर्योदयापूर्वी उगवत्या सूर्याच्या तेजो-मय किरणांनीं उजळून निघतांच त्यांच्या दर्शनानं क्षणभर देहमान विसरावं. थोड्या पावसानंतर सप्तरंगी इंद्रधनुष्य आकाशांत दिसतांच, एकमेकांत मिसळलेले हे सात रंग आकाशांत कुठून आले, कसे आले, केव्हां आले ह्याचा विचार चालू व्हावा; इतक्यांत ते पुसट होत होत नाहींसे व्हावे; आणि मग ते कुठं गेले, कसे गेले, केव्हां गेले, ह्याचा विचार सुरू व्हावा. तेवढ्यांत फिरून आकाशांत गडगडाट व्हावा, वीज कडाडावी, आणि पाऊस पडू लागावा; उघड्या अंगावर पडणारे पावसाचे थेंब मोत्यासारखे चमकत असलेले पहात असतांनाच, निसर्ग-निर्मित कारंजाखालीं स्वच्छ अभ्यंगस्नान घडावं. पाऊस थांबला तर अंग कोरडं होतंच आहे; पाऊस बेसुमार झोडपू लागला, तर एखाद्या निसर्गनिर्मित आडोशाला, पाऊस ओसरेपर्यंत उभं रहावं. अंग फारच गारठलं असेल, तर हातावर हात घासून आणि अंगावरून हात घसाघस चोळून, उष्णता उत्पन्न करावी. त्यावेळींच जर सूर्य प्रकाशू लागला तर आतपस्नान करावं. अग्नीची कल्पनाहि नसलेल्या ह्या रानटी अवस्थेंत, हे सूर्याचे किरण किती आल्हाददायक वाटत असतील! सूर्यनारायणाबद्दल

मानवीमनांत आदर ह्याच रानटी कालांत उत्पन्न झाला, आणि इथूनच सूर्यनारायणाच्या मानसपूजेला प्रारंभ झाला असावा. सूर्य जसजसा जास्त वर येऊं लागेल, तसतसे त्याच्याकडे, त्याच्या गतीकडे त्याच्या किरणाकडे पहात बसता बसता किती वेळ गेला ह्याची त्या पहिल्या मानवाला, आपणां सर्वांच्या आदिपुरुषाला, कधीं कल्पनाहि येत नसेल. स्वस्थ बसण्याचा कंटाळा आला कीं फिरूं लागावं; निसर्गनिर्मित फुलांकडे पहावं; एकादं फूल तोडावं; तें फूल हातांत असतांनाच सहज तो हात तोंडावर बसलेलं फुलपांखरूं उडविण्याकरितां तोंडाकडे जावा; तें फूल चावण्याकरितां दातांत धरलं जावं आणि त्याच वेळीं नाकाला त्याचा सुवास यावा; त्या सुवासानं मन उल्हसित व्हावं; फिरून तोच सुवास अनुभवण्याचा मोह उत्पन्न व्हावा, आणि हातांतील तेंच फूल पुनःपुनः नाकाशीं धरून हुंगावं; एकादी नवी गोष्ट समजली कीं ती पुनःपुनः करून आत्मसात् करावी, हें जें शिक्षणाचं आद्यतत्त्व तें पहिल्या अवस्थेतील रानटी माणसानं, अगदीं जगाच्या सुरवातीलाच, आत्मसात् केलं असलं पाहिजे. नवीन नवीन गोष्टी शिकणं, त्या आत्मसात् करणं, आणि त्यांच्या पायावर आधारलेल्या नव्या गोष्टींचा शोध लावणं, हेंच शिक्षण. आणि ह्या शिक्षणाला रानटी अवस्थेतील वास घेण्याच्या कलेपासून खरीखुरी सुरवात होते. असो.

आनंदानं बागडतां बागडतां, भूक लागल्यास, झाडावर चढावं; गोड लागतील तीं फळं खावीं, ह्या झाडावरून त्या झाडावर, त्या झाडावरून ह्या झाडावर, उड्या मारता मारता, निसर्गानं निर्माण केलेल्या आहाराचा मनमुराद आस्वाद घ्यावा; आणि मग झोप आल्यास धरित्रीमातेच्या गवताळ गालिचावर कुठंहि झोपावं. जिकड तिकड निसर्ग! खरोखर पहिल्या मानवाला निसर्गाचा, स्वातंत्र्याचा, मनमुराद मोकळेपणाचा वीटहि आला असेल!

एकटेपणाचा वीट येताच, आपल्या सहचारिणीबरोबर हसावं, बागडावं, तोंडानं निरनिराळे आवाज करावे, तिचे हात आपल्या हातीं घ्यावे तिच्याबरोबर मनमुराद नाचावं, तिच्या मांडीवर डोकं ठेवून तिच्या

तोंडाकडे पहात तिच्या अंगाशीं खेळावं. आदिमातेच्या, जगज्जननीच्या अंगाला अंग लागताच विजेचा प्रवाह अंगांतून गेल्याप्रमाणं रोमरोमांतून कसल्या तरी सुखसंवेदना निर्माण व्हाव्या. वस्त्राचा आडपडदा नाहीं, तिसऱ्या माणसाची लाज नाहीं, स्त्रीपुरुषांतील भेदभावाची कल्पना नाहीं, अशा परिस्थितींत परिपूर्ण मोकळेपणानं वावरणाऱ्या ह्या दोन जीवांचं सहजगत्या निर्हेतुकपणानं झालेलं मधुरमीलन किती सहजसुंदर किती नैसर्गिक नी किती आल्हाददायक असेल !

स्वजातीयांची वाढ (Propagation of the species) हा निसर्ग-नियम आहे. आज पृथ्वीच्या पाठीवर मानवजातीची बेसुमार वाढ झालेली आहे. त्यामुळं जीवनकलह अत्यंत अवघड होत चालला आहे. ह्या बेसुमार वाढीला वेळींच आळा घातला नाहीं, तर जीवनकलह आजच्यापेक्षांहि भयंकर उग्र स्वरूप धारण करील, अशी भीति वाटत आहे; म्हणूनच माणसांची बेसुमार वाढ थांबवून, आहेत त्या मानवांचं जीवन सुखी करण्याकड समाजशास्त्रज्ञांचं लक्ष वेधलं जात आहे. अशा जगाच्या अवस्थेंत प्रजोत्पादनाचं मूळ महत्त्वच आज नाहींसं झालं असलं, तरी मानवतेच्या प्रथमावस्थेंत, स्वजातीयांची वाढ, हें एक आयुष्यांतील मुख्य उद्दिष्ट झालं असलं पाहिजे असं दिसतं. वैदिक विवाह-संस्कारामधील कन्यादानाच्या वेळच्या मंत्रांत कन्येचा पिता आपल्या कन्येला पतीच्या स्वाधीन करतांना इतर उद्देशांबरोबर प्रामुख्यानं 'प्रजोत्पादनार्थं इमां कन्यां तुभ्यमहं संप्रददे' असा मंत्र म्हणून, कन्यादान करीत असतो, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हल्लींच्या काळींसुद्धां, ज्या राष्ट्रांत, प्रजेची वाण असते; युद्धामुळं, रोगांमुळं, अगर अन्य कारणांनीं ज्या वेळीं राष्ट्राच्या संख्येंत बेसुमार घट होते, त्या वेळीं स्वजातीयांची वाढ करण्याकरितां, प्रत्येक राष्ट्राकडून, राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांना, पैशाच्या रूपानं, गौरवाच्या रूपानं, मदतीच्या रूपानं, प्रोत्साहनच दिलं जातं. मानवतेच्या अफाट आणि उफाप वाढीच्या ह्या विसाव्या शतकांत, स्वजातीयांच्या वाढीला जर इतकं महत्त्व आहे, तर जगाच्या सुरवातीला, ज्या वेळीं ह्या पृथ्वीवर प्रकृति नी पुरुष असे दोनच जीव अस्तित्वांत

होते, त्या वेळीं त्यांच्या हातून सहजासहजीं झालेल्या स्वजातीयांच्या वाढीला किती महत्त्व आलं असेल, ह्याची कल्पनाच होणं शक्य नाहीं.

लहान मूल, मग तें कुणाचंहि असो! किती बरं वाटतं त्याला पाहतांच! त्यांत पहिल्या मानवाचं पहिलं मूल. तें गोजिरवाणं बालक! त्याचं तें चिमुरडं नाक, ते लुकलुकणारे डोळे, ते छोटे छोटे हुबेहुब आपल्यासारखे सारे अवयव! किती आश्चर्य वाटलं असेल त्या आईबापांना! त्या गोंडस बालकाकड कितीतरी वेळ अनिमिष नेत्रांनीं पहातच राहिले असतील ते दोघे! पुढं तें बालक भुकेनं रडूं लागतांच, त्या मातेला पान्हा फुटला असेल, आणि निसर्गनियमाप्रमाणं त्याला पाजीत असतांना तिला होत असलेल्या मातृप्रेमाच्या सुखसंवेदनांनीं तिच्या चित्तवृत्तींचा लय लागला असेल. त्या गोजिरवाण्या बालकावर प्रेम डवरताना त्या दोघां मातापितरांना खराखुरा आत्मानंद अनुभवता आला असेल. त्या बालकाचं संरक्षण करण्याकरितां तीं दोघं आपल्या जिवाकडदेखील पहात नसतील, विशेषतः ही जबाबदारी आदिमायेची असल्यानं, तिला पोसणं, तिला त्रास न होऊं देणं, तिच्या सुखासाठीं झटणं, ह्या गोष्टी आपोआपच पुरुषानं आपल्याकड घेतल्या असतील. स्त्री ही अबला आहे, तिच्यावर पुरुषाची सत्ता आहे. ती सर्वस्वी परावलंबी आहे. ह्या आधुनिक कालांतील हिणकस कल्पनांनीं भारल्यामुळं नव्हे, तर खरोखर तिच्याबद्दल आदर वाटत असल्यामुळंच, स्त्रीनं निर्माण केलेल्या ह्या बालकरूपी चमत्कृतीनं भारला जाऊनच पुरुषानं स्त्रीला त्यावेळीं आधार दिला असला पाहिजे; तिला सुखविण्याकरितां तो झटत असला पाहिजे. ह्या पहिल्या मानवानं जगजननीला दिलेल्या आधाराचं आज अबलांच्या गुलामगिरींत रूपांतर झालं, ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट आहे.

जगाच्या सुरवातीला मनुष्यप्राण्याला ज्या ज्या शक्तींचा चमत्कार वाटला, ज्या ज्या शक्तींबद्दल आदर उत्पन्न झाला, ज्या ज्या शक्तींचं कोडं त्याला सहजासहजीं सोडवता आलं नाहीं, त्या त्या शक्तींना विशेष मानून तो त्यांची मानसपूजा बांधूं लागला. उगवत्या सूर्याबद्दल त्याला आदर वाटे. आकाशांतील कडकडाटाची त्याला भीति वाटे. एकदम

उत्पन्न होणाऱ्या वाऱ्याचं त्याला आश्चर्य वाटे, पृथ्वीवरील अफाट पाण्याच्या पसाऱ्याबद्दल त्याला कौतुक वाटे, आणि अनंत आकाशाकडे पाहताना त्याची मति गुंगून जाई. मानवजातीला पहिला आदर जर कशाबद्दल वाटला असेल तर ह्या पंचमहाभूतांबद्दल. बाहेरील ह्या पांच प्रचंड शक्तींबद्दल ज्याप्रमाणं मानवीमनांत आदर उत्पन्न झाला, त्याच-प्रमाणं स्वजातीयांची वाढ करण्याची आपल्यांतील म्हणजे मानवांतील जी अलौकिक शक्ति; त्याबद्दलहि त्याच्या मनांत आत्मिक शक्तीचा स्फुल्लिंग त्याचवेळीं जागृत झाला असावा. ह्या आत्मिक शक्तीची जाणीव ज्यावेळीं उत्कटतेनं मानवीमनाला झाली; त्याच वेळीं मानव-जातीच्या प्रगतीला झपाट्यानं सुरवात झाली असावी. आत्मविश्वासा-शिवाय ज्ञानाची पायाशुद्ध प्रगति होत नसते.

मानवजातीच्या सुरवातीला जसजशी एकेक नवी गोष्ट पहिल्या मानवाला समजूं लागली, तसतसा त्याचा आत्मविश्वास वाढूं लागला. पहिलें बालक जन्माला येतांच आनंदाच्या भरांत केलेले निरनिराळे आवाज किंवा त्यापूर्वी-सुद्धां आनंद, शोक वगैरे मनोवृत्ति दाखविणारे आवाज, हीच मानवजातीच्या भाषेची सुरवात असावी. प्रथम हुंकार. हुंकारांतून 'अहं' आणि 'अहं' मधून 'अः'. त्यानंतर रे, अरे वगैरे आश्चर्यवाचक नी भावनादर्शक अर्थानुकारी उद्गारांची आपोआपच निर्मिति झाली. भाषेच्या प्रथमा-वस्थेंत जे जे नवीन आवाज माणूस करूं लागे, ते ते आवाज आत्मसात् करण्याकरितां त्या सुरवातीच्या अवस्थेंत माणसाला किती प्रयास पडत असतील ह्यांची आपल्याला, हल्लींच्या बालकाच्या नवीन बोल बोलण्याच्या प्राथमिक अवस्थेंतील प्रयास पाहून, थोडी तरी कल्पना येईल. हल्लींच्या बालकाकरितां तयार भाषा आहे. भाषा शिकण्याकरितां, अनुकार करण्या-करितां, आसपास बोलणाऱ्या व्यक्ती आहेत. भाषा शिकविण्याकरितां उत्तम मायबोली बोलविणारी, अष्टौप्रहर त्या अबोल बालकांशीं बोलत राहणारी माता सदासर्वदा त्याच्या सन्निध तयार आहे. पहिल्या बालकाला तयार भाषा तर नव्हतीच. पण त्याच्या आईवर मात्र नवी भाषा निर्माण करण्याची जबाबदारी होती. आज आपल्याजवळ भाषा शिकण्याकरितां लागणारीं सारीं साधनं आहेत. शुद्धलेखन, व्याकरण, अलंकार, व्युत्पत्ति,

सारं सारं कांहीं लिहून छापून तयार आहे. असं असूनसुद्धां एकादी भाषा आत्मसात् करणं, विशेषतः परकी भाषेवर प्रभुत्व मिळविणं, किती कठिण आहे, ह्याची आपल्याला कल्पना आहे. पण ज्यावेळीं भाषेचंच अस्तित्व नव्हतं, त्यावेळीं निर्माण झालेले शब्द आत्मसात् करायला किती वेळ लागला असावा, तयार झालेली मायबोली जिवंत ठेवण्याकरितां रोजच्या रोज पाठ घेण्याची त्या निरक्षर बिनबोल काळांत किती जरुरी होती, आणि हा सारा समाजविकास साधण्याकरितां, त्या पहिल्यावहिल्या मानवांना किती श्रम करावे लागले असतील, ह्याचा विचार डोक्यांत आला, कीं मन आपल्या पूर्वजांबद्दलच्या कृतज्ञतेनं ओसंडून दुथडी वाहू लागतं.

ह्या सर्व गोष्टी पहिल्या मानवांनीं केल्या त्या नाइलाज म्हणून नव्हे, जरुरी होती म्हणूनच केवळ नव्हे, तर आपल्यामध्यें इतर चराचर जीवसृष्टीपेक्षां विशेष कांहींतरी आहे, असा आत्मविश्वास त्या वेळीं पहिल्या मानवीमनांत उत्पन्न झाला होता म्हणून. हा आत्मविश्वास उत्पन्न व्हायला इतर नव्या गोष्टी निर्माण केल्याच्या जाणिवेपेक्षां, आपल्याला स्वजातीयांची स्वेच्छेनं वाढ करता येते ही जाणीवच मुख्यतः कारण झाली असली पाहिजे.

पहिलं बालक जन्माला येतांच पहिल्या मानवाच्या संसाराला अशा तऱ्हेनं सुरवात झाली. संसाराचा पसारा झपाट्यानं वाढूं लागला. हसावं, खेळावं, बागडावं, आपल्या मुलांना झाडावर चढायला शिकवावं, पोहायला शिकवावं, पळायला शिकवावं. पळता पळता एकाद्या मुलाच्या पायांत काटा बोचला, तर तो काटा उपसून काढावा, रक्त आलं कीं भांबावून जावं, अस्वस्थ व्हावं, हातांनीं रक्त थांबून धरावं, रक्त थांबतांच फिरून त्या मुलाला आपल्याबरोबर घेऊन चालू लागावं, कांहीं वेळ चालून गेल्यावर फिरून मध्येंच थांबून त्याचा पाय पहावा आणि त्या रक्तावर माती चिकटलेली पाहून, रक्त थांबविण्याकरिता मातीचा उपचार करता येतो, असा विचार मनांत यावा, इतर मुलांना तो उपचार प्रत्यक्ष कृतीनं दाखवावा आणि नवा उपचार समजल्याचा आनंद घ्यावा.

पहिल्या मानवाला दुःख नव्हतं असं नाहीं. पाय दुखत असेल तर पायाला माती लावावी, पायावर कोरडी माती हातात नसेल तर ती भिजवून लावावी, थोरांचं हें अनुकरण मुलांनीं करावं आणि पुढं पुढं, दुःख झाल्यास मातीचा लेप द्यावा, ही क्रिया दृढमूल व्हावी. किती सहज-संशोधन हें ! मृत्तिकोपचाराचं मूळ ह्या मानवाच्या पहिल्या जखमेंत आहे. मातीनंतर गवत, गवतानंतर पाला, पाल्यानंतर रस, त्यानंतर रसायनं, गुटिका, भस्मं, अशीच वैद्यकाची प्रणाली मानता येणार नाहीं का ?

हल्लींच्या युगांत बुद्धीची कमालमर्यादा गाठून शास्त्रज्ञ संशोधनाची धडपड करीत असतात; ते आपल्या आयुष्याचं सारसर्वस्व पणाला लावतात, देहभाव विसरून जातात; कदाचित आयुष्याच्या अखेरीस एकादा नवीन शोध लावतात, अगर आपल्या प्रयत्नांत यश न मिळविता अखेर मरून जातात. जगाच्या सुरवातीला प्रत्येक गोष्टच नवीन असल्यानं चालता बोलतांना घडणारी प्रत्येक गोष्टच संशोधनवजा होती. आज एकाद्या संशोधकानं एकादं संशोधन केलं, कीं त्याचा साऱ्या जगभर गाजावाजा होतो, त्याचं हक्क-संरक्षण निर्माण होतं, त्याला त्याबद्दल योग्य पारितोषिकहि दिलं जातं. आजकालचं संशोधन अत्यंत अवघड आहे हें खरं. संशोधन अशक्यप्राय होण्याइतकीं अगणित संशोधनं झालीं आहेत हेंहि खरं. तरी पण आजकालचीं सारीं संशोधनं पैशाकरितां, कीर्तीकरितां, आपला मोठेपणा सिद्ध करण्याकरितां अगर मानवजातीच्या सुस्थितीच्या नी प्रगतीच्या उद्देशानंच केलीं जातात. प्राचीनकाळीं संशोधनं केलीं जात नसत, तीं आपोआप होत असत; म्हणून त्यांचं महत्त्व अधिक आहे. सुखानं राहता राहता वाटेंत येणारीं दुःखं आणि संकटं दूर करण्याकरितां संशोधन सहजासहजीं झालं तर तें त्यावेळीं हवं होतं. आज संशोधन करणारे शास्त्रज्ञ संशोधनाकरितां स्वतःची गांजणूक करून घेतात, आणि स्वतःबरोबर आपल्या कुटुंबियांची पण गांजणूक करितात. ह्या गांजणुकीला त्यागाचं आवरण चढवून आपण त्यांचा उदेउदे करतो. पण मानवतेच्या आद्यसंस्थापकांच्या हातून हें जें प्रचंड संशोधन झालं, तेंच मानवजातीच्या खऱ्याखुऱ्या प्रगतीचं उगमस्थान आहे.

एकाद्या दिवशीं एकाद्या मुलानं अजाणतेपणानं एकादं पचायला जड असलेलं फळ खाल्लं. त्याचं योग्य वेळीं पचन न झाल्यानं त्या दिवशीं त्या मुलानं इतर कांहींहि खाल्लं नाहीं. झऱ्याचं स्वच्छ पाणी पिऊन तो पडून राहिला. एवढ्या साध्या घटनेवरून लंघनचिकित्सेसारख्या प्रचंड शास्त्राची सुरवात झाली असावी, असं मानणं अस्थानीं होणार नाहीं.

जवळपासच्या वेळवाच्या बेटाला निसर्गानं आग लागली. आपलीं हीं सर्व माणसं आईबाप नी मुलं, वणवा पहायला गेलीं; ती आग आपोआप विझल्यानंतर त्यांनीं त्यांतला एकादा निखारा मौजेनं बाहेर ओढला. त्यावर एक लाकूड ठेवलं; तें लाकूड जळू लागलं; पुन्हा दुसरं लाकूड त्या आगींत टाकलं; तेंहि जळू लागलं, त्याची उष्णता भासू लागली; एक नवी गम्मत आपल्याला मिळाली म्हणून त्यांना हर्ष झाला असेल त्यावेळीं. ज्या सूर्याच्या उष्णतेमुळं आपल्याला कित्येक वेळां आनंद होतो, त्या सूर्याचाच हा एक भाग आपल्याला मिळाला, अशीहि कल्पना कदाचित् पहिल्या मानवाला आली असेल. सूर्याचं येणं जाणं आपल्या हातीं नाहीं, पण ह्या चिमुकल्या सूर्याला मात्र आपल्याजवळ बाळगता येतं, आपल्या ताब्यांत ठेवता येतं, म्हणून हा छोटा सूर्य त्यांनीं आपल्या घरीं नेला असेल; त्याला इंधन देऊन त्याची जोपासना केली असेल, हाच अग्निहोत्राचा उगम. ज्यावेळीं आगपेट्या नव्हत्या, ज्यावेळीं विजेची ठिणगी नव्हती, त्यावेळीं मिळालेला हा अग्निस्फुलिंग जतन करणं अतिशय जरूर होतं. अग्निहोत्रांतून चकमक, चकमकींतून दिवा, दिव्यांतून आगपेटी, आगपेटींतून विजेची ठिणगी, अशी ही मालिका पाहिली म्हणजे मनाला मौज वाटते. सूर्याप्रमाणंच ह्या छोट्या सूर्याची उपासना करणं ही कल्पना आज विचित्र वाटत असली तरी रानटी कालांत ही उपासना अनुचित होती असं कोणालाहि वाटणार नाहीं.

त्या कालीं रोगराई नव्हती; रोगाचं कारणच नव्हतं; सात्त्विक आहार; स्वच्छ हवा; निर्मळ पाणी; आणि नैसर्गिक राहणी. काळजी नाहीं; अति-श्रमाचं नांव नको, कमी श्रमाची भीति नको. सर्वांना शंभर टक्के स्वातंत्र्य. अशा परिस्थितींत शरीरयंत्रांत अवेळीं नी अचानक बिघाड क्वचितच

होत असे. प्रजा वाढत चालली असली तरी प्रत्येकाची अंगकांति सतेज, कारण निसर्गाविरुद्ध आचरण कुणाच्याहि हातून होण्याचा संभव नव्हता. मृत्यु म्हणून एक भयंकर चीज असून त्याच्या भीतीनं सारं जग हादरतं; त्याच्या भयानं माणसाचं आयुष्य कमी होतं; मृत्यूच्या भयानं आपापसांत तंटे होतात; मृत्यूच्या भयानं मनुष्यजात स्वार्थी बनते; मृत्यूच्या भयानंच केवळ मनुष्याच्या मनांतील सैतान जागा होतो; अशा ह्या सर्वव्यापी मृत्यूच्या अस्तित्वाची जाणीव अद्याप त्यावेळीं मानवी मनाला झालेली नव्हती.

मृत्यु सर्वसंहारक आहे. मृत्यु क्रूर आहे. मृत्यु निष्ठुर आहे. मृत्यूला दयामाया नाहीं. मृत्यु म्हणजे जीवहत्या करणारें एक यंत्र आहे. मृत्यु कोणालाहि सुटलेला नाहीं. एवढ्याच करितां, जगांतील साऱ्या तत्त्वज्ञांची, मृत्यूवर मात करण्याची खटपट चालली आहे. ह्या तत्त्वज्ञांनीं प्रयत्नांची शिकस्त केली असूनसुद्धां अद्यापपावेतों कुणालाहि यश आलेलं नाहीं. अमरत्वाच्या दंतकथा पुष्कळ आहेत. अश्वत्थामा, बळी, व्यास, हनुमान, बिभीषण, कृप नी परशुराम हे सात चिरंजीव आहेत असं आपण म्हणतो. पण ह्या सात चिरंजीव मानवापैकीं एकहि आपणापैकीं कुणालाहि कधींहि भेटल्याचं ऐकिवात नाहीं. त्याचप्रमाणं अमृत निर्माण करण्याकरितां देवदानवांनीं समुद्रमंथन करून त्यांतून महत्प्रयासानं अमृताची पैदास केली. देवांच्या हातीं हा अमृताचा कुंभ पडला आणि देव अमर झाले, असंहि पण आपण कथांतून वाचलं आहे. ह्या अमर देवापैकीं एकहि देव कधीं कुणाला भेटल्याचा पुरावा मिळत नाहीं. अतिप्राचीन काळीं मरण अस्तित्वांत नव्हतं, त्यावेळीं जगांत अतिशय गर्दी झाल्यामुळं मरणाचा वर मानवानं मागून घेतला अशीहि एक कथा पुराणांत आलेली आहे. कांहींहि असलं तरी आजच्या वस्तुस्थितीवरून असं स्पष्ट मानायला हरकत नाहीं कीं मृत्यूला अद्याप कुणीहि गवसणी घातलेली नाहीं.

तत्त्वज्ञान्यांनीं मृत्यूवर मात केली आहे खरी, पण ती मृत्यूला न भिण्यांत. देहाला मृत्यु आहे, पण मी स्वतः अमरच आहे, हें तत्त्व शरिराला चलनवलन असेपर्यंत अंगीं बाणवण्याची साऱ्या तत्त्वज्ञान्यांनीं परा-

काष्ठा केलेली आहे. अमर होणं म्हणजे हसतमुखानं मृत्यूला कवटाळणं. निधड्या अंतःकरणानं मृत्यूला कवटाळणारे कैक आहेत. मानवीसमाजाच्या कल्याणाकरितां आपल्या देहाची कुरवंडी करणारे महात्मेहि कमी नाहींत. आपलं तत्त्वज्ञानच सत्य आहे असं जगाला छातीठोकपणानं सांगून जगाच्या रोषाला पात्र होऊन हसतमुखानं फासावर लटकणारे धर्मात्मे, आपल्या तत्त्वाच्या सत्याकरितां आनंदानं विषाचा प्याला घेणारे तत्त्वज्ञ, शत्रूशीं झुंजता झुंजता धारातीर्थी देह ठेवणारे वीर, आजवर कैक होऊन गेले आणि यापुढें पण कित्येक होतील. हे सर्व महात्मे अमर झाले आहेत. पण ते कीर्तीनं, देहानं नव्हे. देहानं अमर झालेला प्राणी ऐकला असला तरी आजवर कुणी पाहिला नाहीं. तसा प्राणी अस्तित्वांत असण्याचाहि संभव दिसत नाहीं. वरील सात चिरंजीवांपैकीं एकादा कुठं असलाच, तरी तो ज्याअर्थी आपलं अस्तित्व कुठंहि प्रगट करीत नाहीं, त्याअर्थी असून नसून सारखाच आहे. सांगण्याचा उद्देश हा कीं आजवर मृत्यु अजिंक्यच राहिला आहे.

अशा ह्या बलाढ्य मृत्यूनं पहिल्या मानवाच्या संसारांत अपघातानं ज्या वेळीं पहिली अचानक झडप घातली असेल त्यावेळीं पहिल्या मानवाला काय बरं वाटलं असेल! त्याला दुःख झालं असेल? तो रडला असेल? तो बेशुद्ध पडला असेल? छट्! आपल्या मुलांपैकीं एकाद्या मुलाचं चलनवलन थांबताच त्यानं थोडावेळ त्याचे हातपाय हलवून पाहण्याचा प्रयत्न केला असेल, त्याला उभं करण्याचा प्रयत्न केला असेल, आणि उपयोग होत नाहीं असं पाहतांच तो नेहमींप्रमाणं शांत मनानं तें प्रेत तिथंच सोडून निघून गेला असेल. फिरून परत आल्यावरसुद्धां त्या देहांत चलनवलन नाहीं असं पाहून तो निर्जीव देह त्यानं दूर फेकूनहि दिला असेल; त्यावेळीं कदाचित् त्याच्या मनांत किंचित् आश्चर्याच्या, कांहींशा खळबळीच्या आणि नंतर विरहाच्या भावना निर्माण झाल्याहि असतील. अशा तऱ्हेनं मृत्यूची पहिली कल्पना जरी नैसर्गिक रीत्या विशेष खळबळीची नसली, तरी आज मात्र मृत्यु हा मानवतेचा संहार करणारा राक्षस किती उग्र स्वरूप धारण करून बसला आहे ह्याची आपणां सर्वांना कल्पना आहेच.

जगाच्या सुरवातीच्या मानवीमनाची अशा तऱ्हेनं मांडणी करण्यांत जगाच्या सुरवातीला मानवाची स्थिति कशी होती, ज्याला आपण शिक्षण म्हणतो त्या शिक्षणाला जगाच्या अगदीं प्रथमावस्थेंत कशा तऱ्हेनं सुरवात झाली असावी, याचा आपण विचार केला. हीं सारीं बीजरूपानं आदिमानवाला स्फुरलेलीं शिक्षणतत्त्वं वाढीला लागून आज त्यांचा एक प्रचंड अश्वत्थवृक्ष झाला आहे. ह्या शिक्षणवृक्षावर आज इतक्या असंख्य फांद्या आहेत कीं त्या सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून अभ्यास करणं मानवीमनाला अशक्य आहे. तरी पण ज्याला आज आपण मानसिक उन्नति म्हणतो त्याचा मानवतेवर वाईट परिणाम होत असेल, आपण चोखाळीत असलेला शिक्षणमार्ग चुकत असेल, मानवतेंतून अमानवता किंवा अतिमानवता निर्माण होत असेल, जगांत चालू असलेल्या शिक्षणांतून अशांति, असुख आणि असमाधानच वाढीला लागत असेल तर मानवीसमाजानं आपला मार्ग बदलला पाहिजे. ह्या दृष्टीनं गतेतिहासाचा अभ्यास करून पृथ्वीवरील अखिल मानवजातीला आनंदी करण्याचा प्रयत्न कोणत्या दिशेनं करावा लागेल ह्याचा आपल्याला ह्यापुढं विचार करावयाचा आहे.

—*—

३ : प्रगतीचा उच्चांक

मानव, मागल्या प्रकरणांत वर्णिलेल्या अवस्थेंतून पुढं सरकतां सरकतां बराच सुधारला. मानवजातीची भाषा तयार होऊं लागली. मानवांचे वेगवेगळे जथे निर्माण झाले, आणि ते सोयिस्कर अशा वेगवेगळ्या ठिकाणीं पांगले गेले. एकाद्या गोड पाण्याच्या सरोवराशेजारीं, एकाद्या नदीच्या कांठीं किंवा एकाद्या तलावाच्या आसपास योग्य ठिकाण पाहून पृथ्वीच्या पाठीवर वसाहती होऊं लागल्या. रानटी अवस्थेंतून बाहेर पडून माणसं झाडांच्या साली, पानं, फुलं, यांच्या साहाय्यानं, शरीराचा कांहीं भाग झाकूं लागलीं. सुदृढ आणि सशक्त पतीच्या साहाय्यानं, वेगवेगळ्या स्त्रिया, आपापले वेगवेगळे प्रपंच थाटूं लागल्या. कोणी कोणाबरोबर रहावं याबद्दल पूर्वी कांहींच निर्बंध नव्हते. पण आतां तशा तऱ्हेचे कांहीं निर्बंध निर्माण होऊं लागले. स्त्रीची इच्छा नसतांना तिच्यावर बलात्कारानं आक्रमण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पुरुषांच्या अयोग्य वर्तनाला आळा बसावा, म्हणून कोणत्याहि स्त्रीनं कोणाहि पुरुषाबरोबर रममाण होण्याची नैसर्गिक प्रथा बंद झाली. पुढें पुढें तर स्त्रियांच्या पायांत पुरुषापुरुषांत द्वंद्वं होऊं लागलीं. ह्या द्वंद्वांतील हारजितीवर स्त्रीचा पति कोण हें ठरूं लागलं. निवाऱ्याच्या नैसर्गिक जागांच्याऐवजीं झाडांच्या पानांनीं तयार केलेल्या झोपड्या ठिकठिकाणीं दिसूं लागल्या. वेगवेगळे प्रपंच थाटूं लागले. तरी पण एका जथ्यांतील स्त्रीपुरुष व मुलं एका कुटुंबांतील माणसांप्रमाणं गुण्यागोविंदानं नांदत होतीं. निसर्गनिर्मित फळमूळांच्या आहारावर या सर्वांचा उदरनिर्वाह आतां होईनासा झाला, म्हणून लोक आपल्याला पाहिजे असलेल्या झाडांची लागवड करूं लागले. ह्या लागवडीसाठीं जंगलं तोडून जमीन तयार करण्याकडे लोकांचीं मनं वेधलीं. सरकार नाहीं, सारा नाहीं, जमिनीच्या वाटण्यांसंबंधीं निर्बंध नाहींत. सर्वांनीं मिळून जमीन तयार करावी, बीं पेरावं, येईल तें पीक गोळा करून आपल्या झोपड्यांच्या आसपास आणावं आणि सर्वांनीं मिळून

आपला उदरनिर्वाह करावा. फरक एवढाच कीं पूर्वीप्रमाणं नुसत्या निसर्ग-निर्मित आहारवस्तूंवर आतां निर्वाह होणं शक्य नुसल्यानं मानवी प्रयत्नांनीं आहारवस्तूंची निर्मिती वाढविण्याची आतां जरुरी भासू लागली. अन्नधान्य वाळवून त्याचा अन्नाकरितां उपयोग करण्याची कल्पना अद्याप उत्पन्न झाली नव्हती, कारण त्याची जरुरी नव्हती. फक्त ज्या त्या ऋतूंत उत्पन्न होणाऱ्या फलमूलांची लागवड करून सोर लोक आपला उदरनिर्वाह करूं लागले. ज्या पाणवठ्याच्या वस्तीच्या आसपास अशा तऱ्हेची लागवड करतां येणं शक्य नसे, अशा ठिकाणचे जथे, तेथें असलेल्या वन्य जना-वरांच्या रक्तामांसाची मदत, आपल्या आहाराकरितां घेऊं लागले. अशा ठिकाणीं, रान उठवून, लोक वन्यपशूंच्या शिकारी करू लागले. त्यांतल्या त्यांत जो शिकारी अधिक धाडसी, अधिक बलवान, अधिक मेहनती असेल त्याला इतर लोक आपोआपच महत्त्व देऊं लागले. अशा रीतीनं जथ्याजथ्याचे पुढारी अंगच्या कर्तबगारीवर आपोआपच निर्माण होऊं लागले. शिकारीकरितां निघालेला एकादा जथा, शिकार उठवतां उठवतां, कांहीं कांहीं वेळां, दुसऱ्या एकाद्या जथ्याच्या जागेवर आक्रमण करूं लागला. अशा वेळीं मूळ जथ्यांतील लोक त्याला विरोध करूं लागले, ह्या विरोधांतूनच पृथ्वीच्या पाठीवरील पहिल्या वहिल्या चकमकी सुरू झाल्या. अशा चकमकींत, मूळ जथ्यांतील लोकांचा पराभव झाल्यास, साहजिकच हे उपरे आलेले लोक, त्यांच्या जमिनी, त्यांच्या बायका, त्यांच्या वसाहती आपल्या ताब्यांत घेऊन, त्यांना तेथून हुसकून लावीत, आणि बऱ्याच परिश्रमानं त्यांनीं त्या ठिकाणीं उत्पन्न केलेलीं वनं आपल्या ताकदीच्या जोरावर, ताब्यांत घेत. अशा पहिल्या चकमकींतूनच, रानटी अवस्थेंतील युद्धशास्त्र निर्माण झालं.

अशा तऱ्हेनं समाजस्वास्थ्याला जरूर असणाऱ्या मुख्य गोष्टी म्हणजे अन्न, शरीराच्छादन, निवाऱ्याच्या जागा, कुटुंबव्यवस्था, जथ्यांचे पुढारी, भाषा वगैरे अत्यंत आवश्यक गोष्टी तेवढ्या, समाजांत, समाजाच्या सहज-वाढीबरोबरच निर्माण होऊं लागल्या. पण ज्याला आज आपण शिक्षण म्हणतों, तें शिक्षण त्यावेळीं, फक्त त्या त्या कुटुंबांतील कर्त्यांवरच पूर्णतया अव-लंबून असे. मातेचं अनुकरण करून बालक भाषा शिकत असे आणि पित्याच्या

अनुकरणानं, बालक काम करायचा अभ्यास करीत असे. ह्या शिक्षणा-खेरीज इतर शिक्षणाची समाजाच्या बाल्यावस्थेंत जरुरीहि नव्हती, म्हणून त्या वेळीं तशा तऱ्हेचे प्रयत्नहि झालेले दिसत नाहींत. त्यावेळच्या शिक्षणांत बुद्धीवर ताण पडण्यासारखी एकहि विशेष गोष्ट नसल्यानं, मुलांच्या शिक्षणावर परिश्रम घेण्याची आवश्यकताहि नव्हती.

वेदकालांत मात्र समाज एकदम घोडदौडीनं फारच पुढं गेलेला दिसतो. वेद अपौरुषेय आहेत असं मानण्यानं मनाचं समाधान होत नाहीं. समाज-व्यवस्थेला, समाजधारणेला नी समाजाच्या प्रगतीला उपयोगी पडणारीं शेंकडों तत्त्वं ज्या वेदांत ग्रथित केलेलीं आहेत ते वेद समाजाबाहेरील एकाद्या दिव्यशक्तीकडून पृथ्वीतलावर यदृच्छया विखुरले गेले आणि त्या वेळच्या समाजांतील कर्त्यांनीं निमूटपणें डोळे झाकून त्या वेदांचीं पारायणं सुरूं केलीं असं म्हणणं म्हणजे मानवीमनाच्या अफाट सामर्थ्यावर पंगू-पणाचा भ्याड आरोप केल्यासारखं होणार आहे. रानटी अवस्थेंतील मानवीमन विद्युद्वेगानं पुढं जात असतांना एकाएकीं आकाशांतून कांहीं वेद पृथ्वीवर अवतरले आणि ह्या वेदांच्या आधारावर मानवीसमाजांत सुधारणेला सुरवात झाली ही विचित्र विचारसरणी अक्षम्य नी असह्य आहे.

एकाद्या बालकाला तूं अमुक एक गोष्ट कर अगर तूं अमुक एक गोष्ट करूं नको असं सांगितलं असतां तें सहजगत्या 'कां' म्हणून विचारतं. आपणच सांगितलेल्या कांहीं कांहीं गोष्टींच्या कारणपरंपरेचं स्पष्टीकरण आपल्याला करतां येत नाहीं. अशा वेळीं त्या बालकाची जिज्ञासू बुद्धि अवेळीं खुडून आपल्या मोठेपणाच्या दडपणाच्या जोरावर त्या अनवस्था-प्रसंगांतून कशीबशी, आपण आपली सुटका करून घेतो. त्या बालमनाचं समाधान न होतां कुचंबणा मात्र होते आणि वेळीं तें बालक मनाच्या तळमळीनं त्या न पटणाऱ्या आज्ञेविरुद्ध आपल्या चिमुकल्या ताकती-प्रमाणं बंड पुकारण्याला तयार होतं. ही झाली बालमनाची स्थिति. वेदकालांतील प्रौढांचीं मनं तर बालमनापेक्षां कितीतरी स्वतंत्र आणि स्वैर होतीं. त्यांनीं आपल्या समाजाच्या सुस्थितीकरितां बराचसा विचार केलेला होता. समाजांत जरूर ते निर्बंध त्यांनीं स्वतः निर्माण केले होते.

समाजाची स्थिति सुधारण्याकरितां त्यांचे सतत प्रयत्न चालू होते. अशा वेळीं कांहींएक कारण नसतांना, जरुरी नसतांना; कुठून तरी वेदवाक्यं कानीं पडलीं आणि समाजांतील जाणत्या लोकांनीं तीं वेदवाक्यं प्रमाण मानलीं, असं गृहीत धरणं, म्हणजे त्या काळच्या मानवीमनाच्या विचारसरणीला, त्या काळच्या समाजधुरीणांच्या सामर्थ्याला, जबरदस्त धक्का दिल्यासारखं होणार आहे.

त्याऐवजीं वेद अपौरुषेय आहेत असं दुसऱ्या अर्थानं मानणं, अधिक रास्त, अधिक सुसंगत आणि मानवी समाजाच्या प्रगतीला अधिक धरून होईल. वेद, तत्कालीन समाजतत्त्वांचा संग्रह आहे. वेदकालीन द्रष्टयांनीं आपल्या अनुभवानं सिद्ध झालेलीं तत्त्वं सूत्ररूपानं एकत्रित केलीं. ह्या द्रष्टयांच्या ध्यानीं, मनीं आणि स्वप्नीं सदासर्वदा समाजहित वसत असलं पाहिजे. आत्मानात्मविचार करीत असतांना सत्तत्त्वांचं संशोधन करणं हीच त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता. स्वार्थी संसारापासून परावृत्त झालेल्या ह्या महात्म्यांना समाजहितासाठीं झटण्यांत सात्त्विक आनंद होत असला पाहिजे; म्हणून समाजहितवादी सूत्रं त्यांनीं ग्रथित केलीं. आणि तीं तत्कालीन समाजांत हलकें हलकें विखरून दिलीं. समाजाला तीं सारीं तत्त्वं आधींच पटलीं असल्यानं ह्या तत्त्वांचीं समाजानं पारायणं केलीं.

हीं तत्त्वं अपौरुषेय आहेत असं म्हणण्यांत त्या द्रष्टयांचा हेतु त्यागाचा होता. आपण कोणी तरी मोठे आहोंत, आपण ज्ञानी आहोंत, आपण समाजाचे नेते आहोंत हा मोठेपणा त्यांना मिरवायचा नव्हता. त्यांना समाजाला शिकवण द्यायची होती, समाजाची सुस्थिति साधायची होती, जगाच्या मागं राहून जगाला पुढं आणणं हें त्यांचं ध्येय होतं. हेंच खरं ज्ञान, हेंच खरं शिक्षण, आणि हेंच खरं शिक्षणतत्त्व.

आपण शाळांतून विद्यार्थ्यांना शिकवीत असतांना आपण मागं राहून त्यांना शिकू दिलं, आपणच हें उदाहरण सोडवीत आहोंत, आपणच ह्या वाक्याचा अर्थ लावीत आहोंत, अशी जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण करण्यांतच विद्यादानाचं खरं मर्म आहे. आपले गुरुजी ज्ञानी आहेत, त्यांना भाषांतर करतां येतं, त्यांना उदाहरण सोडवितां येतं, अशा भावनेनं

विद्यार्थ्यांना जो आनंद होत असतो त्यापेक्षां आपल्याला भाषांतर येतं, आपल्याला उदाहरण सोडवितां येतं ह्या कल्पनेचा आनंद शतपटीनं अधिक आहे. जी गोष्ट विद्यार्थ्यांची तीच गोष्ट समाजाची. हें तत्त्व वेद-कालीन द्रष्ट्यांना पटलं होतं म्हणा, स्वतः मागं राहूनच समाजाचं खरंखुरं हित होईल असं त्यांना वाटत होतं म्हणून म्हणा, अगर पारलौकिक हिताच्या मागं लागल्यानं ऐहिक सुखावर नी मोठेपणावर लाथ मारण्याचं ब्रीद त्यांच्या अंगीं पुरेपूर बाणलं होतं म्हणून म्हणा, वैदिक तत्त्वं ग्रथित करणारे हे ज्ञाते कायमचे अज्ञात राहिले. अशा अर्थानं वेद खरोखरीच अपौरुषेय आहेत. ज्या वैदिक काळांत अशा तऱ्हेचे द्रष्टे समाजाच्या मागं होते, त्या काळांत समाजाची प्रगति झपाट्यानं झाली असल्यास नवल नाहीं.

वेदकालांतील समाजाची सर्वांगीण प्रगति अवर्णनीय आणि अतुलनीय आहे. वेदांतील निरनिराळीं सूक्तं आणि ऋचा वाचतां वाचतां कांहीं कांहीं सूक्तांमधील ऋचा सुसंगत वाटत नाहींत. ह्याचं कारण वेदकालीन वाङ्मय मुखोद्गत नी परंपरागत आहे. त्यांतील कोणता भाग केव्हां गळला हें सांगतां येत नाहीं, पण कांहीं भाग गळला आहे हें निश्चित. ज्या ज्ञात्यांना वेद स्फुरले त्यांनीं ते अपौरुषेय ठरविण्याकरितां प्रथम-पासून अखेरपर्यंत अतिशय कसोशीनं काळजी घेतलेली दिसते. ऋषी हे फक्त मंत्रद्रष्टे आहेत, मंत्रकर्ते नव्हेत. वेदांतील उपलब्ध भागांतील निर-निराळ्या सूक्तांतून निरनिराळ्या विषयांवर भरगच्च नी सुरस माहिती दिलेली आढळते. कांहीं कांहीं ठिकाणीं वाङ्मय ह्या दृष्टीनं प्रतिभेचा परमोच्च बिंदु गाठल्यासारखा वाटतो. अशा प्रतिभावान् ज्ञात्यांनीं इतक्या उच्च दर्जाच्या वाङ्मयांत आपल्या नांवाचा, तत्कालीन समाज-घटकांचा, आणि वेदकालाचा चुकूनसुद्धां उल्लेख केलेला आढळत नाहीं ! ह्याला म्हणावं संयम. हाच मनाचा मोठेपणा. हीच समाजहिताची खरीखुरी कळकळ. उच्च ज्ञान मिळवायचं, समाजाला ‘ आपणासारिखें ’ करायचं आणि आपण मात्र नामानिराळं रहायचं, हीच ज्ञानाची आणि शिक्षकाची खरी कसोटी.

हा अलोट त्याग अंगीं बाणायला द्रष्टा आधिभौतिकतेच्या पलीकडं जाऊन आध्यात्मिकतेच्या चौथऱ्यावर उभा असावा लागतो. त्यागाच्या आत्यंतिक परिसीमेवर त्याचं जागतिक जीवन असावं लागतं. खरा त्याग तो कीं जो कुणाला कळत नाहीं. सर्वस्वाचा त्याग करून समाजाची सेवा करितांना ज्याचा नामोच्चारसुद्धां कधीं कुठं होत नाहीं तोच खरा त्यागी. त्याचीं तत्त्वं उच्चतम वेदतत्त्वांप्रमाणं अष्टौप्रहर समाजाच्या डोळ्यापुढं नाचत राहतात. तो तत्त्वद्रष्टा मात्र जनताजनार्दनाच्या अथांग महासागरांत बेपत्ता असतो. त्यागाची ही पराकाष्ठा साधणारा महात्मा जगांतील एकतत्त्वाशीं एकजीव झालेला असतो. पारलौकिक समाधान हेंच त्याचं ध्येय असतं. आध्यात्मिक उन्नति हाच त्याचा ध्रुवतारा असतो, अष्टौप्रहर चिरंतन शांतिसुखांत मग्न राहणं हीच त्याच्या आयुष्याची इतिकर्तव्यता असते. वेदकालीन द्रष्टे अशा अर्थानं महात्मे होते; म्हणूनच केवळ त्यांनीं ग्रथित केलेलीं उच्चतत्त्वं केवळ त्यांच्या इच्छेनंच नव्हे तर त्यांच्या आग्रहानं, अपौरुषेय ठरलीं असावींत.

रानटी अवस्थेतील समाज आणि वेदकालीन समाज ह्यांच्यांत किती काल लोटला असावा हें निश्चित सांगतां येत नाहीं. महत्त्व कालनिर्णयाला नसून तत्कालीन प्रगतीला आहे. त्या दृष्टीनं वेदांत आलेल्या माहितीवरून मात्र असं ठाम वाटतं कीं वेदकालीन समाजानं प्रगतीचा उच्चांक गाठला होता.

वेदकालीन समाजांत तीळ, यव, द्विदल धान्य वगैरेसारख्या अन्नधान्यांची लागवड, पैदास नी सांठवण ह्यांचा प्रचार झाला. जमीन तयार करणं, शेत नांगरणं, पेरणं, वगैरे गोष्टींचा ऋग्वेदांत उल्लेख आहे. (ऋ. मंडल ४ सू. ५७) अर्थात् जमिनीची मशागत करण्याकरितां रानजनावरांचा उपयोग करणं शक्य वाटलं. त्यामुळं वनगाईंना माणसाळविणं, त्यांना पाळणं, त्यांचीं खिल्लारं बनविणं आणि त्यांच्या वासरांचा म्हणजे पाड्यांचा जमिनीच्या मशागतीकरितां उपयोग करणं अशा प्रथा आपोआपच रूढ झाल्या. त्यामुळं त्या कालांत गोधनाला बेसुमार महत्त्व आलं. वेदकालांत माणसांच्या संपत्तीची मोजदाद त्यांच्या गाईंच्या

शिक्कारांवरून होऊं लागली. गाईचा प्रतिपाळ करणं,* त्यांची ओपासना करणं, उत्तम गाईंची पैदास करणं, हें त्यावेळीं एक शास्त्र बनलं. त्यानंतरच्या कालांत आहाराकरितां, विशेषतः मुलांच्या आहाराकरितां गाईच्या दुधाचा उपयोग होऊं लागला आणि मग तर गोधनाला भलतंच महत्त्व आलं. धरित्रीमातेप्रमाणंच गोमातेला देखील समाज पूज्य मानूं लागला. गाय ही अवध्य ठरली. (ऋ. मं. ८ सूक्त १०१ ऋचा १५, १६) रानांतील निरनिराळ्या नैसर्गिक वनस्पतींच्या सेवनानं तयार झालेलं त्यावेळचं गाईचं दूध अमृतालासुद्धां मागं टाकणारं असेल ह्यांत संशय नाहीं. आजच्या गाईच्या दुधांत उत्तम असे सर्व तऱ्हेचे गुणधर्म आहेत असं आधुनिक तज्ज्ञांचं मत आहे. दाट वस्तींत कोंडलेली, कडबा, कोंडा, कळणा व कधीं कधीं ताजं गवत खाणारी आजची गाय जर पौष्टिक दूध देते, तर रानावनांतून स्वैर भटकून मन मानेल तो झाडपाला खाणारी, निसर्गाच्या सहवासांत अष्टौप्रहर राहणारी, मानवी देखरेखीखालीं पूर्ण स्वातंत्र्य उपभोगणारी वेदकालीन गाय प्रतिकामधेनूच असली पाहिजे यांत संशय नाहीं. एवढ्याचकरितां वेदांतील ऋचांतून गाईची महती गाइलेली आहे.

अन्नाच्या प्रश्नाची अशा तऱ्हेनं मीमांसा केल्यानंतर त्यांतून निर्माण होणाऱ्या इतर आनुषंगिक गोष्टींचा विचार करणं या ठिकाणीं युक्तच ठरेल. वेदकालीन समाज आपोआप कसकसा पुढं जात होता ह्याची कल्पना यायला त्यावेळीं शेत नांगरण्याकरितां लागणाऱ्या सामुग्रीचं केलेलं सूक्तमय वर्णन आपल्याला मार्गदर्शक होईल. क्षेत्रपतींनीं आणि उदकाधिपतींनीं मधुर उदक उत्पन्न करावं, बैलांनीं नांगराचा फाळ ओढावा, जुपण्यांचा उपयोग करावा, चाबूक उगारतांना सुखानं उगारावा इतकं बारीक सारीक विवेचनसुद्धां ऋग्वेदांत केलेलं आढळतं. (ऋ. मं. ४ सू. ५७) त्याचप्रमाणं शेतकीप्रधान देशांत तदनुषंगिक कोणकोणते धंदे निर्माण झाले ह्याचीहि माहिती ऋग्वेदाच्या ९ व्या मंडलांत ११२ व्या सूक्तांत आलेली आहे. सुतार, लोहार, गवळी वगैरे धंद्यांचा वेदकालीन उल्लेख पाहिला म्हणजे मन थक्क होऊन जातं. महाभारतकार व्यासांची बुद्धि सर्वगामी असल्यानं त्यांच्यानंतर, नवीन म्हणजे महाभारतकारांना माहीत

नसलेलं कोणतंच ज्ञान निर्माण झालं नाहीं असं ज्याप्रमाणं आपल्याला अभिमानानं म्हणावंसं वाटतं, त्याचप्रमाणं वेदकालीन समाजसुधारणांची माहिती वाचतांनासुद्धां तत्कालीन तत्त्वद्रष्ट्यांच्यापुढं नम्रतेनं मान लववावीशीच वाटते.

अन्नानंतरचा दुसरा प्रश्न म्हणजे वस्त्राचा. खरोखर रानटी अवस्थेतील नग्नावस्था किती नैसर्गिक होती! आजच्या कृत्रिम युगांतील निसर्गाकडं धाव घेण्याची समाजाची धडपड पाहिली म्हणजे ज्या काळांत सारा समाज अष्टदिशांनीं निसर्गानं न्हाडलेला होता त्या काळांत अनैसर्गिक कल्पनांचे वारे कसे वाहूं लागले असतील ह्याची मीमांसा मनोहर नी उद्बोधक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. जगाच्या पाठीवर आज नग्नावस्थेचा (Neudism) पुरस्कार करणारे लोक आहेतच ना? ते कायसारेच वेडे आहेत? त्यांना खरोखरच निसर्गाकडं धाव घ्यावीशी वाटते. हल्लींच्या ह्या कृत्रिम युगाचा त्यांना मनापासून वीट आला आहे. खरंच आहे. माणसानं स्वतः यंत्र बनणं हें अनैसर्गिक, अयोग्य नी अपायकारक आहे. तसं करण्यांत मानवतेचा खून होत आहे. ह्या यांत्रिक युगांत मानव निःसत्त्व, निरुत्साही नी अधिकाधिक दुबळा बनत चालला आहे. यामुळंच 'परत निसर्ग' (Back to Nature) अशा आरोळ्या चोहोंकडे दुमदुमूं लागल्या आहेत.

रानटी अवस्थेंत पहिल्याप्रथम ज्यावेळीं माणसं आपल्या शरीराचा कांहीं भाग पानांफुलांनीं झाकूं लागलीं त्यावेळीं त्यांना नग्नावस्था नकोशी वाटत होती, त्यांना नग्नावस्थेची लाज वाटत होती, किंवा थंडीवाऱ्यापासून आपल्या शरीराचं संरक्षण करण्याकरितांच त्यांनीं पानाफुलांचा उपयोग केला, असं मुळींच नाहीं. समाजाच्या पेहरावांत जो सहज फरक पडत जातो त्याच्या बुडाशीं एकादं महत्त्व नसून त्या त्या कालांतील सौंदर्योपासना हेंच त्याचं एकच एक कारण असतं. एकाद्यानं एकादी गोष्ट सहजगत्या करावी, त्याच्या सुंदर नी रुबाबदार शरीरसौष्ठवामुळं ती गोष्ट त्याला शोभून दिसावी; त्याचं अनुकरण दुसऱ्यानं करावं; अशा तऱ्हेनं नवीन प्रथा पडत असते. एकाद्यानं नग्न शरीराच्या मध्यभागीं

पानाफुलांचं आवरण सहजगत्या घेतलं. त्याला तें शोभून दिसलं. सारा समाज त्याचा अनुकार करूं लागला; त्यांतूनच आपोआप लज्जारक्षणाची कल्पना निर्माण झाली. पुढें पुढें शरीराचा बराच भाग झाकणाऱ्या वल्कलांचा वस्त्राप्रमाणं उपयोग होऊं लागला. अशा रीतीनं मानवीसमाज अगदीं सहजासहजीं वस्त्राच्छादित झाला. तेंच पुढं त्याला बरं वाटूं लागलं; इतकंच नव्हे तर अंगावर वस्त्र नसणं हेंच रानटीपणाचं लक्षण मानलं गेलं.

वेदकालांत तर उभ्या आडव्या धाग्यांनीं वस्त्रं विणण्याची कला पूर्णत्वाला गेलेली होती. (ऋ. मं. ६ सू. ९ ऋ. २) वस्त्राची जरुरी आहे असं एकदां ठरल्यानंतर वल्कलांचा उपयोग करतां करतां, तीं फाटत आलेलीं असतांना, तीं वल्कलं विरल्यानंतर त्यांत स्पष्ट दृग्गोचर होणाऱ्या धाग्यांवरून ह्या धाग्यांचा उपयोग वस्त्रं तयार करण्याकडे करितां येईल अशी कल्पना प्रथम आली असावी; आणि तें फाटलेलं वस्त्र सुई घेऊन त्याच धाग्यानं शिवत असतांना आडव्या उभ्या धाग्यांनीं वस्त्र जास्त टिकाऊ व पातळ तयार करतां येणं शक्य आहे ही कल्पना येणंहि असंभाव्य नाहीं. (ऋ. मं. २ सू. ३२ ऋ. ४ शिवणकला) वस्त्रं विणण्याची कला सुरू झाल्यानंतर बारीक धागा कातणं, त्याला पीळ देणं, वगैरे गोष्टींकडं समाजाचं लक्ष वेधलं. अलीकडे अलीकडे तर आर्यावर्तांत यांत्रिक युगाचं वर्चस्व प्रस्थापित होण्यापूर्वींच्या कालांत आंब्याच्या बारक्या बाठींत सोळा वार कपडा घालतां येईल इतका तलम कपडा निर्माण करीपर्यंत येथील विणकला पूर्णत्वाला पोहोंचली होती असं पेशवेकालीन ऐतिहासिक पुराव्यावरून आपल्याला दिसतं. वस्त्रं विणण्याची कला ज्या आर्यावर्तांत प्रथम वेदकालांत सुरू झाली त्या आर्यावर्तांत यांत्रिक साधनांनीं वस्त्रांची निर्मिति भरमसाट वाढविण्याकडं समाजाचं लक्ष वेधलं गेलं नाहीं ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

अन्नवस्त्रानंतरची मानवजातीची अत्यंत जिव्हाळ्याची गोष्ट म्हणजे पूर्ण शंभर वर्षे ह्या जगांत सुखानं नांदणं. (ऋ. मं. १ सूक्त ८९ ऋचा ९.) अपघात वगळले तर प्रत्येक माणसाला ह्या पृथ्वीवर पूर्ण शंभर वर्षे जगतां यावं आणि तेंसुद्धां पूर्ण आनंदांत, सुखांत आणि निरोगीपणांत;

हा तर वेदकालीन द्रष्ट्यांचा कटाक्ष होता. समाजाची खरीखुरी सुस्थिति मुख्यतः ह्याच गोष्टीवर अवलंबून आहे हें तत्व त्या काळच्या तत्त्व-प्रणेत्यांना पूर्णतया पटलेलं होतं; म्हणून समाजाच्या दैनंदिन राहणीचे नी आहारविहाराचे सर्वोत्कृष्ट नियम त्यावेळीं समाजाच्या आचरणांत आलेले होते. त्यावेळच्या द्रष्ट्यांनीं सूर्योपासनेला दिलेलं महत्त्व अस्थानीं होतं असं आजकालच्या संशोधकांना देखील वाटत नाहीं. सूर्योदयाच्या किंवा सूर्या-स्ताच्या वेळच्या सूर्यकिरणांचं दैवी सामर्थ्य क्षयरोगासारख्या असाध्य रोगा-वरसुद्धां रामबाण आहे हा शोध वेदकालीनच आहे. (ऋ. मं. १ सूक्त ५० ऋचा ११, १२). उत्पन्न झालेले रोग औषधानं बरे करण्यापेक्षां मुळांत रोगच उत्पन्न न होणं ह्या दृष्टीनं मनुष्याची राहणी आंखली जावी, असा त्यावेळीं सतत प्रयत्न होत असे. त्यामुळं औषधोपचाराची गरज त्यावेळीं पडतच नसे, असं म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. इंद्रानं रक्तस्राव न होऊं देतां झालेली जखम बरी केली. (ऋ. मं. ८ सू. १ ऋ. १२) रक्तस्राव न होऊं देतां जखम बरी करणं ही गोष्ट ह्या विसाव्या शतकांत अद्यापिहि साध्य झालेली नाहीं. ह्या एका गोष्टीवरून वेदकालीन शस्त्र-क्रिया किती पुढं गेली होती ह्याची आपणांस कल्पना येईल. वेदांतील सोमयज्ञाचं नी सोमपानाचं वर्णन वाचलं म्हणजे सोमाबद्दलचा वैदिक समाजाचा आदर किती तीव्र होता ह्याची कल्पना येते. ऋग्वेदाचं नववं मंडल संपूर्णपणें सोमाला वाहिलेलं आहे; इतकंच नव्हे तर इतर सर्व मंडलांतूनसुद्धां सोमाचीं वर्णनं इतस्ततः विखुरलेलीं आहेत. सोमवल्ली ही त्या काळची अजब शक्ति असावी; अचूक गुणकारी औषधी असावी; तें एक अत्यंत सामर्थ्यवान् पेय असावं; बुद्धीला चालना देणारा, शरीराला नवचैतन्य देणारा, आयुष्याची वृद्धि करणारा तो एक अनुपमेय रस असावा. त्याला इतकं महत्त्व येण्याचं दुसरं कारणच दिसत नाहीं.

ह्याशिवाय समाजांतील चालीरीति, पुनर्विवाह, सती जाणं, अनेक-लोकांकडून चालविलं गेलेलं स्वराज्य, संघटनेवरील सूक्त वगैरे गोष्टींचीं वेदांतील वर्णनं वाचलीं म्हणजे मन उल्हसित होतं. समग्र वेदांचा सूक्ष्म अभ्यास करणं, त्यांतल्या साऱ्या बारीकसारीक गोष्टींची मीमांसा करणं, त्यावरून कांहीं विशिष्ट सिद्धांत काढणं हा ह्या लिखाणाचा उद्देश नाहीं

वेदकालीन समाज किती प्रगल्भ होता, समाजाच्या प्रगतीकरितां उमा अन्म प्रयत्न करणारे त्यावेळचे द्रष्टे म्हणजे शिक्षक किती वरच्या पातळीवर होते ह्याचा शिक्षणशास्त्रदृष्ट्या आणि समाजशास्त्रदृष्ट्या विचार करणं हा ह्या लिखाणाचा उद्देश आहे.

मानवीमनाची ठेवणच अशी आहे कीं फक्त एका आत्मविश्वासाच्या जोरावर मानवी मनांत आकाशाला गवसणी घालण्याचं सामर्थ्य येऊं लागतं. अगदीं रानटी अवस्थेपासून तों आजतागायत मानवीमनाचं हें वैशिष्ट्य कायम आहे. मी धान्य उत्पन्न करूं शकतो; मी स्वजातीयांची वाढ नी संगोपन करूं शकतो; जगांत सुख निर्माण करण्याचं सामर्थ्य माझ्यांत आहे; ह्या चराचर जीवसृष्टीचा भोक्ता, शासनकर्ता नी संहारकर्ता मी आहे; मी माझ्या सामर्थ्यावर ह्या जगांत शंभर वर्षे जगूं शकतों; अशा तऱ्हेचा आत्मविश्वास मानवीमनांत वेदकालांतच निर्माण झाला, आणि तो तत्कालीन द्रष्ट्यांनीं केला. ही आत्मविश्वासाची ज्योत सतत तेवत ठेवण्याकरितां हे वेदकालीन द्रष्टे बाजूला राहिले. त्यांनीं आत्मानात्मविचाराची मशाल आपल्या हातीं घेतली. आत्मा अमर आहे, मी प्रत्यक्ष परमेश्वर आहे; अखिल चराचर जगाचा मी शास्ता आहे; अशा बळकट पायावर मनाची एकतानता साधण्याचा प्रयत्न करीत असतांना त्यांना जो चिरकालीन आनंद अनुभवायला मिळत असे त्या आनंदापुढं त्यांना हें सारं जग आणि त्यांतील सुखं नश्वर आणि म्हणूनच त्याज्य वाटत. पण ह्या द्रष्ट्यांनीं जगांतील इतर मानवांना जो संदेश दिला तो आत्मविश्वासाचा होता. त्या संदेशाच्या जोरावर त्या वेळची संपूर्ण मानवजात स्वयंपूर्ण बनली. आत्यंतिक पारलौकिक सुखासाठीं धडपड करण्याऐवजीं ऐहिक सुखाची परिसीमा गाठण्याचा अखिल मानवजातीनं प्रयत्न केला.

प्रत्येक माणसांत काम करण्याची ताकद आहे आणि ज्यानं त्यानं आपल्या ताकदीप्रमाणं काम करीत राहण्यांतच मानवतेचं खरं कल्याण आहे हें तत्त्व समाजाला पटल्यानंतर समाज त्या तत्त्वाला चिकटून राहिला. ज्याच्या मनगटांत सामर्थ्य आहे, ज्याला पुढारी होण्याची ताकद आहे,

लोक आपली हुकमत मानतील असा ज्याला आत्मविश्वास आहे तो सह-जच समाजाचा पुढारी झाला. ज्याला आपल्या बुद्धिसामर्थ्यावर मानव-जातीच्या उत्कर्षाकरितां नवीं नवीं तत्त्वं प्रस्थापित करितां आलीं तो आपो-आपच पुढाऱ्यांचा पुढारी झाला. ज्यांना बुद्धीहि नाहीं आणि इतर मानव-जातीचा विश्वास संपादन करण्याची ताकदहि नाहीं असे लोक आपापल्या योग्यतेप्रमाणं समाजांत वैयक्तिक कामं करूं लागले. पण साऱ्या व्यक्तींत आत्म-विश्वास होता नी साऱ्या व्यक्तींच्या ठिकाणीं स्वतःला सुखी करण्याचं सामर्थ्यहि होतं. एकानं दुसऱ्यावर सत्ता गाजवावी, एकानं खूप धनसंचय करून आपल्या द्रव्याच्या जोरावर दुसऱ्याला आपला गुलाम बनवावं ही वृत्ति त्या वेळीं नव्हती. कोणीहि समाजांत कोणतंहि काम करीत असला तरी तो सुखी व्हावा हें त्यावेळचं अखिल मानवजातीचं धोरण होतं. पुढारी कुणी होत नसे तर त्याचे गुण पाहून समाज त्याला पुढारीपण देत असे. पुढाऱ्यांचा पुढारी होण्याची महत्त्वाकांक्षा कुणाचीच नसे; पण मानवीसमाजाच्या हिताकरितां द्रष्ट्यांची मनधरणी करून हक्कानं समाज त्यांच्या श्रेष्ठ बुद्धीचा उपयोग करून घेत असे. ज्याला बुद्धि नाहीं, पुढारी होण्याची ताकदहि नाहीं, आणि एक व्यक्ति ह्या दृष्टीनंसुद्धां जो स्वतःच्या मनानं काम करूं शकत नसे अशा व्यक्तींनासुद्धां वेदकालीन समाजांत मानाचं स्थान होतं. मला बुद्धि आहे म्हणून मी श्रेष्ठ, मला सामर्थ्य आहे म्हणून मी श्रेष्ठ अशी श्रेष्ठपणाची अहमहमिका त्यावेळीं नव्हती. मानवीसमाजांतील प्रत्येक घटकाला सुखानं समाजांतहि राहण्याचा हक्क तर होताच, पण त्या-पेक्षां प्रत्येक समाजघटकानं सुखी असावं असा अखिल मानवसमाजाचा कटाक्ष होता. ज्याला जें साधेल तें त्यानं करावं आणि प्रत्येकानं सुखानं रहावं हें त्यावेळच्या समाजाचं ध्येय होतं. हें ध्येय जोपर्यंत कायम होतं, प्रत्येक व्यक्तींत आत्मविश्वासाची ज्योत जोपर्यंत तेवत होती, स्वतःच्या सुखाकरितां दुसऱ्या व्यक्तीच्या तोंडाकडं पाहण्याची जरुरी जोपर्यंत समा-जांत निर्माण झाली नव्हती, सारी मानवजात हें एक कुटुंब आहे ही संघटनेची कल्पना जोपर्यंत समाजांत जागृत होती, तोपर्यंत मानवी समा-जाची प्रगति अबाधित चालू राहिली. वेदकालांत युद्धं होतीं; वेदकालांत संहारहि होत असे; पण तीं युद्धं किंवा तो संहार व्यक्तीच्या मोठेपणा-

करितां होत नसून अखिल मानवजातीच्या उन्नतीकरितां होत असे. आज-काल आपण तत्त्वं ऐकतो तीं हींच. पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति मात्र वेगळी असते. वेदकालानंतर समाज आणि समाजाची उन्नति हीं बाजूला पडून जेव्हां व्यक्तिव्यक्तीमधील तंट्यांचं बीजारोपण झालं, व्यक्तीच्या मोठेपणा-पायीं समाजस्वास्थ्याला धोका पोहोंचूं लागला, आणि समाजहिताच्या नांवाखालीं व्यक्तिहिताचा सांवळा गोंधळ सुरू झाला त्यावेळेपासून मानवी समाजाच्या अधोगतीला सुरवात झाली. अर्थात् ही मानवी-समाजाची अधोगति थोपवून धरण्याचे प्रयत्नहि कांहीं कमी झाले नाहींत. पण फांद्या तोडल्यानं ज्याप्रमाणं झाडाचा विध्वंस होत नाहीं, वरच्या औषधीलेपानं ज्याप्रमाणं शरीरांतील रक्तदोष नाहींसा होत नाहीं त्याच-प्रमाणं मानवीसमाजाची ही अधोगति थांबविण्याचे हे वरवरचे प्रयत्न कसे अयशस्वी झाले ह्याचा विचार पुढें यावयाचा आहे.

त्यापूर्वी पुन्हां एकदां एवढंच सुचवायचं आहे कीं वेदकालीन समाजा-कडून मानवीसमाजप्रगतीचा जो उच्चांक गांठला गेला त्याचं मुख्य कारण त्यावेळचे अज्ञात द्रष्टे. त्यांनीं बाजूला राहून मानवीमनाच्या सुप्त शक्ती जागृत केल्या. समाजांत जिकडं तिकडं आत्मविश्वासाचे वारे वाहूं लागले. स्वतःची उन्नति स्वतःच्या हातीं आहे अशी प्रत्येक व्यक्तीला खात्री वाटूं लागली. प्रत्येक समाजघटकाला समाजांत सुखानं राहण्याचा हक्क होता. ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणं समाजसंघटनेंत मानाचं स्थान मिळत असे; आणि ज्ञात्यांनीं, अज्ञात राहून, समाजाला दिलेल्या आत्मविश्वासाच्या शिक्षणामुळं, त्यावेळीं समाज विस्कळित झाला नाहीं. अशा दृष्टीनं वेदकालीन ज्ञात्यांनीं त्यावेळीं ज्या वरील तत्त्वांचा समाज-शिक्षणाकरितां उपयोग केला, तीं तत्त्वं वेदकालानंतर कितपत पाळलीं गेलीं आणि तीं जर पाळलीं गेलीं नसतील तर तीं कां पाळलीं गेलीं नाहींत, तीं न पाळलीं गेल्यामुळं समाजावर काय परिणाम झाला वगैरे गोष्टींचा विचार केल्यानंच मानवीसमाजाच्या प्रगति–अधोगतीवर योग्य प्रकाश पडणार आहे.

—*—

४ : प्रगतीचा अभ्यास

वेदकालीन समाजाचा धीरगंभीरपणा, त्याचा आत्मविश्वास, त्याचे मानवी जीवन सुखी करण्याचे आत्यंतिक प्रयत्न, त्याची निष्ठा या सर्व समाजोन्नतिकारक गुणविशेषांच्या पायावर उभारलेली भक्कम इमारत मानवी मनाचा उत्कर्ष कळसाला पोचविणार अशी तत्कालीन समाजधुरीणांना खात्री वाटूं लागली. वेदकालानंतरच्या कालांत तर, समाज इतका झपाट्यानं प्रगति करूं लागला कीं, वेदकाल नी पौराणिक काल यांच्या दरम्यानच्या कालांतच म्हणजे स्मृतिकारांच्या कालांत मानवी-समाजानं सुस्थितीचा उच्चांक गाठला. रानटी अवस्थेपासून तों तहत स्मृतिकारांच्या कालापर्यंत समाज सुधारणेची चढण चढत होता. ज्या-प्रमाणं सतत देश जिंकत जाणारं सैन्य एकसारखं उत्साहानं नी विजयानं भारलेलं असतं, त्याला पराभवाची नी पिछेहाटीची कल्पनासुद्धां नसते, पुढं, पुढं, याहीपेक्षां पुढं ही जशी त्या सैन्यांत एकच महत्त्वाकांक्षा असते, आणि ह्या महत्त्वाकांक्षेनं भारलं गेलेलं सैन्य जसं बेभान झालेलं असतं, त्याचप्रमाणं या मधल्या कालांतील समाज नी समाजनेते प्रगतीच्या ध्येय-निष्ठेनं वेडे झाले होते. समाजांतील प्रत्येक गोष्ट निर्दोष झाली पाहिजे, समाज पूर्णत्वाला पोचला पाहिजे, समाजांतील प्रत्येक लहानथोर व्यक्ति आत्यंतिक सुखाच्या शिखरावर अधिष्ठित झाली पाहिजे, हा त्यांचा कटाक्ष होता.

आजसुद्धां समाजाचं ध्येय हेंच आहे. निरोगी व्यक्ति, निष्काळजी जीवन, आणि शांतीचं नी समतेचं वातावरण. स्मृतिकालींहि समाजाचं ध्येय हेंच होतं. आजहि समाजाचं ध्येय तेंच आहे. त्या कालींहि ध्येय गाठलं गेलं नव्हतं. आजहि पण तीच परिस्थिति आहे. आणखी दहा हजार वर्षांनंतरसुद्धां कदाचित् हीच परिस्थिति राहील. लहानपणीं गाडीनं, टांग्यानं अगर मोटरनं प्रवास करीत असतांना, समोर, जवळच कांहीं अंतरावर आकाश जमिनीला टेकलेलं दिसत असतं. कांहीं अंतर पुढं

आतांच आपण त्या पृथ्वीच्या नी आकाशाच्या संयोगस्थानीं येऊं अशी खात्री वाटत असते. पुढं कांहीं अंतर गेल्यानंतर आपण आतां त्या संगमाच्या अगदीं जवळ आलों असूं अशा कल्पनेनं फिरून पुढं पहावं तों पहिलीच परिस्थिति कायम असते. प्रवासाच्या सुरवातीला जी स्थिति तीच स्थिति प्रवास चालू असतांना, आणि प्रवास चालू असतांना जी स्थिति, तीच स्थिति आपला प्रवास संपल्यानंतरसुद्धां असते. पृथ्वीचा नी आकाशाचा संयोग कुठंच होत नाहीं हें बालमनाला माहीत नसतं म्हणून तें कधींहि निराश होत नाहीं, इतकंच. जी स्थिति क्षितिजाच्या बाबतींत बालमनाची, तीच स्थिति ध्येयाच्या बाबतींत मानवी-समाजाची आहे.

जें कधींहि गाठतां आलं नाहीं, जें कधींहि गाठतां येत नाहीं, आणि जें कधींहि गाठतां येणार नाहीं तेंच ध्येय. समजा, दुर्दैवानं आपण आपलं ध्येय गाठूं शकलों तर मानवीमनाची कायमची कुचंबणा होईल, जगणं असह्य होईल, पृथ्वीच्या पाठीवर जिकडं तिकडं निराशेचं वातावरण पसरेल. ध्येय, गाठतां न येण्यासारखं असावं, हें जितकं सत्य आहे, तितकंच किंवा त्याहूनहि अधिक कटु सत्य, मानवीसमाज ध्येयप्राप्तीकरितां अविश्रांत झटत असतांना ध्येयताऱ्यापासून तो अधिकाधिक दूर जाणं हें आहे.

आज, ह्या विसाव्या शतकांत मानवीसमाजाची आधिभौतिक नी आध्यात्मिक दृष्ट्या भयानक प्रगति झालेली आहे. प्रचंड वेगानं आकाशांतून भराऱ्या मारणारीं विमानासारखीं वाहतुकीचीं साधनं आज आपल्या हातापायाशीं आहेत. एका क्षणांत जगाच्या ह्या टोकाची बातमी त्या टोकापर्यंत पोचविणारीं रेडिओसारखीं साधनं आज उपलब्ध झालीं आहेत. यंत्रांची विपुलता तर इतकी आहे कीं अखिल जागतिक मानवी-समाज यंत्रांनीं चोहोबाजूंनीं घेरला गेला आहे. वैद्यकशास्त्रांतील औषधांच्या शोधांनीं सुखानं मरणंसुद्धां अशक्य झालं आहे. 'मृत्यूवर मात' एवढी एकच गोष्ट अद्याप वैद्यकशास्त्राच्या आटोक्यांत आलेली नाहीं. अन्नवस्त्र निर्माण करणं, प्रकाश देणं, प्रवास करणं, लिहिणं, संदेश पाठविणं, युद्धं करणं, एकजात साऱ्या गोष्टी यंत्रानं होऊं लागल्या आहेत.

पण द्रुतगतीच्या प्रवासाच्या साधनांनीं माणसाची चालण्याची शक्ति मारली गेली. धान्य दळणं, वस्त्र विणणं, कपडा शिवणं, लिहिणं वगैरे गोष्टी यंत्रांच्या साहाय्यानं होऊं लागल्यानं माणसाचं काम हलकं झालं; पण त्याच्या काम करण्याच्या शक्तीचा ऱ्हास झाला, आणि मानवी-समाज जवळजवळ दुबळा झाला. जगांतील ह्या यांत्रिक प्रगतीनं वैयक्तिक कलेचा ऱ्हास झाला. कारागिरांची कलोपासना मारली गेली. व्यक्तिगत नैपुण्याला वाव राहिला नाहीं. कलोत्कर्षाला जबरदस्त धक्का बसला.

मागल्या प्रकरणांत सूचित केलेल्या कातकामाच्या आणि विणकामाच्या कलेचा झालेला प्रकर्ष आज अदृश्य झाला आहे, याचें कारण यंत्र. सोन्याचांदीवर उच्च दर्जाचं कलाकुसरीचं काम करणारे सुवर्णकार आज जवळजवळ नष्टप्राय झाले आहेत, याचं कारण यांत्रिक सुधारणा. विजापुरच्या गोलघुमटाची कल्पना मूर्तस्वरूपांत आणणारे कारागीर, आग्र्याचा ताजमहाल बांधणारे तत्कालीन वास्तुशास्त्रज्ञ, हिंदुस्थानांतील किल्ल्यांच्या बांधकामांत वापरलेल्या चुन्याची माहिती असणारे चुनेगार, एकजात सारे कलावान आज निर्वंश झाले आहेत, याचं कारण यांत्रिक प्रगति. विजापुरच्या गोलघुमटाला पडलेली चीर सांधण्याकरितां सर्वोत्कृष्ट वास्तु-शास्त्रज्ञांचा तांडाच्या तांडा विचार करीत होता. चीर सांधणं सोपी गोष्ट होती. पण त्या घुमटांतील प्रतिशब्द करण्याची ताकद पूर्वीप्रमाणंच परत आणण्याचा विचार करण्याकरितां हे सारे वास्तुशास्त्रज्ञ एकत्र आले होते. ते आले तसे परत गेले. विजापुरच्या गोलघुमटांतील प्रतिशब्दाची ताकद मात्र कोणालाच परत आणतां आली नाहीं. ताजमहालांत तळमजल्यावर असलेल्या थडग्यावर पावसाळ्यांत वरून थेंबाथेंबानं पाणी ठिबकत असतं. ताजमहालाच्या कारागिरानं हा दोष मुद्दाम टेविला आहे अशी आख्या-यिका आहे. कित्येक आधुनिक शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांना न जुमानतां पाण्याचे थेंब थडग्यावर तसेच ठिबकताहेत. पूर्वीच्या किल्ल्यांच्या बांध-कामांत वापरलेल्या चुन्यानं एकजीव झालेले दगड सुटे करणं एका दगडाचे दोन तुकडे करण्यापेक्षांहि अधिक अवघड आहे.

या सर्वांचं एकच एक कारण म्हणजे हीं आजकालचीं राक्षसी यंत्रं. यंत्रांनीं थोड्या वेळांत, थोडक्या खर्चांत, भरपूर काम होतं. यंत्रांच्या

साहाय्यानं कारखान्यांतून एकाच धर्तीचं कापड विणणं, एकाच धर्तीचे चाकू तयार करणं, एकाच धर्तीच्या विमानांची पैदास करणं हा आजकालच्या मानवांच्या तळहाताचा मळ झाला आहे नुसता. पण ह्या कारखान्यांतून कामं करणारे कारागीरसुद्धां, कारखान्यांतील इतर निर्जीव यंत्रांप्रमाणं नुस्तीं चालतीं बोलतीं यंत्रंच बनले आहेत. कारखान्यांतील कामगारांना आज कोणीहि कारागीर म्हणत नाहीं. तीं सारीं माणसं आज मजूर ह्या एकाच सामान्य नामानं संबोधिलीं जातात. आपल्या बुद्धीची, कौशल्याची, कल्पकतेची चमक दाखवायला त्यांना बिलकुल वाव नसतो. ते फक्त दिल्या वेतनाचे नी सांगितल्या कामाचे धनी असतात. त्यांच्यांत खरा जिवंतपणा नसतो. एकादं काम करीत असतांना होणारा एकतानतेचा आनंद त्यांना अनुभवायला मिळत नाहीं. कामांत जिवंतपणा नाहीं, चढाओढ नाहीं, स्वतःचं वैशिष्टय नाहीं. असलं मेलेलं काम करीत असतांना काम करणारा मजूरसुद्धां मेल्यासारखाच असतो. म्हणून आधुनिक जगांतील यांत्रिक सुधारणा जों जों अधिकाधिक वरच्या थराला जात चालली आहे तों तों मानवी मन अधिकाधिक खालच्या स्थितीला जात चाललं आहे. ही झाली आजकालच्या भौतिक शास्त्रांची करुण कहाणी.

आध्यात्मिकतेची कहाणी तर याहिपेक्षां अधिक हृदयस्पर्शी आहे. मानवी मनाची आत्यंतिक एकतानता साधण्याचं ज्ञान म्हणजेच खरंखुरं तत्त्वज्ञान. प्रथम ही अवघड व्याख्या थोडी सोपी करूं या. एक विद्यार्थी भूमितींतील एक अवघड उदाहरण सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. साऱ्या दिलेल्या गोष्टी मनांत आणून तो त्या उदाहरणावर चौफेर मारा करीत आहे. ह्या त्याच्या प्रयत्नांत अशी एक वेळ येते कीं ज्यावेळीं तो आपलं देहभान विसरतो. आसपासच्या जगाची त्याला कल्पना नसते. तो त्या उदाहरणाशीं एकजीव झालेला असतो. तें उदाहरण सुटतांच त्याला उदाहरण सुटल्याचा एक क्षणभरच आनंद होतो आणि त्याच वेळीं तो एकतानतेचा आनंद गमावून बसलेला असतो. हा एकतानतेचा आनंद पुनःपुनः अनुभवण्याकरितां तो एकसारखा भूमितीचीं उदाहरणं सोडवूं लागतो. त्याला अभ्यासाचं वेड लागतं, ह्यामुळंच त्या विद्यार्थ्याला अभ्यासाची गोडी लागली असं आपण म्हणतो. दारुड्याचं व्यसनसुद्धां इतकं अनावर होण्याच्या कारणाचा

आपण सहसा विचार करीत नाहीं. दारू घेतल्यानंतर हलके हलके मनुष्याचं भान नाहींसं होत जातं. हें भान नाहींसं होण्याच्या अवस्थेंत एक क्षण असा येऊन जातो कीं त्यावेळीं मनाची आत्यंतिक एकतानता साधली जाते. तो एकतानतेचा परमोच्च बिंदु गाठला जातो न जातो इतक्यांत ती एकतानता नाहींशी होते. ती मनाची निर्विकल्प एकतानता साधण्याच्या जबरदस्त मोहाला बळी पडून दारुडा मरेपर्यंत दारूला चिकटून राहतो. तिसरं नेहमींच्या व्यवहारांतलं एकतानतेचं उदाहरण म्हणजे स्त्रीपुरुष–मीलनाचं. ह्या तिन्ही गोष्टींत मनाची एकतानता होत असते, पण ती क्षणभरच. ही मनाची एकतानता, हा आत्मिक आनंद, ही निर्विकल्प समाधि पुनःपुनः अनुभवायला मिळावी म्हणून विद्यार्थ्याला अभ्यासाचं वेड लागतं, दारुड्याचं व्यसन अनावर होतं आणि अखिल मानवजात विषयकर्दमांत कायमची लोळत राहते. वर वर्णिलेले एकतानतेचे, आनंदाचे, जगाचा विसर पडण्याचे अनुभव फारच थोडा वेळ टिकणारे असतात, म्हणून वरील प्रकारचा चिरंतन नी हुकमी आनंद अनुभविण्याकरितां म्हणजेच मानवीमनाची आत्यंतिक एकतानता साधण्याकरितां मानवी मनानं केलेले प्रयत्न याचंच नांव तत्त्वज्ञान.

आज ह्या विसाव्या शतकांत अशा तऱ्हेचा एकादा तरी तत्त्वज्ञ असेल कीं नसेल अशी शंका उत्पन्न होते. असेल असं वाटण्याचं कारण इतकंच कीं अतिप्राचीनकाळींसुद्धां जर अशा तऱ्हेचे तत्त्वज्ञ निर्माण झाले होते तर आपण मानवीसमाजाच्या प्रगतिमार्गावर इतकीं वर्षे चालल्यानंतर मूळ तत्त्वज्ञांची प्रथा अस्तित्वांत असावी असं मानणं हेंच आशावादाला धरून आहे. असे तत्त्वज्ञ अद्याप आपल्या तपश्चर्येनं मानसिक उन्नति साधण्याचा प्रयत्न करीत असल्यानं आज अशा तत्त्वज्ञांचं अस्तित्व समाजांत भासत नाहीं. म्हणून असा तत्त्वज्ञ समाजांत नसेल असं वाटतं. तरी पण मानसिक सामर्थ्याच्या प्रयत्नांत असलेले हे तत्त्वज्ञ आज ना उद्यां आपल्या सामर्थ्यानं समाजाचा उत्कर्ष साधतील अशीहि खात्री वाटते.

आज मात्र जिकडं तिकडं मतामतांचा गलबला झाला आहे हें खरं. तत्त्व बाजूला राहून वितंडवादाला मात्र ऊत आला आहे. एकेश्वरी वाद

अधिक हिताचा कां निरीश्वरवादच योग्य, डार्विनच्या कल्पनेप्रमाणं उत्क्रान्तिवाद (Evolution) अधिक बरोबर कां टायलरच्या म्हणण्याप्रमाणं 'सर्व एक आहे' (Absolute one) हेंच तत्त्व मान्य करायचं; नीत्शेचं अतिमानवतेचं (Superman) तत्त्वज्ञान, स्पिनोझाचं अणुतत्त्व कां बर्गसॉनची अंतःस्फूर्ति (Intuition)? खरोखर संताप येतो ह्या तत्त्वांचा नी तत्त्वज्ञांचा! अहो तत्त्वज्ञ, तुम्ही ज्ञानी आहांत, थोर आहांत, तुमच्यांत विचार करण्याची भरपूर ताकद आहे, तुमची लेखनशैली चांगली आहे, तुम्ही प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाचं मुखपृष्ठसुद्धां आकर्षक आहे! पण तुम्ही आपल्या ह्या लिखाणानं मानवीसमाजाचं हित करताहांत का? समाजाचं सुख साधण्याचा प्रयत्न करताहांत का? समाजाची विस्कटलेली घडी पुन्हा साफसूफ करून देताहांत का? नसेल तर नुसतं तुमच्या नांवाचं ढोलगं बडवणारं, सर्वसाधारण मानवीसमाजाला अज्ञेय आणि अगम्य अशा एका तत्त्वाचं प्रतिपादन करणारं, तत्त्वज्ञातत्त्वज्ञांतला वाद वाढविणारं हें असलं लिखाण समाजाला नको आहे. कोणी म्हणतील तत्त्वं प्रतिपादन करणं हें तत्त्वज्ञांचं काम आहे, तत्त्वं उपयोगांत आणणं न आणणं हें समाजावर अवलंबून आहे. नुसतीं तत्त्वं मांडणाऱ्या तत्त्वज्ञांपेक्षां आपल्या मानसिक सामर्थ्यानं आपला बुद्धिवाद समाजाला भिडविणारे तत्त्वज्ञच वेदकालीन तत्त्ववेत्त्यांप्रमाणं समाजाला गवसणी घालूं शकतात. अशा तत्त्ववेत्त्यांनाच खरेखुरे ज्ञाते म्हणतां येईल. बाकी सारे तत्त्वज्ञ श्रेष्ठ आहेत, विचारवंत आहेत, तत्त्वं प्रतिपादन करणारे आहेत; पण समाजाला त्यांचा उपयोग नाहीं, त्यांच्या लिखाणाचा उपयोग नाहीं, त्यांच्या तत्त्वांचा उपयोग नाहीं, अर्थात् समाजहि त्यांची फिकीर करीत नाहीं.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे एक. रशियांत एका मोठ्या मोकळ्या पटांगणांत एक पाहरेकरी पहाऱ्यावर होता. त्याला स्वतःला पहाऱ्याचं कारण माहीत नव्हतं. त्याचा अधिकारी, त्याच्यावरचा अधिकारी, अगदीं सर्वश्रेष्ठ अधिकारी, सरतेशेवटीं झार. अगदीं अखेरपर्यंत कोणालाच पाहऱ्याच्या कारणाचा पत्ता नव्हता. शेवटीं एका वयोवृद्ध दासीनं कारण सांगितलं कीं मागील एक राणी गरोदर असतांना तिनं त्या पटांगणांत एक सुंदर

फूल पाहिलं. आपल्या सुकुमार गर्भाबरोबरच वाढत असलेल्या त्या फुलाबद्दल तिला प्रेम वाटलं आणि म्हणून तिच्या इच्छेवरून तें फूल सांभाळण्याकरितां तो पाहरेकरी तिथं उभा होता. तें फूल गेलं, ती राणी गेली, तो तिचा राजपुत्रहि नाहींसा झाला, त्यानंतरच्या एक दोन पिढ्या पण गेल्या. पण त्या पटांगणांत तो पहारेकरी मात्र तिथं नसलेल्या फुलावर अद्याप खडा पाहरा करीत उभा आहे. 'झरिनाज् व्हायोलेट्' हें त्या गोष्टीचं नांव. मूळ तत्त्व तत्त्वज्ञांच्या मनांतून केव्हांच नाहींसं झालं आहे. पण अस्तित्वांत नसलेल्या तत्त्वावर अद्याप तत्त्वज्ञांचा खडा पाहरा मात्र चालू आहे. ह्या आधिभौतिक नी आध्यात्मिक तत्त्वज्ञांच्या अधोगतींतच मानवीसमाजाच्या अवनतीचं बीज असल्यानं त्याचा उल्लेख केला आहे. ह्या अधोगतीची कारणपरंपरा स्मृतिकालापासून असल्यानं आणि प्रत्यक्ष परिस्थितींत आज कोणते दोष उत्पन्न झाले आहेत ह्याची कल्पना आल्यानंतरच पुराणकालीन मानवीसमाजाच्या प्रगतीवर कोणकोणते व कसकसे अनुकूल अगर प्रतिकूल परिणाम झाले हें समजणं सोपं जाईल ह्या कल्पनेनं वरील विवेचन केलं. ह्या वरील विवेचनांत मुख्यतः हेंच सुचवायचं आहे कीं स्मृतिपुराणकालांतच तत्त्वज्ञाचं मानसिक आसन प्रथम कळत न कळत डळमळलं आणि समाजाच्या अधोगतीला खरोखर त्या वेळेपासूनच सुरवात झाली. अर्थात् वेगांत असलेली गाडी ज्याप्रमाणं हलकें हलकें थांबत जाते त्याचप्रमाणं वेदकालीन प्रगति हलकें हलकें कमी होऊं लागली. तरीसुद्धां वेदकालीन तत्त्वज्ञान्यांनीं समाजांतील प्रगतीला दिलेला झोला इतका जोरदार होता कीं त्या जोरावरच समाज अद्याप सुधारणेची चढणच चढत आहे असा पुराणकालींसुद्धां आभास होत राहिला होता.

मनूनं ग्रथित केलेलं मानवी जीवनाचं शास्त्र म्हणजे आरसा आहे नुस्ता. जगाच्या सुरवातीपासून मानवधर्माला कसा आरंभ झाला ह्याचं स्थूल विवेचन करून मानवाला सुखानं जगांत राहण्याकरितां कोणकोणत्या गोष्टी करणं जरूर आहे ह्याचं सूक्ष्म विवेचन मनुस्मृतींत आढळतं. जीवन सुखी करण्याकरितां चातुर्वर्ण्यांतील प्रत्येक घटकानं कसं वागावं याचं जवळजवळ जन्मापासून मृत्यूपर्यंतचं वर्णन मनुस्मृतींत आहे. सूर्योपासना व व्यायाम ह्यांची आवश्यकता, जीवनावश्यक गोष्टींबद्दल कोणती

काळजी घ्यावी, ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यास ह्यांची मानवीजीवनाला त्या त्या वयांत कशी जरुरी आहे, त्याचप्रमाणं प्रत्येक आश्रमांतील वागण्याचे वेगवेगळे हितकारक नियम कोणते, विवाह केव्हां करावा, कोणाशीं करावा, कोणत्या विधीनं करावा, गृहस्थाश्रमाच्या काळांत आचरण कसं असावं, धनसंचय किती करावा, पत्नीशीं कसं वागावं, वानप्रस्थाश्रमाची जरुरी नी उद्देश; आणि अखेर संन्यासाश्रमाची आवश्यकता नी उपयुक्तता ह्याचं मनूनं केलेलं विवेचन पाहिलं म्हणजे मनूनं निर्माण केलेली मानवी जीवनाची चाकोरी किती हितकारक आहे ह्याची पूर्ण कल्पना येते.

राजांचे धर्म, न्याय कसा करावा, दोषी व्यक्तींना दंड कोणत्या तऱ्हेचा असावा, किती असावा, त्रैवर्णिकांच्या बाबतींत आणि शूद्रांच्या बाबतींत कोणकोणते फरक करणं इष्ट आहे, प्रत्यक्ष राजाच अपराधी असेल तर त्यालासुद्धां दंड कोणी नी किती करावा ह्या साऱ्या गोष्टींचं मनूनं केलेलं पृथक्करण वाचतांना मन रंगून जातं. हे सारे नियम व्यक्तींच्या सुखी जीवनाकरितां आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीकरितांच मुख्यतः घालून दिलेले आहेत ह्याची खात्री पटते.

हें सारं जरी खरं असलं तरी याज्ञवल्क्य, पाराशर, भृगु, मनु वगैरे स्मृतिकालीन ज्ञात्यांमध्यें वेदकालीन ज्ञात्यांच्या इतका तत्त्वनिष्ठुरपणा राहिला नव्हता. हा त्यांचा दोष नसून मानवी मनोधर्म आहे. तत्त्वद्रष्टे, समाजनेते, धर्मप्रणेते ह्या सर्वांनाच हा मानवीमनाचा स्वभावधर्म लागू आहे. जीसस् ख्राइस्ट, महमद पैगंबर, गौतमबुद्ध ह्यांच्यासारख्या धर्मप्रणेत्यांनीं मनाच्या आत्यंतिक तळमळीनं नवे नवे युगधर्म निर्माण केले. मानवीसमाजांतील अनवस्थाप्रसंग पाहणं असह्य झाल्यानं त्यांना जें वाटत होतं तें त्यांनीं निर्भय मनानं समाजापुढं मांडण्याचं धाडस केलं. ह्या साऱ्या धर्मप्रणेत्यांचं आचरण नी शिकवण पाहिली म्हणजे मन थक्क होतं. साऱ्या समाजघटकांवर सारखं प्रेम करा, जगांत विश्वबंधुत्वाचं नातं निर्माण करा, तत्त्वनिष्ठ व्हा आणि वेळ पडली तर आपल्या तत्त्वनिष्ठेकरितां वाट्तील ते शरीरकष्ट सहन करा, प्रसंगीं प्राण-

त्याग देखील करायला मागंपुढं पाहूं नका, अशी त्या महात्म्यांची शिकवणूक नी वागणूक. पण त्याच धर्मांची मशाल कायम तेवत ठेवणारे त्यांचेच अनुयायी आज जगावर किती भयानक गोष्टी करताहेत! आप्तेष्टांचा छळ करताहेत, विश्वबंधुत्वाचा खून पाडताहेत, नी तत्त्वनिष्ठेकरितां प्राणत्याग करण्याऐवजीं दुसऱ्यांचे प्राण मात्र घेताहेत. तत्त्वप्रवर्तक ज्ञाते आणि त्यांचे अनुयायी यांच्यांतील हा विरोध नेहमींचाच आहे. हीच स्थिति स्मृतिकारांच्या वेळींहि निर्माण झाली. याज्ञवल्क्य, मनू ह्यांच्यासारख्या स्मृतिकारांनीं अज्ञात राहून समाजाला मार्गदर्शन करण्याचं वेदकालीन ज्ञात्यांचं तत्त्व सोडून आपण कोणीतरी श्रेष्ठ आहोंत, इतर समाजापेक्षां आपलं ज्ञान, आपलं सामर्थ्य, आपला त्याग अधिक आहे आणि म्हणून समाजानं आपली शिकवण मानली पाहिजे अशी मोठेपणाची नी अभिमानाची भूमिका घेतली. इथूनच तत्त्वप्रणेत्यांच्या आणि पर्यायानं मानवतेच्या अधःपाताला प्रारंभ झाला. मनुस्मृतींतील मानवी आचरणाची शिकवण निर्दोष आहे ह्यांत वादच नाहीं. मनूच्या कालापासून तहत आजपर्यंत तिनं मानवी मनाची पकड घेतली ही एकच गोष्ट तिच्या निर्दोषत्वाची चालती बोलती निशाणी आहे. पण स्मृतिकार कितीहि थोर असले तरी मानवीसमाज त्यांच्याहिपेक्षां थोर आहे. स्मृतिकार मर्त्य होते, समाज अमर आहे. स्मृतिकारांना मर्यादा होती, मानवीसमाजाचा पसारा अमर्याद आहे. स्मृतिकार स्मृति निर्माण करूं शकले. पण असल्या वेगवेगळ्या स्मृति निर्माण करणारे कैक स्मृतिकार समाजानं आजवर निर्माण केले आहेत आणि पुढंहि निर्माण करील. याज्ञवल्क्यादि स्मृतिकारांनीं हींच सामाजिक तत्त्वं, हेच मानवी निर्बंध, हेच धार्मिक विधि अपौरुषेय म्हणून समाजाच्या नांवावरच समाजांत रूढ केले असते तर व्यक्तिनिष्ठेला आळा बसला असता, समाजांत आत्मविश्वासाचा प्रकाश कायम राहिला असता. पण ह्या स्मृतिकारांच्या व्यक्तिमाहात्म्यानं समाज भारला गेला. त्याचा आत्मविश्वास नाहींसा झाला. तो अगतिक होऊन ज्ञात्यांच्या तोंडाकडं असहायतेनं पाहूं लागला. समाजाच्या ह्या हीनदीन परिस्थितींत स्मृतिकारांनीं पुढं आणलेल्या भयानं

तो भेदरून गेला. वेदकालांतील निर्भय समाज व्यक्तींनीं पुरस्कारलेल्या पापाच्या नी नरकाच्या भीतीनं व्याकुल झाला.

चातुर्वर्ण्याची उत्पत्ति वेदकालीन असली तरी त्या वेळच्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य नी शूद्र ह्या जाती गुणकर्मांवर अवलंबून होत्या. त्यावेळच्या समाजांत ज्याला त्याला आपापल्या मगदुराप्रमाणं आपला वर्ण म्हणजे वर्ग बदलतां येत असे. पण मनूनं चातुर्वर्ण्यावर नवीन निर्बंध लादले. विशेषतः बुद्धिवाद्यांचं म्हणजे ब्राह्मणांचं सामर्थ्य अबाधित रहावं म्हणून आपल्या स्मृतीमध्यें ब्राह्मणांची अवास्तव तरफदारी केली, इतकंच नव्हे तर त्यांचा पक्ष उचलून धरिला. ब्राह्मणाला प्राणांतिक दण्डाऐवजीं मुंडणाची शिक्षा सुनावण्यांत तर मनूनं धडधडीत अन्याय केला आहे. (मनु. स्मृ. अध्या. ८ श्लो. ७९) ब्राह्मण अधिक बुद्धिवान, अधिक ज्ञानी, अधिक श्रेष्ठ अर्थात् ज्याला सारासार विचार अधिक त्या ब्राह्मणाला त्याच्या वाईट कृत्याबद्दल अधिक भयंकर शिक्षा द्यायला पाहिजे होती. बरं! ब्राह्मणाच्या मनावर उच्च संस्कार झाले असल्यानं मुंडणाच्या अपमानानं तो मेल्यापेक्षांहि मेला होईल असं म्हणावं तर ज्या ब्राह्मणानं एकादी हीन गोष्ट केली त्या ब्राह्मणाला मरणापेक्षां अपमानच अधिक असह्य होईल असं मानणंसुद्धां गैरच होईल. त्या कालीं ब्राह्मण म्हणजे एक संपूर्ण वेदांचं चालतं बोलतं पुस्तक असल्यानं एका ब्राह्मणाला मारल्यानं एक पुस्तक नाहींसं झालं असतं असाहि मनूच्या वतीनं युक्तिवाद केला जातो. एक हीनबुद्धि ब्राह्मण मारल्यानं जोंपर्यंत सारी बुद्धिवादी मानवजात मारली जात नाहीं तोंपर्यंत हा युक्तिवादसुद्धां फोलच ठरतो. मनु हा स्वतः बुद्धिवादी असल्यानं बुद्धिवाद्यांच्या बाबतींत त्याच्याकडून पक्षपात झाला असावा असं नाइलाजानं म्हणावं लागतं.

पौराणिक कालांतील ज्ञाते तर याहिपेक्षां थोडे अधिकच पुढं गेले. त्यांनीं मानवीसमाजांतील ज्ञानाचा मक्ताच आपल्याकडे घेतला. आपण ज्ञाते, आपण समाजाचे शिक्षक, आपल्या तंत्रानंच समाजानं चालावं ही भूमिका पौराणिक कालांतील ज्ञात्यांनीं घेतली. अर्थात् अशा प्रकारेचं उच्च स्थान समाजांत पटकाविण्याकरितां त्यांनीं किंमतहि एक

ग्वाहीच देऊं केली. समाजांतील राजे लोक सर्व सुखोपभोग मनमुराद भोगत असतांना, वैश्य लोक वाणिज्यवृत्तीनं ,उमाप संपत्ति मिळवीत असतांना हे ज्ञाते, सर्व तऱ्हेच्या अधिकारावर, सुखोपभोगावर आणि धनसंचयावर लाथ मारून अरण्यांत, निसर्गाच्या संगतींत भिक्षावृत्तीनं राहूं लागले. हा त्यांचा त्याग डोळ्यांत भरण्यासारखा आहे. समाजांतील आपल्यासारखे इतर लोक, आपल्यापेक्षां बुद्धिसामर्थ्यानं कमी असलेल्या समाजांतील व्यक्ती, नव्हे आपल्या स्वतःच्या बुद्धीच्या मदतीवर सर्वस्वी अवलंबून असणारा मानवीसमाज सुस्थितीच्या शिखरावर अधिष्ठित असतांना आपण स्वतः, समाजांतील शास्त्यांचे शास्ते असूनहि फक्त जीव जगविण्यापुरत्या अन्नवस्त्रावर निर्वाह करून, अखंड ज्ञानदानाचं सत्र आमरण चालू ठेवण्याचं व्रत पत्करून आत्मानात्मविचारांत मग्न रहायचं हा कांहीं साधासुधा त्याग नव्हता. ह्या ज्ञात्यांच्या त्यागानं समाज दिपून गेला. म्हणूनच त्यावेळचा सारा समाज ह्या ज्ञात्यांच्या म्हणजे पौराणिक काळच्या ऋषींच्या अंकित राहिला.

हे पौराणिककालीन ज्ञाते अखिलविद्यापारंगत होते. समाजाचा त्यांच्यावर विश्वास होता. ते आपल्याला ज्ञान देतील, आपल्या मुलांबाळांना शिकवण देतील. पण स्वतः अधिकाराचा अभिलाष कधींहि धरणार नाहींत अशी समाजाची खात्री होती. आपल्या मुलांबाळांना, विद्याभ्यासाकरितां, निःशंकपणानं गुरुगृहीं ठेवणं हें तत्कालीन समाजाचं धोरण होतं.

त्यावेळचे ऋषी हे कोणत्याहि दृष्टीनं समाजाचे मिंधे नव्हते. गुरुगृहीं अध्ययनाकरितां आलेल्या विद्यार्थ्यांत तरतमभाव यत्किंचितसुद्धां दिसत नव्हता. श्रीमंत, गरीब, बुद्धिवान, बुद्धिमंद, सशक्त, अशक्त सारे विद्यार्जनाकरितां आलेले विद्यार्थी गुरुगृहीं बंधुभावानं रहात. माझे वडील श्रीमंत आहेत. माझे वडील शूर आहेत. मी राजपुत्र आहे असा भेदभाव विद्यार्थ्यांमध्यें दिसून येत नव्हता. विद्यार्जनाकरितां आलेल्या विद्यार्थ्यांची पालनपोषणाची व शिक्षणाची जबाबदारी पूर्णपणें गुरूवरच असे. गुरुगृहीं अध्ययन करणाऱ्या अशा साऱ्या बालमनांची आधिभौतिक वी आध्यात्मिक विकासाची जबाबदारी पूर्णपणें गुरूवरच होती. त्याकाळचे

विद्यार्थी चोवीस तास गुरूजवळ असत आणि चोवीस तास त्यांचं शिक्षण चाले. आपल्याला छोट्या जीवांचं एक राष्ट्र तयार करायचं आहे. याची त्या वेळच्या ऋषींना जाणीव होती, इतकंच नव्हे तर ती जबाबदारी त्यांनीं आपखुषीनं पत्करिली होती.

पहाटे उठतांच गुरुजींच्याबरोबर बाहेर पडावं. वाटेंत असलेल्या फुलझाडांची नी फळझाडांची गुरुजींना माहिती विचारावी, फुलं तोडावीं, फळं पाडावीं, फुलांच्या माळा गुंफाव्या, मधुर फळं गोळा करावीं आणि अशा तऱ्हेनं वाटेनं जातां जातां निरनिराळ्या वनस्पतींचं ज्ञान मिळवावं. नदीकांठीं जाऊन प्रातर्विधि आटोपावा, झाडाच्या फाट्यानं दंतधावन करावं, नदीच्या पाण्यांत स्नान करावं, स्वतःचं वस्त्र अगर कौपीन स्वतःच धुवावं, गुरुजींच्याबरोबर संध्यावंदन करून सूर्याला अर्घ्यप्रदान द्यावं, नमस्कार घालावे आणि आपापले कमंडलू भरून घेऊन मंत्रांचा जयघोष करीत परत आश्रमांत यावं. आश्रमांत येतांच गुरुपत्न्यांनीं किंवा आश्रमवासी कन्यकांनीं गाईंच्या धारा काढल्या असतील तर दूध प्यावं. धारा काढल्या नसतील तर मोठ्या विद्यार्थ्यांनीं गोदोहन करावं. रानांत जाऊन बटूंनीं समिधा, दूर्वा, फुलं, पत्री असं साहित्य जमा करावं. मोठ्या विद्यार्थ्यांनीं लहान विद्यार्थ्यांना त्यांनीं विचारलेली माहिती मोकळेपणानं द्यावी. परत आश्रमीं यावं, गुरूंच्याबरोबर मंत्रयुक्त हवन करावं आणि मग गुरुपत्नीला स्वयंपाकपाण्यांत मदत करावी. गुरूंनीं दिलेल्या पाठांचं पठण करावं. धनुर्विद्येचा अभ्यास करावा. नंतर सर्वांनीं एकत्र आनंदानं भोजन करावं. दुपारच्या वेळीं गुरु टकळीवर सूत कातीत असतांनाच त्यांच्याकडून संथा घ्यावी. गोष्टींच्या द्वारें, निसर्गाच्या द्वारें, आपल्याला आवडेल तें शिक्षण घ्यावं. बागेंत काम करतांना झाडाझुडपांची माहिती घ्यावी. शेतांत काम करतांना शेतीसंबंधींचं ज्ञान मिळवावं, कंदमुळं गोळा करतांना औषधींचा अभ्यास करावा आणि खेळतां खेळतां शिक्षण घ्यावं. दुपारीं नीतिपाठ घ्यावे, कथा ऐकाव्या नी रात्र पडतांच झोपावं. बारा वर्षे गुरुगृहीं राहून गुरुकृपेनं विद्याभ्यास पुरा झाल्यावर गुरुजींचा आशीर्वाद घेऊन त्यांना गुरुदक्षिणा देऊन अगर गुरुदक्षिणा देण्याचं अभिवचन देऊन त्या आश्रमाचा, तेथील गुरुजनांचा आणि बरोबरच्या

बटूंचा सद्‌गदकंठानं निरोप घेऊन आपल्या घराकडं परतावं. किती शुद्ध आचरण, किती उच्च शिक्षण नी किती उत्साही वातावरण! ब्राह्मण, क्षत्रिय अगर वैश्य कोणीहि असो गुरुगृहांतील अध्ययन पूर्ण होतांच नजर ठरत नसे त्या विद्यार्थ्यांवर. प्रत्येकाला आपल्याला मिळालेल्या विद्येचा विश्वास वाटे. आपल्या कर्तबगारीबद्दल खात्री वाटे. आपल्या गुरूंबद्दल पूज्यभाव वाटे. त्यावेळीं जीवनधंद्याची निवड (Vocational Bias) आपोआपच विद्यार्थ्यांच्या मनःप्रवृत्तीवरून होत असे. खेळतां खेळतां शिक्षण (Playway in education) हा तर त्यावेळच्या शिक्षणाचा आत्मा होता. 'फील्ड वर्क' होतं, उघड्यावरील वर्ग (Open air classes) होते, वर्गप्रतिनिधि (मॉनिटर्स) होते, शिस्तसंस्था (Prefect system) होती. सारं आधुनिक शिक्षणशास्त्र त्यावेळीं अगदीं पूर्णावस्थेंत होतं. त्याकालचीं सारीं गुरुकुलं वसतिविद्यालयं (Residential Schools) होतीं. आधुनिक शिक्षणशास्त्रांतील साऱ्या बारीकसारीक गोष्टीसुद्धां ह्या गुरुकुलांतून होत्या. फक्त वरील इंग्रजी नांवं त्यावेळीं अस्तित्वांत नव्हतीं, शिक्षकांच्या लायखीच्या परीक्षा नव्हत्या, आणि नुसता देखावा करण्याची जरूरी नव्हती. वेदविद्यापारंगत होणं हाच त्या वेळच्या गुरूंचा अभ्यास, निष्कलंक चारित्र्य ही कसोटी, ऐहिक सुखांचा आमरण त्याग करण्याची तयारी हीच त्यांची परीक्षा होती. अशा शाळांतून बाहेर पडलेले विद्यार्थी समाजाला ललामभूत होणं अपरिहार्य होतं.

प्रभु रामचंद्रासारखे सत्यवचनी वीर त्याच काळांत झाले. सीतेसारख्या आदर्श पत्न्या त्याच काळांत उत्पन्न झाल्या, भरतासारखे निःस्वार्थी बंधुभक्त, हनुमानासारखे आजीव निष्ठावंत सेवक, धर्मराजासारखे धर्माचे अवतार अशा तऱ्हेचे सारे आदर्श समाजघटक निर्माण करण्याचा मान ह्याच पौराणिक काळांतील पाठशालांना होता.

पौराणिक काळांतील ऋषींची, समाजांतील बालमनावर आपला नैतिक ताबा प्रस्थापित करण्याची ही कल्पना मात्र अभिनव होती. बालमनं काबीज करून त्रैवर्णिकांवरील आपलं वर्चस्व त्रिकालाबाधित करण्याची त्यावेळच्या ऋषींची म्हणजे ब्राह्मणांची महत्त्वाकांक्षा होती. अशा रीतीनं

उत्पन्न होणारी ब्राह्मणांची सत्ता इतर त्रैवर्णिकांना कायमची ग्रासून टाकील कीं काय ह्या भीतीनं विश्वामित्रासारख्या राजर्षींना ब्रह्मर्षि होण्याचा अत्यंत अवघड खटाटोप करावा लागला. पण व्यक्तींनीं केलेले प्रयत्न संघटित सामर्थ्यांपुढं टिकाव धरूं शकत नाहींत. त्यामुळं अविश्रांत तपश्चर्या करून ब्राह्मणसत्तेविरुद्ध उघड उघड बंड पुकारणाऱ्या विश्वामित्रासारख्या व्यक्तींचे प्रयत्न व्यक्तींपुरतेच यशस्वी झाले.

इतर त्रैवर्णिकांना आपल्या सामर्थ्याची दहशत बसावी म्हणून पौराणिक कालांतील ऋषींनीं, आत्मिक बलाच्या सामर्थ्यावर हस्तगत केलेल्या शापासारख्या शस्त्रांचा दुरुपयोग करण्यालादेखील मागंपुढं पाहिलं नाहीं. शापाच्या शक्तीनं विशेषतः सूड घेण्याच्या ब्राह्मणांच्या प्रयत्नांना या कालीं ऊत आला होता. खुनाला खून ह्या नात्यानंच फक्त शापांचा उपयोग करून ब्राह्मण स्वस्थ बसले नाहींत, तर आपल्याला उणं उत्तर दिलं दे शाप, आपलं आदरातिथ्य केलं नाहीं दे शाप, निव्वळ अज्ञानानं झालेल्या साध्या अपराधांबद्दलसुद्धां ब्राह्मणांनीं शापाचं शस्त्र वापरण्याचा सपाटा चालविला होता.

दुष्यंताच्या प्रेमबाणांनीं घायाळ झालेली शकुंतला आश्रमांत एकटी होती. ती अस्वस्थ होती. मनानं वरलेल्या पतीची ती एकांतांत प्रेमपूजा बांधीत होती. ती अंतर्मुख होती. ती बेभान होती. अशा वेळीं दुर्वासांच्या आगमनाकडं तिचं लक्ष न जाणं ह्यांत अनैसर्गिक कांहींच नव्हतं. तिनं समजून उमजून कोणताच अपराध केला नव्हता. असं असूनसुद्धां अहंतेला बळी पडून आपला अपमान झाला म्हणून दुर्वासांनीं त्या निष्पाप हरिणीला शाप दिला. बिचारीला उभं तारुण्य पतिविरहाच्या दारुण यातनांत कंठावं तर लागलंच, शिवाय व्यभिचाराचा काळकुट डाग कायमचा कपाळीं मारला जाण्याचा दुर्धर प्रसंग तिच्यावर ओढवण्याची वेळ आली होती. बिचारीचा अपराध किती क्षुल्लक आणि प्रायश्चित्त किती जबर! पण दुर्दैवानं पुराणकालीन शाते स्वतःच्या मानसिक सामर्थ्यानं आंधळे झाले होते. हा अधःपात अक्षम्य होता. आत्मानात्मविचारानं मिळणारं चिरंतन शांतिसुख हल्के हल्के त्यांच्या नजरेआड होऊं लागलं होतं.

स्वतंत्र समाजाला गुलाम बनविण्यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेनं त्यांची दिशाभूल झाली होती. समाजहिताकरितां बालमनाच्या जोपासनेची जबाबदारी आपल्या शिरावर घेण्यांत त्यांनीं दाखविलेल्या बुद्धिचातुर्यावर त्यांच्या ह्या आतातायी वृत्तीमुळं पाणी पडण्याची वेळ आली होती.

बालमनविकास हें पौराणिक कालांतील ज्ञात्यांचं नवं वैशिष्ट्य होतं. पण वेदकालीन ज्ञात्यांप्रमाणं आपण बाजूला राहून, अज्ञात राहून, त्यांनीं त्यांच्या पाठशाळांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहजविकास होऊं दिला असता, तर त्यांच्या मोठेपणाला मोल नव्हतं. समुद्रमंथनांतून अमृताबरोबरच हालाहलाची जशी उत्पत्ति झाली त्याचप्रमाणं त्यांच्या ह्या बालमनविकासाच्या अमोल तत्त्वज्ञानाबरोबर त्यांच्यामध्यें दुरभिमानाचं हालाहल पण निर्माण झालं, हें आर्यावर्ताचं दुर्दैव. आर्यावर्तातील ज्ञात्यांनीं ज्यावेळीं बालमनविकासाची नवी कल्पना वाढीला लावली, ह्या सुवर्णभूमींत ज्या काळीं अक्षरशः सोन्याचा धूर निघत असे, ह्या हिंदुस्थानांत ज्यावेळीं कणाद व गौतम ह्यांच्यासारख्या पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनीं जगांतील मूलतत्त्वं (Elements) सातापर्यंत कमी करीत आणलीं होतीं, त्यावेळीं इतर साऱ्या जगांतील मानवजात अद्यापि रानटी अवस्थेंत होती. हिंदुस्थानांत ज्या काळीं अग्नि, वायु आणि पाऊस उत्पन्न करणाऱ्या अस्त्रांचा शोध लागला होता, त्या काळीं इतर जगांतील रानटी लोक अद्याप दगडाधोंड्यांच्या हत्यारांतच (Stone age) घुटमळत होते. आर्यावर्तांतील लोकांचं पुष्पक विमान ज्यावेळीं डौलानं आकाशांत घिरट्या घालीत होतं त्यावेळीं आमच्यावर सत्ता गाजवीत राहिलेले पाश्चात्य देशांतील वीर जनावरांचं कच्चं मांस खाऊन जमिनीवरच नग्नावस्थेंत फेर धरून नाचत होते. ज्या वेदांत 'व्यचिष्टे बहुपाय्ये यतेमहि स्वाराज्ये ' (ऋ. मं. ५ सूक्त ६६ ऋ. ६) अशा तऱ्हेच्या अनेक लोकांनीं चालविलेल्या लोकसत्ताक राज्याची स्पष्ट कल्पना आली आहे त्या वेदांच्या कालांत पाश्चिमात्य लोकसत्ताक राज्यांच्या राजधान्यांतून मानवजात अस्तित्वांत होती किंवा नाहीं ह्याची शंका आहे. ह्यांत अतिशयोक्ति नाहीं. गतवैभवाचं गुणगान नाहीं. आजच्या पाश्चिमात्य संस्कृतीला कमी लेखण्याचा उद्देश

नाहीं. आलेले आघात खिलाडू वृत्तींनं सहन करण्याची ताकद आम्हा हिंद-वासीयांत आहे. आम्ही सुधारणेच्या नी संस्कृतीच्या शिखरावर असतांना आमच्या हातून घडलेल्या चुकांचं प्रायश्चित्त आज आम्ही भोगतों आहोंत. म्हणूनच झालेल्या चुका पुन्हां न होऊं देण्याची खबरदारी आपण घेऊं या. व्यक्तींचे मानापमान, व्यक्तींचे दुरभिमान आपण बाजूला ठेवूं या. प्राचीनकाळीं आपल्या समाजांत असलेल्या गुणांचा परिपोष करून दोषांचं निर्मूलन करण्याकरितां निःपक्षपातीपणानं गत-कालांतील आपल्या गुणदोषांचं विवेचन करूं या.

—*—

५ : उन्नति कां अवनति ?

समाजाची प्रगति मुख्यतः समाजांतील बुद्धिवान् लोकांवर अवलंबून असते हें जरी त्रिकालाबाधित सत्य असलं तरी नुसत्या बुद्धिवान् लोकांना कांहींच करितां येत नाहीं. समाजांतील बुद्धिवान् लोक हे नेहमींच अल्पसंख्याक असतात. पुढारी एकटाच असतो. अनुयायी मात्र शेंकडो असतात. आपल्या बुद्धीच्या जोरावर समाजांतील इतर लोकांचीं मनं आपल्याकडं आकर्षून घ्यायला कौशल्य लागतं. आपल्या आदर्श आचरणावर, आपल्या त्यागाच्या जोरावर, आपल्या गोड नी मनाला जाऊन भिडणाऱ्या वक्तृत्वावर खरा बुद्धिवान् माणूस समाजाला आपल्याकडं खेचूं शकतो. पौराणिक कालापर्यंतचे ज्ञाते ह्याच गुणांनीं समाजावर आपली छाप पाडूं शकले. पौराणिक कालीं समाजांत चलबिचल झाली. तत्कालीन ब्राह्मणांनीं केलेला सत्तेचा दुरुपयोग समाजाला पटला नाहीं. ब्राह्मण त्यागी आहेत, ब्राह्मण तत्त्ववेत्ते आहेत, ब्राह्मण बुद्धीनं श्रेष्ठ आहेत, ब्राह्मण बालमनाला शिक्षण देताहेत पण त्याच वेळीं ब्राह्मण इतर लोकांना आपल्यापेक्षां कमी लेखतात, त्यांच्यावर जुलमानं आपलं वर्चस्व गाजवितात आणि त्यागाच्या नांवाखालीं संपूर्ण सत्ताधारी बनण्याचा प्रयत्न करितात ही गोष्ट समाजाला असह्य झाली.

शिवाय त्यावेळीं ब्राह्मणांचं कर्मकांड फारच बोकाळलं होतं. मनाची एकतानता हें ध्येय साधण्याकरितां यज्ञयागादिकांची उत्पत्ति झाली. पण ध्येय बाजूला राहून साधनाला अवास्तव महत्त्व आलं. ब्राह्मणांनीं दारू पिऊं नये, मांस खाऊं नये असे कडक निर्बंध होते. पण यज्ञीय पशूचं मांस खाण्याला त्यांना मुभा होती. ह्या सवलतीचा मोह तत्कालीन होत्यांच्या बाबतींत इतक्या हीन थराला गेला कीं फक्त अभक्ष्यभक्षण आणि अपेयपान करण्याला आपल्याला सवड मिळावी म्हणूनच हे बुद्धिवादी लोक यज्ञयागादिकांचं प्रस्थ माजवीत आहेत असा त्यांच्यावर उघड उघड आरोप होऊं लागला. तरीपण मरण आणि मरणा-

नंतरच्या यातना ह्यांची समाजाला वाटत असलेली भीति त्यांना उघड उघड ब्राह्मणांविरुद्ध बंड पुकारूं देत नव्हती. ब्राह्मण हा अद्याप त्यांना आपला आधारच वाटत होता. समाजमनाच्या ह्या दुबळेपणाचा फायदा घेऊन ब्राह्मणांनीं त्यांना निरनिराळे मंत्र सांगितले, देवतांची आराधना सांगितली, तीर्थाटणं सांगितलीं आणि सत्पात्र ब्राह्मणांना दानंहि सांगितलीं. प्रथम प्रथम मानवीमनाला हें पटलंहि. पण ज्या मनाला फक्त एकतानतेंतच खरं समाधान लाभतं त्या मनाला ह्या बाह्योपचारांनीं समाधान लाभण्याऐवजीं त्यांची उपाधीच वाढूं लागली. मनाची एकतानता होईना. तळमळ अधिकाधिक वाढूं लागली. सामाजिक सुखाची आणि उन्नतीची कल्पना बाजूला पडून जो तो आप-पल्या परीनं बलिष्ठ होण्याचा प्रयत्न करूं लागला. अखिल समाजहिताचा विचार ब्राह्मणांनीं सोडून दिला. राजे लोक सत्तेचा दुरुपयोग करूं लागले. अन्यायानं, अनीतीनं, समाजाची फसवणूक करून वैश्य धन-संचय करण्याच्या मागं लागले! गरीब बिचारे शूद्र! त्यांचा कुणी वालीच नसल्यानं दारिद्य, असमाधान, हालअपेष्टा ह्यांनीं पुरेपूर गांजून गेले.

अशा वेळीं गौतमबुद्धाचा अवतार झाला. गौतमबुद्ध हा राजपुत्र होता. समाजांतील सारीं सुखं त्याच्या हातापायाशीं होतीं. सुंदर आणि सुशील पत्नी, नुक्तंच झालेलं पुत्ररत्न, राज्योपभोगांची विपुलता आणि अनिर्बंध सत्ता. त्याच्या ऐहिक सुखांत कोणत्याच बाबतींत कमीपणा नव्हता. असं असतांनासुद्धां बुद्धाला राज्यत्याग करावासा वाटला, हेंच त्यावेळच्या समाजाच्या अधःपाताचं गमक आहे. समाजांत रक्तपाताची क्रान्ति व्हायला ज्याप्रमाणं समाजाचं दारिद्य समाजाला असह्य व्हावं लागतं, आधुनिक जगांत युद्ध निर्माण व्हायला ज्याप्रमाणं समाजाचा आर्थिक पाया डळमळावा लागतो, त्याप्रमाणं समाजांत धर्मप्रवर्तक महात्मा निर्माण व्हायला समाजाच्या मानसिक प्रकर्षाला जबरदस्त धक्का बसावा लागतो. ह्या दृष्टीनं समतोल मनानं विचार केल्यास बुद्धाचा अवतार त्या काळीं अपरिहार्य होता असंच म्हणावं लागेल. समाजाची घडी विस्कटलेली होती. समाज अगतिक झाला होता. सान्या समाजाला

एकत्र आणून समाजाला प्रगतिपथावर नेऊन सोडण्याची ताकद असलेला अलौकिक पुरुष त्यावेळच्या समाजांत नव्हता.

राजपुत्र सिद्धार्थ झाला समाजाची हीनदीन स्थिति पाहवली नाहीं. जिकडं पहावं तिकडं दुःख, मनस्ताप नी निराशा! राजवाड्यांत सुखांची रेलचेल होती. पण राजवाड्याबाहेर गरिबाच्या झोपडींत सुख औषधालासुद्धां नव्हतं. सारा समाज यज्ञयागांत होणाऱ्या आर्थिक पिळणुकीनं पुरेपूर गांजला गेलेला होता. सिद्धार्थ विचार करूं लागला. मी आज राजपुत्र आहे. उद्यां मी राजा होणार! मी आज सुखी आहे. राजा झाल्यावरसुद्धां मी सुखांतच राहीन. पण माझ्या राज्यांतील प्रत्येक व्यक्तीला माझ्याइतकाच सुखांत राहण्याचा हक्क नाहीं का? मी जो प्रजेकडून करभार घेणार त्या करभारांत प्रजेला सुखी करणं हें माझं कर्तव्यच नव्हे का? माझ्या हातून प्रजेचं कल्याण होत नसेल, माझ्या राज्यांतील प्रजा माझ्या नांवावर सुखानं नांदूं शकत नसेल, माझ्या राज्यांतील अकालीं होणारे मृत्यू मला थांबवितां येत नसतील, रोगपीडित माणसांना निरोगी करण्याचं सामर्थ्य माझ्यांत नसेल तर मी राजा होण्याला नालायख आहे. समाजाचं सुख तेंच माझं सुख. मानवीसमाजाची प्रगति हेंच माझं ध्येय आणि तें साधण्याकरितां मला माझ्यांत ताकद निर्माण केली पाहिजे, ह्या एकाच विचारानं सिद्धार्थ अस्वस्थ झाला. राजवाड्यांतील ऐश्वर्य त्याला असह्य झालं. पत्नी, पुत्र, अधिकार ह्यांचा त्याला वीट आला. आपल्यांतील दुबळेपणा घालविण्याचा त्यानं निश्चय केला. महात्म्यांच्या मनाचा एकदां निश्चय झाला कीं त्यांना आपल्या दृढनिश्चयापासून प्रत्यक्ष परमेश्वरदेखील परावृत्त करूं शकत नाहीं. राजपुत्र सिद्धार्थानं बरींच वर्षे विचारांत घालविलीं. साऱ्या समाजाची बारकाईनं पाहणी केली. त्यानं राज्याचा त्याग केला. निष्पाप आणि सुशील पत्नीचा कठोर अंतःकरणानं निरोप घेतला. अजाण बालकाचा प्रेमपाशसुद्धां त्याला त्याच्या दृढनिश्चयापासून परावृत्त करूं शकला नाहीं. अचानकपणें एके दिवशीं सिद्धार्थ आपल्या मनाची तळमळ शांत करण्याकरितां, आपल्यांतील दैवी सामर्थ्य जागं करण्याकरितां, समाजहिताच्या ध्येयानं प्रेरित होऊन, सर्वसंगपरित्याग करून एकाएकीं नाहींसा झाला.

सहा वर्षे सतत तपश्चर्या करूनसुद्धां गौतमबुद्धाला मनाचं खरंखुरं समाधान लाभलं नाहीं. मन एकाग्र करणं ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाहीं. मनावर विजय मिळविणं हा सर्व विजयांचा राजा आहे. आपण थोडा वेळ डोळे झाकून मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करावा. कसला तरी आवाज ऐकूं येतो. ह्या आवाजावरून मनांत एकादी कल्पना येते. कल्पनेतून कल्पना, फिरून तिसरी कल्पना, अगदीं साखळी जोडल्यासारखी वाटते. पुन्हां दृढनिश्चयानं मन एका ठिकाणीं शांत करण्याचा प्रयत्न करावा. जागेपणीं झोप घेण्याचा निश्चय करावा. झोपेवरून आदल्या रात्रींची आठवण व्हावी. काल रात्रीं आपल्याला झोंप लवकर कां बरं आली नाहीं ? मन लागलीच त्या कारणपरंपरेकडं वळतं. कारण कालची भजीं. भजावरून हॉटेल. हॉटेलवरून दारूगुत्ता, दारूगुत्त्यावरून एकाद्या दारुड्याची बडबड, त्याच्या अचकट विचकट शिव्या, जे कधीं आपण उच्चारणं शक्य नाहीं अशा अपशब्दांची मानसिक उजळणी, साऱ्या साऱ्या घाणेरड्या गोष्टी मनापुढं उभ्या राहतात. आपल्या रोजच्या व्यवहारांत ज्या गोष्टी करण्याची आपली तयारी नसते, अशा गोष्टींकडंच ध्यानाच्या वेळीं मन ओढ घेत असतं. ह्या साऱ्या गोष्टींवरून मन निश्चल करणं किती अवघड आहे ह्याची साधारण कल्पना येईल. रोजच्या अभ्यासानं नी चिकाटीनं ही गोष्ट साध्य करतां येते हें जरी खरं असलं तरी इतक्या चिकाटीनं अभ्यास करून मनावर ताबा मिळविणारे लोक फारच विरळे. हेंच ह्या मानवीजीविताचं ध्येय आहे. जगांतील प्रत्येक माणसाकडून मनावर ताबा मिळविण्याचा अभ्यास होऊं लागला तर ह्या पृथ्वीवर नंदनवनच काय पण आनंद, उल्हास, सुख नी शांति ह्यांचंच साम्राज्य होईल.

अशा तऱ्हेचं साम्राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांत गौतमबुद्धाची गणना आहे. सहा वर्षांच्या निष्फळ तपश्चर्येनंतरसुद्धां ध्येयनिष्ठेनं प्रेरित झालेला गौतम निराश झाला नाहीं. समाजाचं हित करण्याची ताकद आपल्यांतच आहे. आपण जर ही गोष्ट करूं शकलों नाहीं तर इतर कोणीहि करूं शकणार नाहीं. समाजाबद्दल मनापासूनच्या कळकळीनं केलेले प्रयत्न कधींहि वाया जाणार नाहींत, असा फिरून

निश्चय करून गौतमबुद्धानं आपलं मानसिक सामर्थ्य वाढवून साऱ्या जगावर आपल्या मनःसामर्थ्यानं फिरून आनंदाचा साजशृंगार चढविण्याचा चिकाटीनं प्रयत्न केला. अखेर गयेंतील 'बोधिवृक्षाखालीं' त्याला दिव्यज्ञान झालं. दिव्यज्ञान होणं, दिव्यदृष्टि मिळणं, मोक्षसुखाची प्राप्ति होणं, साऱ्या गोष्टींचा अर्थ मनावर विजय मिळविणं हाच आहे. निरनिराळ्या तत्त्वज्ञान्यांनीं, आजवर, ही गोष्ट अतिशय अवघड आहे असाच मतप्रचार केला आहे. कोणतीहि गोष्ट अवघड आहे म्हणूनच सांगायला सुरवात केली कीं ती अतिशय सोपी असूनसुद्धां अवघडच ठरते असा अनुभव आहे. 'अवघड असेल तें सोपं करा' हें शिक्षणशास्त्रांतील एक आद्यतत्त्व आहे. असं करण्याऐवजीं मन स्थिर करणं अवघड आहे, सर्वसाधारण माणसाला तें अशक्य आहे, भल्याभल्यांचा जिथं टिकाव लागला नाहीं तिथं तुमच्याआमच्यासारख्यांचा काय पाड, अशा तऱ्हेचे निरुत्साही विचार कांहीं तत्त्वज्ञान्यांनीं जगांत रूढ केले आहेत. जी गोष्ट बुद्धासारख्या माणसाला साध्य झाली, जी गोष्ट येशू ख्रिस्तासारख्या धर्मप्रणेत्यानं जगांत अगदीं सोपी करून दाखविली, ती गोष्ट साध्य करणं तुम्हांआम्हालादेखील शक्य आहे. फक्त प्रयत्नांची शिकस्त करणं मात्र जरूर आहे. हेंच अखिल मानवजातीचं खरंखुरं तत्त्वज्ञान आहे. आजवर जगांतील ज्ञात्यांनीं, संशोधकांनीं आणि धर्मप्रवर्तकांनीं अशा तऱ्हेचे करून प्रयत्न केले आहेत. ज्ञात्यांनीं मानसिक सामर्थ्य निर्माण केलं आणि त्या सामर्थ्याचा समाजाच्या प्रगतीकरितां उपयोग केला. मन मानेल तेव्हां मानसिक सामर्थ्याच्या जोरावर सुखदुःखापलीकडील चिरंतन एकतानतेचा अनुभव घेण्याकरितां ते ध्यानस्थ बसत. सारे ऐहिक सुखोपभोग, अधिकार, मोठेपणा त्यांना ह्या आत्यंतिक सुखापुढं तुच्छ वाटत होता. मनाच्या शांतीकरितां ध्यानस्थ बसावं आणि इतर वेळीं समाजहित साधावं हीच त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता होती. अज्ञात राहून त्यांनीं समाजाला शिकवण दिली. त्यांना कोणताच स्वार्थ साधायचा नसल्यानं त्यांनीं समाजाला दिलेली शिकवण पूर्ण निर्दोष होती. त्यांचा समाजावर निर्बंध नव्हता, त्यांनीं समाजांत भय निर्माण केलं नाहीं, समाजांत आपलं स्तोम माजविण्याचा प्रयत्न केला नाहीं. समाजहिता-

करितां अमुक गोष्ट करणं जरूर आहे, समाजाच्या प्रगतीकरितां प्रत्येक व्यक्तीनं प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे, अशा तऱ्हेनं वागल्यानं प्रत्येक व्यक्तीचं आयुष्य अखेरपर्यंत सुखाचं होईल ही त्यांची शिकवण. पटल्यास समाजानं त्याप्रमाणं वागावं, न पटल्यास सोडून द्यावं. इतक्या निर्भीड वृत्तीनं हे ज्ञाते समाजांत अज्ञातपणानं वावरत होते आणि आपण सांगितलेल्या गोष्टी समाजाला पटताहेत हें पाहून त्यांना आनंद होत असे. ह्या सात्त्विक आनंदाच्या जोरावर फिरून नवी शिकवण देण्याचा ते कसोशीनं, खऱ्या तळमळीनं आणि निःस्वार्थीपणानं सतत प्रयत्न करीत होते. म्हणूनच समाज ह्या ज्ञात्यांच्या शिकवणुकीनं प्रयत्नवादी, संघटित आणि प्रगतिपर असाच झाला.

तत्त्वसंशोधकांनीं देखील आपल्या बुद्धीच्या जोरावर ज्ञात्यांच्या प्रमाणंच मानसिक एकतानता साधली. पण चिरंतन शांतिसुख अनुभवणं हें त्यांचं ध्येय नव्हतं. आपल्या तत्त्वसंशोधनानं समाजाचं हित होईल का अनहित होईल ह्याचा विचार करायला ते कधींहि थांबले नाहींत. सतत विचार करीत पुढं जाणं हेंच त्यांचं ध्येय होतं. समाजाचं सुखस्वास्थ्य त्यांच्या नजरेपुढं प्रामुख्यानं नसल्यानं, त्यांनीं केलेल्या आध्यात्मिक संशोधनाचा समाजाला उपयोग झाला नाहींच पण त्यांनीं केलेल्या आधिभौतिक संशोधनाचा उपयोगाऐवजीं दुरुपयोग मात्र झाला. एकानं क्रान्तिवादाचा पुरस्कार केला, दुसऱ्यानं उत्क्रान्तितत्त्व पुढं केलं. कांहींचा मनवाद, कांहींचा बुद्धिवाद; कांहींचा जडवाद, कांहींचा धनवाद; कांहींचा समाजवाद; कुणाचा हा वाद, कुणाचा तो वाद, अशा अनेक वादांचा पुरस्कार झाला. आधिभौतिक वादांतसुद्धां आज इतक्या प्रचंड प्रमाणावर शोध लागले आहेत कीं त्या साऱ्या संशोधनांच्या नुसत्या सूचीचे प्रचंड ग्रंथ होतील. सर्वांचीं तत्त्वं बरोबर आहेत, सर्वांचे शोध अचूक आहेत; पण साऱ्या शोधांचा समन्वय लावून त्यांचा समाजहिताला उपयोग होत नसेल तर ते सारे शोध नी वाद समुद्राच्या बुडाशीं कायमचे गाडून टाकण्याच्या लायकीचे आहेत अशी विचारसरणी जोपर्यंत जगांत निर्माण होत नाहीं तोपर्यंत हे सारे वाद असेच फोफावत जात जात त्यांच्या दडपणाखालीं एके दिवशीं ह्या सबंध पृथ्वीचा सत्यानाश होणार आहे कीं काय अशी कल्पना मनाला वाटून

जातें. ह्या कल्पनेंत अशक्यता नाहीं हें ह्या विसाव्या शतकांतील अणु-शक्तीनं सिद्ध झालं आहे. ह्या नवीन शोधानं एक शहरच्या शहर व त्याच्या आसपासचा पाचपंचवीस मैलांचा टापू उध्वस्त केला आहे. हाच शोध थोडा अधिक प्रभावी झाल्यास पृथ्वी नामशेष व्हायला कितीसा वेळ लागणार आहे ? ह्या सार्‍या तत्त्ववेत्त्यांच्या अखिल जाग-तिक परिषदा भरतात, त्यांचे वादविवाद होतात, शोधांच्या आणि तत्त्वांच्या चिकित्साहि होतात. पण हे सारे शोध नी हीं सारीं तत्त्वं कशा-करितां आहेत, प्रचंड सभा भरवून वादविवाद कशाकरितां करायचे, श्रेष्ठ संशोधकांना बक्षिसं कशाकरितां द्यायचीं ह्याचा ह्या सभांतून कसा विचार होत नाहीं ह्याचं राहून राहून आश्चर्य वाटतं. बहुजनसमाजाचं हित साधलं जात नसेल तर हीं सारीं तत्त्वं आणि हे सारे शोध निकामी आहेत.

बुद्धाच्या आधींच्या आणि बुद्धानंतरच्या धर्मप्रणेत्यांनीं आपली स्वतःची मानसिक उन्नति साधल्यानंतर समाज आणि समाजहित हें एकच ध्येय आपल्या डोळ्यापुढं ठेविलं होतं. आपल्याला जें वाटलं तें त्यांनीं निर्भय मनानं आणि निर्भीडपणानं समाजापुढं मांडलं. सुर-वातीला स्वतःच्या मानसिक सामर्थ्याखेरीज कोणतीहि बाहेरील शक्ति त्यांच्या पाठीशीं नव्हती. आपलं तत्त्व आंधळ्या समाजावर जुलमानं लादायचं ही त्यांची वृत्ति नव्हती. आपण मांडलेलं तत्त्व खरंखुरं समाजहिताचं आहे हें समाजाला पटवून देण्याचा मात्र त्यांनीं सतत प्रयत्न केला. त्यांनीं आपल्या संशोधनांचा बाजार मांडला नाहीं, राज्यकर्त्यांकडून पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला नाहीं. ते सतत समाजाच्या तळच्या थरांत वावरत राहिले. सत्ताधाऱ्यांनीं त्यांच्यावर घाणेरडे आरोप केले, आपल्या सत्तेला धक्का बसेल ह्या भीतीनं त्यांचा अनन्वित छळ केला. असं असूनसुद्धां सारे छळ हसतमुखानं नी उदार मनानं सहन करून बहुजनसमाजावर आपल्या सद्धर्माची अजिंक्य छाप पाडली. तरी पण ह्या व्यक्तिनिष्ठ धर्मप्रणेत्यांच्या धर्मतत्त्वांना समाजनिष्ठ वेदकालीन ऋष्यांच्या तत्त्वांचा उठाव येऊं शकला नाहीं.

गौतमबुद्ध एक सद्धर्मप्रवर्तकच होता. त्यावेळच्या वैदिक धर्मगुरूंनीं कळसाला नेलेलं जीवहत्याकांड थांबविणं हें त्याचं पहिलं ध्येय होतं. त्यांनीं

समाजांत रूढ केलेली विषमता घातुक आहे म्हणून त्या विषमतेचा नायनाट करणं हें त्याचं दुसरं धोरण होतं. जो परमेश्वर समाजांतील दुःखं, समाजांतील रोग, समाजांतील असत्प्रवृत्ति ह्यांचा नायनाट करूं शकत नाहीं अशा निष्क्रिय परमेश्वराचं अस्तित्व झुगारून देऊन कर्मकांडाच्या नांवाखालीं होणारी समाजाची पिळवणूक थांबविणं हें त्याचं तिसरं तत्त्व होतं. अहिंसा, सत्प्रवृत्ति आणि शून्यवाद ही त्याची तत्त्वत्रयी होती.

मानवीसमाज हा जगाच्या सुरवातीपासून आतांपर्यंत समाजांतील बुद्धिवाद्यांच्या हिंदोळ्यावर झोके घेत आहे. सुखाच्या झोक्याबरोबर समाज उंच उंच जाऊं लागतो. हें आत्यंतिक सुखाचं समाधान अनुभवतांना समाज सुखाच्या अत्युच्च बिंदूला पोचतो न पोचतो तोंच तो सुखाचा झोला क्षणभर–फक्त क्षणभरच–स्थिर होतो. त्या ठिकाणीं समाजाला आपल्या सुखाची परमावधि झाल्यासारखी वाटते. त्याच ठिकाणीं कायम राहण्याची समाजाची धडपड सुरू होते. इथूनच समाजाच्या अधोगतीला प्रारंभ होतो. त्या उंचावलेल्या झोल्याला उलट गति मिळते. ही झोल्याची उलट गति सावरून धरण्याचा समाज प्रयत्न करीत असतो. पण हे प्रयत्न झोल्याला मिळालेल्या नैसर्गिक गतीच्या सामर्थ्यापुढं साहजिकच फिके पडतात. सुखाच्या अत्युच्च टोकावर क्षणभर स्थिरावलेला हा झोला खालीं केव्हां घसरला हें समजत देखील नाहीं. झोला उतारावर असतांनासुद्धां नुकत्याच अनुभवलेल्या उंच झोल्याच्या परमावधीची आठवण मनाला रिझवीत असते. शेवटीं झोला अगदीं खालीं येतो. समाजांतील अवनतीचे खाचखळगे, काटेकुटे आतां झोला खालीं आला असतांना अगदीं जवळ दिसत असल्यानं समाज भयभयीत होतो. हा झोला इथंच स्थिर झाल्यास, क्षणभर–फक्त क्षणभरच–समाज किंकर्तव्यतामूढ होतो. तितक्यांत झोला फिरून उलट बाजूनं वर जाऊं लागतो. अशा वेळीं एकादा ज्ञाता, एकादा तत्त्वसंशोधक, एकादा धर्मप्रवर्तक अवनतीला पोचलेल्या ह्या समाजाच्या झोल्याला एक हलकासा झोका देतो. नैसर्गिक गतीला मिळालेल्या ह्या मानवी मनाच्या झोक्यानं समाजाचा झोला फिरून वरवर जाऊं लागतो. त्यावेळेपुरतं आपल्या प्रगतीचं सारं श्रेय

समाज त्या शात्याला द्यायला तयार होतो. नंतर फिरून समाजाच्या प्रगतीच्या नी सुखाच्या नव्या युगाला सुरवात होते.

अधोगतीच्या आत्यंतिक सीमेवर स्थिर झालेल्या समाजाच्या झोल्याला गौतमबुद्धानं एक हलकासा झोका दिला हें सत्य आहे. गौतमबुद्धाचा हा प्रयत्न त्यावेळच्या सतावलेल्या समाजमनाला पूर्णपणें पटला हेंहि तितकंच सत्य आहे. ह्याशिवाय गौतमबुद्धाच्या ह्या नवीन धर्माचा प्रसार साऱ्या आशियाखंडांत इतक्या झपाट्यानं झाला नसता. ह्याशिवाय गौतमबुद्धाची गणना दशावतारांत झाली नसती. गौतमाचा छळ झाला नाहीं. इतकंच नव्हे तर तत्कालीन सम्राटानं स्वतः बुद्धधर्माचा स्वीकार करून उलट त्याला मदतच केली. ह्याचं श्रेय जितकं गौतमाच्या धर्मतत्त्वांना आहे तितकंच किंवा त्याहून अधिक तत्कालीन समाजाच्या भयाण अवनतीला आहे, ही गोष्ट आपल्याला दृष्टीआड करितां येत नाहीं. वैदिक तत्त्वज्ञानानं समाजाचा झुलता झोला सुखाच्या ज्या आत्यंतिक टोकाला नेऊन भिडविला होता त्याच्या अगदीं उलट दिशेला समाज चालला असतांनाच बुद्धानं समाजाला झोका दिला ह्याहि गोष्टीचा विचार करणं जरूर आहे. बुद्धाच्या हयातींत त्याच्या नवीन धर्माला कोणाचाच विरोध झाला नाहीं, एवढंच नव्हे तर त्याच्या ८० वर्षांच्या आयुष्यांतच त्याच्या ह्या नवीन तत्त्वज्ञानाचा वृक्ष बेसुमार फोफावला.

बुद्धानंतरच्या कालांत सुद्धां बुद्धानुयायांनीं त्याची उत्तम तऱ्हेनं जोपासना केली. ठिकठिकाणीं बुद्धतत्त्वज्ञानाच्या प्रसाराकरितां बुद्धविहारांची स्थापना झाली. धनिकांनीं द्रव्य दिलं. राजानं संरक्षण दिलं. समाजानं पाठिंबा दिला. बुद्धशात्यांच्या मानसिक उन्नतीकरितां ह्या विहारांतून सर्व तऱ्हेच्या सुखसोई केल्या गेल्या. विहिरी, तलाव, राहण्याच्या जागा, खाण्याजेवण्याच्या सोयी साऱ्या गोष्टी परिपूर्ण होत्या. तत्त्वज्ञानाचा विचार करावा, विद्वत्परिषदा बोलवाव्या, वादविवाद करावे आणि विहारांत राहून शांततेच्या मार्गानं सद्धर्माचा प्रसार करावा. त्यावेळचा समाज दुःखदारिद्र्यानं गांजलेला होता. समाजांतील सारे लोक ह्या विहारांतील सुखसोईनीं दिपून गेले. जातिनिर्बंध नाहींत, श्रीमंत–गरीब भेद नाहीं,

स्त्रीपुरुषांत विषमता नाहीं, नी संसाराची काळजी नाहीं. अशा तऱ्हेचे हे विहार साऱ्या निराधार रंजल्यागांजलेल्यांना अभूतपूर्व नवलाईचे आधार वाटले असल्यास नवल नाहीं. समाजांतील तरुण स्त्रीपुरुषसुद्धां संन्यास घेऊन ह्या विहारांत आनंदानं वावरूं लागले. ऐन तारुण्यांत संन्यास घेऊन स्त्रीपुरुषांनीं एकत्र राहणं हें समाजहिताच्या दृष्टीनं किती घातुक आहे ह्याची त्यावेळीं कल्पना आली नाहीं. वयमानपरत्वें सर्व आशाआकांक्षांची सफलता अगर विफलता झाल्यानंतर मरणापूर्वीच्या कालांत संन्यस्तवृत्तीनं राहणं वेगळं आणि आशा नुकतीच वाढीला लागली असतांना, सौंदर्याच्या नी तारुण्याच्या कळ्या नुकत्याच फुलायला लागल्या असतांना, विषयोपभोगाच्या इच्छा अनावर असतांनाच, मानवजातीच्या वाढीचा हा सारा मोहोर अवेळीं खुडून संन्यस्तवृत्तीनं राहणं हें समाज-हिताला घातक ठरलं. 'कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें' ह्या निसर्गनियमाला अनुसरून अवेळीं दबल्या गेलेल्या मानवी मनाच्या सहज-प्रवृत्ती ह्या बुद्धविहारांत दुप्पट जोमानं उफाळल्या. एकत्र राहणाऱ्या भिक्षुभिक्षुणींचीं मनं एकमेकाच्या यौवनसुलभ आकर्षणांनीं भारलीं गेलीं. नियम सुटले. बंधनं शिथिल झालीं. संन्यासाचं विडंबन झालं. सद्धर्म-प्रसाराकरितां स्थापन झालेले हे विहार भिक्षूंचे नी भिक्षुणींचे रासक्रीडेचे विहार बनले.

विहारांत आलेल्या सुंदर सुंदर स्त्रियांच्या रूपयौवनसंपदेला भाळून तरुण भिक्षू त्यांच्या पायीं लाचार झाले. त्याचप्रमाणं सतेज आणि डौलदार बांध्याच्या तरुण भिक्षूंवर तरुण भिक्षुणी आषक झाल्या. सद्धर्माचा प्रसार करण्याकरितां विहारांत आलेले हे सारे स्त्रीपुरुष तपस्वी ज्या ध्येयानं विहारांत आले तें ध्येय पार विसरून गेले. ह्यांत धर्मप्रवर्तकाला दोष देण्यासारखं कांहींहि नसून हा तारुण्याचा, उन्मादाचा, तिथल्या निष्का-ळजी जीवनाचा दोष होता. मानवी आयुष्याच्या रानटी अवस्थेंतल्या स्वतंत्र वातावरणाचा फिरून एकदां ह्या विहारांतून मानवजात अनुभव घेत होती. नियमित आहार, नियमित व्यवहार नी निष्काळजी जीवन. शरीरकांति तजेलदार नी आकर्षक बनायला लागणाऱ्या साऱ्या गोष्टींची ह्या विहारांतून विपुलता होती. परिणाम असा झाला कीं सद्धर्माचरण

आणि शून्यवाद ह्यांना मात्र तेथील बरेच भिक्षू पारखे झाले. त्यांना ध्यानस्थ बसणं अशक्य झालं. शून्याचं ध्यान करीत असतांना मनोविकार उसळी घेऊं लागले. मनाची एकाग्रता साधून मन निर्विकार होण्या-ऐवजीं मनश्चक्षूंपुढं तारुण्यसुलभ विषयवासनांचा धुमाकूळ माजूं लागला. ज्या भिक्षूंचीं मनं विषयवासनेकडं धाव घेत होतीं त्यांपैकीं कांहीं जाणून बुजून पापी होते. ते मनांतल्या मनांत भीत होते. पण इतर कांहीं जे मनापासून सदाचरणाचा प्रयत्न करीत होते त्यांचीं मनंसुद्धां सैरावैरा धावत होतीं. ते भीतभीतच मुख्य भिक्षूकडं गेले. त्यांनीं आपली असहाय मनःस्थिति त्यांच्यापुढं मांडली. विहारांतील ज्ञात्यांनीं ह्या अनवस्था-प्रसंगावर इलाज पण शोधून काढला. मन शून्याकार करणं कांहीं कांहीं वेळां त्यांनासुद्धां कष्टसाध्यच होत होतं. अनादि कालापासून मनाची चंचलता सिद्ध झालेली त्यांनासुद्धां मान्य होती. मन ज्याकडं ओढ घेतं, ध्यानस्थ असतांना मन ज्या विचारावर खिळून राहतं त्याच विचारांचं ध्यान करा. स्त्रीपुरुष, चराचर सृष्टीपैकीं जी मूर्ति, जो आकार मनाला अस्वस्थ करीत असतो त्याच ठिकाणीं मन स्थिर करा. एकदां अभ्यासानं मन कायमचं स्थिर होऊं लागलं कीं स्थिरतेची दिशा बदलून शून्याकाराचं ध्यान करणं सहजसाध्य होईल. अशा तऱ्हेनं तत्कालीन ज्ञात्यांच्या विचा-रांची संगति लावली म्हणजे आत्मनाशाचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न कोणीच केला नसून आत्मोन्नति हेंच सर्वांचं ध्येय होतं ह्याची सत्यता पटते.

अभ्यासाचं खरं मर्म हेंच. नेमलेल्या अगर न नेमलेल्या विषयांपैकीं ज्या विषयांकडं विद्यार्थ्याचं मन ओढ घेत असतं त्या विषयांत त्याला रंगूं द्या. अभ्यासानं त्या विषयाशीं एकजीव होण्याची ताकद आधीं बालमनांत दिसूं लागूं द्या. खेळांत का होईना, आधीं बालमनं तल्लीन होऊं द्यात. खेळांत मन एकाग्र होऊं लागलं, सभोवारच्या जगाचा बालमनाला विसर पडूं लागला म्हणजे मग हीच अभ्यासाची दिशा वाटेल त्या विषयाकडं बदलतां येते. ह्यालाच आधुनिक शिक्षणशास्त्रांत खेळतां खेळतां अभ्यास असं म्हणतात.

हें शिक्षणशास्त्रांतील अभ्यासाचं तत्त्व बुद्धानंतरच्या काळांतील ज्ञात्यांनीं प्रथम आचारांत आणलं. ज्यांचीं मनं शून्याकर स्थिर होत नव्हतीं,

ज्यांच्या मनांतील असत्प्रवृत्ती ध्यानधारणेच्या वेळीं बळावत असत, त्या सर्वांनीं ध्यानाभ्यासाचा हा नवा उपक्रम सुरू केला. इथूनच मूर्ति-पूजेला प्रथम सुरवात झाली. हिंदु लोक मूर्तिपूजक आहेत म्हणून त्यांची नुसती हेटाळणी करणं वेगळं! पण ज्या कालांत ही मूर्तिपूजा प्रथम रूढ झाली त्याकालीं मूर्तिपूजेला साधन म्हणून महत्त्व होतं, साध्य म्हणून नव्हे. जगांतील साऱ्या धर्मांचं जें ध्येय त्याहून हिंदुतत्त्वज्ञानाचं, म्हणजे वैदिक तत्त्वज्ञानाचं ध्येय वेगळं नाहीं, तर जगाच्या पाठीवरील सारीं तत्त्वज्ञानं निर्माण होण्यापूर्वीं कित्येक शतकं जें तत्त्वज्ञान निर्माण झालं होतं त्या तत्त्वज्ञानाचं ध्येय जगांतील प्रचलित तत्त्वज्ञानांपेक्षां अधिक वर्धिष्णु, अधिक संग्राहक आणि म्हणूनच मानवी समाजहिताला अधिक पोषक आहे ही गोष्ट सर्वांनींच मान्य केली आहे. मानवीसमाजाच्या वाढीबरोबर निरनिराळ्या धर्म-प्रवर्तकांनीं निरनिराळ्या धर्मभावनांना चालना दिली; पण हीं सारीं वेगवेगळीं धर्ममतं ज्या वेळीं अस्तित्वांत देखील नव्हतीं त्यावेळीं त्या सर्व धर्ममतांचं मूळ जें एकच एक वैदिक तत्त्वज्ञान त्याचा ध्वज पृथ्वीवरील अखिल मानवजातीच्या कल्याणाकरितां डौलानं फडकत होता. ध्वजाचा रंग कोणता असावा, ध्वजाची काठी किती लांब असावी, प्रार्थनामंदिरं वेगवेगळीं असावीं का सर्वांचं प्रार्थनामंदिर एकच असावं, त्या ठिकाणीं निर्गुण परमेश्वराची प्रार्थना करावी का विभूतींची पूजा करावी, का धर्म-ग्रंथांची स्थापना करावी, ही सारी मूर्तिपूजाच झाली. पण साऱ्या धर्मांचं जें एक मुख्य सूत्र म्हणजे समाजमनाची उन्नति, चिरकालीन शांति नी अतुलनीय सुख त्या सूत्राची मुहूर्तमेढ वैदिक धर्मानं रोविली हें आज इतिहासमान्य आहे.

बुद्धधर्मांतील महायानपंथानं मूर्तिपूजेचा पुरस्कार केल्यानंतर समाजानं तिकडं धाव घेतली. ही समाजाची धाव थोपवून धरण्याकरितां हिंदु-धर्मीयांनीं हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाचं कार्य हातीं घेतलं, आणि वैदिक तत्त्वज्ञानाचा ऱ्हास होऊं नये म्हणून नाइलाजानं हिंदूंच्या तत्त्वज्ञानाची षड्दर्शन, भूतदया, अहिंसा नी मूर्तिपूजा यांच्या अधिष्ठानावर फिरून नव्यानं स्थापना करण्यांत आली.

ह्यानंतरच्या कालांत मूर्तिपूजेला अवास्तव महत्त्व आलं. धनिकांनीं निरनिराळ्या देवांचीं निरनिराळीं देवळं उभारलीं. दगडाच्या, चांदीच्या सोन्याच्या हिऱ्यामाणकांच्या अशा मोठमोठ्या मूर्तींच्या स्थापना करण्यांत आल्या. मानसिक सामर्थ्यानं मूर्तीचं आवाहन नी विसर्जन करतां येतं हें तत्त्व मागं पडलं. मनाच्या सामर्थ्याचं मूर्तीच्या सामर्थ्यांत रूपांतर झालं. मानवानंच आपल्या हातानं टाकीच्या घावानं अगर अग्नींत तापवून तयार केलेल्या ह्या दगडाधातूंच्या मूर्तींत अपरंपार सामर्थ्य सामावलेलं आहे अशी मानवी मनाची दिशाभूल झाली. मूर्तीमध्यें सामर्थ्य आहे फक्त मनाची एकाग्रता करण्याचं. मूर्तीच्या ठिकाणीं मन स्थिर होऊं लागलं म्हणजे त्याच स्थिरतेच्या जोरावर अमूर्त परमेश्वराचं ध्यान करतां येईल ही मूळ कल्पना. पण ही मूळ कल्पना दृष्टीआड होऊन मूर्ति हेंच समाज-सर्वस्व झालं.

वैदिक धर्म हा जयिष्णु धर्म कधींच नव्हता. एका हातीं शस्त्र नी एका हातीं शास्त्र घेऊन धर्मप्रसार करण्याचं धर्मवेड हिंदूंमध्यें कधींच नव्हतं. मानसिक उन्नति साधण्याकरितां निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांनीं दाखविलेले मार्ग म्हणजेच वेगवेगळीं धर्मतत्त्वं. ज्याला ज्या मार्गानं आपल्या मनाची उन्नति साधतां येईल तो धर्म त्या व्यक्तीच्या दृष्टीनं श्रेष्ठ आहे, अशी उदार कल्पना तत्कालीन राजेलोकांत सुद्धां रूढ होती. धर्माच्या नांवावर समाजाची उठावणी करणं हें त्यांच्या मनांत देखील कधीं आलं नाहीं. त्यावेळच्या समाजांत अहिंसेचं तत्त्वज्ञान बळावलं होतं. सद्वर्तनाला महत्त्व आलं होतं. कर्मसंन्यासाच्या निवृत्तिपर भावनेनं सारा समाज भारला गेला होता. आणि मूर्तीमध्यें अचाट सामर्थ्य आहे ह्या श्रद्धेनं समाज शिथिल झाला होता.

अशा वेळीं झालेलं इस्लामीयांचं आक्रमण तत्कालीन हिंदूंना असह्य झालं. हिंदू संख्येनं कमी नव्हते. हिंदू सामर्थ्यानं कमी नव्हते. हिंदू संपत्तीनं कमी नव्हते. पण हिंदूंमध्यें प्रतिकारशक्ति नव्हती. त्यावेळचा अहिंसावादी समाज मोकळ्या हातानं हिंसा करायला धजत नव्हता. सद्धर्माचरणानं भारलीं गेलेलीं त्यांचीं मनं हें योग्य का अयोग्य ह्याचा

विचार करण्यांतच गुंतल्यानं विचारांच्या हेलकाव्यांबरोबर तळमळणाऱ्या हॅम्लेटप्रमाणं ते पूर्ण निष्क्रिय झाले होते. देवळांतील दगडामातीच्या मूर्तींच्या देवपणावर त्यांचा आंधळा विश्वास असल्यानं त्या निर्जीव देवाच्या मनधरण्या नी आळवण्या करतां करतां आपण नामोहरम केव्हां झालों हें त्यांना समजलं देखील नाहीं. ज्याचं मन बळकट असतं तो आपल्यापेक्षां शरीरानं अधिक धिप्पाड असलेल्या शत्रूला देखील भारी असतो. शरीराच्या उमेदीपेक्षां मनाची उमेदच युद्धांत प्रबळ ठरते. ह्या मनाच्या उमेदीचं हिंदुमनांतून संपूर्ण उच्चाटण झालं होतं.

ह्याच्या उलट त्यांच्यावर आक्रमण करणारे शत्रु हिंसावादी होते. धार्मिक आक्रमणाकरितां सत्तेचा उपयोग करणं हें त्यांचं धोरण होतं. त्यांचा आचार, विचार नी ध्येय एक होतं आणि तें म्हणजे आक्रमण. त्यांनीं ज्या ज्या वेळीं हिंदूंवर हल्ले केले त्या त्या सर्व वेळीं त्यांनीं विजयच मिळविला. ह्याचं कारण त्यावेळच्या रूढ धर्मभावनांनीं हिंदूंचीं मनं मारलीं गेलीं होतीं. जसे जसे शत्रूला अधिकाधिक विजय मिळत गेले तशीं तशीं हिंदुमनं अधिकाधिक दुबळीं होत गेलीं आणि शत्रू मात्र विजयानं बेहोष झाले. आपण धर्मप्रसाराकरितां प्राणांची खैरात करतों आहोंत म्हणूनच आपल्याला विजयश्री सतत माळ घालते आहे ह्या भावनेनं त्यांचीं मनं, आपण करतो आहोंत तें ईश्वराला सर्वस्वीं मंजूर आहे असं वाटून, उत्तरोत्तर अधिकाधिक बलशालीच होत होतीं. त्यांनीं देश जिंकले, जिंकलेल्या देशांतील लोकांच्या बायका पळविल्या, बायकांमुलांसुद्धां उभे संसारच्या संसार आपल्या धर्मांत ओढले. एकदां बाटलेला प्राणी भ्रष्ट झाला असल्यानं तो परत आपल्या धर्मांत येऊं शकत नाहीं ह्या हिंदुतत्त्वज्ञानाचा फायदा घेऊन सामुदायिक पद्धतीनं त्यांनीं खेडींच्या खेडीं आपल्या धर्मांत ओढलीं आणि अशा तऱ्हेनं तलवारीच्या धारेवर हां हां म्हणतां जिकडं तिकडं इस्लामी संस्कृतीचा प्रसार केला. देवळं लुटलीं, मूर्ती फोडल्या आणि त्या फोडलेल्या मूर्तींच्या पोटांतील उमाप संपत्तीनं आपले खजिने भरले. आपण करतो तें योग्यच आहे, आपल्यामागं धर्माचं अधिष्ठान आहे, आपल्या पराक्रमाच्या जोरावर आपल्या धर्माचा प्रसार अखिल भरतखंडांत झाला पाहिजे ह्या एकाच महत्त्वाकांक्षेनं त्यांचं

कार्य सतत चालू होतं. समाजाची उन्नति, मानवी मनाचा विकास, बंधुभावाची स्थापना ह्यांतील एकहि कल्पना त्यांच्या नजरेपुढं नव्हती. लढाया, जाळपोळ, लुटालूट, जुलूम ह्यांच्या डळमळीत पायावर इस्लामी साम्राज्याचे ताबूत खडे होते. कांहीं काळ हेच डळमळीत पायावरील ताबूत अखिल वैदिक संस्कृति नामशेष करून टाकतात कीं काय अशी भीति पण वाटत होती.

उलट हिंदु संस्कृतींत रामच नव्हता. अहिंसावादानं भारलेला समाज, ऐहिक सुखावरील अनासक्ति, संन्यासाची शिकवण ह्या साऱ्या गोष्टींनीं स्वतःच्या समाजसंरक्षणाविषयीं सुद्धां सारा हिंदुसमाज उदासीन होता. एकी नव्हती, संघटना नव्हती, एकसूत्रीपणा नव्हता. बुद्धिवाद्यांची बुद्धि निवृत्तिपर तत्त्वज्ञानावर टांगली गेली होती. आपापसांतील यादवीनं सामर्थ्य-वाद्यांचा एकजिनसीपणा नाहींसा झाला होता. व्यक्तिनिष्ठ स्वार्थापलीकडं धन-वाद्यांची नजरच पोचत नव्हती. कामकरी लोक अज्ञानांत नी दारिद्र्यांत पिचत होते. वैदिक समाजदेवतेच्या सौभाग्याच्या मंगलसूत्रांतले हे मंगल मणी, त्यांना एकत्र ठेवणारा धागा तुटल्यामुळं, ओघळून इतस्ततः विखुरले गेले होते. याचं कारण वैदिक परंपरेचं सूत्र बुद्धमतप्रसारानं अनिर्वाहपक्ष म्हणून अचानक-पणें तोडलं होतं. बुद्धमतवादाला आळा घालण्याकरितां रामानुजाचार्य, मध्वाचार्य, शंकराचार्य, वल्लभाचार्य ह्यांनीं केलेले प्रयत्न अपुरे होते. विद्वानांच्या सभेंत बुद्धमताचं खंडन केल्यानं, बुद्धधर्मातील कांहीं मतं उचलून हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न केल्यानं पुढं गेलेला समाज मागं परतवणं त्यांना शक्य झालं नाहीं. बालमनविकासाचा अविरत प्रयत्न चालू असल्याशिवाय आदर्श पिढीचा उदय होत नाहीं हें आद्य-तत्त्व ह्या मतामतांच्या गलबल्यांत कुणाच्या लक्षांतच राहिलं नाहीं. सारे वर्ण वेगळे झाले. साऱ्या व्यक्ती अलग झाल्या. समाजांतील सारे दुवे निखळले. इथून पुढें व्यक्तिमाहात्म्याला सुरवात झाली.

स्वपराक्रमाच्या जोरावर विजयानगरचं ब्राह्मणी राज्य स्थापन करून ब्राह्मणांनीं क्षात्रवृत्तीचा स्वीकार केला. कांहीं वैश्यांनीं देखील आपल्या मनगटाच्या जोरावर राज्यं स्थापन केलीं आणि ते क्षत्रिय बनले. इस्लामी-यांच्या वर्चस्वामुळं कांहीं क्षत्रिय व्यक्तींनीं आपखुषीनं त्यांचं दास्य पत्करलं.

चातुर्वर्ण्य ही संस्था जन्मावर अधिष्ठित झाली नसून तींत गुणकर्मालाच प्राधान्य असल्यानं एवढ्यानं कांहींच बिघडलं नाहीं. पण, वृत्ती योग्या-योग्यतेप्रमाणं बदलूं लागल्या असून सुद्धां जाती मात्र जन्मावरच ठरूं लागल्या. हा एक विशेष दोष ह्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत प्रामुख्यानं पुढं आला.

अशा रीतीनं पौराणिक कालानंतर बुद्धधर्माचा उगम आणि प्रसार ह्याचा इतक्या विस्तारानं विचार करण्याचं कारण वैदिक धर्माला विरोध करणारं हें तत्त्वज्ञान वैदिक धर्माचं बहुतांशीं उच्चाटन करूं शकलं होतं. बुद्धधर्मानं वैदिक धर्मावर कांहीं काळ मात केली खरी, पण बुद्ध तत्त्वज्ञान बहुजनसमाजाच्या आवांक्याबाहेरचं असल्यानं त्या तत्त्वज्ञानाचा भडकपणा फार दिवस टिकला नाहीं. बुद्धधर्माचा समाजा-वर मात्र विपरीत परिणाम झाला. ह्याच कालखंडांत समाजशिक्षण मागं पडलं, बालमनविकासाची पूर्ण आबाळ झाली, समाजमनाचा ध्येयतारा ढगाआड झाला, राजा व प्रजा ह्यांच्यांतील आपुलकी नाहींशी झाली. राजे लोक जोंपर्यंत समाजहिताकरितां तळमळत असत तोंपर्यंत समाज राजाच्या हांकेला धावून जात असे. पण समाजाला राजाकडून साधं संरक्षण देखील जेव्हां मिळेनासं झालं तेव्हां समाजसुद्धां राजाबद्दल पूर्ण बेफिकीर झाला. राजा आला काय, गेला काय नी मेला काय, समाजाच्या दृष्टीनं त्याला महत्त्वच नव्हतं. अशा अगतिक परि-स्थितींतसुद्धां समाजाचं तारूं नाशाच्या खडकावर आपटूं न देण्याचे कसे प्रयत्न झाले आणि त्यांचा कितपत उपयोग झाला ह्याचा विचार आपल्याला ह्यापुढं करावयाचा आहे. प्रयत्न केले गेले ह्याबद्दल आप-ल्याला अभिमान वाटतो. प्रयत्न करीत राहणं हें समाजाचं कर्तव्य आहे, आणि पुढं होणाऱ्या प्रयत्नांना हटकून यश यावं म्हणून मागं झालेल्या प्रयत्नांचा जिज्ञासु वृत्तीनं अभ्यास करणं हें जरूर आहे. पण अभ्यास करतांना मागील शास्त्यांवर दोषारोप करीत बसण्याऐवजीं त्यांच्या उदाहरणांनीं आपल्यामध्यें ते दोष न येऊं देण्याची खबरदारी घेऊनच हा अभ्यास करणं हिताचं आहे.

—*—

६ : मधुर मिलाफ

हिंदुस्थानांतील समाजाच्या भयाण अवस्थेंत देखील मानवीसमाजाचा गेलेला तोल सावरून धरणारे महात्मे नव्हते असं नाहीं. तत्कालीन संतांनीं निरनिराळ्या मार्गांनीं स्वार्थनिरपेक्ष कर्मयोगाचा प्रचार केला. हिंदूमध्यें भेकडवृत्तीची पैदास झाली आहे, हिंदूंतील संघटना लयाला गेली आहे आणि त्यामुळं जगांतून हिंदुत्वाचं आणि त्याबरोबरच वैदिक तत्त्वज्ञानाचं उच्चाटण व्हायची वेळ आली आहे, अशीं स्पष्ट चिन्हं त्या हिंदु महात्म्यांना दिसत होतीं. वेळींच संघटनेचं सामर्थ्य उत्पन्न झालं नाहीं तर हिंदुसमाजाची धडगत दिसत नाहीं असं दिसतांच त्या काळच्या ज्ञात्यांनीं नव्या उभारणीला सुरवात करण्याचा निश्चय केला. मानसिक सामर्थ्याशिवाय सारे प्रयत्न फोल जातात ही भावना ह्या काळापर्यंत ज्ञात्यांच्या मनांत वास करीत होती. आत्मिक बलाच्या विकासाला तपश्चर्येची जरूरी असते, आत्मिक बलाशिवाय हातीं घेतलेल्या कार्यांत परमेश्वराचं अधिष्ठान उत्पन्न होत नाहीं आणि परमेश्वराच्या अधिष्ठानाशिवाय कोणतीहि बलशाली उभारणी करितां येत नाहीं हें तत्त्व अद्याप ज्ञात्यांच्या दृष्टीआड झालेलं नव्हतं. मूर्तींत सामर्थ्य नाहीं हें त्यांनाहि मान्य होतं. मानवानंच मूर्ती निर्माण केल्या आहेत त्या अर्थी मानव हा मूर्तीपेक्षां श्रेष्ठ आहे, हें तत्त्वज्ञान त्यांना पटलेलं होतं. पण तत्त्वज्ञाला नेहमीं समाजमनाचा कयास बांधूनच कार्य करावं लागतं. समाजांतील अमूर्त मूर्तींची आराधना जवळ जवळ लुप्त झाली होती. परंपरागत शिक्षणाला खंड पडल्यानं जुन्या शिक्षणाला समाज पारखा झाला होता नी नवी शिकवण अद्याप नजरेच्या टापूंत आलेली नव्हती. समाज अंधकारांत चाचपडत होता. शत्रूचे तडाखे सहन करतां करतां तो हवालदिल झाला होता, त्याचा स्वतःवर विश्वास नव्हता, राजावर विश्वास नव्हता, योद्ध्यांवर विश्वास नव्हता. त्यांतील थोड्याफार धाडसी वीरांना परकीय धन्याच्या गुलामगिरींत लाचार जिणं अगण्यांतच द्यायसं वाटत होतं. सेवावृत्ति पत्करलेले

जातीनं क्षत्रिय पण वृत्तीनं शूद्र असे हे आपल्याच जातीचे, आपल्याच धर्मांचे समाजधुरीण असूनसुद्धां त्यांच्या मनांत समाजाची उठावणी करण्याचं चुकूनसुद्धां कधीं आलं नाहीं; इतकंच नव्हे तर कोणी अशी उठावणी करायला निघाला तर लागलीच त्याला जमीनदोस्त करण्याचा ह्यांनीं जणूं पैजेचा विडाच उचलला होता. त्याला कारण वैयक्तिक स्वार्थ. आम्हांला हिंदुस्थानचा इतिहास रंगवायचा नाहीं. नांवनिशीवार यादी करायची नाहीं, कोणकोण सरदार केव्हां उदयाला आले ह्याच्या सनावळ्या द्यायचा आमचा उद्देश नाहीं. पण ज्या आर्यावर्तांत, अतिप्राचीन काळीं मानवी समाजानं उन्नतीचं शिखर गाठलं होतं त्या आर्यावर्तात कालपरत्वें समाजमनांत मुख्य फरक कसकसे होत गेले हें सांगून अखिल जगांतील मानवजात आज ज्या दिशेनं प्रगत होण्याचा यत्न करीत आहे ती दिशा बदलून समाजाला नवीन वळण देणं कसं जरूर आहे हें सिद्ध करायचं आहे. हे सारे तत्कालीन धुरीण समाजाच्या उन्नतीपेक्षां स्वतःच्या खोट्या मोठेपणाला बळी पडलेले होते. ज्या परकी सत्तेनं साऱ्या हिंदुस्थानभर आपल्या तलवारीच्या जोरावर धुमाकूळ मांडला त्या सत्तेच्या नांवाखालीं आपला वैयक्तिक मोठेपणा समाजाला मानायला लावून स्वतःचा मोठेपणा मिरविण्याच्या मोहाला बळी पडलेले हे वीर होते. ज्याअर्थी ही सत्ता आपल्यामार्फत समाजांत हुकमत चालवते आहे, त्याअर्थी तिचं वर्चस्व मान्य केल्यानं आपलं सामर्थ्य अबाधित राहील असा आभास ह्यांच्यांत उत्पन्न झाला होता. त्या त्या व्यक्तीच्या सुखोपभोगाच्या दृष्टीनं हें खरंहि होतं. अशा ह्या समाजाच्या परिस्थितींत जिकडं तिकडं गुलामगिरीचा काळाकुट्ट अंधार पसरला असतांना समाजांत अगदीं खालच्या थरांत वावरून झोपलेल्या समाजमनाला खडबडून जागं करण्याचा मान श्रीसमर्थ रामदास स्वामींना आहे.

वेदकालीन ज्ञाते, पुराणकालीन ज्ञाते, बुद्धकालीन ज्ञाते, आणि मराठेशाहींतील ज्ञाते सगळे ज्ञाते एकच होते. सर्वांनीं मानसिक सामर्थ्य हस्तगत केल्यानंतरच समाजहिताचं कार्य हातीं घेतलं होतं. सर्वस्वावर पाणी सोडून मृत्यूलाहि न जुमानणाऱ्या बेडरवृत्तीनं समाजाच्या अगदीं तळच्या

थरापासून समाजमनाची एका आवाजानं उठावणी करण्याला जें मानसिक सामर्थ्य लागतं, तें सामर्थ्य स्वतःमध्यें प्रचंड आत्मिक बल निर्माण केल्याशिवाय येत नाहीं ह्याची सर्वांना सत्यता पटलेली होती. सर्वांनींच अलौकिक स्वार्थत्याग केला. सर्वांचाच देहात्मभाव नष्ट झालेला होता. आत्मिक सामर्थ्यावर सर्वांचाच भर होता. तपश्चर्येची ताकद सर्वांच्याच प्रत्ययाला आलेली होती. पण समर्थांनीं केलेली उठावणी अगदीं वेगळ्या तऱ्हेची होती. ज्ञाते एकाच दर्जाचे. सामर्थ्य एकाच तोलाचं. धोरण समाजहिताचं. पण उठावणी मात्र अगदीं वेगळ्या प्रकारची. त्याला सबळ कारणंहि होती. वैदिक तत्त्ववेत्त्यांना समाजाच्या आदि तत्त्वज्ञानाचा पाया घालायचा होता. पौराणिक तत्त्ववेत्त्यांना, बुद्धिवादी लोकच फक्त समाजाची उन्नति करूं शकतात हें सिद्ध करायचं होतं. बुद्धकालीन तत्त्ववेत्त्यांना समाजहिता-करितां, नाइलाज म्हणून, वैदिक तत्त्वज्ञान आमूलाग्र उखडून काढायचं होतं. आणि समर्थांना हिंदुसमाजाची परचक्रापासून सोडवणूक करायची होती. समाजाची उभारणी करतांना समाजाला झेपेल असंच तत्त्वज्ञान समाजापुढं ठेवावं लागतं. बुद्धकालीन तत्त्वप्रणालीनं मानसिक उन्नतीची पूर्वीची प्रथा पूर्णपणें निकालांत निघाली होती. अशा वेळीं रामदास-स्वामींनीं समाजापुढं मानसिक उन्नतीचं ध्येय ठेवलं असतं तर समाजाला तें झेपलं नसतं. त्याकाळच्या समाजाच्या अगदीं तळच्या थराचा स्वामींनीं आधीं अभ्यास केला. आपल्यांत मानसिक सामर्थ्य निर्माण करतां येतं ह्याची पुसट कल्पना देखील त्यावेळच्या समाजांत नव्हती हें त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलं होतं. रजपूत राजांनीं परचक्राचा फेरा थोपवून धरण्याचा अखंड प्रयत्न केला असून त्यांच्या प्रयत्नाला यश न येण्याच्या कारण-मीमांसेचाहि त्यांनीं पूर्ण विचार केला होता. कित्येक शतकं अधःपाताच्या खातेऱ्यांत समाज लोळत असल्यानं समाजाच्या मानसिक उन्नतीची जुनी परंपरा त्यांना खात्रीनं डोईजड वाटणार हा स्वामींचा सिद्धान्त होता. त्यांनीं पौराणिक कालांतील बालमनविकासाचा आधार घ्यायचं ठरविलं. ज्या गुरुकुलसंस्थेत धर्मराजासारखे आदर्श शास्ते उदयाला आले, ज्या गुरुकुलसंस्थेनं कर्णार्जुनासारखे प्रतापी योद्धे निर्माण केले त्या गुरुकुल-

पद्धतीनं समाजांतील बालमनांना शिकवण दिल्यास आपल्याला आपलं उद्दिष्ट साधतां येईल अशी आपल्या मनाशीं खूणगांठ बांधून त्यांनीं कार्याला सुरवात केली. तरी पण त्यांनीं गुरुकुलांची उभारणी केली नाहीं, ब्रह्मचर्याश्रमाची स्थापना केली नाहीं, गुरुगृहीं राहून विद्यार्थ्यांनीं अध्ययन करावं असाहि त्यांनीं आग्रह धरला नाहीं. अशी उठावणी करायला समाज शांततेंत नी सुस्थितींत असायला पाहिजे होता. त्यावेळचा समाज विस्कळित नी मागासलेला होता. अशा समाजाची उठावणी मानसिक सामर्थ्यांतून करण्याऐवजीं शारीरिक सामर्थ्यांतूनच केल्यास नवीन संघटना मूळ धरील, असं त्यांच्या मनानं घेतलं. शून्याचं ध्यान करणं शक्य होत नाहीं असं दिसतांच ज्याप्रमाणं बुद्धधर्मांच्या अनुयायांनीं शून्याच्या ऐवजीं मूर्तीचं ध्यान करण्याचा पुरस्कार केला, त्याचप्रमाणं समर्थांनीं शरीरसामर्थ्यांतून मानसिक सामर्थ्य साधण्याचा अभिनव उपक्रम केला. समाजोन्नतीच्या ह्या नव्या नव्या मार्गांचा अभ्यास करतांना, ज्ञात्यांच्या कल्पकतेचं कौतुक करावंसं वाटतं. आपल्या समोरील समाजाच्या ताकदीप्रमाणं आपले शिकवणुकीचे मार्ग बदलून ध्येयाशीं गाठ घालण्याची ही ज्ञात्यांची प्रवृत्ति पाहिली म्हणजे धन्यता वाटते. मानसिक उन्नतीचं ध्येय गाठण्याकरितां शारीरिक उन्नतीपासून सुरवात करण्याची कल्पना समर्थांची आहे. म्हणूनच त्यांच्या विचारसरणीला विशेष महत्त्व आहे.

गोब्राह्मण प्रतिपालक छत्रपति शिवाजी महाराजांच्या हाकेला ओ देऊन हिंदवी राष्ट्राच्या उद्धाराकरितां महाराष्ट्रांतील मावळ्यांना संघटित करण्याचं श्रेय महाराजांच्याइतकंच समर्थांनाहि आहे. स्वामींनीं अज्ञात राहून महाराष्ट्रांतील खेड्यांतून उठावणीला प्रारंभ केला. खेड्यांत जावं, तिथल्या प्रौढांना एकत्र बोलवावं, त्यांच्या मुलांबाळांना एकत्र खेळ खेळण्याची हौस नाहीं का असं त्यांना विचारावं, खेळाकरितां एकत्र येण्याच्या मार्गानं त्यांच्या मनांत सुप्त असलेल्या संघटनेच्या सामर्थ्याची त्यांना थोडीशी अस्पष्ट कल्पना द्यावी, गुलामगिरीला कवटाळून बसलेल्या ह्या प्रौढ समाजाला, शत्रूविरुद्ध आपलं सामर्थ्य एकवटण्याची कल्पना दिल्यास कदाचित् ते बिचकून जातील ह्या भीतीनं, मुलांनीं रोज एकत्र

घेऊन खेळण्याखेरीज इतर कोणतीच कल्पना स्वामींनीं त्यांना दिली नाहीं. आईबापांची सारीं कामं करून, संध्याकाळच्या वेळींच फक्त गांवांतील साऱ्या बालगोपालांनीं गांवाबाहेरील पटांगणांत एकत्र जमावं, सूरपारंब्या, हुतूतू वगैरे साहित्याशिवाय खेळतां येण्यासारखे खेळ मुलांना सांगावे, अशा रीतीनं स्वामींनीं खेडेगांवांतून खेळांची सुरवात केली. आपल्यावर निष्ठा असलेल्या त्यांच्यांतीलच एकाद्या मुलाला पट्टशिष्याचा मान देऊन त्याच्या गळ्यांत गंडा बांधणं, त्याला तिथल्या मुलांचा पुढारी नेमणं, उघड्या पटांगणांतच मुलांच्याकडून तांबडी माती टाकवून घेऊन तिथं मुलांना कुस्त्या करायला लावणं, जवळच एकादी लहानशी खोप घालून त्या ठिकाणीं रोजच्या रोज मुलांना दंड बैठकांची शिकवण देणं, लाठी, काठी, बोथाटी, बरची—भाल्याच्या फेकी नी तलवारीचे हात ह्यांची जातीनं शिकवण देणं, अधून मधून साऱ्या मुलांना रामकृष्णादिकांच्या गोष्टी सांगतां सांगतां हलकेच शत्रूशीं झुंज देण्याची कल्पना देणं, वरचेवर गांवकऱ्यांना एकत्र आणून त्यांना मुलांची प्रगति दाखवणं, त्यांच्याकडून हौसेनं त्या बाहेरच्या पटांगणांत एक छोटीशी व्यायामशाळा बांधवून घेणं, अशा तऱ्हेच्या समाजसंघटनेला उपयोगी पडणाऱ्या कित्येक गोष्टी स्वामींनीं केल्या. आसपासच्या खेड्यांत स्वामी वायुवेगानं वावरूं लागले. पुढं पुढं तर स्वामी कुठं आहेत ह्याची कल्पना मिळणंसुद्धां कठिण होत गेलं.

प्रत्येक खेड्यांतील मुलांची झपाट्यानं प्रगति होऊं लागली. स्वामी असोत नसोत, मुलांनीं एकत्र यावं, खेळ खेळावे, सामने भरवावे आणि संघटना करावी ह्यांतच त्या पिढीला स्वामींच्या शिकवणुकीमुळं आनंद वाटूं लागला. स्वामींच्यावरील त्यांची श्रद्धा दिवसेंदिवस चंद्रकलेप्रमाणं वाढीला लागली. स्वामी मात्र सदासर्वकाळ समाजाच्यामागं होते. त्यांना प्रसिद्धीची हाव नव्हती, आपल्या मोठेपणाचा टेंभा मिरवायचा नव्हता, पुढारी होऊन स्वतःच्या नांवचं राज्यहि स्थापायचं नव्हतं. झोपी गेलेला समाज जागा व्हावा, समाजाची संघटना व्हावी, आणि ह्या संघटनेच्या जोरावर महाराष्ट्रानं परकी सत्तेपुढं दंड थोपटून उभं रहावं एवढीच त्यांच्या मनाची तळमळ होती. स्वामींची शिष्यशाखा वाढूं लागली.

त्यांचे शिष्य आतां निरनिराळ्या खेड्यांतून वावरूं लागले. पांच, पंचवीस, शंभर, हजारों खेड्यांत स्वामींच्या ह्या नव्या शिकवणुकीचा प्रसार झाला. स्वामी मात्र नामानिराळे होते. आपल्या नांवाचा कुठें उच्चारसुद्धां होऊं न देण्याची खबरदारी त्यांनीं घेतली. स्वतः अलिप्त राहून समाजाला आत्म-स्फूर्तीनं प्रगत होण्याचा मान द्यावा ही वेदकालीन ज्ञात्यांची विचारसरणी त्यांनीं आपल्या कार्यात उपयोगांत आणली. पुराणकालीन तत्त्ववेत्त्यांच्या धर्तीवर प्रत्येक खेड्यांत त्यांनीं छोटीं छोटीं गुरुकुलं स्थापन केलीं. समाजाची शारीरिक नी मानसिक उन्नति साधण्याकरितां त्यांनीं बुद्ध-विहारांच्या धर्तीवर व्यायामशाळा काढल्या. त्यांच्या शिकवणुकींत शरीरसंवर्धनाला प्राधान्य असल्यानं सामर्थ्याचा पुतळा जो हनुमान त्याची समाजमनावर ध्येय म्हणून स्थापना केली आणि बुद्धधर्मानंतरच्या मूर्तिपूजेचा त्यांनीं अशा तऱ्हेनं उपयोग करून घेतला. कांहीं ठिकाणीं व्यायामशाळेंत आणि शक्य नसेल त्या ठिकाणीं व्यायामशाळेबाहेर त्यांनीं गांवकऱ्यांच्या मदतीनं मारुतीची स्थापना केली. आज महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व खेड्यांत वेशीबाहेर मारुतीचीं देवळं आहेत, ही ब्रह्मचर्या-श्रमांतील मूर्तिपूजेची प्रथा स्वामीजींची आहे. ही सारी जुळणी करून आणण्याकरितां स्वामींना किती परिश्रम पडले असतील ह्याची वाचकांनींच कल्पना करावी.

आजकाल दिवसांतून जेमतेम पांच तास आम्ही विद्यार्थ्यांना शिकवितों. त्याबद्दल पगार घेतो. जादा पगाराची मागणी करतो आणि पगारवाढ न झाल्यास संपाची धमकी देतो. पण महाराष्ट्राची उठावणी करतांना, साऱ्या महाराष्ट्रभर स्वातंत्र्याची तळमळ लागलेलीं जनमनं तयार करतांना स्वामींनीं किती वेतन घ्यायला पाहिजे होतं ? स्वामींचं वेतन पाहून आपण घाबरून जाऊं. आहारापुरती भिक्षा आणि लाज राखण्यापुरतं लंगोटीचं फडकं हें त्यांचं वेतन होतं. 'आपल्या मुलाबाळांचीं मनं बिघड-विणारा गोसावडा' अशी कांहीं लोकांकडून होणारी निर्भर्त्सना ही त्यांची वेतनवाढ होती. आपल्या कार्याकरितां रानोमाळ भटकत असतांना कांहीं कांहीं वेळां त्यांना समाजाकडून जो मार खावा लागला ती त्यांची बक्षिसी होती. आपल्या पगारांत वाढ होत नाहीं म्हणून बालमनांना द्यायचं ज्ञान

बंद करून संपावर जाणं ही आजकालच्या शिक्षकांची प्रवृत्ति आणि समाजाला ज्ञान देण्याकरितां भिक्षापात्र हातीं घेऊन अविश्रांत श्रम करीत असतांना क्वचित्काळीं समाजाच्या हातचा मार खाऊनसुद्धां पुन्हां दुप्पट जोमानं समाजमनाची जागृति करीत राहणं ही स्वामींची प्रवृत्ति. स्वामींच्या ह्या निःस्वार्थी शिकवणुकीचा विचार करतांना मन सद्गदित होतं, डोळ्यावाटे अविरत आनंदाश्रू ओघळूं लागतात आणि स्वामींच्या मानसमूर्तींच्या चरणीं त्रिकाल मस्तक ठेवून आपली कृतज्ञता व्यक्त करावीशी वाटते.

हेंच खरं शिक्षण आणि ह्याच खऱ्या शाळा. शेतांतून काम करणाऱ्या समाजाला काय करायचं तुमचं हल्लींचं शिक्षण ? हिंदुस्थानांतील जवळजवळ नव्वद टक्के समाज निरक्षर आहे, म्हणून आज आपण आश्चर्य व्यक्त करतो आहोंत. पण साक्षरतेच्या प्रसारानं समाजाची प्रगति होत नसेल, असत्प्रवृत्तीला आळा पडत नसेल, तर त्या साक्षरतेपेक्षां निरक्षरताच परवडली असं नाइलाजानं नी निराशेनं म्हणावं लागतं. स्वामींनीं महाराष्ट्रांतील बालमनांना सकाळसंध्याकाळ दूर राहून शिकवण दिली, मुलगा कोणत्या इयत्तेंत गेला ह्याच्याऐवजीं हा मुलगा व्यायाम करतो किंवा नाहीं, वेळ पडल्यास हा देशाच्या हाकेला ओ देईल किंवा नाहीं, ह्याला तलवारीचे हात येतात किंवा नाहींत ह्याची मात्र वेळोवेळीं चाचणी घेण्याची त्यांनीं प्रथा पाडली. सामने भरवले, जत्रा भरवल्या, विजयी वीरांना गांवकऱ्यांकडून बक्षिसं देवविलीं आणि हें सर्व करीत असतांना सुप्त मनांतून हिंदुत्वाची भावना जागी केली. अशा पद्धतीनं स्वामींनीं मराठमनाची जमीन नांगरून तयार केली. परकी अम्मल असून सुद्धां खेड्यांतील प्रत्येक मावळमराठ्याच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाचं तेज झळाळूं लागलं. समाजांत एकीचे वारे वाहूं लागले. संघटनेच्या सामर्थ्यावर तत्कालीन समाज हातीं मिळेल त्या लाठीकाठीच्या साहाय्यानं शत्रूशीं झुंज द्यायला कचरणार नाहीं अशी तयारी झाली. परकी अम्मल सगळीकडेच असल्यानं त्या सत्तेला नकळत, मारुतीच्या मूर्तीखालींच, कुणाला शंकाहि न येईल अशा ठिकाणीं गुप्त बैठकांच्या जागा तयार करण्यांत आल्या आणि इकडं इतकी सारी तयारी होत

असतांनाच तिकडं शिवबासारखा कर्मवीर ह्याच पिढींत पुढं आला. ह्या दोन कर्तबगार विभूतींच्या मधुर मिलाफांतूनच हिंदवी स्वराज्य उदयाला आलं.

विजापुरच्या दरबारीं नोकर म्हणून मानमान्यतेला चढलेल्या शहाजी राजांचा शिवाजी हा मुलगा. मोरे, जाधव, स्वतः भोसले हीं सारीं मराठे सरदारांची घराणीं थाटांत वावरत असलीं तरी त्यांचा मानाचा मुजरा परकी सत्तेला होता. आपल्या जहागिरींत त्यांच्या माना वर असत; पण त्याच माना विजापुरच्या सुलतानच्या दरबारांत, गुलामगिरीचं चिन्ह म्हणून अदबीनं लवत असत. शिवाजीच्या आईचं घराणं जाधवांचं. जाधवसुद्धां मुसलमानी पातशाहीचे बंदे गुलाम होते. अशा एका गुलामी वृत्तीनं गुंगलेल्या पण मनानं स्वाभिमानी असलेल्या सरदारांच्या कुळांतच छत्रपतींचा जन्म झाला. पण ह्यावेळीं हिंदुसमाजाचं नष्टचर्य संपत आलं होतं म्हणून म्हणा, समर्थ स्वामीमहाराजांच्या प्रयत्नांना यश येणं अपरिहार्य होतं म्हणून म्हणा, किंवा जिजामातेच्या आणि दादोजी कोंडदेवाच्या शिकवणुकीनं बालराजे मंत्रमुग्ध झाले म्हणून म्हणा, अगदीं बालवयांतच शिवबाच्या मनांत मराठ्यांच्या स्वातंत्र्याचे विचार घोळूं लागले. आपल्या साऱ्या नातलगांनीं, मोठमोठ्या वजनदार सरदारांनीं एकत्र येऊन परकी सत्तेला मूठमाती देण्याचा विचार आजपर्यंत कां केला नाहीं याचं त्याच्या बालमनाला कोडं पडलं. मनगटांत सामर्थ्य असतांना हे सारे लोक गुलामगिरीचा हा जाच कसा सहन करितात ह्याचा विचार सुरू झाला. कृष्णानं ज्याप्रमाणं कंसाला नामोहरम केलं, रावणाला ज्याप्रमाणं प्रभु रामचंद्रांनीं रसातळाला पोंचविलं त्याप्रमाणं शहाला शह देणं आपल्याला शक्य नाहीं का होणार ? विचाराविचारानं शिवबाचं बालमन त्रस्त झालं. त्यानं आपली ही कल्पना आपल्या संवगड्यांपुढं मांडली आणि सर्वांनीं एकविचारानं कार्य करण्याचा बालवयांतच चंग बांधला. समकालीन रामदासस्वामींनीं ह्याच वेळीं मावळमराठ्यांची जुळणी केली होती. ठिणगी पडण्याचाच फक्त अवकाश होता. ठिणगी पडतांच भडका उडाला आणि शिवबाच्या नेतृत्वाखालीं ह्या तरुण पोरांनीं शहानशहाच्या सत्तेला पहिला धक्का दिला. त्यावेळचे सारे मराठे सरदार, प्रत्यक्ष शहाजीराजे सुद्धां विजा-

जीच्या ह्या हूड हुल्लडीच्या विरुद्ध होते. पण त्याचा भर आपल्या बरोबरीच्या तरुण रक्तावर होता. 'आलात तर तुमच्यासुद्धां, नाहीं आलात तर तुमच्याशिवाय ' कांहीं झालं तरी ही परकी सत्ता उखडून काढलीच पाहिजे अशा हिरीरीनं शिवाजी महाराज कामाला लागले आणि फारच थोड्या काळांत त्यांनीं हिंदवी स्वराज्याचा पाया घातला. चोर, लुटारू, डोंगरांतला उंदीर अशी त्यावेळच्या शहांनीं, त्यांच्या सरदारांनीं आणि इंग्रजी इतिहासकारांनीं शिवाजीची निर्भर्त्सना केली आहे. पण कित्येक शतकं हिंदुस्तानावर राज्य करीत असलेल्या परकी सत्तेला अवघ्या पंचवीस वर्षांत मुळापासून उखडून काढण्याइतकं प्रचंड सामर्थ्य ज्या एका विभूतीनं निर्माण केलं ती व्यक्ति नुस्ता राजाच नव्हे, तर राजांचा राजा व्हायला लायक असली पाहिजे ह्याबद्दल वादच नाहीं. स्वजनहित साधूं इच्छिणाऱ्या लोकांनीं कितीहि नांवं ठेविलीं, तरी छत्रपति शिवाजीमहाराजांच्या ठायीं अलौकिक सामर्थ्य असल्याशिवाय त्यांना अलौकिक पुरुष बनतां आलं नाहीं हें निर्विवाद. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी शिवाजीनं हिंदवी स्वराज्याचा पाया घातला, आणि वयाच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी ह्या मराठी राज्याच्या संस्थापकाला रायगडीं, गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपातशहा छत्रपति शिवाजीमहाराज अशा किताबानं राज्याभिषेक झाला.

स्वामींच्या संघटनेचा शिवाजीमहाराजांच्या सामर्थ्याशीं जो मिलाफ झाला त्याचंच हें प्रचंड प्रतीक आहे. जिवाला जीव देणारे जिवाचे कलिजे, स्वार्थावर लाथ मारून हिंदवी स्वातंत्र्याकरितां धारातीर्थी देह ठेवणारे योद्धे, शिवबाच्या हाकेसरशी खडबडून बाहेर पडणारे मावळे ह्यांची शिवबाला कधींच वाण पडली नाहीं. याचं खरंखुरं मर्म शिवबाच्या आणि त्याच्या संवगड्यांच्या मानसिक उन्नतींतच आहे. शिवाजीमहाराज ज्या ज्या वेळीं अडचणींत असत, ज्या ज्या वेळीं त्यांना आपल्यासमोर, अंधार पसरलेला आहे असं वाटे, त्या त्या वेळीं ते एकाग्रमनानं भवानीपुढं ध्यानस्थ बसत आणि त्यानंतर त्यांना आई भवानीचा आदेश मिळे असं सांगतात. हा आदेश म्हणजेच त्यांच्या मानसिक उन्नतीची उज्ज्वल ज्योत होती. त्यांनीं ध्यानस्थ बसण्याचा अभ्यास करून

मानसिक सामर्थ्य कमावलेलं होतं. ह्या मानसिक सामर्थ्याच्या जोरावर ते बेडर वृत्तीनं कोणत्याहि संकटांत उडी घ्यायला कचरत नसत. अशी निर्भय वृत्ति मनाच्या एकतानतेनंच फक्त निर्माण होऊं शकते. त्यांच्या बरोबरीच्या मावळमराठ्यांचीं मनं स्वामींच्या शिकवणुकीनं तयार झालीं होतीं. हिंदवी स्वराज्याच्या कामगिरीपुढं त्यांना इतर सर्व गोष्टी तुच्छ वाटत होत्या. त्यांनीं कधीं द्रव्याची अपेक्षा केली नाहीं, कधीं मानमरातबाची आशा केली नाहीं, कधीं बायकामुलांच्या मोहाला ते बळी पडले नाहींत. स्वामींच्या शिकवणीनं तयार झालेलीं हीं मनं स्वराज्याकरितां बेभान झालीं होतीं. तळहातावर शिरं घेऊन लढणं त्यांना पोरखेळ वाटत होता. मुलाची लगीनगाठ साजरी होत असतांना ऐनवेळीं शिवबाच्या हाकेला ओ देणारा तानाजी हातांतल्या अक्षता हातांतच ठेवून सिंहगड सर करण्याकरितां बाहेर पडला तो फिरून घरीं परतला नाहीं, ही हकीगत ऐकतांना अंगावर काटा उभा राहतो. अशा तऱ्हेनं हिंदवी स्वराज्यावरून स्वार्थाची कुरवंडी करणारे महात्मे उत्पन्न होण्याचं एकच एक कारण म्हणजे ते सारे वीर देहात्मभाव विसरून ध्येयाशीं समरस झाले होते.

शिवबानं देखील आपल्या सबंध राज्याचं दान भिक्षा म्हणून समर्थांच्या झोळींत टाकलं ह्यांतलं खरं मर्म अनासक्ति हेंच आहे. अशा रीतीनं मराठी साम्राज्याची उभारणी करण्याची कामगिरी ह्या दोन महात्म्यांनीं केली. पण ह्यापुढील काळांत मात्र मानसिक सामर्थ्याच्या अभ्यासाचा पूर्णपणें लोप झाला. आध्यात्मिक सामर्थ्यावर उभारलेली समाजाची इमारत आधिभौतिक सामर्थ्यावर स्थिर झाल्यानं यानंतर मात्र आर्यावर्तातील विचारसरणीच्या खऱ्याखुऱ्या अधःपाताला सुरवात झाली.

शिवाजीमहाराजांनीं आपल्या राज्याभिषेकानंतर उत्तम प्रकारची राज्यव्यवस्था अमलांत आणली. संस्कृत राजनीतीच्या ग्रंथांतून सांगितलेल्या तत्त्वाप्रमाणं त्यांनीं अष्टप्रधानमंडळ स्थापन केलं. ह्या प्रधानमंडळांतले सारे अधिकारी राजाचे पगारी नोकर होते. अशा पगारी सेवेंत कांहीं ब्राह्मण म्हणजे तत्कालीन बुद्धिवादी लोक शिरले ही गोष्ट मात्र अयोग्य

झाली. बुद्धकालानं वैदिकधर्माला दिलेल्या जबरदस्त तडाख्यानं बुद्धिवाद्यांचं मानसिक अधिष्ठान ढासळलं होतं. पण शिवाजी महाराजांच्या वेळीं फिरून मानसिक उन्नतीचा काल जवळ आला होता. गाई व ब्राह्मण ह्यांना शिवाजी-महाराजांच्या कारकीर्दींत पहिलं मानाचं स्थान दिलं गेलं. राजा हा राज्याचा संरक्षक असला तरी राज्य हें देवाब्राह्मणांचं आहे असं शिवाजी-महाराज मानीत असत. तत्कालीन ब्राह्मणांनीं आपलं पूर्वीचं आध्यात्मिक सामर्थ्य परत मिळविण्याचे प्रयत्न केले असते तर महाराजांनीं त्यांना त्यांच्या प्रयत्नांत मदतच केली असती. स्वामींनीं खेड्यापाड्यांतून वेशी-बाहेर मारुतीची स्थापना केलीच होती. त्याच देवळांत राहून स्वामींनीं घालून दिलेल्या मार्गानं बालमनाच्या प्रगतीची जबाबदारी ब्राह्मणांनीं आपल्यावर घेतली असती तर इथून पुन्हां आर्यावर्तात सुवर्णयुगालाच प्रारंभ झाला असता. 'ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा। ॐ भवति या पक्षा। रक्षिलें पाहिजे।' ह्या समर्थांच्या उपदेशाप्रमाणं गांवांत जाऊन मध्याह्नीच्या वेळीं चार घरं भिक्षा मागावी आणि आत्मोन्नतीबरोबरच समाजोन्नति साधण्याकरितां ह्या खेड्यांतील साऱ्या मुलांना शिक्षण द्यावं. ह्यांत ब्राह्मणांना नवे परिश्रम कोणतेच करावे लागणार नव्हते. फक्त मानसिक उन्नति साधलेल्या रामदास-स्वामींच्या शिष्यांनीं ह्या देवळांतून जाऊन बसण्याचाच अवकाश होता. शिवाजीमहाराजांनीं देऊं केलेल्या अष्टप्रधानांतल्या जागांचा मोह सोडून आनंदानं नी स्वार्थत्यागपूर्वक महाराजांना समजावून सांगून, समर्थांनीं आपल्या झोळींत पडलेलं हिंदवी स्वराज्याचं दान महाराजांना परत करून ज्याप्रमाणं त्यांना आशीर्वाद दिला, त्याचप्रमाणं आपल्या अधिकाराच्या जागा शिवबाला परत करून बालमनाची ओपासना करण्याचं काम जर ब्राह्मणांनीं शिवबाकडून मागून घेतलं असतं तर हिंदवी संस्कृतींत फिरून आमूलाग्र फरक झाला असता. संभाजीसारख्या बलशाली नी तेजस्वी राजपुत्राला ब्रह्मचर्याश्रमांतील सात्त्विक तपश्चर्येचं शिक्षण मिळालं असतं तर शिवाजीमहाराजांनीं सुरू केलेला हा शक असा अवेळीं मागं पडला नसता. पण तत्कालीन ब्राह्मणांना अधिकाराचा मोह अनावर झाल्यानं त्यांनीं सेवाधर्माचं दास्य पत्करलं. परशुरामासारख्या अवतारी ब्राह्मणानं

पृथ्वी एकवीस वेळा निःक्षत्रिय केली, आर्य चाणक्यानं नंदांशीं आपलं वाकडं येतांच नंदांचा समूळ नाश करण्याची घोर प्रतिज्ञा करून ती पार पाडली. बुद्धानंतरच्या काळांत कांहीं ब्राह्मणांनीं राज्यं स्थापन करून क्षत्रियवृत्ति पत्करली; पण आपलं ब्राह्मणत्व विसरून स्वाभिमानशून्य सेवाधर्मांत जाणूनबुजून ब्राह्मणांनीं पहिलं पाऊल टाकलं तें शिवरावांच्या काळांत. बौद्धकालापासून तों शिवरायापर्यंतच्या सुमारें दीडपावणेदोन हजार वर्षांच्या कालांत अनिर्वाहपक्ष म्हणून कित्येक ब्राह्मणांना कधीं क्षत्रिय, कधीं वैश्य आणि कधीं शूद्रधर्मानं म्हणजे सेवाधर्मानंहि रहावं लागलं असेल. पण तो अनिर्वाहपक्ष होता. त्यावेळीं वैदिक समाजधारणेची संस्था जवळजवळ लयाला गेलेली होती. अधूनमधून जुन्या संस्थेच्या पुनरुज्जीवनाचे क्षीण प्रयत्न झाले, पण ते झाले तसेच गेलेहि. बुद्धकाळानंतरच्या दीड हजार वर्षांच्या काळांत वैदिक समाजसंस्थेच्या पुनरुजीवनाचे थोडेथोडके प्रयत्न झाले नाहींत. पण जें कार्य दीड हजार वर्षांत होऊं शकलं नाहीं तें कार्य स्वामीजी आणि महाराज ह्या दोन असामान्य व्यक्तींच्या अवघ्या पंचवीस वर्षांच्या प्रयत्नांनीं यशालाभाला आलं, ह्याचं कारण पुनरुज्जीवनाचं वेदकालीन अधिष्ठान हेंच होय. ह्या मधल्या कालांत एकनाथ, ज्ञानदेव, नामदेव वगैरे साधुसंतांनीं चिरकालीन वाङ्मय निर्माण केलं. पण स्वामीजींनीं लिहिलेल्या दासबोधाची उठावणी अगदीं वेगळ्या पद्धतीनं नी वेगळ्या ध्येयानं झालेली आहे. दासबोध वाचतांना स्मृतिकारांची आठवण होते हेंच त्या ग्रंथाचं वैशिष्ट्य होय. जवळजवळ मनुस्मृतीच्या तोलाचा ग्रंथ मराठी भाषेंत लिहून मनुस्मृतींतील शिकवण सुरस मायबोलींत आणून स्वामींनीं आपलं नांव मानवी इतिहासांत अजरामर करून ठेविलं आहे. पण स्वामींचं नांव अजरामर झालं नसतं तरी हरकत नव्हती, शिवछत्रपतींच्या नांवाचा जयघोष साऱ्या महाराष्ट्रभर दुमदुमला नसता तरी परवा नव्हती, पण ज्या तत्त्वज्ञानाच्या जोरावर सारा समाज खडबडून जागा होऊन आत्मविश्वासाच्या चौथऱ्यावर उभा राहिला तें तत्त्वज्ञान समाजांतील प्रत्येक व्यक्तींत ओसंडून वाहूं लागलं असतं तर शिवबाच्या तोलाचे कितीतरी नेते अन् स्वामींच्या तोलाचे कितीतरी [illegible] समाजांत शिवकालानंतर निर्माण झाले असते. पण जें कार्य दीड

हजार वर्षांत होऊं शकलं नाहीं तें फारच थोड्या कालांत झाल्यानं मानवी समाज बेभान झाला. हर्षातिरेकानं तो इतका हुरळून गेला कीं कोणत्या बलवत्तर सामर्थ्यानं समाजमनाची सुप्त शक्ति जागृत झाली हेंच तो विसरला, आणि तत्कालीन समाज फक्त एकाच गुणानं ह्या जागतिक प्रगतीच्या परीक्षेत नापास झाला.

ब्राह्मणांनीं अष्टप्रधानांच्या मालिकेंत मानाची जागा घेतली आणि ते छत्रपतींचे पगारी सल्लागार म्हणून मिरवूं पण लागले. पौराणिक काळांत शास्त्यांचे सल्लागार ब्राह्मणच होते. आजहि सल्लागार होण्याचा मान ब्राह्मणांनाच मिळाला. पण त्यावेळच्या सल्लागारांना कोणताच स्वार्थ साधायचा नसल्यानं ते निर्भीड होते. त्यांना राजाचं भय नव्हतं, राजा आपल्याला आपल्या जागेवरून कमी करील कीं काय ह्याची काळजी नव्हती. 'राजा, तुझ्या प्रजेच्या हिताकरितां अमुक गोष्ट करणं जरूर आहे.' 'राजा, तुझा अधःपात होतो आहे' असं राजाला अधिकारवाणीनं बजावण्याचं सामर्थ्य त्यावेळच्या सल्लागार ब्राह्मणांत होतं. पण आज तेच ब्राह्मण सल्लागार असून सुद्धां, अधिकारवाणीनं राजाला आज्ञा करण्याची योग्यता त्यांच्यांत असून सुद्धां, ते राजाचे सेवक असल्यानं त्यांची मंत्रिपदावर स्थापना करणं अगर त्यांना मंत्रिपदावरून हुसकून लावणं ही राजाच्या मर्जीची गोष्ट होती. हें छत्रपतींना मानवेल किंवा नाहीं, असा सल्ला दिल्यानं राजाची आपल्यावर इतराजी होईल कीं काय ह्या भीतीनं हल्लींच्या ह्या सल्लागारांना राजाच्या मतानुसारचं वागावं लागत असे. कारण ह्या शिवकालीन सल्लागारांची अधिकारत्यागाची तयारी नव्हती. मंत्रिपदाचीं वस्त्रं, दरबारांतील मानमरातब, मानाचे मुजरे ह्यांचा मोह त्यांना आवरला नाहीं. स्वतः छत्रपतींच्यापुढं माना झुकवतां झुकवतां, दुसऱ्यांचे मुजरे घेण्यांतच त्यांना मोठेपणा वाटूं लागला. इतरांचे मुजरे आपल्याला मिळाले नाहींत तरी हरकत नाहीं, राजाची मान मात्र आदराच्या अदबीनं आपल्यापुढं झुकली पाहिजे ही ब्राह्मणाची मानाची जागा ते विसरले. ब्राह्मणाच्या सर्वसंगपरित्यागाचं प्रतीक, ब्राह्मणाच्या संन्यासाश्रमाची निशाणी, समाजाच्या उन्नतीकरितां खडतर भिक्षावृत्तीनं आयुष्य पत्करणाऱ्या ब्राह्मणाची ही खूण, बुद्धिवादी ब्राह्मणानं ही

सामर्थ्यवादी क्षत्रियाचं एकीकरण दर्शविणारा भगवा ध्वज ब्राह्मणाच्या उत्तरीयाचाच एक भाग आहे हें त्यांच्या लक्षांत राहिलं नाहीं. आंधळेपणानं सेवावृत्तीच्या सोनेरी पिंजऱ्यांत ते सुखानं नांदू लागले.

पेशव्यांनीं छत्रपतींची सेवा पत्करली आणि ती त्यांनीं इमानेंइतबारें केली. मालकाच्या सुखाकरितां, मालकाच्या मोठेपणाकरितां, मालकाच्या विजयाकरितां त्यांनीं आपल्या प्राणांचीहि कदर केली नाहीं. छत्रपतींच्या गादीवर जोपर्यंत कर्तबगार राजे होते तोपर्यंत पेशव्यांनीं इमान राखलं ह्यांत कांहीं विशेष नाहीं. पण छत्रपतींची कर्तबगारी संपुष्टांत आली असतांना अगर सिंहासनावर बालराजांची स्थापना झाली असतांना त्यांनीं गादीचा मान राखून मराठ्यांचा भगवाझेंडा अटकेपार फडकविला. मराठेशाहीचा मान राखण्याचा पेशव्यांनीं अगदीं अखेरच्या घटकेपर्यंत प्रयत्न केला; पण ज्यावेळीं छत्रपतींचा मान राखतां राखतां मराठे सरदारांतील दुफळी बेसुमार वाढली आणि ही दुही अशीच चालू राहिली तर तिच्या पायीं साऱ्या मराठे सरदारांचा, पेशव्यांचा आणि त्यांच्याबरोबरच हिंदुपदपातशाहीचा सत्यानाश होणार अशीं स्पष्ट चिन्हं जेव्हां त्यांना दिसूं लागलीं तेव्हां छत्रपतींना बाजूला सारून पेशव्यांनीं साऱ्या मराठेशाहीची सत्ता आपल्या हातीं घेतली आणि हिंदवी साम्राज्याचा कलता डोलारा सावरून धरला. फिरून कांहीं काळ पेशव्यांच्या अमलाखालीं हिंदुसत्तेला जोर आला. पण हा जोर फारच थोडा वेळ टिकला नी अखेर पेशव्यांची सत्तासुद्धां लयाला गेली. मानवी समाजाच्या ह्या अफाट महासागरांत कित्येक सत्ता उदयाला आल्या आणि तितक्याच लयाला गेल्या. कांहीं सत्ताधीशांनीं प्रजेच्या सुखाकरितां जिवाचं रान केलं, कांहीं सत्ताधाऱ्यांनीं स्वतःच्या मोठेपणाच्या नांवाखालीं प्रजेचा छळ केला, कांहींनीं साऱ्या हयातींत राज्यविस्ताराचं ध्येय डोळ्यापुढं ठेवून प्रजेला उसंत मिळूं दिली नाहीं, तर कांहींनीं समाजोपयोगी कामं करण्यांतच आपल्या सत्तेचा उपयोग केला.

वेगवेगळे सत्ताधारी आले नी आले तसेच काळाच्या अफाट समुद्रांत विलीन झाले. समुद्रकांठीं उभं राहून समुद्रावर उसळणाऱ्या लाटांचा

खेळ पाहणं देखील असंच मौजेचं वाटतं. एक लाट येते, ती मध्येंच उंचावते आणि अखेर किनाऱ्यावर येऊन पसरते, केव्हां ती पूर्ण जमीनदोस्त होते. पहिलीमागून दुसरी, दुसरीमागून तिसरी, प्रत्येकीची गत तीच होते. कांहीं काळ भरतीचा असतो त्यावेळीं ह्या प्रचंड लाटांमुळं समुद्राचं पाणी वाढल्याचा भास होतो, पण ओहोटीच्या वेळीं समुद्राचं पाणी कमी होतंय कीं काय अशी भीति वाटूं लागते. समुद्राचं पाणी वाढतहि नाहीं नी कमी पण होत नाहीं. तशीच गोष्ट समाजाची आहे. समाजाची कांहीं काळ झपाट्यानं प्रगति होत असते; त्यावेळीं समाज पुढं चालल्याचा भास होतो, पण एक काळ असा येतो कीं समाज जिकडं तिकडं छिन्नविछिन्न झालेला दिसतो. त्यावेळीं समाज मागं फिरल्याचा भास होतो. समाज आहे तिथंच असतो. एक गोष्ट मात्र खरी कीं सदासर्वकाळ समाजांतील ज्ञाते, त्याचप्रमाणं समाजांतील व्यक्ती सुखाची आराधना करीत असतात. मार्ग बरोबर असेल तर सुख मिळत जातं; पण मार्ग चुकत असेल तर सुखाचा शोध करीत असतांनाच दुःखाचे डोंगर उभे राहतात. अमृताचा सांठा मिळविण्याकरितां समुद्रमंथन करीत असतांनाच हालाहालाची निर्मिति होते. समाजाची प्रगति साधण्याचा प्रयत्न करीत असतांनाच समाजाला अधोगति केव्हां येते हें समजत सुद्धां नाहीं. मानवी जीवनांत उद्भवणाऱ्या रोगांनीं आयुष्याची दोरी अवेळीं तुटूं नये म्हणून इकडं समाज इलाज करीत असतो, तर तितक्यांत प्राणहारी शस्त्रं हातीं घेऊन विरुद्ध बाजूकडील माणसांचा प्रचंड प्रमाणावर संहार करण्याचे इलाज मानवच शोधून काढीत असतो. समाजांत सुख नी शांति प्रस्थापित करण्यांतच खऱ्या मानवतेचं रहस्य आहे असं वाटतं न वाटतं इतक्यांत समाजांत अशांतता नी दुःखं फैलावणारीं सर्वसंहारक युद्धं सुरू होतात. मानवी समाजांत अनादिकालापासून आतांपर्यंत अशा परस्परविरोधी गोष्टींची पैदास झालेली दिसत असली तरी समाजाचं ध्येय मात्र सुख नि शांति हेंच आहे.

पेशव्यांनंतर इंग्रज आले आणि ह्या इंग्रजांनीं आसेतुहिमाचल सार्वभौमसत्ता प्रस्थापित केली, आणि कालपरवांपर्यंत अखिल भारतांत ही एकच अनियंत्रित सत्ता चालू होती. ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं

स्वातंत्र्यसूर्याचा उदय झाला आणि हिंदुस्थानांतील हिंदवासी-यांच्या हातीं हिंदुस्थानची सत्ता संक्रमित झाली आहे. हिंदवी-समाजांत सुख नी शांततेचं साम्राज्य प्रस्थापित करणं हें राष्ट्र-नेत्यांचं ध्येय आहे ह्यांत वाद नाहीं. पण अशा ध्येयानं प्रेरित होऊन प्रयत्न करीत असतांना समाजहिताच्या वावडीला फिरून उलटा वारा लागूं नये ह्या दृष्टीनं कसोशीनं प्रयत्न व्हायला पाहिजेत असं आपणा सर्वांनाच वाटतं.

आतांपर्यंत मानवी समाजाच्या गतकालाच्या इतिहासाचा मुख्य टप्या-टप्यानीं समाजहिताच्या दृष्टीनं जरूर तेवढाच अभ्यास करतांना दोषैक-दृष्टीनं विचार न करतां समाजहिताकरितां होत गेलेल्या प्रयत्नांचे समाजा-वर कसकसे परिणाम झाले ह्याचाच मुख्यत्वेंकरून विचार झाला आहे. ह्यानंतर मानवी समाजाच्या दुसऱ्या म्हणजे आजच्या कालखंडांत आपण प्रवेश करणार आहोंत. ह्या कालखंडाचा सांगोपांग उहापोह करून मानवी समाजाच्या प्रगतीचा कल भरतीकडं आहे कां तो ओहोटीकडं आहे ह्याचा विचार करणं क्रमप्राप्त आहे. हा कल भरतीकडंच असेल तर चालू कालांत समाज ज्या मार्गानं चालला आहे तोच रास्त मार्ग आहे असा निष्कर्ष काढून पुढं हिंदुस्थानांतील नेत्यांना ह्याच मार्गानं मानवी उत्कर्ष साधण्याकरितां कसकसे प्रयत्न करावे लागतील ह्याचा विचार करणं सोपं आहे. पण सध्यांचा मार्ग रास्त मार्ग नसेल तर आजवरच्या पहिल्या कालखंडांतील प्रगतीच्या सूत्रांचा अभ्यास करून, त्याचप्रमाणं चालू कालांतील बऱ्यावाईट घटनांचा जागतिक समाजाच्या हिताच्या दृष्टीनं विचार करून नव्या मार्गाच्या रूपरेखा आखण्याची अवघड जबाबदारी आजकालच्या ज्ञात्यांवर पडणार आहे. गोष्ट अवघड आहे हें खरं! प्रवाहपतित होऊन प्रवाहाबरोबर वहात जात असतांना समाजमनाची प्रगति साधणं हें सोपं असतं. पण प्रवाहाच्या उलट जातांना प्रवाहाचा तिरकस छेद घेऊन, आपल्या सामर्थ्यावर प्रवाहाचं विशेष दडपण न येऊं देतां, प्रवाह कापीत कापीत ध्येयाकडं जाणं ह्यांतच खरं कौशल्य आहे. अनादि संस्कृतीचा उज्ज्वल इतिहास आपल्यामागं आहे. वैदिक तत्त्वज्ञानाचं आपल्याला अधिष्ठान आहे. आधिभौतिक नी आध्यात्मिक

उन्नतीच्या दुहेरी अभ्यासाचं आपल्याला पाठबळ आहे. शारीरिक उन्नतीपेक्षां मानसिक उन्नतीवर समाजानं ज्या ज्या काळीं अधिक भर दिला त्या त्या काळांत समाजाची उन्नति झपाट्यानं झाली असं इतिहास आपल्याला सांगतो आहे. पण त्याच वेळीं गतेतिहासानं आपल्याला अट्टहासानं असं बजावलं आहे कीं आध्यात्मिक उन्नतीवर बेसुमार भर देऊन आधिभौतिक उन्नतीकडं दुर्लक्ष केल्यानं सुद्धां समाजाचं अनहितच झालेलं आहे. आध्यात्मिक उन्नतीचा पाया प्रथम आर्यावर्तांतच घातला गेला होता. आधिभौतिक उन्नतीचं पहिलं वहिलं श्रेयसुद्धां आर्यावर्ताचंच आहे. नुसत्या आधिभौतिक सामर्थ्यावर भर दिल्यानं सामाजिक उन्नतीची इमारत कोसळून पडते हें आर्यावर्ताच्या इतिहासावरूनच सिद्ध झालं आहे. निर्भेळ आध्यात्मिक उत्कर्षानं समाज दाही दिशांनीं उधळला जातो हेंहि आपल्याच इतिहासावरून आपल्या प्रत्ययाला आलं आहे. म्हणून आधिभौतिक नी आध्यात्मिक उन्नतीचा योग्य प्रमाणांत समन्वय साधून नवीन जागतिक संस्कृतीचा पाया घालण्याचा मान ह्या आर्यावर्तांतील ज्ञात्यांनाच मिळण्याचा संभव आहे असं मानणं गैर होणार नाहीं. आज हिंदुस्थानांत त्याचप्रमाणं जगाच्या पाठीवर सुद्धां अध्यात्मतेज जवळजवळ लुप्त झालं आहे. कांहीं तुरळक व्यक्ती अध्यात्म तेजानं झळाळत असलेल्या आपल्याला दिसत असल्या तरी त्या व्यक्ती अहोरात्र जगापलीकडील उच्च वातावरणांत वावरत असल्यानं समाजहिताच्या दृष्टीनं त्यांचं अस्तित्व असून नसल्यासारखंच आहे. युरोप व अमेरिका हीं दोन्हीं खंडं आजवर आधिभौतिक उन्नतीच्या मंत्रानं पुरेपूर भारलीं गेलीं असलीं तरी आज तींसुद्धां पुढं काय होणार ह्या भयाण कल्पनेनं बेचैन झालीं आहेत. अशा वेळीं आधिभौतिक उन्नतीला अध्यात्माचा आधार दिल्याशिवाय समाजाची धडगत नाहीं, असे पुसट विचार तिकडच्या ज्ञात्यांच्या मनांत उत्पन्न होऊं लागले आहेत. पण पुढं जाणं जितकं धोक्याचं आहे, त्याहूनहि अधिक धोक्याचं मागं परतणं हें आहे. आजवर युरोपीय तत्त्ववेत्त्यांचा सारा भर मुख्यतः आधिभौतिक प्रगतीवरच असल्यानं त्यांना आध्यात्मिक उन्नतीबद्दल तितकासा आत्मविश्वास वाटणं शक्य नाहीं. आत्मविश्वास नसतांना नवीन प्रयोग करणं धोक्याचं आहे.

अशा वेळीं साऱ्या जगाचे डोळे आर्यावर्ताकडं लागणं साहजिक आहे. आर्यावर्तात एक नवं तत्त्वज्ञान आधींच वाढीला लागलेलं आहे. ह्या नव्या तत्त्वज्ञानाचा आजकालच्या हिंदुस्थानांतील समाजधुरीणांनीं चांगलाच अभ्यास केला असल्यानं ह्या तत्त्वज्ञानाबद्दल त्यांना विश्वास पण वाटतो आहे. अशा परिस्थितींत हिंदुस्थानांतील नेत्यांनीं जागतिक समाजहिताचं पुढारीपण पत्करण्याचं धाडस करणं अस्थानीं होणार नाहीं. यश मिळालं नाहीं तर विशेष नुकसान नाहीं. पण ह्या नव्या प्रयोगांत यश मिळालं तर फिरून एकदां जगाच्या इतिहासांत आर्यावर्ताला पहिलं मानाचं स्थान मिळण्याचा संभव आहे.

—*—

७ : पाश्चिमात्यदर्शन

युरोपखंडांतील ग्रीक तत्त्वज्ञान आशिया खंडांतील वैदिक तत्त्वज्ञानाच्या तोलाचं होतं, इतकंच नव्हे तर ग्रीस देशांतील मानवजात आणि आर्यावर्तांतील मानवजात ह्या एकाच समाजवृक्षाच्या शाखा आहेत. ज्याप्रमाणं आपण आशिया खंडांतील लोक अद्याप संस्कृत व पर्शिअन भाषांना महत्त्व देतो त्याचप्रमाणं पाश्चात्य देश ग्रीक व लॅटिन ह्या भाषांना महत्त्व देतात. ईजिअन संस्कृति, इजिप्तची संस्कृति, बाबिलोनी संस्कृति, चिनी संस्कृति व भारतीय संस्कृति ह्या सगळ्या संस्कृतींचं उगमस्थान उत्तरध्रुवाकडील प्रदेश हेंच होय अशा तऱ्हेचं संशोधन आपल्यापुढं आहे. आज उत्तरध्रुवाकडील प्रदेश मानवी वस्तीला अयोग्य असला तरी मानवजातीच्या सुरवातीला तो प्रदेश बर्फाच्छादित नसल्यानं पृथ्वीवरील साऱ्या मानवजातींचे जनक त्याच ठिकाणीं प्रथम वावरूं लागले आणि तिथूनच मानवजात भूपृष्ठावरील इतर देशांतून पसरली. कोणत्या काळीं कोणती प्राचीन संस्कृति कुठं विकास पावली हें प्राचीन काळच्या अवशेषांवरून नक्की जरी समजत नसलं तरी ह्या पांच संस्कृती अत्यंत प्राचीन आहेत ह्याबद्दल दुमत नाहीं. ज्या संस्कृतीला अधिक ऐतिहासिक पुरावे पुराणवस्तुसंशोधनांतून मिळत जात आहेत ती संस्कृति अधिक जुनी असं संशोधनावरून सिद्ध होत आहे. आपलीच संस्कृति अतिप्राचीन आहे असं आपण किती जरी अट्टाहासानं सांगितलं तरी जोपर्यंत भूपृष्ठाखालीं गाडलेल्या अवशेषांवरून तसं स्पष्ट सिद्ध होत नाहीं तोपर्यंत नुसत्या दुराग्रहानं कोणत्याच संस्कृतीला अतिप्राचीनत्वाचा मान मिळणार नाहीं. खरा मोठेपणा प्राचीनपणांत नसून विकासांत आहे. ईजिअन संस्कृतींतून क्रीट व ग्रीसमधील संस्कृतींचा विकास झाला, ह्यांतून रोमन संस्कृति उदयाला आली आणि ह्या रोमन संस्कृतीनं एके काळीं जवळजवळ सारा युरोप व्यापला होता हें ऐतिहासिक सत्य आहे. क्रीट व ग्रीक संस्कृतींत तत्त्वज्ञराजे (Philosopher Kings) ही जी विचारसरणी

उदय पावली त्या विचारसरणीच्या अर्थाचा अनर्थ झाल्यानं युरोपीय संस्कृति आणि आशियांतील संस्कृति ह्यांतील साधर्म्य, लयाला गेलं. तत्त्वज्ञराजे म्हणजे श्रेष्ठ तत्त्वज्ञ ह्या विचारसरणीचा लोप होऊन तत्त्वज्ञच राजे असले पाहिजेत अशी विचारपरंपरा युरोपांत सुरू झाली. म्हणजे युरोपांत बुद्धिवाद्यांच्या हातीं समाजाच्या पहिल्या अवस्थेंतच सत्ता आली. वैदिक विचारसरणींत बुद्धिवादी समाज राष्ट्राच्या अग्रभागीं असला तरी तो समाजाच्या प्रथमावस्थेंत सामर्थ्यवाद्यांच्या सल्लागाराच्या स्थानीं असल्यानं आशियांतील संस्कृतींत बुद्धिवाद्यांच्या हातीं सत्ता मिळायला थोडा अधिक काळ लागला. पण ह्या दोन्ही विचारप्रणालींतून समाजाला घातक आणि मानवतेच्या मूळ ध्येयाला विसंगत अशींच तत्त्वं रूढ झालीं. एका खंडांत आधिभौतिक वादाला ऊत आला तर एका खंडांत आध्यात्मिकतेचा कळस झाला. एकाच आईच्या पोटीं जन्म घेतलेल्या दोन पोपटांच्या पिलांपैकीं एक पिलू आदरातिथ्य करायला शिकलं आणि दुसरं शिव्या द्यायला शिकलं. त्याचप्रमाणं ह्या दोन खंडाच्या परंपरेतून मानवजातीचे दोन परस्परविरोधी गट निर्माण झाले. स्पार्टन लोकांच्या विचारसरणीच्या अनुरोधानं नवीन जन्माला आलेलं मूल राष्ट्राला निरुपयोगी ठरत असेल तर त्याचा अमानुषपणें नाश करण्याची आधिभौतिक प्रवृत्ति सामर्थ्यवान ठरली, तर तारुण्यांतच सर्वसंगपरित्यागाचं आध्यात्मिक अधिष्ठान बुद्धधर्मप्रणेत्यांनीं उचलल्यानं तत्कालीन सारा समाज निवृत्तिपर बनला. आधिभौतिक सामर्थ्यावर अधिष्ठित असलेल्या राष्ट्रांतून आध्यात्मिकतेचे प्रयत्न वाया गेले, त्याचप्रमाणें आध्यात्मिक सामर्थ्यावर अधिष्ठित असलेल्या राष्ट्रांतील आधिभौतिक सामर्थ्याचे प्रयत्नसुद्धां फोल ठरले. अशा ह्या एकान्तिक प्रयत्नांच्या संगमांतूनच मानवी सुखशांतीच्या प्रवाहाचा उगम होण्याचा संभव असल्यानं नव्या भारतीय विचारसरणीचं तत्त्व समाजापुढं मांडण्यापूर्वी युरोपीय संस्कृतीचा म्हणजे आधिभौतिक संस्कृतीचा भारतीय संस्कृतीशीं संघर्ष होण्याच्या वेळीं युरोपीय संस्कृति कोणत्या अवस्थेंत होती ह्याचं स्रोटक समालोचन करणं आवश्यक आहे.

युरोपियनांच्या हिंदुस्थानांत येण्यानं आर्यावर्तातील समाजांत आध्यात्मिक ज्ञानाच्या ज्या अस्पष्ट रेषा अस्तित्वांत होत्या त्या पार पुसून गेल्या. घारे डोळे, गोरा वर्ण, उंचीपुरी आकृति, कुणाच्याहि मनांत आदर व भीति उत्पन्न होईल असेच हे युरोपीय लोक होते. युरोपांतील थंड प्रदेशांतून मानवीसमाजाला पुरेशी अन्नधान्याची उत्पत्ति होत नसल्यानं व तेथील समाज देशाच्या नैसर्गिक रचनेमुळं समुद्रावरून प्रवास करण्यांत वाकबगार झाला असल्यानं तेथील कांहीं धाडसी लोक अन्नसामुग्रीच्या जरूरीमुळं परदेशाशीं व्यापारी दळणवळण वाढविण्याकरितां हातीं तराजू घेऊन हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरले ह्यांत अस्वाभाविक कांहीं नाहीं. हिंदुस्थानांतील तत्कालीन राजसत्तेला सुद्धां सातासमुद्रापलीकडील मानवजातीशीं नव्यानं ओळख झाल्यानं थोडाबहुत आनंद झाला असल्यास नवल नाहीं. मानवजात ही सगळी जगाच्या पाठीवर इथून तिथून एकच आहे, देवाण घेवाण हा जगाचा नियम आहे, आपल्याजवळच्या अनवश्यक वस्तू दुसऱ्याला द्याव्या, दुसऱ्याजवळच्या वस्तू आपण घ्याव्या आणि एकमेकाला पूरक होऊन जगांत सुखासमाधानानं नांदावं ही सहिष्णुतावृत्ति हिंदुस्थानांतील समाजाच्या अंगवळणीं पडली असल्यानं ह्या नव्या मानवतेच्या ओळखीनं हिंदुस्थानांत एक नवं दालन उघडलं गेलं.

समतोल देवाण घेवाण किंवा तराजू हा युरोपीय आधिभौतिक शास्त्राचा प्राण आहे. हिंदुस्थानांत मानवी जीवनाला आवश्यक असलेल्या अन्नवस्त्राची वाण कधींच नव्हती. पण नेहमींच्या आयुष्यांत जरूर नसलेल्या अशा अनवश्यक वस्तूंचा ह्या परकी व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या समाजावर मारा केला आणि ह्या नव्या नव्या चैनीच्या वस्तूंनीं हिंदुस्थानांतील आत्मसंतुष्ट समाजाला भुरळ पाडली. अनवश्यक पण चैनीच्या वस्तूंच्या बदल्यांत, परकी समाजाला जरूर असलेल्या आवश्यक वस्तूंची देवाण सुरू होऊन ह्या व्यापारी समाजाचं हिंदुस्थानशीं दळणवळण सुरू झालं.

हे भुकेकंगाल परकी लोक अनिच्छेनं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरले, त्यावेळीं हिंदुस्थानांत अक्षरशः सोन्याचा धूर निघत होता. खायलाप्यायला भरपूर, वस्त्रप्रावरणाची ददात नाहीं, खनिज संपत्तीचा उमाप

साठा, तीनं बाजूंनीं समुद्र असल्यानं मांसमच्छराची कमतरता नाहीं, थोडक्यांत सांगायचं म्हणजे हिंदुस्थानांत खरीखुरी वाण कशाचीच नव्हती. हा देश स्वयंपूर्ण होता. स्वयंपूर्ण देशांत बेकारी नसली, म्हणजे राष्ट्र-विस्ताराची जरुरीच भासत नाहीं. ह्याच्या उलट येथें आलेले हे परकी लोक मानवतेच्या आवश्यक वस्तूंना सुद्धां पारखे होते. त्यांना आपल्या देशांत परत जाण्यापेक्षां इथंच वसाहती करून राहणं आवडूं लागलं, इतकंच नाहीं तर दारिद्र्यांत खितपत पडलेल्या आपल्या नातेवाइकांना ह्या देशांतील सुखसमृद्धीची कल्पना देऊन ह्या देशांत येऊन राहण्याचा ते आग्रह करूं लागले. प्रथम प्रथम त्यांच्या नातेवाइकांचा देखील त्यांच्यावर विश्वास बसेना. पण ह्यांच्यांतील कांहीं लोक संततिसंपत्ती—समृद्धीनं परिपूर्ण होऊन मायदेशीं जाऊन ज्यावेळीं ऐषआरामांत राहूं लागले, त्यावेळीं तेथील लोकांना ह्यांच्या सांगण्याची सत्यता पटली आणि हिंदुस्थानांत येऊन सधन होण्यासंबंधीं ह्यांच्यांत अहमहमिका सुरू झाली. इतका त्यांचा देश कंगाल होता.

नुसता इंग्रजांचा देशच नव्हे तर सगळा युरोप हिंदुस्थानच्या मानानं कंगाल होता. युरोपांतील बहुतेक राष्ट्रं अन्नवस्त्राची वाण असलेलीं घरभूत राष्ट्रं होतीं. थोडीबहुत खनिज संपत्ति, मुख्यतः मांसावर, उदरनिर्वाह आणि जनावरांच्या कातड्याचे अगर लोकरीच्या कापडाचे कपडे वापरायला हेंच त्यांचं वैभव! आशिया खंडाला जवळ असलेले इटली, ग्रीस वगैरे चारदोन देश सोडले तर बाकी सर्व युरोपीय देशांत रानटीपणा नी दारिद्र्य ह्यांचंच साम्राज्य होतं. इसवी सनानंतर कांहीं शतकं साऱ्या युरोपांत रोमन संस्कृतीचा पगडा होता. खुद्द इंग्लंडमध्यें ख्रिस्ताचं तत्त्वज्ञान सुरू व्हायला ख्रिस्तजन्मापासून सुमारें सहा शतकें जावीं लागलीं. म्हणजे आज इंग्लिश लोकांची संस्कृति अवघी चवदाशें वर्षांची आहे. इस्लामी संस्कृति सुद्धां तितपतच जुनी आहे. ह्या दोन संस्कृतींपैकीं जी संस्कृति हिंदुस्थानला अधिक लगतची होती त्या इस्लामी संस्कृतीनं आधीं हिंदुस्थानावर आक्रमण केलं आणि ह्या युरोपीय संस्कृतीनं त्यानंतर हिंदुस्थानावर आक्रमण केलं. ह्या दोन्ही संस्कृती वर्धिष्णु नसून जयिष्णु आहेत ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. हिंदु संस्कृति

अतिप्राचीन कालापासून हिंदुस्थानांत असून ह्या दोन्ही संस्कृतींच्या आक्रमणानंतर सुद्धां हिंदु संस्कृति जिवंत राहिली; एवढंच नव्हे तर नव्या कालाला योग्य असे फेरबदल हिंदुसंस्कृतींत होऊनसुद्धां जुनं तत्त्वज्ञान नाहींसं झालं नाहीं, ह्यांतच वैदिक तत्त्वज्ञानाचं वैशिष्ट्य आहे. संस्कृति जितकी अधिक जुनी, तितक्या प्रमाणांत त्या संस्कृतींतील तत्त्वांचं सामर्थ्य अधिक आणि ज्याअर्थी ही वैदिकसंस्कृति अद्यापि भारतवर्षांत टिकून आहे त्याअर्थी इतर परकीय संस्कृतींपेक्षां ह्या संस्कृतीमधील तत्त्वज्ञान अधिक चिवट आहे असं मानण्याला जागा आहे.

आधींच कंगाल असलेल्या युरोपखंडांत माणसांची वाढ जसजशी अधिकाधिक होऊं लागली त्या प्रमाणांत त्या खंडांतील निरनिराळ्या देशांतील लोकांत तीव्रतर जीवनकलहाला सुरवात झाली. म्हणून आहेत त्या लोकांची उपासमार कमी करण्याच्या उद्देशानं त्यांतील कांहीं धाडसी खलाशी नाइलाज म्हणून परकी देशांकडं धाव घेऊं लागले. पंधराव्या शतकाच्या अखेरीस कोलंबसानं अमेरिकाखंडाचा शोध लावला, त्यावेळीं आपण हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरच उतरलों आहोंत अशी त्याची कल्पना झाली; कारण हिंदुस्थानदेशाचं नांव युरोपखंडांत ऐकून माहीत होतं नी अमेरिकाखंडाची कोणालाच कल्पना नव्हती. त्यानंतर सुमारें शंभर वर्षांनीं धाडसी युरोपीय खलाशी हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरले आणि इथूनच हिंदुस्थानांतील समाजमनाची वायुवेगानं पिछेहाट होऊं लागली.

हे टोपीवाले, कंगाल देशचे रहिवासी असून सुद्धां, हिंदुस्थानांतील लोकांना ते तसे भासले मात्र नाहींत. त्यांचे गाजरासारखे लालबुंद चेहरे, त्यांचा बोलण्याचालण्याचा रुबाब, त्यांची वागण्याची शिस्त ह्यामुळं आपले हिंदुस्थानांतील लोक त्यांच्या दिखाऊपणानं भारले गेले. मोठ्या कौतुकानं त्यांचं स्वागत करून, त्यांना लागतील त्या व्यापारी सवलती देऊन, त्यांनीं त्यांची मैत्री संपादन केली. हिंदुस्थानांतील संस्कृति इतकी जुनी-पुराणी असून सुद्धां आधिभौतिक शास्त्रांत हिंदुस्थानांत झालेली प्रगति असमाधानकारक आहे. युद्धास्त्रं, आकाशप्रवास, विणकला, शस्त्रक्रिया इत्यादि शोध पुराणकालीन आणि वेदकालीन असूनसुद्धां हजारो वर्षांच्या प्रगतीनंतर हिंदुस्थानांत यांत्रिक सुधारणा कां झाली नाहीं अशी शंका

जिकच शंका येण्याचा संभव आहे. म्हणून यांत्रिक सुधारणेसंबंधीं तौल-निक विचार करणं ह्या ठिकाणीं अस्थानीं होणार नाहीं.

मानवी समाजाच्या सुखाला जरूर त्या सुधारणा हिंदुस्थानांत कळसाला पोंचल्या होत्या असे दाखले आपल्याला पुष्कळ सांपडतात. पण यांत्रिक सुधारणा आर्यावर्तांत झपाट्यानं झाल्या नाहींत, याचं कारण हिंदुस्थानांतील ज्ञात्यांना त्यांची जरुरी भासली नाहीं इतकंच नव्हे, तर यांत्रिक सुधारणांच्या योगानं समाजांत अनर्थ होतील ह्याची स्पष्ट कल्पना हिंदुस्थानांतील ज्ञात्यांना आली असली पाहिजे. सूत कातण्याच्या टकळ्या किंवा चरखे त्याचप्रमाणं कापड विणण्याचे माग वेदकालीन समाजांत होते आणि ह्याच साध्या यांत्रिक तत्त्वावर काम करीत असलेल्या सुताच्या नी कापडाच्या गिरण्या मात्र युरोपीय देशांतून इकडे आल्या हें खरं आहे. तत्त्व जर तेंच आहे तर त्या बाबतींतील यांत्रिक सुधारणा घडवून आणणं हिंदुस्थानांतील तत्त्ववेत्त्यांना अशक्य झालं असं म्हणणं धाडसाचं होईल. अर्थशास्त्रांतील तत्त्वानुरोधानं मागणीपुरवठ्याचं गणित सोडवूनच पुरवठा वाढविणं अगर कमी करणं हें तत्कालीन ज्ञात्यांनीं नियंत्रित केलं असलं पाहिजे. मागणीपेक्षां पुरवठा अधिक झाल्यास तयार मालाकरितां बाहेरची बाजारपेठ तरी काबीज करावी लागते, किंवा जादा माल जाळून नाहींसा तरी करावा लागतो, किंवा आपल्या देशांतील कांहीं कारागिरांना बेकार तरी ठेवावं लागतं. परदेशी बाजारपेठ काबीज करण्याकरितां परकी देशांवर आक्रमण करीत असतांना परदेशांतील मानवजातीचा आणि त्याचबरोबर स्वदेशांतील मानवजातीचा संहार करावा लागतो. ही मानवी समाजाची उन्नति नसून अवनतीच आहे. जादा माल उत्पन्न करून तो जाळणं म्हणजे अप्रत्यक्ष रीत्या मानवी समाजाच्या श्रमाची होळी करण्यासारखंच आहे. जादा माल उत्पन्न करण्याची शक्यता असतांना तो उत्पन्न न करणं म्हणजे समाजांतील कांहीं लोकांना विनाकारण बेकार आणि त्यामुळं आळशी बनविण्यासारखं आहे. प्राच्या हिंदुस्थानांत कित्येक वर्षांच्या मानवी समाजाच्या प्रगतींत आवश्यक वस्तूंचा अपुरा साठा हा प्रश्नच कधीं उद्भवला नाहीं. युद्धकालीन परिस्थिति सोडली तर हिंदुस्थान हा सर्व दृष्टीनं समृद्ध देश होता नी

आजसुद्धां तो तसाच आहे. हिंदुस्थानांत जरूर तेवढीच यांत्रिक सुधारणा होती आणि वैयक्तिक कारागिरांच्या कौशल्याला भरपूर वाव दिला जात होता. पुरवठ्याची जर अडचण पडली असती तर ग्रामोद्योगांत ज्या यांत्रिक सुधारणा झाल्या त्यापेक्षां थोड्या अधिक सुधारणा शात्यांनीं अमलांत आणल्या असत्या हें निश्चित. पण भरमसाट यांत्रिक सुधारणा न होऊं देण्याची त्यांनीं खबरदारी घेतली असती. हेंच आर्यावर्तातील संस्कृतीचं वैशिष्ट्य आहे.

वेल्सच्या ' Men on the Moon ' मधल्या काल्पनिक मानवजातींत वेल्सनं वर्णन केलेल्या आधिभौतिक सुधारणांचं काल्पनिक नियंत्रण आर्यावर्तातील तत्त्वज्ञांनीं फार प्राचीन काळीं सत्यसृष्टींत आणलं होतं. काम करणाऱ्या कारागिरांची जरूरीपेक्षां जास्त वाढ झाल्यास त्यांना एक औषधी पाजून गुहेमध्यें टाकून ठेवावं आणि कामगार कमी पडतील त्यावेळीं त्यांना फिरून दुसरी औषधी पाजून जागं करावं ही वेल्सची कल्पना अद्‌भुतरम्य वाटत असली तरी त्यांत तथ्यांश पुष्कळच आहे. बुद्धिवाद्यांचं फक्त डोकंच वाढूं द्यावं, कामकऱ्यांचे फक्त हातपायच सुदृढ होऊं द्यावे अशा तऱ्हेच्या वेल्सच्या कल्पना असंभाव्य वाटत असल्या तरी हल्लींच्या युगांतील मानवी संस्कृतीला मारक झालेल्या वर्गचढाओढी पाहिल्या म्हणजे ह्या काल्पनिक भराऱ्याच सत्यसृष्टींत आणणं जरूर आहे असं वाटूं लागतं.

आर्यावर्तातील तत्त्वज्ञांचं धोरण अशाच तऱ्हेचं होतं. आर्यावर्तातील शात्यांना यांत्रिक सुधारणा शक्य झाल्या नाहींत आणि आतां मात्र जुन्या तत्त्वज्ञांची महती गातांना ह्या शात्यांच्या मनींमानसीं नसलेल्या कल्पना त्यांच्यावर लादून त्यांचे गोडवे गाणारे त्यांचे वंशज त्यांना फुकटचं देवपण देतात असा एक आरोप कधींकधीं केला जातो. पण थोडा अधिक विचार केल्यास आपल्याला असं दिसून येईल कीं ज्या शात्यांनीं शत्रूंच्या सैन्यावर आगीचा वर्षाव करणारीं यंत्रं तयार केलीं होतीं त्यांना रोजच्या व्यवहारांत यंत्रांचा उपयोग करणं आवश्यक वाटलं असतं तर आधुनिक जगांतील नव्या नव्या संस्कृती उदयाला येण्यापूर्वीच त्यांनीं यांत्रिक सुधारणा कळसाला नेऊन पोचविली असती. पण यांत्रिक सुधारणांनीं मनुष्य-

जातीची उन्नति होण्याऐवजीं अवनतीच होईल असा त्यांचा ठाम निश्चय असल्यानं, अनिर्वाहपक्ष म्हणून युद्धांतच फक्त वापरतां येण्यासारखीं यंत्रं तत्कालीन समाजांत त्यांनीं रूढ केलीं असावींत हेंच सयुक्तिक वाटतं.

ह्याच्या उलट युरोपखंड हा कंगाल देश होता. ओसाड, थंड आणि हिमाच्छादित प्रदेशांत अन्नधान्याची टंचाई असणं साहजिक आहे. म्हणूनच युरोपखंडांत हिंदुस्थानसारख्या संपन्न प्रदेशांतून अन्नधान्याची आयात करणं आवश्यक झालं. याच्या बदल्यांत ज्या निरनिराळ्या पदार्थांची निर्यात त्यांना करावी लागत असे त्या पदार्थांची देखील तेथें विपुलता नव्हती. अर्थात् आयातीच्या प्रमाणांत निर्यात करावयाची झाल्यास आपल्या देशांत होणाऱ्या मालाची निर्मिति वाढविणं हा एकच उपाय होता. ही निर्मिति वाढविण्याकरितां युरोपांतील मानवजातीचं लक्ष वस्तूंची जलद निर्मिति करण्याकडं वेधणं साहजिक आहे. गरजेंतूनच शोध बाहेर पडतात. अशा दृष्टीनं पाहिल्यास एका माणसाच्या कामांत दोन, चार दहा माणसांचं काम करून घेण्याची प्रवृत्ति हीच युरोपांतील यांत्रिक सुधारणा होय. शिवाय यांत्रिक वस्तूंची निर्मिति करतांना कुशल कारागिरांची जरुरी नसते. अभ्यासानं निर्माण होणाऱ्या कौशल्याची वाट पहात बसायला तिथल्या मानवजातीला सवड नव्हती. कारागिरांत कौशल्य निर्माण करण्याच्या प्रयत्नांत असलेल्या मानवजातीला उपाशी मारण्यापेक्षां कौशल्य नसलेल्या मजुरांना यंत्रांच्या मदतीनं काम करायला लावून निर्यातीकरितां भरपूर मालाचं उत्पादन करणं हें युरोपांतील समाजाला आवश्यक होतं. ह्या समाजाच्या गरजेंतूनच यांत्रिक सुधारणा वाढीला लागून युरोपखंड यांत्रिक युगाचं केंद्र बनलं. होकायंत्र, दुर्बिण, छापण्याची कला वगैरे कांहीं यांत्रिक शोध एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वकालीन असले तरी वाफेची शक्ति, विजेची शक्ति व त्या शक्तीच्या साहाय्यानं चालणारीं एंजिनं, आगबोटी, तारायंत्र वगैरे बहुतेक सगळे मुख्य मुख्य यांत्रिक शोध एकोणिसाव्या शतकांतील आहेत आणि जवळजवळ बहुतेक शोध युरोपांतलेच आहेत.

युरोपखंडांतील समाजाचं अस्तित्वच ह्या शोधांच्यावर अवलंबून होतं. हे शोध लागले नसते तर युरोपांतील मानवीसमाज जगाच्या पाठीवरून

कदाचित् नामशेषहि झाला असता. कारण जगाच्या बाजारांतील देवाण-घेवाणीच्या तत्त्वाप्रमाणं निर्यात मालाचा पुरेसा पुरवठा करणं हें या यांत्रिक प्रगतीशिवाय त्यांना अशक्य झालं असतं. अशा रीतीनं हा यंत्र-राक्षस-उत्पन्न झाला. हा राक्षस प्रबल करण्याच्या बाबतींत युरोपांतील ह्याच्या थंड प्रदेशांतच मुख्य अहमहमिका सुरू झाली. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांतील यांत्रिक प्रगतीच्या चढाओढीमुळं एकोणिसाव्या शतकांत जिकडं तिकडं शोधच शोध, यंत्रंच यंत्रं दिसूं लागलीं. मानवता मारली गेली. कलावान कारागिरांना समाजांत जागा शिल्लकच राहिली नाहीं, माणसंच यंत्रं बनलीं असं म्हणणं सुद्धां अतिशयोक्तीचं होणार नाहीं. युरोपांतील मानवजातीनं आपल्या गरजा भागविण्याकरितां निर्माण केलेला हा यंत्रराक्षस ह्या विसाव्या शतकांत इतकं अक्राळविक्राळ स्वरूप धारण करून बसला कीं ह्या राक्षसाच्या कचाट्यांत सापडलेला मानवी-समाज कोणत्या क्षणाला पृथ्वीच्या पाठीवरून नामशेष होऊन एकदम काळाच्या उदरांत गडप होईल ह्याचा नेमच राहिला नाहीं.

स्मशानांत राहून चिताभस्म अंगीं लावून घोर तपश्चर्या करण्याचं शंकराचं व्रत होतं. रोजच्या रोज चिताभस्म गोळा करण्याचे श्रम करवेनात म्हणून म्हणा, अगर चिताभस्म गोळा करण्यांत जो वेळ जातो तो वेळ वाया घालविण्याच्या अनिच्छेनं म्हणा, एके दिवशीं शंकरांनीं आपल्याच हातांतील चिताभस्मांतून एक खडा घेऊन त्यांतून भस्मासुर नांवाचा एक राक्षस आपली सेवा करण्याकरितां उत्पन्न केला. तो असुर हात जोडून शंकरापुढं उभा राहिला आणि 'आज्ञा काय आहे?' असं त्यानं नम्रपणानं आपल्या निर्मात्याला विचारलं. शंकरांनीं त्याला आपल्याला रोजच्या रोज नेमानं चिताभस्म पुरविण्याची आज्ञा केली. भस्मासुरानं कृतज्ञतेनं मालकाची आज्ञा शिरसावंद्य मानून रोज नेमानं शंकराला चिताभस्म पुरविण्याला सुरवात केली. पहाटे उठून चिताभस्म गोळा करावं एवढीच त्याची कामगिरी होती आणि ती तो नित्य नियमानं करीत असे. एके दिवशीं त्याला भस्म आणण्याला उशीर झाला. शंकरांनीं कारण विचारतांच, 'आज चिताभस्म लवकर मिळालं नाहीं' असं भस्मासुराकडून उत्तर आलं. भोळ्या शंकराला

कारण खरं वाटलं. यापुढं वरचेवर असाच उशीर होऊं लागला. भस्मासुर रोज तेंच कारण पुढं करूं लागला. पुढं पुढं तर दोनदोन तीनतीन दिवस चिताभस्म मिळेना. नाइलाजानं शंकरांनीं भस्मासुराला वर दिला ' तूं ज्याच्या ज्याच्या डोक्यावर हात ठेवशील त्याचं त्याचं भस्म होईल. ' झालं ! आपल्या ह्या नवीन शक्तीचा उपयोग करीत भस्मासुरानं प्रचंड संहाराला सुरवात केली आणि रोजच्या रोज तो ताजं चिताभस्म शंकराला पुरवूं लागला. जिकडं तिकडं हाहाःकार उडाला. शंकराच्या वरदानानं भस्मासुर अजिंक्य झाला, उन्मत्त झाला आणि अखेर तेंच वरदानाचं शस्त्र शंकरावर वापरण्याची त्याला इच्छा झाली. शंकरसुद्धां भयभीत झाले. आपल्याच सेवकाच्या भयानं ते सैरावैरा धावूं लागले. शंकराच्या डोक्यावर हात ठेवून त्याचं भस्म केल्यावर भस्मासुर अजिंक्य होणार होता. पृथ्वीचा प्रलयकाळ जवळ आला म्हणून सारे लोक भयभीत झाले. मोहिनीचं रूप घेऊन विष्णू भस्मासुराला आडवे आले. विश्वमोहिनीच्या ओसंडणाऱ्या सौंदर्यानं भस्मासुर मोहित झाला. तो तिच्यावर इतका आषक्त झाला कीं तिच्याकडं पहात तिच्या अभिलाषानं देहभान हरपलेला तो भस्मासुर तिच्या मोहक हावभावाचं अनुकरण करूं लागला. तो पूर्ण भारला गेला आहे, तो भानावर नाहीं असं पाहतांच विश्वमोहिनीनं आपल्या नयनमनोहर नृत्यांतील हावभावांत, सहज लीलेनं, आपला हात स्वतःच्या मस्तकावर ठेविला. बेभान झालेल्या भस्मासुरानं नकळत विश्वमोहिनीचं अनुकरण केलं. त्यानंहि आपला हात स्वतःच्या मस्तकावर ठेविला आणि त्याचं भस्म झालं, अशी एक कथा पुराणांतरीं आहे. कथा खरी असो वा खोटी असो, कथेंतील बोध मात्र अमोल आहे. हा यांत्रिक सुधारणेचा भस्मासुर मानवजातीनं स्वतःच्या प्रगतीकरितां स्वेच्छेनंच निर्माण केला आहे. पण तो भस्मासुर आतां कृतघ्न होऊन मानवजातीवरच उलटला आहे. सारी मानवजात ह्या भस्मासुराच्या भयानं सैरावैरा धावत सुटली आहे. ह्या भस्मासुराला नाहींसा करण्यानंच मानवजात सुखी होणार आहे असे विचारप्रवाह सुरू झाले आहेत. पण त्या भस्मासुराला गाडून टाकणारी विश्वमोहिनी मानवी मनाची दिव्यशक्ति मात्र अद्याप कुठं दिसत नाहीं. ही दिव्यशक्ति निर्माण करण्याच्या दृष्टीनं

कांहीं प्रयत्न करतां येतील का ह्याचाच आपल्याला ऊहापोह करावयाचा आहे.

प्रथम प्रथम ह्या यंत्रांचा उपयोग व्यक्तिनिष्ठ होता. पण मागणीच्या प्रमाणांत पुरवठा वाढविण्याकरितां ह्या व्यक्तिनिष्ठ यंत्रांचं कारखान्यांत रूपांतर झालं. मानवीसमाजाच्या हिताकरितांच यांत्रिक सुधारणेला सुरवात झाली ही गोष्ट दीपस्तंभाप्रमाणं सतत आपल्या डोळ्यासमोर वागविणं जरूर आहे. हे कारखाने उभारणं एकट्यादुकट्याचं काम नसल्यानं संघटित भांडवल उभं करण्याची कल्पना आली आणि भांडवलभागीदारांच्या संस्था (Limited Companies) अमलांत आल्या. अशा तऱ्हेनं यांत्रिक सुधारणांची वाढ हाच युरोपीय संस्कृतीचा ध्येयतारा ठरला.

युरोपांत मानसिक उन्नतीचं तत्त्वज्ञान उदयालाच आलं नाहीं असं नाहीं. येशू खिस्ताचा अवतार वैदिक तत्त्वज्ञानानंतर कित्येक शतकांनीं झाला असला तरी खिस्ताच्या तत्त्वज्ञानाचं सूत्र मानसिक उन्नति हेंच होतं. पण हें तत्त्व रुजायला, उगवायला नी फोफावायला ज्या तऱ्हेची मनोभूमि असावी लागते त्या तऱ्हेच्या मनोभूमीचा युरोपखंडांत अभाव होता. येशू खिस्ताचं तत्त्वज्ञान साऱ्या युरोपखंडांत फैलावलं आणि आजतागायत तें नुसत्या युरोपखंडांतच नव्हे तर इतर एकदोन खंडांत सुद्धां मुख्य धर्मतत्त्व मानलं जात आहे. पण हा धर्म युरोपखंडांत योग्य तऱ्हेनं रुजला मात्र नाहीं. याचं कारण युरोपीय समाजाची हलाखी. धर्मप्रणेत्यांनीं सांगितलं पुष्कळ, पण त्या तत्त्वांचा विचार करायला तिथल्या समाजाला सवड नव्हती. त्यांना दारिद्र्याशीं झुंज द्यायची होती. सर्वांग बधिर करणाऱ्या थंडीविरुद्ध त्यांना झगडायचं होतं. त्यांच्याकडं वक्रदृष्टीनं पाहणाऱ्या ओसाड निसर्गावर त्यांना मात करायची होती. जगांत जगायचं कसं हा प्रश्न त्यांच्यापुढं होता. अशी निराश परिस्थिति असूनसुद्धां मानसिक उन्नतीचे अविश्रान्त प्रयत्न ह्या देशांत झाले. लॅटिमर, रिडलेसारख्या महान तपस्व्यांनीं स्वतःला जाळून घेतलं पण आपल्या मनाला पटलेलं मानसिक उन्नतीचं तत्त्व सोडलं नाहीं. ल्यूथरसारख्यांनीं समाजाला न भितां बेडरवृत्तीनं आपल्याला पटलेल्या तत्त्वांचा प्रसार करण्याचा जिवापाड प्रयत्न केला.

कळणूक सोसली, देहदंड सहन केला, सद्धर्मपालनाकरितां नी प्रसारा-करितां प्राणत्याग करायला देखील त्यांनीं मागंपुढं पाहिलं नाहीं. पण त्यांचे हे सारे प्रयत्न यावे तितके फळाला आले नाहींत. त्यावेळच्या युरोपांतील भिक्षूंनीं लोकांचीं मनं वळविण्याचा खूप प्रयत्न केला; पण मानसिक उन्नतीला लागणारी शान्ति नी स्वास्थ्य समाजाच्या ठिकाणीं नसल्यानं त्यांचे सारे प्रयत्न पालथ्या घड्यावरील पाण्याप्रमाणं फोल ठरले. धर्म-गुरूंनीं मरतेसमयीं लोकांना पापविमोचनपत्रिकांची खैरात करायला सुर-वात केली पण ह्या पापविमोचनपत्रिकांपेक्षां जिवंतपणींच्या दारिद्र्यविमोचन-पत्रिकांची समाजाला अधिक जरुरी होती. म्हणून आपल्याला आर्थिक साहाय्य देणाऱ्याकडं समाज धाव घेऊं लागला. धर्मगुरूपेक्षां भांडवल-वाला कारखानदार श्रेष्ठ ठरला. समाजाचा धर्मावर विश्वासच बसला नाहीं. येशू ख्रिस्तानं मानसिक उन्नतीचं बी रुजू घातलं खरं पण आध्यात्मिक उन्नतीपेक्षां आधिभौतिक उन्नतीचीच समाजाला जरुरी असल्यानं समाज त्या नादाला लागला.

त्यावेळच्या समाजाला भांडवलवाला हा देव वाटला. आज समाज भांडवलवाल्यांविरुद्ध कितीहि ओरड करीत असला, भांडवलवाला काम-कऱ्यांची पिळणूक करतो आहे, त्यांचं रक्त शोषतो आहे अशी भांडवल-वाल्यांची कितीहि निंदा होत असली तरी युरोपांतील मजुरांचा भांडवल-वाला हाच खराखुरा आधार होता. अठराव्या शतकांत जेम्स हारग्रीव्हज ह्या कोष्टयानं ज्यावेळीं पहिल्याप्रथम सूत कातण्याचं यंत्र शोधून काढलं त्या-वेळीं आपली उपासमार होईल ह्या भीतीनं इतर कातकऱ्यांनीं त्याचं तें यंत्र मोडून तोडून फेकून दिलं, इतका त्यावेळच्या मजुरांत हेवादावा होता. पण भांडवलवाल्यांनीं ज्यावेळीं यांत्रिक सुधारणेच्या मदतीनं कारखाने उभारले त्यावेळीं त्यांच्या कारखान्यांत साऱ्या मजुरांना ठराविक वेतनावर काम मिळूं लागलं आणि ज्या समाजाची आजवर उपासमार होत होती त्या समाजाला ह्या भांडवलदाराच्या कृपेनं खायला पुरेसं अन्न आणि ल्यायला पुरेसं वस्त्र मिळूं लागलं. कारखान्यांत काम करणाऱ्या ह्या मजुरांकडून भरपूर मालाची उत्पत्ति व्हावी म्हणून कारखानदार त्यांच्या-कडून बारा बारा तास काम करून घेत असत. मजुरांच्या राहाण्याच्या

जागा गलिच्छ होत्या. त्यांना मिळणारं वेतन फक्त जीवनवेतनच होतं. त्यांना मिळणारं वस्त्र आडंभरडंच होतं. हें जरी खरं असलं तरी कारखाने अस्तित्वांत येण्यापूर्वीची समाजाची केविलवाणी स्थिति आठवली म्हणजे त्यावेळीच्या समाजाला कारखानदार हे देवदूत वाटले असतील ह्यांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं.

समाजाला शिकवण देणारे वैदिक ज्ञाते, उपासमारीनं गांजलेल्या समाजाला अन्न देणारे युरोपांतील भांडवलवाले, परकीय चक्रापासून आपल्या देशांतील समाजाची कत्तल थांबविणारे राजे आणि बालमनाची जोपासना करण्याकरितां स्वार्थावर लाथ मारणारे शिक्षणसंस्थांचे प्रणेते सगळे मुळांत महात्मेच होते. पण ह्या साऱ्या महात्म्यांनीं ज्या शुद्ध हेतूनं प्रेरित होऊन कार्याला सुरवात केली तो हेतु त्यांच्यानंतरच्या चालकांच्या नजरेपुढं राहिला नाहीं म्हणून म्हणा, पुढील पिढ्यांतील चालक स्वार्थानं मारले गेले म्हणून म्हणा, अगर कालांतरानं ह्या सर्व संस्थांच्या उत्पत्तीचं कारण समाजाच्या नजरेआड झालं म्हणून म्हणा वैदिक ज्ञाते, समाजहितवादी भांडवलवाले, सामर्थ्यवान राजे आणि त्यागी संस्थापक ह्यांची परंपरा समाजाच्या दृष्टीनं वंदनीय राहिली नाहीं. आर्यावर्तांतील वैदिक ज्ञात्यांच्या परंपरेला गौतमबुद्धानं हदरा दिला. मजूर लोक भांडवलवाल्यांना शिव्यांची लाखोली वाहूं लागले. राजे लोक लोकशाहीच्या हातांतील पत्त्यांतले राजे बनले आणि बालमनाची जोपासना करणारे संस्थाचालक शिक्षणाचा क्रयविक्रय करणारे व्यापारी बनले. मुळांत दोष कोणाचाच नाहीं. पण प्रत्येक ठिकाणीं परिणाम मात्र विपरीत झाले आहेत.

कमींत कमी वेतन नी जास्तींत जास्त काम हें भांडवलवाल्यांचं ध्येय असल्यानं कारखान्यांचं भांडवल फोफावूं लागलं. मजुरांना सुद्धां जरूरीपुरतं हुकमी वेतन कारखान्यांतून मिळत असल्यानं वैयक्तिक कामकरी सुद्धां आपखुषीनं कारखान्यांत सामील होऊं लागले. भांडवल वाढलं, मजूर वाढले, यंत्रंहि सुधारत चाललीं आणि त्यामुळं मालाचं उत्पादनहि बेसुमार होऊं लागलं. ह्या मालाच्या वाढत्या उत्पादनाबरोबरच बाजारपेठांची वाण भासूं लागली. ही बाजारपेठांची वाण कमी करण्याकरितां पृथ्वीच्या पाठीवरील निरनिराळ्या बाजारपेठा हस्तगत करण्याचे प्रकार

सुरू झाले. विशेषतः युरोपांतील ज्या राष्ट्रांत अन्नधान्याची टंचाई होती अशा राष्ट्रांनीं हिंदुस्थान्, चीन, आफ्रिका वगैरे बाजारपेठा काबीज केल्या. कारखान्यांत मालहि भरपूर उत्पन्न होऊं लागला आणि हे भांडवलवाले गब्बर झाले. निरनिराळ्या देशांतून व्यापारी कंपन्या स्थापन झाल्या. त्या त्या देशांत वसाहती झाल्या. गांवंच्या गांवं विकत घेऊन कंपन्यांच्या नांवावर राज्यं स्थापन झालीं- फौजफाटा गोळा झाला. ह्या परक्या भांडवलवाल्यांनीं आपल्या पैशाच्या जोरावर ह्या नवीन देशांतील रहिवाशांत कलागती लावायला सुरवात केली. आज एक बाजू, उद्यां दुसरी बाजू असं करतां करतां कंपन्यांचा प्रादेशिक व्याप वाढूं लागला. अखेर त्या त्या देशांतील सरकारनीं हीं व्यापारी कंपन्यांनीं स्थापलेलीं राज्यं आपल्या ताब्यांत घेतलीं. इथूनच ह्या युरोपीय राष्ट्रांच्या राज्य-विस्ताराला सुरवात झाली.

भांडवलवाले दिवसेंदिवस अधिकाधिक बळावत चालले. त्यांच्यावर पैशाचा पाऊस पडत होता. उलटपक्षीं कारखान्यांत राबणारा मजूर मात्र हलकें हलकें खालावत चालला. मालाचा उठाव कमी होऊं लागला कीं त्या प्रमाणांत मजुरांचं वेतन कमी होऊं लागलं. मजुरांना आतां मालकांचा शिरजोरपणा जाचक होऊं लागला. संपत्तीच्या जोरावर हे भांडवलवाले राजे लोकांना सुद्धां खेळवूं लागले. कारखान्यांतून मालाची निर्मिति वाजवीपेक्षां जास्त होऊं लागली, बाजार मंदींत आला. मालाचा उठाव होईनासा झाला कीं ह्या व्यापाऱ्यांनीं राजाला भरीला घालून ह्या ना त्या कारणांनीं परराष्ट्रांशीं कुरापती काढून युद्धाला आव्हान द्यायला सुरवात केली आणि ह्या युद्धांच्या वेळीं युद्धोपयोगी सामानाकरितां कारखान्यांचा उपयोग करून यांत्रिक साहाय्यानं निर्माण होणाऱ्या मालाचा बाजारांत तुटवडा येईल अशी योजना करायला प्रारंभ केला. अशा तऱ्हेनं राष्ट्रा-राष्ट्रांतील युद्धं, मजुरांची बेकारी, समाजाची उपासमार ह्या साऱ्या अनर्थांचीं सूत्रं हे भांडवलवाले हलवूं लागले.

आतां तर साऱ्या भांडवलवाल्यांना यांत्रिक सुधारणांचं वेड लागलं होतं. रोज नवं यंत्र. रोज नवी सुधारणा. रोज नवा कारखाना. प्रत्येक नव्या कारखान्याबरोबर, प्रत्येक यांत्रिक सुधारणेबरोबर, मजुरांची बेकारी

बारेमाप वाढूं लागली. मजूर हवालदिल झाले. त्यांनीं आपली संघटना केली. आणि ह्या मजूरसंघटनेच्या जोरावर ते ह्या भांडवलदारांशीं संपाच्या शस्त्रानं लढूं लागले. संपाचं शस्त्र कितीहि प्रभावी असलं तरी ह्या बेगुमान भांडवलदारांवर त्याचा परिणाम होणं कठिण. बहुतेक संपांत मजुरांच्या कांहीं मागण्या मान्य केल्या जात हें जरी खरं असलं तरी संपामुळं मजूरच खराखुरा चेचला जाई. संप ही मजुरांची तपश्चर्या असली, त्यांनीं भांडवलवाल्यांना नमविण्याकरितां उमाप स्वार्थत्याग केला असला, मजूर हेच खरे मालक आहेत असं आजवर त्यांनीं अगदीं कंठशोष करून जरी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असला तरी मजूर नी भांडवलवाले ह्यांच्यांतील आर्थिक विषमता मजुरांच्या प्रयत्नांनीं कमी न होतां ती आजवर वाढतच गेलेली दिसते आहे.

ह्या वाढत्या आर्थिक विषमतेमुळं समाजांतील पैशाचा हव्यास बेसुमार उफाळला आहे. अखिल मानवजातींतील बालमनाचं सुद्धां पैसा हेंच ध्येय झालं आहे. विशेषतः ज्या पाश्चिमात्य विचारसरणींचे आज आपण गोडवे गातो त्या पाश्चिमात्य देशांतील बालमनांना देखील जगांत पैशाशिवाय कांहींच दिसेनासं झालं आहे. शरीरांत मन म्हणून एक महत्त्वाची चीज आहे आणि त्या मनाच्या उन्नतीवरच आपलं ऐहिक सुखस्वास्थ्य पूर्णतया अवलंबून असतं ह्याची त्यांना कल्पना सुद्धां नाहीं. शत्रूशीं झुंज देण्याच्या सामर्थ्याची आपल्याला आवश्यकता आहे म्हणून ते बॉक्सिंग शिकतात, आपण मोठे झाल्यावर आपल्याला परराष्ट्रावर आक्रमण करायचं आहे ह्या दृष्टीनं ते लष्करी शिक्षण घेतात, आपल्याला खूप पैसा मिळवितां यावा म्हणून आधुनिक यंत्रविद्येच्या अभ्यासांत ते उच्चांक गाठण्याचा प्रयत्न करितात. पण मानसिक उन्नति आणि मानवजातीचं कल्याण हेंच मानवी जीवनाचं एकमेव ध्येय आहे ह्याची त्यांना कल्पनाच दिली जात नसल्यानं ह्या क्षेत्रांत मात्र ते कोरे करकरीत राहतात. ते शरीर कमावतात, पण मन मात्र गमावून बसतात. ते शाळेंत जातात, पैसा कसा मिळवावा हें शिकण्याकरितां. ते शाळेंतील अभ्यास करतात, आपली शारीरिक सुखाकांक्षा साधण्याच्या हेतूनं. ते निरनिराळ्या यांत्रिक सुधारणांचा अभ्यास करतात,

मानवजातीवर आपलं वैयक्तिक वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां. त्यामुळे शाळेंतील आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या विद्यार्थ्यांना ते तुच्छ लेखतात नी आपल्यापेक्षां वरच्या दर्जाच्या विद्यार्थ्यांचा ते सतत हेवा करीत असतात. आधुनिक पाश्चात्य शिक्षणशास्त्रांत आज नवे नवे शोध लावले जात आहेत, नव्या नव्या पद्धतीनं बालमनाला शिकवण देण्याचे प्रयोग केले जात आहेत, विद्यार्थ्यांचा पूर्ण विकास कसा साधतां येईल ह्याचा सारे पाश्चात्य शिक्षणशास्त्रज्ञ चिकित्सेनं अभ्यास पण करीत आहेत. विद्यार्थ्यांचीं मनं पूर्ण विकसित व्हावीं ह्या उद्देशानं केले जाणारे प्रयोग विद्यार्थ्यांच्या मनांत अहंपणा, श्रेष्ठकनिष्ठभाव, हेवादावा अशा तऱ्हेचे हीन मनोविकारच वाढीला लावीत आहेत. कारण खरं सुख कशांत आहे ह्याचा ह्या पाश्चिमात्य शिक्षणशास्त्रज्ञांना पत्ताच नसल्यानं त्यांना मानवजातीचं जें ध्येय वाटतं त्यापलीकडं त्यांची दृष्टिच पोहोचूं शकत नसल्यानं ते ऐहिक सुधारणेंतच घोटाळत राहिले आहेत. मानवजातीच्या उन्नतीचा ध्येयतारा ऐहिकतेच्या ढगाआड दडल्यानं त्या ढगांकडंच ते ध्येय म्हणून बोट दाखवीत आहेत. भूमितीचा अभ्यास करायचा यांत्रिक सुधारणांकरितां. भूगोलाचा अभ्यास करायचा पृथ्वीच्या पाठीवरील कोणते देश आपल्याला कसे जिंकतां येतील ह्याच्या माहितीकरितां आणि पदार्थविज्ञानशास्त्राचा अभ्यास करायचा जगांतील आर्थिक विषमता कळसाला पोंहोचविण्याकरितां! अशीं हिणकस ध्येयं ह्या पाश्चिमात्य अभ्यासक्रमांतून वाढीला लागलीं असल्यानं सगळीकडं ध्येयशून्य गतीलाच वेग दिला जात आहे.

ह्या विसाव्या शतकाच्या पहिल्या निम्या भागांत एकाहून एक अधिक भयानक अशीं दोन युद्धं झालीं, ह्याचं मूळ ह्या भयाण ध्येयशून्य गतींतच आहे. ह्या दोन्ही महायुद्धांचीं तात्कालिक कारणं कांहींहि असलीं तरी हीं दोन्ही युद्धं जगांतील आर्थिक अनवस्थेचीं दृश्य प्रतीकं आहेत. दोन्ही युद्धांत प्रथम उठावणी घेणारं महत्त्वाचं राष्ट्र जर्मनी हेंच असून दोन्ही वेळीं त्याच राष्ट्राचा पराभव झाला आहे.

जर्मन राष्ट्र हें स्वयंपूर्ण नाहीं. शिवाय त्या राष्ट्राला स्वतःची बाजारपेठहि नाहीं. युरोपांतील इतर परभृत राष्ट्रांप्रमाणंच ह्या राष्ट्रांत यांत्रिक सुधारणा अगदीं कळसाला पोंचलेली आहे. चौदा सालच्या महायुद्धाच्या

वेळीं जर्मनराष्ट्राची बाजारपेठ ज्यावेळीं कारखान्यांतील मालानं भरगच्च भरून गेली, त्यावेळीं जर्मन राष्ट्रानं इतर राष्ट्रांशीं व्यापारी चढाओढ करून आपल्यांकरितां बाजारपेठ निर्माण करण्याचा, झीज सोसून देखील, आत्यंतिक प्रयत्न केला. उत्तम यंत्रसामुग्री, सरस औषधं नी स्वस्त सुखसोईच्या वस्तूंनीं जगाची बाजारपेठ काबीज करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला यश न आल्यानं नाइलाज म्हणून कारखान्यांतून युद्धसाहित्य निर्माण करायला त्यांनीं प्रारंभ केला. पण त्यांच्या इतर वस्तूंना जशी बाजारपेठ नव्हती त्याचप्रमाणं त्यांच्या युद्धसाहित्याला देखील मागणी नव्हतीच. अर्थात् ह्या 'युद्धसाहित्याकरितां युद्ध' हें ओघानंच आलं. युद्ध सुरू झाल्यानंतर मात्र बाजारपेठेची परिस्थिति आपोआपच बदलते. युद्धाच्या वेळीं कारखान्यांचा उपयोग युद्धाकडं होत असल्यानं पेठेंत तुंबून राहिलेला माल चढ्या भावानं विकला जातो आणि देशांतील आर्थिक अनवस्थाप्रसंग पुढं ढकलला जातो. पहिल्या महायुद्धाच्या चार वर्षांच्या कालांत जगांतील साऱ्या बाजारपेठा रिकाम्या झाल्या. मजुरीचे दर वाढले. जगांतील बेकारी जवळजवळ नाहींशी झाली. मानवजातीची, लढाईमुळं थोडीफार खात्रीहि झाली आणि अखेर जर्मन राष्ट्राचा आर्थिक कोंडमारा होऊन हें महायुद्ध एकदाचं संपलं.

ह्या युद्धांत जर्मन राष्ट्र मात्र पुरेपूर नाडलं गेलं. राष्ट्रांत जिकडं तिकडं हाहाःकार उडाला. कारखाने बंद पडले. अन्न दुर्मिळ झालं. कागदी चलन कोसळलं. शिवाय जित राष्ट्र म्हणून त्यांच्यावर लादल्या गेलेल्या नुकसानभरपाईनं तर तें राष्ट्र मेटाकुटीला आलं. आधिभौतिक पायावर आधारलेलीं असलीं राष्ट्रं सूडाच्या भावनेनं अंतर्बाह्य पेटलेलीं असतात. नाइलाज म्हणून ह्या राष्ट्रानं कांहीं वर्षे अपमान सहन केला. पण ह्या अपमानाच्या कालांत ह्या राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं बालमनापुढं 'आपल्या अपमानाचा सूड' हें एकच ध्येय ठेविलं. शाळांतून 'सूडाचं' ध्येय नजरेपुढं ठेविलं गेलं. पितृभूमीकरितां रक्ताचे सडे शिंपण्याची बालमनाला शिकवण दिली गेली. घरांत, शाळेंत, शाळेबाहेर सगळीकडं शत्रूचा सूड दिसत होता. ह्या विद्यार्थ्यांची पिढी मोठी होतांच कारखान्यांतून काम करणारा प्रत्येक मजूर, खाणींतून काम करणारा प्रत्येक

कामगार, शेतांत राबणारा प्रत्येक शेतकरी, सारी जर्मन जनता अप-मानाच्या सूडानं वेडी झालेली होती. राष्ट्रांतील प्रत्येक जर्मन इतर निर्जीव यंत्राप्रमाणं एक एक सजीव यंत्रच बनला होता.' ही उठावणी आध्यात्मिक पायावर केली गेली असती तर! पण आध्यात्मिक उन्नति हें युरोपीय राष्ट्रांचं ध्येयच नसल्यानं ती गोष्ट अशक्य होती.

बालमनं सूडानं भारलीं गेलीं तरी राष्ट्रांत मात्र अद्याप त्राण नव्हता. चोहोंबाजूंनीं मारल्या गेलेल्या जर्मन राष्ट्राला, हिटलरसारखा नात्सीवादी नेता मिळेपर्यंत, चोहोंकडे भयाण अंधकारच होता. अन्न आहे तर वस्त्र नाहीं, वस्त्र आहे तर अन्न नाहीं, इतर सुखसोईच्या वस्तू तर नाहींतच नाहींत, अशी जर्मन राष्ट्राची हलाखीची स्थिति होती. ही राष्ट्राची हीनदीन परिस्थिति पाहून आपल्या नव्या तत्त्वज्ञानाच्या अनुरोधानं राष्ट्रांतील प्रत्येक माणसाला अन्नवस्त्र पुरविण्याचा ह्या नेत्यानं पुकारा केला. समाजानं त्याच्याकडं धाव घेतली नी त्याचं शिष्यत्व पत्करलं. हिटलरनं लोकांना अन्न दिलं, वस्त्र दिलं आणि त्यांना कामाला पण लावलं. ह्यापेक्षां जास्त त्यानं समाजाला विचारच करूं दिला नाहीं. आपला नेता सांगेल त्याप्रमाणं विचार न करतां वागायचं असं नात्सी नेत्यांनीं सांगितलं आणि समाजानं तें ऐकलं. सारे कारखाने, सारं उत्पादन जर्मन राष्ट्राच्या मालकीचं झालं आणि राष्ट्राच्या हिताकरितां राष्ट्र देईल तितकंच अन्न नी वस्त्र घेऊन राष्ट्र सांगेल तें काम करणं हें समाजाचं धोरण ठरलं. ह्यांत त्याग होता, एकचालकानुवर्तित्व होतं, एकराष्ट्र हा आवाज होता, पण ह्या संघटनेला मानसिक उन्नतीचं अधिष्ठान नव्हतं. आपल्या प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर, अन्न-वस्त्राची राष्ट्राला वाण पडूं देणार नाहीं ह्या घोषणेच्या जोरावर, आपण आर्य आहोंत, श्रेष्ठ आहोंत, जगांत आपलंच वर्चस्व असलं पाहिजे अशा वृथाशेच्या जोरावर जर्मन जनतेला झुलवून हिटलर 'रीश'चा नेता झाला. हिटलरनं अवघ्या सोळा वर्षांच्या कालांत इतकी जोरदार संघटना केली, जर्मनीचा ढासळलेला आर्थिक पाया इतका बळकट केला कीं सारं जग आश्चर्यानं जर्मनीकडे आदर्श राष्ट्र म्हणून बोट दाखवूं लागलं. पण हें सर्व करतांना हिटलरनं केलेलं युद्धसाहित्याचं उत्पादन आतां भस्मा-

सुराप्रमाणं त्यालाच भेडसावूं लागलं. हिटलर शूर होता, वक्ता होता, बुद्धिवान् होता, पण त्याला अधिकाराची हाव होती. आपला अधिकार जर्मनीवर अनिर्बंधित चालावा म्हणून हिटलरनं केलेले अमानुष वध हे त्याच्या हावरेपणाची साक्ष देतात. हिटलर सामर्थ्याचं प्रतीक होता खरा, पण त्याला आध्यात्मिक सामर्थ्याचं पाठबळ नव्हतं, त्यानं आपल्या वैयक्तिक जरबेनं जर्मन जनता इतकी घाबरवून सोडली कीं व्यक्तिव्यक्तींचं मोकळेपणानं बोलणं देखील त्यानं मारून टाकलं. आपल्या गुप्त हेरांचं जाळं त्यानं जर्मन राष्ट्रभर इतक्या असीम थराला नेलं कीं आईबाप, बहीणभाऊ, पतिपत्नी, भाऊभाऊ ह्यांच्यांत सुद्धां प्रत्येकाला एकमेकाची भीति वाटूं लागली. हिटलरविरुद्ध तोंडांतून ब्र काढणारा प्रत्येक माणूस नामशेष होऊं लागला. हिटलर जर्मनीचा अनभिषिक्त राजा झाला खरा, पण आपलं स्थान अढळ करण्याकरितां त्याला आपल्याच रक्तामांसाच्या जर्मन लोकांचे अमानुषपणानं खून करावे लागले.

इतकं झालं तरी राष्ट्राचा आर्थिक पाया फिरून केव्हां डळमळेल ह्याची त्याला सतत भीति वाटत होती. यांत्रिक युगाचा हाच मोठा दोष आहे. मागणी-पुरवठ्याचं समीकरण ह्या यांत्रिक युगांत अशक्य झालं आहे. मागणीपेक्षां उत्पादन अधिक होत असलं, तरी राष्ट्रांतील भावी बेकारी थोपवून धरण्याकरितां, तें तसंच चालू ठेवावं लागतं. जर्मनींतील अशा तऱ्हेचं फाजील उत्पादन ह्या दुसऱ्या महायुद्धाला कारण झालं. युद्ध सर्वांनाच मनापासून नको असतं. हिटलरलासुद्धां युद्ध नकोच होतं. पण त्याचा नाइलाज होता. जर्मन बालमनांत उत्पन्न झालेली सूडाची भावना युद्धाच्या घोषणेला दुजोराच देत होती. अशा परिस्थितींत हिटलरला नाइलाजानं युद्धाची कुरापत काढावी लागली. डँझिग बंदर आम्हांला द्या, कॉरॉयडरची पट्टी आम्हांला मिळाली पाहिजे, अशा हिटलरनं मागण्या केल्या. इतर राष्ट्रांतील नेत्यांनीं त्याचा समझोता करण्याचा यत्न केला. पण हिटलरचं कशानंहि समाधान होणं शक्य नव्हतं. त्यावेळच्या त्याच्या मागण्या जरी पुऱ्या झाल्या असत्या तरी त्याला फिरून दुसरं कारण काढणं भाग होतं. मागण्या पुऱ्या झाल्या नाहींत म्हणून युद्धाचा पुकारा झाला. युद्ध सुरू होतांच जगांतील बेकारी कमी झाली. सैन्यं सज्ज झालीं. जमिनीवर,

समुद्रावर नी आकाशांत प्रचंड वणवा पेटला. बाजारपेठेंतील मंदी नाहींशी झाली. साऱ्या खंडांत मानवी जीवनाला आवश्यक असलेल्या वस्तूंचे भाव एकदम कडाडले. जर्मनीनं जगांतील इतर कांहीं राष्ट्रांच्या मदतीनं सतत सहा वर्षे झुंज दिली. आपल्यासकट साऱ्या जगाचा प्रचंड प्रमाणावर विध्वंस केला. सारी मानवजात युद्धाला कंटाळली तरी युद्धाची परिसमाप्ति होईना. अशा वेळीं अमेरिकेनं अॅटम बॉम्बचा उपयोग केला. अखेर ह्या अद्वितीय संहारक शस्त्रानं युद्धाचा शेवट केला.

दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला, पण पुढं काय, हा प्रश्न जगांतील साऱ्या लहानमोठ्या राष्ट्रांना भेडसावीत आहे. जर्मनीची लांडगेतोड झाली खरी पण एवढ्यानं जगाचा तोल सावरला जात नाहीं असं तज्ज्ञांचं मत आहे. पहिल्या महायुद्धानंतर अस्तित्वांत आलेला राष्ट्रसंघ निकामी ठरला. दुसऱ्या महायुद्धानं राष्ट्राराष्ट्रांतील द्वेष पराकोटीला पोंचले आहेत. यांत्रिक सुधारणा झपाट्यानं पुढं चालली आहे. आज जर्मनीनं युद्ध पुकारलं, उद्यां रशिया युद्धाची कुरापत काढील, परवां अमेरिका अस्वस्थ होईल, पण हें सारं चालणार कुठपर्यंत हा आज जागतिक प्रश्न झाला आहे.

आज जगांत वेगवेगळे समाजवाद माजले आहेत. प्रत्येक वाद आपापल्या परीनं अचूक ठरलेल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करतो आहे. पण ह्या सर्व वादांचं मूळ कशांत आहे? ह्या वेगवेगळ्या वादांनीं समाजावर होत असलेल्या अनिष्ट आघातांना पायबंद बसत नसेल तर हे सारे वाद फोल आहेत. मानवीसमाजाचं शक्तिसर्वस्व खर्च करून हे वाद ताणायचे आणि समाजाच्या स्थितिस्थापकत्वाचा बिंदु ढासळून समाजांत अनवस्था पसरल्यानंतर आतां थांबा असं म्हणून हे सारे वाद थांबविण्यापेक्षां, साऱ्या वादांचा समन्वय साधून चिरकालीन सुखांत डुंबत राहणारा समाज निर्माण करण्यांतच आज अखिल मानवजातीचं हित आहे असे विचारप्रवाह सुरू झाले आहेत. अशा वेळीं ह्या वादांचं मूळ कशांत आहे ह्याचा विचार करणं आवश्यक आहे. आधिभौतिकतेच्या दृष्टिकोनांतून हे वाद वाढवीत बसण्यापेक्षां आध्यात्मिकतेच्या दृष्टिकोनांतून ह्या

साऱ्या वादांवर पडदा टाकून मानवीसमाजाची नव्यानं उभारणी करण्यांतच आज अखिल मानवजातीचं हित आहे. अशी भूमिका घेऊन साऱ्या वादांतच दोष असल्यास मुळावरच घाव घातला पाहिजे. ह्या वादांची वरच्यावर खर्डी करण्याचा प्रयत्न केल्यानं त्यांतून अनंत वेगवेगळे वादच उदयाला येतील. वाद उत्पन्न व्हायला कोणतीच हरकत नाहीं. पण ह्या वादांमुळं मागं झालेल्या युद्धापेक्षां अधिक भयानक युद्धं होणार अशी भीति वाटत असल्यास यापुढील युद्धं जगांत सुरू होण्यापूर्वीच ह्या साऱ्या वादांचा उहापोह करून ते समाजाला घातक असतील, त्यांतून फैलावणारी विचारसरणी समाजापेक्षां व्यक्तींनाच महत्त्व देत असेल, तर ह्या साऱ्या वादांचं निर्मूलन करण्याकरितां त्यांचा तौलनिक अभ्यास करणं जरूर आहे.

—*—

८ : एकरंगी वाद

भांडवलशाहींतून मजुरांची संघटना आणि युद्धांचा उठाव कां व कसा होतो ह्याचा मागील प्रकरणांत अभ्यास झाला. ह्या भांडवलवाल्यांनीं आपल्या पैशाच्या जोरावर राजेलोकांवर दडपण आणण्याची प्रथा सुरू केली. राजा पैशाच्या अडचणींत असतांना त्याला पैसा कर्जाऊ देऊन हे सधन कारखानदार राजाकडून आपल्या कारखानदारीकरितां निरनिराळ्या सवलती मिळवीत. पुढं पुढं तर हे भांडवलदार सांगतील ती पूर्व होऊं लागली. मजुरांची पिळणूक करणं, राजाकडून व्याज घेणं, कारखान्याकरितां जादा सवलती मिळवणं ह्यामुळं हे भांडवलवाले अधिकाधिक गबर होऊं लागले. कारखान्यांत मजुरांना मिळणाऱ्या वेतनाच्या मानानं ह्या कारखानदारांना विनाश्रम मिळणारा अलोट पैसा पाहून मजुरांचे डोळे दिपून जात. आपलं अठराविसवे दारिद्र्य आणि भांडवलदारांची कुबेरालाहि लाजविणारी संपत्ति, ही विषमता पाहून मजुरांची तळपायाची आग मस्तकाला जाऊं लागली. ह्या साऱ्या कारखान्यांतून राबणाऱ्या मजुरांच्या श्रमाशिवाय कारखान्यांतील इकडची काडी तिकडं होत नसतांना, हे ऐतखाऊ आपल्यावर हुकमत गाजवितात ह्याची मजुरांना चीड येऊं लागली. कारण बहुतेक भांडवलदारांच्याजवळ कांहींच विशेष सद्‌गुण नसत. पैशाच्या जोरावर ते संशोधकांचे शोध अल्प किंमतींत विकत घेत. उमाप पैसा खर्चून ते कारखान्यांची उभारणी करीत. आणि मजुरांना भाकरी देऊन ते त्यांना कामाला जुंपीत. अशा रीतीनं पैशाच्या सद्‌गुणावर ते आपल्यामध्यें वाटतील ते सद्‌गुण निर्माण करूं शकत.

आजच्या यांत्रिक युगांत खरं सात्त्विक सामर्थ्य कोणतं हाच वादग्रस्त प्रश्न आहे. आधिभौतिकतेवर आधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांत उत्पन्न झालेले वेगवेगळे वाद मूळ भांडवलशाहींतून उगम पावले. 'राजा हा देवाचा अवतार आहे ह्या विचारसरणीला भांडवलवाल्यांनीं चालना

दिली. राष्ट्रांतील धर्मगुरूंचं मानसिक उन्नति हें ध्येय ह्या भांडवल-वाल्यांना पसंत नव्हतं, कारण त्यामुळं समाज विचारानं प्रगल्भ झाल्याव त्यांच्या अनियंत्रित सत्तेवर गदा येण्याचा संभव होता. हे भांडवलवाले आपल्या आर्थिक सुस्थितीच्या जोरावर धर्मगुरूंचं वर्चस्व झुगारूं लागले आणि राजांनासुद्धां त्यांचं वर्चस्व झुगारून देण्याची शिकवण देऊं लागले. राजांनासुद्धां धर्मगुरूंच्या तत्त्वज्ञानापेक्षां ह्या भांडवलदारांचं आर्थिक तत्त्वज्ञानच अधिक परवडूं लागलं. धर्मगुरूंचा ओढा देखील प्रथम प्रथम प्रच्छन्न रीतीनं आणि पुढें अगदीं उघड उघड स्वतःच्या आर्थिक उन्नती-कडे अधिकाधिक झुकूं लागला. धर्माच्या व्यासपीठावर अधिष्ठित झालेले हे खिस्तप्रेषित धर्माच्या नांवाखालीं समाजाची आर्थिक पिळणूक करूं लागले. धर्मगुरूंच्या आध्यात्मिक शिकवणुकीनं समाज दारिद्र्यांतून बाहेर पडूं शकला नाहीं; म्हणून साहजिकच ह्या धर्मगुरूंच्यापेक्षां हे संपत्तिवान भांडवलवालेच समाजाचे खरेखुरे उपकारकर्ते आहेत असंच समाजाला-सुद्धां वाटूं लागलं. अशा रीतीनं भांडवलवाले, राजे, धर्मगुरू नी समाज सारेच पैशाला देव मानूं लागले. राजांनीं धार्मिक बंधनं झुगारून दिलीं आणि स्वतः राजाच राष्ट्राचा धर्मगुरू आहे ह्या नवीन मतप्रणालीचा पाया घातला. ह्यानंतर धर्मगुरूंचं वर्चस्व नष्ट होऊन राजसत्तेचं अनिर्बंध वर्चस्व साऱ्या युरोपखंडांत प्रस्थापित झालं. राजाला नियम नाहींत, राजाला दंड नाहीं, राजाला शिक्षा नाहीं. राजा हाच देव आहे, अशा विचारसरणीनं राजा हाच सर्वसत्ताधीश झाला. धर्माची शिकवण, मानसिक उन्नति, समाजाची प्रगति ह्या साऱ्या उच्च तत्त्वांचा सर्वांनाच ह्या कालांत विसर पडला. ह्या राजांचे स्तुतिपाठक, जगांतील पंचमहाभूतांवर देखील राजाचीच सत्ता आहे असं प्रतिपादन करून राजांची अवास्तव स्तुति करूं लागले. कॅन्यूट राजानं, आपली खुर्ची, भरतीच्या वेळीं समुद्रकांठीं ठेवून समुद्राला मागं फिरण्याची आज्ञा केली आणि ती आज्ञा समुद्रानं मोडल्याचं प्रात्यक्षिक दाखवून आपल्या खुषमस्कऱ्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातल्याचं इतिहासप्रसिद्ध उदाहरण सर्वांच्या परिचयाचं आहे.

विशेष आयास न पडतां मिळालेल्या अनिर्बंध सत्तेनं बेभान झालेले राजे जगांत कुणाचीच कदर करीतनासे झाले. आपल्या सुखाकरितां, आपल्या चैनीकरितां ते प्रजेवर अन्याय्य आणि अमाप करांची लादणी करूं लागले. संपत्तीच्या मदानं आधींच धुंद असलेले हे राजे दारूच्या धुंदींत नाचरंगांत मग्न झाले. आपल्या राज्यांतील सुंदर सुंदर स्त्रिया विषयलालसेनं पळविणं, आपले घाणेरडे हेतू साध्य करण्याकरितां आपल्या हस्तकांकरवीं खून पाडणं, वंद्य धर्मप्रणेत्यांचा छळ करणं अशा तऱ्हेच्या मानवजातीला लाज आणणाऱ्या अमानुष कृत्यांचा बुजबुजाट झाला. समाजाला हें असह्य झाल्यानं सारा समाज राजे लोकां-विरुद्ध खवळून उठला. समाजांत क्रान्तीचे वारे वाहूं लागले. अखेर ह्या खवळलेल्या समाजानं चार्लस् राजाचा दिवसाढवळ्या बळी घेतला. त्यानंतर राजांच्या अनियंत्रित सत्तेवर प्रजेचे निर्बंध असणं जरूर आहे असं समाजाला वाटूं लागलं.

तितक्यांत अचानकपणें समाजांत सामर्थ्यवादाला महत्त्व आलं. प्रजेच्या प्रतिनिधींना धाब्यावर बसवून 'बळी तो कान पिळी' ह्या तत्त्वा-वर ह्या सामर्थ्यवादाची उभारणी आली. तत्कालीन समाजांतील एका कर्तबगार विभूतीनं सारी सत्ता आपल्या हातीं घेतली. आपल्या मता-प्रमाणं समाजाला वागायला लावणं, आपल्या इच्छेप्रमाणं राज्याचं शासन करणं, आपली हुकमत समाजावर गाजविणं हें या सामर्थ्यवादाचं धोरण होतं. जुलमी राजसत्तेच्या निर्मूलनानंतर उत्पन्न झालेल्या ह्या सामर्थ्यवादानं समाजाला एक जबरदस्त झोला दिला. सात्त्विकता, शुद्धाचरण आणि साधेपणा ह्या सद्गुणांचा समाजांत पुरस्कार झाल्यानं कांहीं काळ समाज ह्या जुलमी सामर्थ्यवादाकडं सुद्धां आशेनंच पाहूं लागला. जिकडं तिकडं शुद्धमतवादाचा (Puritanism) पुरस्कार होऊं लागला. नाचरंग, तमाशे, दारू ह्या चैनीच्या नी विलासाच्या गोष्टींवर समाजानं बहिष्कार पुकारला. शुद्ध सात्त्विकतेचा सोन्याचा दिवस जवळ आला असाच सर्वांचा समज झाला. पण आधिभौतिकतेच्या पायावर उभारलेली ही सात्त्विकतेची इमारत कळसाला पोचण्यापूर्वीच कोसळून पडली. आर्यावर्तात वैदिक धर्माला हदरा देणाऱ्या बुद्धविचारसरणीची

उभारणी आध्यात्मिकतेवर झाली असल्यानं, आज अडीच हजार वर्षां-नंतरसुद्धां, वैदिक विचारप्रणालीच्या अगदीं विरुद्ध टोकाला असलेली ही विचारसरणी समाजांतून नाहींशी झाली नाहीं. पण युरोपखंडांतील हा शुद्धमतैवाद अर्ध शतक सुद्धां टिकला नाहीं. स्वार्थी मनोवृत्तीला उच्च तत्त्वांची झिलई केल्यानं अस्सल मनोवृत्तीचा कांहीं काळ आभास झाला तरी त्यांत टिकाऊपणा येत नाहीं. तत्त्वं हीं नेहमीं दुधारी असतात. मानवीसमाजाच्या हिताकडं ज्या तत्त्वाचा उपयोग करतां येतो तेंच तत्त्व विरुद्ध बाजूकडून वापरलं कीं त्याचा उपयोग तितक्याच प्रमाणांत समा-जाच्या अपकर्षाकडं करतां येतो. सोन्याच्या कोंदणांत हिरकणी बसवून तयार केलेला अलंकार शरीराचं सौंदर्य वाढवितो, पण तीच हिरकणी पोटांत गेली असतां त्याच शरीराचा अमानुषपणें नाश करते. नागाचं विष रक्तांत भिनलं असतां माणूस गतप्राण होतो, पण तेंच विष योग्य अनुपानानं औषध म्हणून वापरलं असतां शरीरांतील दुःसाध्य रोगाचा नाश करून मरणाच्या दारीं पडलेल्या माणसाला नवचैतन्य देऊं शकतं हा वैद्यकशास्त्राचा अनुभव आहे. त्याचप्रमाणं शुद्धमतवाद फारच थोड्या अनुभवानंतर विषारी ठरला.

जी स्थिति शुद्ध मतवादाची तीच लोकशाहीची. लोकशाहीचं तत्त्व समाजाच्या सार्वत्रिक हिताकरितां अस्तित्वांत आलं. समाजांतील सान्या व्यक्तींना एकत्र बसून विचारविनिमय करणं शक्य नसल्यानं लोकांनीं आपण होऊन निवडून दिलेल्या माणसांनीं एकत्र बसून समाजहिताचा विचार करावा, ह्या विचारसरणींत तत्त्व ह्या दृष्टीनं दोष कोणताच नाहीं. पण ह्याच तत्त्वाचा लोकशाही राष्ट्रांत दुरुपयोग होऊं लागला. समाजहित हें ध्येय दृष्टीआड होऊन निवडून येणं ह्या गोष्टीला प्राधान्य आलं. समाजांतील एका व्यक्तीला त्याचं ज्ञान, त्याचा निःपक्षपातीपणा, त्याची समाजहिताची कळकळ, हे त्याच्यांतील सद्गुण पाहून त्याला समाजानं आपला प्रतिनिधि म्हणून काम करण्याची आज्ञा करावी व ही समाजाची आज्ञा शिरसावंद्य मानून समाजाची इच्छा असेपर्यंत त्या व्यक्तीनं एकनिष्ठेनं समाजसेवा करावी ह्या प्रणालीचा लोप होऊन, 'मला निवडून द्या, मी समाजसेवा कर-

त्याला लायख आहे, मी विद्वान आहे, मी त्यागी आहे' अशा तऱ्हेचा आत्मप्रौढीचा प्रचार करण्याची प्रथा सुरू झाली. एवढ्यानंहि काम भागणार नाहीं म्हणून दरिद्री समाजाचीं मतं मिळविण्याकरितां त्यांच्यावर अप्रत्यक्ष मार्गानं दडपणं येऊं लागलीं. कारखान्यांत काम करणाऱ्या कामकऱ्यांवर नोकरीच्या भीतीनं कारखानदारांचं वजन पडूं लागलं. व्यापाऱ्यांच्यावर व्यापाऱ्यांचं दडपण, शेतकऱ्यांवर सावकारांचं दडपण, समाजांतील निरनिराळ्या चाकोरींतील व्यक्तींवर निरनिराळे नवे नवे मार्ग काढून समाजांतील बुद्धिवान माणसं, मोठेपणाच्या लालुचीनं, निरनिराळीं अनिष्ट नी लाजिरवाणीं दडपणं आणूं लागले. अशा तऱ्हेनं ह्या ना त्या मार्गानं समाजांतील व्यक्तींचीं मतं गोळा करून समाज-हिताकरितांच केवळ स्थापन झालेल्या ह्या लोकशाही शासनसंस्थेचा, समाजांतील स्वार्थी, आपमतलबी पण बुद्धिवान् लोक आपला वैयक्तिक मोठेपणा वाढविण्याकडं दुरुपयोग करूं लागले. समाजमतावर अनिष्ट दडपण येऊं नये म्हणून गुप्त मतदानाची प्रथा सुरू झाली. ह्या गुप्त मतदानपद्धतीनं हीन मनोवृत्तीला आळा पडण्याऐवजीं हें लोकशाही तत्त्व अधिकाधिक हिणकसच बनूं लागलं. कायदा, प्रतिकायदा, पुन्हा त्याच्यावर दुसरा कायदा अशा तऱ्हेनं हें कायद्यांचं जाळं जसजसं अधिकाधिक फोफावतं तितक्याच प्रमाणांत पळवाटाहि वाढतच जातात. समाजांत ज्यावेळीं अगदीं थोडे कायदे अस्तित्वांत होते, त्यावेळच्या समाजांतील गुन्हेगारांचं त्यावेळच्या समाजांतील व्यक्तींच्या आंकड्यांशीं जें प्रमाण होतं तें प्रमाण आज कायदे वाढले असतांना सुद्धां अधिकच वाढलं आहे. ह्याच तत्त्वावर ह्या निवडून देण्याच्या पद्धतींतील नियम ज्या प्रमाणांत अधिक अधिक वाढले त्या प्रमाणांत ह्या मतदानपद्धतींत सुद्धां अधिकाधिक बुजबुजाट झाला. ह्या भांडवलवाल्यांच्या कारवायांना कंटाळून, समाजांतील अगदीं तळच्या थरांतील शेतकरी नी कामकरी ह्या लोकांनाच आपण निवडून दिलं पाहिजे अशी विचारसरणी सुरू होऊन, प्रत्यक्ष कामकरी नी शेतकरी असेच लोक समाज निवडून देऊं लागला. आतां प्रत्यक्ष एकाद्या भांडवलदाराला अगर एकाद्या जमीनदाराला, अगर समाजांतील वरच्या थरांतील व्यक्तींना

निवडून येणं अशक्य होऊं लागल्यानं आपण स्वतः निवडणुकीला उभं राहण्याऐवजीं निवडून आलेल्या लोकांना लाच देऊन आपल्या बाजूला वळवून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. कुणाला पैशाचं आमिष दाखव, कुणाला एकादी मोठी नोकरी दे, कुणाला एकादा बंगला बांधून दे, कुणाचं आपल्या मुलीशीं लग्न करून दे, अशा नाना प्रकारांनीं सत्ताधीश लोकांकरितां नानाप्रकारचे सांपळे तयार करून हे भांडवलवाले आपलं उद्दिष्ट साध्य करूं लागले. अखेर ह्या लोकशाही शासनसंस्थेवरील समाजाचा विश्वास सुद्धां पार उडाला.

निरनिराळे शेंकडो लोक निवडून देऊन त्यांच्या तंत्रानं राज्यकारभार चालविण्यापेक्षां ज्या एका व्यक्तीवर समाजाचा पूर्ण विश्वास आहे त्या व्यक्तीला निवडून देऊन तिच्या तंत्रानं राष्ट्राचा कारभार चालावा अशी एक नवीन कल्पना समाजमनांत आली. कांहीं राष्ट्रांतून अशा शासनसंस्थेला यशहि आलं. पण एकदां निवडून दिलेल्या ह्या व्यक्तीला दुसऱ्या निवडणुकीच्या वेळीं अधिकारावरून दूर करणं अशक्य होऊं लागलं. अधिकारारूढ व्यक्ति समाजाला डोईजड होऊं लागली. सत्ता हातीं आल्यानंतर ती सत्ता सहजासहजीं सोडण्याची कुणालाच इच्छा नसते. हातीं सत्ता येतांच प्रत्यक्ष सत्तेच्या जोरावर, सैन्याच्या जोरावर आपल्या विरुद्ध असलेल्या लोकांचे रक्तपात करून सुद्धां, हे निवडून दिलेले व्यक्तिसत्ताधीश अधिकाराला चिकटून बसूं लागले. अशा तऱ्हेनं एकचालकानुवर्तित्वाचं तत्त्व सुद्धां समाजाला मारकच ठरलं.

ह्यानंतर समाजवादाला जोर आला. समाजांतील प्रत्येक व्यक्तीला सुखी करणं हें ह्या वादाचं अधिष्ठान आहे. व्यक्तीचं हित तेंच समाजाचं हित, समाजाचं हित तेंच राष्ट्राचं हित आणि राष्ट्राचं हित तेंच अखिल मानवतेचं हित अशी ह्या वादाची मतप्रणाली आहे. समाजांतील व्यक्तींचे कमींत कमी वेतन आणि जास्तींत जास्त वेतन ह्यांत जो जमीन अस्मानाचा फरक असतो तो असूं नये; अर्थात् समाजांतील कामाच्या कमी-अधिक महत्त्वाच्या मानानं थोडाफार फरक ठेविल्याशिवाय समाजांत खदाखोद होणार नाहीं म्हणून हा फरक विवक्षित प्रमाणाबाहेर जाऊं नये

असा दण्डक घालण्यांत आला; जातीय निर्बंधांनीं मानवी मनांत गंड निर्माण होऊन त्याचं रूपांतर वैमनस्यांत होतं, म्हणून समाजांत जातीय निर्बंधास महत्त्व असूं नये; ज्याच्या योगानं व्यक्तीच्या श्रमाशिवाय व्यक्तींत धनोत्पादनाचं सामर्थ्य निर्माण होईल अशी खासगी मालमत्ता व्यक्तीच्या मालकीची असूं नये; समाजांतील प्रत्येक कार्यक्षम व्यक्तीला काम देणं आणि त्याबरोबरच समाजांत सुखा-समाधानानं वावरतां येईल इतकं किमान वेतन प्रत्येक व्यक्तीला देणं ह्याची जबाबदारी राष्ट्रावर असावी; बालमनांत लहानपणापासून उच्चनीचभाव वाढीला लागूं नयेत म्हणून साऱ्या बालमनांच्या शिक्षणाची व्यवस्था राष्ट्रानं करावी. अशा तऱ्हेचे विचारपूर्ण निर्बंध घालून सोव्हियट रशियांत समाजसत्तावादाचा नव्या धर्तीवर पुरस्कार करण्यांत आला. रशियांतील झारशाही नष्ट झाली. मानवीसमाज एक दिलानं नांदूं लागला. राष्ट्राची पायरीपायरीनं सुधारणा करण्याकरितां पांच पांच वर्षांच्या योजना आखल्या गेल्या. ठरलेल्या पंचवार्षिक अगर दशवार्षिक योजनेप्रमाणं समाजांत सुधारणा पण होऊं लागल्या. अशा ह्या आदर्श राष्ट्रांत सुद्धां राष्ट्राच्या नेत्याला आपलं नेतृत्व टिकविण्याची लालसा असल्यानं कधीं समाजहिताचं ध्येय पुढं करून, कधीं समाजाच्या तोंडाला पानं पुसून, कधीं विरोधी गटाच्या पुढाऱ्यांना हद्दपार करून, तर कधीं जरूर त्या लोकांचे खून करून त्यांनीं आपली राष्ट्रावरील हुकमत कायम टिकविली.

प्रथम भांडवलवाल्यांनीं समाजावर हुकमत गाजविली, त्यानंतर राजांचा अधिकार बळावला, तिथून पुढं शुद्धमतवादाचा पुरस्कार झाला, शुद्ध-मतवादानंतर लोकशाही आणि लोकशाहींतून एकचालकवाचा उगम झाला. अखेर आज ही क्रांतीची वावटळ समाजसत्तावादावर स्थिर झालेली दिसते आहे. समाजसत्तावादाला सुद्धां आज निरनिराळे फाटे फुटायला लागले आहेत. कारण समाजसत्तावादानं अद्याप मानवी मनाचं समाधान झालेलं नाहीं. त्या यच्चयावत् वादांना बदलत्या कालाप्रमाणं वेगवेगळीं नांवं दिलीं गेलीं असलीं तरी हे समग्र वाद मुळांत आणि व्यवहारांत एकाच बुद्धिवादाचीं वेगवेगळीं रूपं आहेत. कालमानानुरोधानं त्यांच्या-

वर वेगवेगळे रंग चढले असले तरी हा वरपांगी दिसणारा फरक नुसता आभास आहे. पहिला चार्लस्, क्रॉम्वेल, रुझवेल्ट, हिटलर नी स्टॅलिन हीं ह्या पांच वादांचीं पांच मूर्तिमंत प्रतीकं आहेत. मानवीसमाजाची सर्वांगीण उन्नति साधणं हेंच ह्या सर्व नेत्यांचं ध्येय होतं नी आहे. जगांतील धर्मप्रणेते ज्या एका ध्येयानं प्रेरित होऊन आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचा प्रयत्न करितात तशाच तऱ्हेचं ध्येय सर्वकालीन नेत्यांच्या डोळ्यापुढं असतं. नेता बुद्धिवान असल्याशिवाय समाजाचं नेतृत्व त्याच्याकडं येणं शक्य नसतं. आपल्या हातीं सत्ता आल्यानंतर साऱ्या नेत्यांना, आपण नी फक्त आपणच, समाजाचं हित करूं शकूं असा आत्मविश्वास वाटत असतो. प्रत्येक नेत्याचे मार्ग भिन्न असले तरी आपलं वर्चस्व समाजावर अबाधित रहावं हेंच प्रत्येकाचं धोरण असतं. 'राजा अयोग्य गोष्ट करण्याला असमर्थ आहे' हें जसं राजसंस्थेच्या नेत्यांचं प्रामाणिक मत असतं त्याचप्रमाणं आपण करूं तेंच योग्य असं ह्या प्रत्येक पुढाऱ्याला वाटत असतं. पहिल्या चार्लस्च्या जुलमी वर्तनाचा जसा समाजाला वीट आला त्याचप्रमाणं क्रॉम्वेलची कडक अमदानी सुद्धां समाजाला असह्यच झाली. रुझवेल्टनं तर गेल्या महायुद्धाच्या वेळीं अमेरिकन काँग्रेसचे नियम धाब्यावर बसवून एकापेक्षां अधिक वेळां निवडणूक यशस्वी रीतीनं जिंकली; इतकंच नाहीं तर दुर्दैवानं मरण आलं नसतं, तर आणखी किती वेळां त्यानं अमेरिकेचं अध्यक्षपद पायांखालीं घातलं असतं ह्याची कल्पनाच करवत नाहीं. ह्या व्यक्तींना मिळालेल्या अधिकारांचा उपयोग स्वार्थाकडं करून घेण्याची ताकद ह्यांच्या हातीं असल्यानं ते स्वतःच्या व्यक्तिमत्वाची यशस्वी आघाडी समाजाविरुद्ध उभी करूं शकतात. हिटलरनं तर सारा जर्मन देश आपल्या इतका अंकित ठेविला होता कीं प्रत्येक वेळीं जवळजवळ शंभर टक्के मतं मिळवून तो जर्मन 'रीश' चा शास्ता म्हणून निवडून येत असे. हिटलरसकट उभ्या जर्मन राष्ट्राची जेव्हां ह्या युद्धाच्या पेटत्या होमकुंडांत राखरांगोळी झाली तेव्हांच ह्या हिटलरच्या तत्त्वज्ञानाचं वर्चस्व नाहींसं झालं.

हिटलर नी स्टॅलिन ह्यांच्या मतप्रणाली परस्परविरोधी असल्या तरी दोघांची विचारसरणी एकच आहे. आपणच आपल्या समाजाचं, नव्हे अखिल मानवजातीचं हितं करूं असं दोघांनाहि वाटत होतं. दोघांचीहि तत्त्वज्ञानं अगदीं परस्परविरोधी असून सुद्धां प्रत्येकाचं तत्त्वज्ञान पटणारे भरपूर अनुयायी दोघांनाहि होते. ह्या घनघोर युद्धांत हिटलर तत्त्वज्ञानाचा पाडाव झाला म्हणून आज आपण स्टॅलिनचं तत्त्वज्ञान श्रेष्ठ आहे असं म्हणतों आहोंत. हिटलर तत्त्वज्ञानाचा ह्या लढ्यांत विजय झाला असता तर त्या तत्त्वज्ञानाचाहि आपण मुक्तकंठानं उदोउदो केला असता. हिटलरनं मानवजातीची कत्तल केली, हिटलरनं जगाच्या पाठीवरील सुसंपन्न प्रदेश जाळून पोळून उध्वस्त केले. अजाण अर्भकं पाहिलीं नाहींत, बायका पाहिल्या नाहींत, मानवजातीवर उपकार करणाऱ्या इतर जीवसृष्टीचा विचार केला नाहीं. आपल्या मतप्रणालीचा श्रेष्ठपणा सिद्ध करण्याकरितां बेमानपणानं साऱ्या चराचर सृष्टीवर आगीचा वर्षाव केला.पण समाजहिताचे एकमेव कैवारी, शेतकऱ्यांचे अन्नदाते,मजुरांचे पालनकर्ते स्टॅलिनसाहेब ह्यांनीं तरी काय केलं ? किती मजूर मारले ? किती किसान मारले ? कोंवळ्या रक्ताच्या किती चिळकांड्या उडविल्या ? किती सवत्स मातांचे बळी दिले ? आपलं स्थान स्थिर करण्याकरितां किती लोकांना हद्दपारीची शिक्षा दिली ? आपल्याविरुद्ध पुकारा करणाऱ्या किती स्वजातीयांचे अंधारांत खून केले ? आहे कांहीं मोजदाद ? लढाईच्या काळांत सुद्धां हे गुन्हे अक्षम्य आहेत. शांततेच्या काळांत तर हे गुन्हे करणारे गुन्हेगार शिक्षेस पात्र आहेत ह्यांत वादच नाहीं. पण लढाईच्या आधीं आणि लढाईनंतर सुद्धां ह्यांचं हें शत्रुसत्र अग्निहोत्राप्रमाणं सतत धगधगत राहिलं आहे.

ह्या शत्रुसत्राकरितां सारे जेते एकत्र जमले. त्यांत इंग्लंडच्या मजूर सरकारचे मुख्य प्रधान ॲटलीसाहेब होते. जगावर शांततेचं साम्राज्य प्रस्थापित करूं इच्छिणारे ट्रूमनसाहेब होते. अखिल मानवजातीच्या हिताकरितां अवतार घेतलेले स्टॅलिनसाहेबहि होते. ह्या साऱ्या जेत्यांनीं एकविचारानं मानवजातीला ललामभूत अशा जर्मनींतल्या नरशार्दूलांना फांसावर लटकवलं. ह्यांत त्यांनीं कोणत्या तत्त्वज्ञानाचा आधार घेतला ? कायद्यांचं होमकुंड पेटवून त्यांत ह्या नररत्नांच्या आहुति देण्यांत कोणतं

राष्ट्रकार्य साधलं ? सूडानं भारावलेल्या ह्या जेत्यांना, एकेकाळीं साऱ्या जगाला हदरा देणाऱ्या सामर्थ्यवान् विभूतींना फांसावर लटकवण्यांतच मोठेपणा वाटला. त्यांनीं असा कोणता अक्षम्य गुन्हा केला होता ? जो गुन्हा ह्यांनीं केला असा त्यांच्यावर आरोप आहे तोच सर्वांनीं केला आहे. मानवजातीचं रक्त त्यांच्या हातावर जितकं उडालेलं आहे तितकंच तें ह्या साऱ्या नेत्यांच्या हातावरहि उडालेलं आहे. जगांतील एकजात सगळ्या समुद्रांचं पाणी लाल करून टाकण्याइतकं जें मानवजातीचं रक्त महायुद्धांत सांडलं गेलं त्या रक्तपाताला हे सारे जेते त्यांच्याइतकेच जबाबदार आहेत. पारडं फिरलं असतं, त्यांच्या ठिकाणीं आपण असतों तर आपल्याला हें पटलं असतं का ह्याचा विचारसुद्धां ह्या जेत्यांना शिवला नाहीं. जर्मनीनं कुरापत काढली, जर्मनीनं युद्ध पुकारलं, पहिला प्रहार जर्मनीनं केला; सगळं खरं आहे. पण ह्या यांत्रिक युगांत जर्मनीनं त्यावेळीं उचल घेतली नसती तर तुम्हाला ती उठावणी करावी लागली असती. त्यावेळीं युद्ध टळणं अशक्य होतं. प्रत्येक राष्ट्रांत कारखान्यांतून उत्पन्न झालेल्या मालानं वखारी तुंबून पडल्या होत्या. प्रत्येक राष्ट्र युद्धाची आतुरतेनं वाट पहात होतं. पण युद्ध सुरू करण्याचा वाईटपणा कुणालाच नको होता. युरोपांतील साऱ्या बलिष्ठ राष्ट्रांचे नेते जर्मन नेत्यांइतकेच किंवा त्याहूनहि अधिक प्रमाणांत युद्ध गुन्हेगार आहेत. युद्ध पाहिजे असून युद्ध नको आहे असं म्हणण्याचं ढोंग तरी जर्मन नेत्यांनीं केलं नाहीं. युद्ध सुरू होण्यापूर्वी प्रत्येक राष्ट्रांतून एकमेकाच्या भीतीनं कमी अधिक प्रमाणांत युद्धसाहित्याची निर्मिति होतच होती. युद्धाचा वणवा केव्हां पेटेल ह्याची प्रत्येकाला धास्ती वाटत होती. युद्धाची जबाबदारी आपल्यावर नको म्हणून प्रत्येक राष्ट्र आपल्या सहन-शक्तीची कमाल मर्यादा गाठण्याचा प्रयत्न करीत होतं. पहिलं आव्हान जर्मनीनं दिलं. सर्व राष्ट्रं युद्धाला उत्सुक होतींच. युद्ध सुरू झालं आणि संपलंहि. मालानं भरलेल्या वखारी रिकाम्या झाल्या. लोक बेकार होण्याची कांहीं काल तरी आतां भीति नाहीं. जिकडं तिकडं मालाचं उत्पादन प्रचंड प्रमाणावर फिरून सुरू झालं आहे.

भूकंपावर जसा इलाज नाहीं त्याचप्रमाणं युद्धावरहि इलाज नाहीं अशी ह्या यांत्रिक युगांतली परिस्थिति आहे. पृथ्वीच्या पोटांत तसरक

ज्याप्रमाणं सारखा उकळत असतो त्याप्रमाणं प्रत्येक राष्ट्रांतून मालाची पैदास एकसारखी उसळत असते. ह्या पृथ्वीच्या पोटांतील तप्तरस ज्याप्रमाणं सतत बाहेर पडण्याचा यत्न करीत असतो, त्याचप्रमाणं राष्ट्रांतील आर्थिक परिस्थिति कोंडी फोडण्याचा सतत प्रयत्न करीत असते. पृथ्वीचा भुसभुशीत पृष्ठभाग ज्याप्रमाणं ह्या तप्तरसाला वाट करून देतो त्याचप्रमाणं ह्या आर्थिक अनवस्थेचा बुडबुडा एकाद्या राष्ट्रांत डोकं वर काढतो. ज्याप्रमाणं एकादा ज्वालामुखी उत्पन्न होऊन भूपृष्ठावरील चराचर सृष्टीची होळी करतो, त्याचप्रमाणं एकाद्या राष्ट्राचा आर्थिक अनवस्थेचा हा बुडबुडा फुटला म्हणजे युद्धाचा वणवा पेट्न त्यांत मानवजातीची आहुति पडते. कांहीं काळानें हा युद्धाचा ज्वालामुखी शांत होतो आणि जिकडेतिकडे शांतता प्रस्थापित झाल्यासारखी दिसते. पण पृथ्वीच्या पोटांतील ही खळबळ जशी कायमची थांबत नाहीं त्याप्रमाणं राष्ट्राराष्ट्रांतील ही आर्थिक खळबळहि थांबण्याचीं चिन्हं दिसत नाहींत.

कारण उघड आहे. प्रत्येक राष्ट्रांत कारखान्यांची भरमसाट वाढ झाली आहे. दिवसेंदिवस अधिकाधिक यांत्रिक सुधारणा होते आहे. हल्लीं कारखान्यांत काम करणारा एक मजूर कमींतकमी दहा मजुरांचं काम करूं शकतो असं आपण गृहीत धरूं. एका राष्ट्रांतील सगळे लोक काम करूं लागले तर दसपट मालाची निर्मिति होईल. ह्या उत्पन्न होणाऱ्या मालापैकीं एकपट मालच जर त्या राष्ट्राला पुरत असेल तर बाकीच्या नऊपट मालाला दुसरी बाजारपेठ शोधावी लागेल. म्हणजे एका राष्ट्रांतील मालाच्या उत्पादनावर असल्या दहा राष्ट्रांना माल पुरवितां येईल. म्हणजे पृथ्वीवरील इतर नऊ राष्ट्रांत कारखाने नसतील, तिथले लोक कांहींएक काम न करितां स्वस्थ बसतील तरच ह्या मालाचा उठाव होईल. पण इतर राष्ट्रांतून सुद्धां ह्याच प्रमाणावर माल उत्पन्न होत राहिल्यास निर्माण झालेला माल ठेवायला सुद्धां पृथ्वीच्या पाठीवर रिकामी जागा सांपडणार नाहीं.

रशियानं हा प्रश्न उत्तम तऱ्हेनं सोडवला म्हणून आज आपण रशियन तत्त्वज्ञानाच्या मागं धावतो आहोंत. पण रशियन राष्ट्राच्या उठावणीला

सुरवात होऊन अवघीं पांचपंचवीस वर्षंच झाली आहेत, हें आपण अभि-बात विसरतो. झारशाहीच्या नाशानंतर रशियांत सुधारणा होऊं लागल्या. पहिल्या पांच वर्षांत कांहीं सुधारणा, नंतरच्या पांच वर्षांत आणखी कांहीं सुधारणा असं करतां करतां जेमतेम पंचवीस वर्षांत तें राष्ट्र युरोपांतील इतर राष्ट्रांच्या बरोबरीला आलं. तोपर्यंतच रशियन राष्ट्रांत मालाची वाजवीपेक्षां जास्त निर्मिति झाली नाहीं. एकदां इतर राष्ट्रांशीं सारखेपणा निर्माण झाल्यावरच मागणीपुरवठ्याचं समीकरण साधणं अवघड होऊं लागतं. त्यानंतरच्या कालांतच अशा यंत्राधिष्ठित राष्ट्रांत आर्थिक खळबळ सुरू होते. ह्या खळबळीला आळा घालायचा असेल, तर कामकऱ्यांचं काम तितक्या प्रमाणांत कमी करावं लागेल. म्हणजे आज आठ तास काम करणाऱ्या मजुराला फक्त एक तास किंवा त्याहूनहि कमी काम द्यावं लागेल. म्हणजे कारखाने किंवा काम करण्याच्या वेळा दहास एक ह्या प्रमाणांत कमी कराव्या लागतील. दिवसाच्या चौवीस तासांपैकीं तेवीस तास मानवीसमाज रिकामा राहील. एवढ्यानंहि भागणार नाहीं. यंत्रांत जसजशा अधिकाधिक सुधारणा होत जातील त्या त्या प्रमाणांत कामाच्या वेळा कमी करतां करतां कदाचित् दिवसांतून एकाददुसरं मिनिटच फक्त समाजांतील व्यक्तींना काम करावं लागेल. अशा रीतीनं विचार केला असतां हें उदाहरण कधींच सुटणार नाहीं.

आजकालच्या जगांत उत्पन्न झालेल्या अनर्थाचं मूळ इथंच आहे. कमींत कमी काम नी जास्तींत जास्त वेतन ह्यानंच जर जीवन सुखी होण्याचा संभव असला तर निष्क्रिय कोट्याधीश तरी सुखी झाला असता. पण सुख हें संपत्तीवर किंवा निष्क्रियतेवर अवलंबून नसून तें मनाच्या आत्यंतिक समाधानावर अवलंबून असतं. आजच्या ह्या यंत्र-युगांत यंत्रावर काम करणाऱ्या मजुरांना काम केल्याचा आनंद होत नाहीं, कलेची सेवा केल्याचं समाधान मिळत नाहीं. लायकीप्रमाणं वेतन-वाढहि होत नाहीं, नी समाजाचं हितहि साधतां येत नाहीं. इतकं असून सुद्धां आज ह्या जगांत कारखान्यांचा मोह न सुटण्याचं कारण एकच आहे. आजवर ह्या यंत्रसामुग्रीच्या जोरावर कारखानदारांनीं चैन केली. आतां आपण चैन करावी नी सुखी व्हावं असं मजुरांना वाटणं स्वाभा-

विक आहे. पण कारखानदार सुखी कां मजूर सुखी ह्याचा अद्याप निश्चय झालेला नाहीं. मिळेल ती मीठभाकर चवीनं खाण्यांत सुख आहे, कां पंचपक्वानांचीं ताटं पुढं असतांना त्यांतला कोणताच जिन्नस गोड लागत नाहीं ह्यांत खरं सुख आहे; आंगभर मेहनत करून फाटक्या घटकुरावर गाढ झोपण्यांत खरं सुख आहे, कां गाद्यांगिरद्यांवर लोळत असतांना सुद्धां रात्रभर झोपेविना तळमळण्यांत अधिक सुख आहे; कामाखेरीज राहिलेला वेळ बायकामुलांच्या सहवासांत घालविण्यांत खरं सुख आहे; कां चोवीस तास पैशाच्या मागं वणवण करीत फिरतां फिरतां आपल्याला प्रपंच आहे ह्याचासुद्धां ज्या श्रीमंतींत विसर पडतो, त्या श्रीमंतींत खरं सुख आहे ह्याचा विचार वाचकांनींच करावा.

ह्या आजकालच्या यांत्रिक जीवनानं आईचा आईपणा नष्ट झाला आहे, बापाचं पितृवात्सल्य दृष्टीआड झालं आहे. मानवीमनांतील आपलेपणाच्या ओलाव्याचा मागमूस सुद्धां राहिला नाहीं हें मात्र निश्चित. आईबाप कामावर असतांना शैशवांत मुलं दायांच्या अंगावर असतात, बालपणांत तीं मादाम मॉंटेसोरीबाईच्या देखरेखीखालीं वाढतात आणि तारुण्यांत तीं शिक्षकांच्या देखरेखीखालीं शाळांतून वावरतात. आणि विद्यार्थीदशा संपतांच तीं यंत्रांच्या सहवासांत स्वतः यंत्रं बनून जीवनझगडा झगडूं लागतात. मातापित्यांची त्यांना ओळख करून द्यावी लागते. गृहजीवनाची त्यांच्या आयुष्यांत कुठं भेटच होत नाहीं. दाया, शिक्षकिणी किंवा शिक्षक कितीहि तज्ञ असले तरी त्यांचं प्रेम ह्या बालजीवांच्यापेक्षां त्यांना मिळणाऱ्या पगारावर अधिक असतं. दायांना पान्हा फुटतो पण तो पगारी. शिक्षकिणी मुलांना लडिवाळपणानं गोंजारतात पण दिखाऊ प्रेमानं. शिक्षक शिक्षण देतात पण घंटेच्या ठोक्यावर. गृहजीवनाला पारखीं झालेलीं हीं कोवळीं रोपटीं अकालीं जून बनून यंत्राप्रमाणं जीवनाच्या चाकोरींत वावरूं लागत असल्यास नवल नाहीं.

राष्ट्रांतील मुलांची संपूर्ण जबाबदारी राष्ट्रावर असते. मुलं मोठीं झाल्यावर राष्ट्रच त्यांना काम देतं. तारुण्यांतील भावनांच्या भरांत एकत्र काम करणाऱ्या तरुणतरुणी एकमेकांकडं खेचल्या जातात. विजेच्या समविषम प्रवाहाप्रमाणं तीं यौवनसुलभ मनोविकारांमुळं एकत्र येतात.

व्यापारी देवाणघेवाणीच्या तत्त्वांवर त्यांचीं लग्नं ठरतात. फी देऊन लग्नांची नोंदणी होते. मनोविकारांची तृप्ति होते. मुलंहि होतात. पण त्यांच्या जीवनांत मात्र जिह्वाळा कुठंच दिसत नाहीं. रोज सकाळीं उठल्या-वर दोघांचं कामाला जाणं, तिथं दोघांनीं संध्याकाळपर्यंत काम करणं, संध्याकाळीं आपल्या खुराड्यांत परत येणं, रात्रींची विश्रांति घेणं नी फिरून दुसरा दिवस उजाडतांच फिरून तेंच करणं! कार-खान्यांतील तीं लोखंडी निर्जीव यंत्रं आणि त्या यंत्रांवर काम करणारीं हीं जिवंत यंत्रं एवढाच फरक. ह्यांना झालेलीं मुलं ही संपत्ति राष्ट्राच्या मालकीची असल्यानं ह्यांचा नी ह्यांच्या मुलांचा विशेष संबंध येण्याचं कारणच नाहीं. पटलं तर पति–पत्नी म्हणून रहावं, न पटल्यास काडीमोडीची नोंद करून नवरेपणाचा किंवा बायकोपणाचा पहिल्या-इतक्याच बेफिकीरपणानं दुसरा परवाना काढावा हें या विसाव्या शतकां-तील सुधारलेल्या राष्ट्राचं जीवन! उच्चनीच भेद नाहीं, आईबापांची ओळख नाहीं, प्रेमांत एकनिष्ठपणा नाहीं नी लग्नांत पावित्र्य नाहीं. साऱ्या युरोपखंडांत आणि थोड्याफार फरकानं अमेरिकाखंडांत हेंच आजचं आदर्श जीवन झालं आहे.

खरोखर आपल्या गुलामगिरींतलं आपलं जीवन ह्या यांत्रिक जीवनापेक्षां कितीतरी पटीनं अधिक चांगलं होतं. दारिद्र्य आहे, रोगराई आहे, गुलामगिरी होती तरी सुद्धां अद्याप आपण पूर्णपणें यंत्र बनलों नाहीं, याबद्दल आपणाला अभिमान वाटला पाहिजे. दरिद्री असलों तरी अद्याप आपण आईबापांना मानतों. गुलाम असलों तरी परमेश्वराचं अस्तित्व मानतो. रोगराईनं गांजलेले असलों तरी आम्ही अद्याप स्वत्व पूर्णपणें विसरलों नाहीं, राष्ट्र ह्या दृष्टीनं आज आपण अर्धमेले झालों असलों तरी सांस्कृतिक दृष्टीनं अजूनहि आम्ही जगाला भारी आहोंत. आमचीं शरीरं मृतवत् असलीं तरी मनानं आम्ही जिवंत आहोंत. इंग्लंडचं आपल्यावर साम्राज्य होतं, रशियानं जर्मनीसारख्या ध्येयवादी राष्ट्राला धुळीला मिळविलं, अमेरिकेनं एका ॲटम बॉंबनं जागतिक महा-युद्ध थांबवलं, म्हणूनच केवळ ह्या राष्ट्रांतील यांत्रिक जीवन आदर्श जीवन मानायला आम्ही तयार झालों आहोंत. प्राचीन कालांत आपणच त्यांना

आदर्श जीवनाचे, आदर्श राष्ट्राचे, आदर्श आध्यात्मिकतेचे धडे दिले आहेत. आणि भविष्यकाळांत फिरून एकदां आपणच त्यांना आदर्श-जीवनाचे प्रात्यक्षिक पाठ देणार आहोंत असा आमचा आत्मविश्वास आहे. मातापित्यांचं निरपेक्ष प्रेम, पतिपत्नींतील लाजाळू प्रेम, भावा-बहिणींतलं नी भावाभावांतलं हृदयस्पर्शी प्रेम आणि मित्रामित्रांतलं निष्कलंक, निःस्वार्थी प्रेम अद्याप आपणच आपल्या ह्या अर्धमेल्या अवस्थेंत सुद्धां दाखवूं शकतों.

वास्तविक ह्या युरोपीय संस्कृतीचा विचारच आपल्याला ह्या विचार-सरणींत आणावयाचा नव्हता. आपल्या हिंदवी संस्कृतीमधील चढ-उतारांचा अभ्यास करून आपण आपला मार्ग फिरून एकदां वेगळ्या तऱ्हेनं आखल्यास आपलं स्वातंत्र्यसुख आपल्यापासून फार दूर नाहीं ह्या दृष्टीनंच फक्त विचार करून आज आपण कसं वागलं पाहिजे हेंच आपल्याला ठरवायचं आहे. तथापि आपल्या जेत्यांच्या संस्कृतीनं आपण भारले गेलों आहोंत. त्यांची शिस्त, त्यांची ताकद, त्यांच्या सुधारणा, आपल्यापेक्षां कितीतरी पटीनं श्रेष्ठ आहेत अशी आपली भावना झाली आहे. आपल्यांत जाडे तत्त्ववेत्ते आहेत, आदरणीय विभूती आहेत, जगद्वंद्य संशोधक आहेत, असं असून सुद्धां आपल्या गुलामगिरीनं आपला आत्मविश्वास पार नाहींसा झाला आहे. युरोपखंडांत लोक-शाहीचं तत्त्व अंमलांत आलं म्हणजे आपणहि जिकडं तिकडं स्वतंत्र मतदानाचा धुमाकूळ घालूं लागतों. युरोपांत हिट्लरि-झमचा जोर झाला असं दिसतांच आपल्या येथील पगारी अधि-कारी सुद्धां आपल्या हाताखालच्या लोकांना सोटेशाहीचा धाक दाखवूं लागतात; रशियांत समाजसत्तावादाचा जोर होऊं लागला कीं आपणहि खांद्यावर लाल बावटे टाकून गल्लीगल्लींतून लाल बावट्याच्या जयघोषांत आपल्या मानसिक अगतिकतेचं प्रदर्शन करीत फिरूं लागतों. आपल्याला प्रिय असलेली एकादी व्यक्ति आजारी पडली म्हणजे हताश होऊन ज्याप्रमाणं ह्या डॉक्टरकडून त्या वैद्याकडे, त्या वैद्याकडून एकाद्या युनानीकडे धाव घेत असतो; डॉक्टर, वैद्य किंवा हकीम कोणत्याहि मनुष्याचं आयुष्य वाढवूं शकत नाहीं हें पक्कं माहीत असतांना सुद्धां

आपल्या असहायतेबद्दल आपण बेभान होऊन धावत सुटतो, त्याचप्रमाणं हें चांगलं, तें चांगलं असं म्हणत म्हणत आपल्या घाबरटपणाचं प्रदर्शन करीत आपला समाज बेमान होऊन पाश्चात्य संस्कृतीच्या मृगजळामागं उन्नतीच्या आशेनं धावत सुटला आहे. 'तुझें आहे तुजपाशीं परि तूं जागा चुकलासी ' ह्या तुकारामबुवांच्या उक्तीप्रमाणं आपण आज आपलं स्वत्व विसरलों आहोंत. म्हणून ह्या पाश्चिमात्य यंत्रसंस्कृतीमध्यें खरोखरच कांहीं गोष्टी घेण्यासारख्या आहेत का ह्याचा विचार करण्याच्या दृष्टीनं ह्या दोन प्रकरणांत युरोपीय संस्कृतीचा उहापोह करणं जरूर वाटलं.

इंग्रज लोक ज्यावेळीं प्रथम इथं आले त्यावेळीं आपल्याला आपल्या संस्कृतीचा पूर्णपणें विसर पडला होता. त्यांचा गणवेश, त्यांच्या बंदुका, त्यांची भाषा सगळंच कांहीं आपल्याला अनुकरणीय वाटलं. पण अवघ्या दोनशें वर्षांच्या यांत्रिक सुधारणांनीं यंत्रशाहीच्या पूर्णपणें आहारीं गेलेलीं तींच राष्ट्रं आपापसांतील कलहानं मानवजातीचा अमानुष संहार करूं लागलीं, त्यावेळीं त्यांच्या संस्कृतीचा भडकपणा कमी झाला आणि आज आपल्या हिंदुस्थानांतील ज्ञात्यांना आणि नेत्यांना असा आत्मविश्वास वाटूं लागला आहे कीं, आपल्याला ह्या परकीय संस्कृतीकडून कांहींएक शिकावयाचं नसून त्यांना शिकविण्यासारखं आपल्याजवळ पुष्कळच आहे. जादुगार हा नजरबंदी करतो आणि मानसशास्त्रवेत्ता हा मनावर ताबा मिळवितो. जादुगाराची नजरबंदी दिखाऊ असली तरी टिकाऊ नसते. हीच अवस्था आज ह्या युरोपीय जादुगाराची झाली आहे. त्यानं मानवजातीची नजरबंदी करण्याकरितां आपल्या पोतडींतून निरनिराळ्या चिजा काढण्याचं ढोंग केलं. राजेशाही झाली, भांडवलशाही झाली, लोकशाही झाली, व्यक्तिशाही झाली आणि अखेर समाजशाही पण झाली. पोतडी तीच, वस्तु तीच, वरचं आवरण मात्र वेगळ्या रंगाचं. मानसिक उत्कर्षाच्या अथांग समुद्रांत ह्या साऱ्या चिजा धुऊन पाहतांच साऱ्यांचं अंतरंग एकच आहे हेंच आम्हांला दाखवायचं होतं. युरोपांत निरनिराळ्या व्यक्तींनीं निरनिराळ्या वेळीं, निरनिराळ्या नांवाखालीं आपलं व्यक्तिगत सामर्थ्य अबाधित चालू ठेवण्याचा प्रयत्न केला हा एकच सूर, हें एकच गाणं आपल्याला सतत ऐकूं येतं. युरोपांतील प्रत्येक

वादाच्या नेता हुकूमशहाच होता हें मागील विवेचनावरून आपल्या लक्षांत आलंच असेल. ह्या साऱ्या हुकूमशहांचं ध्येयवाक्य निर्मळ स्वार्थ हेंच होतं, हेंच आहे आणि हेंच राहणार. यांत्रिक सुधारणा परमावधीला नेऊन स्वतःच्या राष्ट्रांतील व्यक्तींच्या सुखी जीवनाचा परमोच्च बिंदु गांठण्याऐवजीं त्या सर्वांनीं मानवीजीवनावर सतत आगीचाच वर्षाव केला. चातकानं आ करून जलबिंदूकरितां मेघाकडं पहात रहावं आणि त्याच्यावर अचानक वीज कोसळावी अशीच आज साऱ्या जगांतील मानवजातीची शोचनीय स्थिति झाली आहे. हे सारे युरोपीय स्वार्थ-निष्ठ नेते, हे सारे यंत्रसम्राट, आधिभौतिक तत्त्वज्ञानाचे हे सगळे राजर्षी आज भयभीत झाले आहेत. ह्यावेळीं जर ह्यांना कोणी मार्गदर्शक ज्ञाता मिळाला नाहीं तर हे सारे लाकडी ओंडके वहात वहात एकमेकांवर सतत आपटत राहून एके दिवशीं नामशेष होतील.

ह्या जागतिक अनवस्थेचं कारण खऱ्या मानसिक उन्नतीचा अभाव हेंच आहे. शिक्षणशास्त्रांत ह्यांनीं निरनिराळ्या पद्धतींचा शोध लावला, बालमनाचा खूप अभ्यास केला; पण अखेर बालमनाला मानसिक उन्नतीचं शिक्षण देण्याचं मात्र राहून गेलं. धंदेशिक्षण झालं, पदार्थ-विज्ञानशास्त्र झालं, वास्तुशास्त्र झालं, यंत्रशास्त्र झालं, ह्या साऱ्या आधि-भौतिक शास्त्रांचं मूळ जें मानसशास्त्र तेंहि झालं. मानसशास्त्राचा अभ्यास झाला, विचार झाला; पण आचार मात्र राहून गेला. तत्त्व-संशोधनांत रममाण झालेले हे संशोधक संशोधनांतच आनंद मानूं लागले. तत्त्वसंशोधनापलीकडील मानसिक एकाग्रतेच्या चौथऱ्यावर उभे राहून समतोलबुद्धीनं मानवी जीवनाचं सुख साधण्याचा प्रयत्न ह्यांच्यांतील एका महान् धर्मप्रणेत्यानं केला. पण तो प्रयत्न ज्या काळीं केला गेला त्या काळीं पाश्चिमात्य समाज, दारिद्य, अधःपात नी अज्ञान ह्या साऱ्या गोष्टींनीं इतका गांजला गेला होता कीं आपल्या आधिभौतिक उन्नतीपुढं त्याला ह्या धर्मप्रणेत्याची शिकवण पटली असूनसुद्धां आचरणांत आणतां आली नाहीं. ह्याचा परिपाक म्हणजे आजकालचं दिशा चुकलेलं, आपलं खरंखुरं ध्येय विसरलेलं, आधिभौतिक उन्नति हेंच आपलं सर्वश्रेष्ठ हित असं मानणारं मानवीमन. ह्या मनावरील सांचलेली राख बाजूला

करून आंतील अग्नीला फुंकर घालून तो प्रज्वलित करण्याचं काम हिंदवी संस्कृतीचं आहे. जगाला योग्य मार्गावर नेऊन सोडण्याचं सामर्थ्य आज आर्यसंस्कृतींतच आहे. ईजिप्त संस्कृति आज नामशेष झाली आहे. बॅबिलोनिअन आणि ग्रीस संस्कृति आज भूपृष्ठाखालीं खोल गाडली गेली आहे. रोमन संस्कृतीचा मध्य ढासळला आहे. अशा वेळीं मानवी-मनाच्या सामर्थ्याची कमाल मर्यादा गाठून समाजाचं श्रेयस् नी प्रेयस् साधण्याचं काम फक्त आमची हिंदुसंस्कृतीच करूं शकेल. आजवर ह्या युरोपीय संस्कृतीचे आघात सहन करतां करतां आर्यावर्तातील समाजावर कसकसे परिणाम झाले, ह्याचा विचार करून आजच्या आपल्या समाजांत आपलं जुनं तत्त्वज्ञान रूढ केल्यास आपलं उद्दिष्ट खात्रीनं साध्य होईल. मिळालेलं स्वातंत्र्य टिकविण्याकरितां आपण कसोशीनं प्रयत्न केल्यास ह्या चाळीस कोटींच्या समृद्ध हिंद देशाकडं वाकड्या नजरेनं पाहण्याची कोणाचीच ताकद होणार नाहीं; इतकंच नव्हे तर हिंदवी राष्ट्राचं योग्य मार्गानं उत्थापन झाल्यास वेदकालीन अपौरुषेय तत्त्वज्ञानाच्या पायावर उभारलेला अखिल जागतिक मानवीसमाज सुस्थितींत आणि गुण्या-गोविंदानं नांदूं लागेल.

—*—

९ : स्वातंत्र्ययत्न

आर्यावर्तांत इंग्रजांचं एकछत्री साम्राज्य होतं. अशा तऱ्हेचं एकछत्री साम्राज्य फार प्राचीन काळीं असेलहि कदाचित्. अश्वमेध करण्यापूर्वी यज्ञीय घोडा ज्ञात असलेल्या सर्व प्रदेशांतून फिरविला जात असे. तो घोडा जर कोणीं अडविला तर त्या अडविणाऱ्याचा पराभव करून सार्वभौमसत्ता प्रस्थापित झाल्यानंतरच अश्वमेध करावा असा दंडक असल्यानं ह्या आर्यावर्तांत ज्या ज्या काळीं अश्वमेध झाले त्या त्या काळीं आसेतुहिमाचल सार्वभौमसत्ता प्रस्थापित होत असावी असा अंदाज आहे. अंदाज म्हणण्याचं कारण इतकंच कीं त्यावेळीं आसेतुहिमाचल आर्यावर्ताचा पूर्ण शोधच जर लागला नसेल, निबिड अरण्यामुळं अगर दुर्लंघ्य पर्वतामुळं पलीकडे असलेल्या प्रदेशाची जर कल्पनाच नसेल तरच कदाचित् हे यज्ञ फक्त ज्ञात प्रदेशांतून घोडा फिरवून होत असल्यास त्या काळच्या सार्वभौमसत्तेचा व्याप आजच्या इतकाच असेल असं म्हणतां येणार नाहीं. पण एवढं नक्की कीं पुराणकालीं सुद्धां सार्वभौमसत्ता आर्यावर्तांत प्रस्थापित झाली होती. पण पुराणकालची सार्वभौमसत्ता आणि आजची सार्वभौमसत्ता ह्यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. घोडा जर कोणीं अडविलाच नाहीं तर त्याकाळीं लढाई होतच नसे. अश्वमेध करणाऱ्या राजाचं सार्वभौमत्व कबूल केलं म्हणजे सारे मांडलिक राजे आपापल्या राज्यापुरते स्वतंत्रच होते. त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ करणं, त्यांना राज्यावरून हुसकून लावणं, त्यांना दत्तक घेऊं न देणं, आणि अशा तऱ्हेनं कांहीं ना कांहीं कारण पुढं करून तें राज्य गिळंकृत करणं हा त्यावेळच्या राजांचा उद्देशच नव्हता. त्या वेळचं सार्वभौमत्व फक्त सामर्थ्य अजमावण्यापुरतंच असे. आजचं सार्वभौमत्व रक्त शोषण्याकरितां आहे. त्यावेळीं लढाया झाल्याच तर त्या राजाराजांच्या सैन्यांत युद्धनियमाला अनुसरून होत असत. आजकालच्या युद्धांत युद्धनियम मोडणाऱ्या कावेबाज शत्रूच्या हिकमतीलाच प्राधान्य

दिलं जातं. पूर्वीच्या लढायांच्या वेळीं निःशस्त्र प्रजेवर कधींहि हत्यार उचललं जात नसे; इतकंच नव्हे तर कोणत्या राजाचा पराभव झाला नी कोणत्या राजाला विजयश्रीनं माळ घातली हें फक्त अश्वमेधाच्या घोषणेवरूनच प्रजेला समजत असे. हल्लींच्या युद्धांत पहिला तडाखा निःशस्त्र आणि शांतताप्रिय प्रजेलाच सहन करावा लागतो. त्या काळच्या युद्धांत सैनिकांना नी नेत्यांनाच मुख्यतः युद्धांतील हालअपेष्टा सोसाव्या लागत. पण आजकालच्या युद्धांत सैनिकांची सोय प्रामुख्यानं पाहिली जाते. इतकंच नव्हे तर सैनिकांच्या सुखसोईकरितां लाखो प्रजाजनांना उपाशी मारलं जातं.

हिंदुस्थानांत सार्वभौमसत्ता प्रस्थापित करण्याकरितां पाश्चात्य देशांतील व्यापाऱ्यांनीं लढाया केल्याच नाहींत असं म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. एकमेकाविरुद्ध झुंजत असलेल्या हिंदुस्थानांतील सत्ताधीशांना सतत झुंजत ठेवून दुसऱ्यांची सत्ता क्रमाक्रमानं कमी करीत आणणं हाच त्यांच्या साम्राज्यसत्तेचा बीजमंत्र होता. कधीं ह्या राजाला मदत कर, कधीं त्या राजाविरुद्ध गाऱ्हाणं कर, एका राजसत्तेकडून एकादं बेट विकत घे, दुसऱ्या राजसत्तेकडून एकादं बेट बक्षिसादाखल मिळव, कधीं आपली फौज एका राजाच्या तैनातीला ठेव, अशा मार्गानं आवळा देऊन कोहाळा काढीत काढीत त्यांनीं आपलं आसन हिंदुस्थानांत स्थिरावत आणलं. व्यापाराच्या मिषानं हिंदुस्थानला बंदराबंदरांनीं वेढा घालतां घालतां सबंध हिंदुस्थान देश यांच्या सार्वभौम अंमलाखालीं केव्हां नी कसा गेला हें समजलं सुद्धां नाहीं. औरस संतति नसेल तिथं दत्तकाला मान्यता द्यायची नाहीं आणि औरस संतति असेल तिथं राजाला वेडा ठरवायचा. जळूप्रमाणं शत्रूच्या अंगाशीं एकजीव होऊन रक्तशोषण करीत असलेल्या नेत्यांना कळत नकळत दुर्बल करीत जायचं आणि मोडकळीला आलेल्या राज्यांच्या थडग्यावर आपल्या राष्ट्राची समाधि बांधायची. थोडा वेळ बकध्यान करायचं आणि प्रथम गिळलेला मासा पुरा पचल्यावर दुसऱ्या माशावर झडप घालायची. अशा तऱ्हेनं व्यापाराच्या मिषानं हिंदुस्थानांत उतरलेले हे पाश्चात्य तागडीवाले एका

हातीं तराजू नी दुसऱ्या हातीं तलवार घेऊन अखिल हिंदुस्थानचे एकमेव सत्ताधीश बनले.

हिंदुस्थानांतील लोकांना प्रथम त्यांच्याबद्दल आदर वाटला. कांहीं काळानं त्यांच्याबद्दल कौतुक वाटूं लागलं. नंतर कौतुकाची जागा भीतीनं घेतली. अखेर हे परकी लोक प्रत्येक बाबतींत आपल्यापेक्षां सरस असल्यानं त्यांना ते आदर्श मानूं लागले. हिंदुस्थानांत सत्ता प्रस्थापित केल्यानंतर हिंदुस्थानांतील लोकांना त्यांनीं आपापल्या धर्माप्रमाणं वागायची सवलत दिली, इतकंच नव्हे तर कोणाच्याहि धर्ममतांत आपण ढवळाढवळ करणार नाहीं अशी ग्वाही दिली. त्या त्या धर्मग्रंथांवर आधारलेल्या कायद्यांचाच त्यांनीं पुरस्कार केला. नवीन नवीन यांत्रिक सुधारणा हिंदुस्थानांत आणल्या. आपल्या सुखसोईच्या निरनिराळ्या यांत्रिक साधनांनीं हिंदुस्थानांतील रहिवाशांना थक्क करून सोडलं. प्रवासाचीं सुखकारक साधनं सुरू केलीं. कारखाने काढले. वीज, तारायंत्र, टेलिफोन ह्यांचा सगळीकडे सुकाळ केला. जिकडं तिकडं शांतता प्रस्थापित केली. पहिल्या पहिल्यांदा हिंदुस्थानांतील लोकांना हे परकी लोक देवदूतच वाटले.

हिंदुस्थानांतल्या लोकांच्या हिताकरितांच आपण हिंदुस्थानांत साम्राज्याची स्थापना केली असा आभास ह्या इंग्रजांनीं निर्माण केला. बुद्धिवान लोक हुद्याच्या जागांवर नेमले गेले. व्यापारी मोकळेपणानं व्यापार करून पैसा मिळवूं लागले. शेतकरी शेतांत कामं करून निर्भयतेनं नी शांततेनं राहूं लागले.

कोणत्याहि परकीय संस्कृतीविरुद्ध उठावणी करणं किंवा तिला साथ देणं ही गोष्ट नेहमीं समाजांतील बुद्धिवादी वर्गच करीत असतो. समाजाच्या तळच्या थरांत प्रामुख्यानं एकदम फरक असा कधींच पडत नाहीं. समाजांत नेहमीं जी उलथापालथ होत असते तिला सुरवात समाजाच्या वरच्या थरांत म्हणजे बुद्धिवादी समाजांतच होत असते. ही वरच्या थरांतील खळबळ जितकी अधिक जोरदार तितकी ती समाजाच्या खालच्या थरापर्यंत जलद पोहोंचूं शकते आणि कोणतीहि घटना

खालच्या थरापर्यंत पोहोंचली म्हणजेच ती बलशाली होते. पाश्चात्य संस्कृतींशीं आपला संबंध येतांच बुद्धिवादी विचारसरणींत फरक पडला आणि त्यामुळं ती विचारसरणीच प्रबल असल्यानं त्याचा एकंदर समाजा-वर अनिष्ट परिणाम झाला.

हा बुद्धिवादी वर्ग पाश्चात्यांच्या विचारसरणीनं आमूलाग्र भारला गेला. पोषाख त्यांचा, भाषा त्यांची, आचारविचार त्यांचे, राहणी त्यांची, शिक्षण त्यांचं, थोडक्यांत सांगायचं म्हणजे आर्यावर्तांतील बहुतेक बुद्धिवादी प्रत्येक बाबतींत पाश्चात्यांचा अनुकार करूं लागले. इंग्रजी भाषा हीच खरी भाषा, इंग्रजी विचारसरणी हीच खरी समाजहिताची ज्योत अशा कल्पनेनं वेडे झालेले हिंदवी नेते घरीं दारीं समाजांत साऱ्या ठिकाणीं पाश्चात्य सुधारणेचा गाजावाजा करूं लागले. अगदीं घराच्या चौभिंतींतल्या त्यावेळच्या बुद्धिजीवी समाजाचा विचार केला तर काट्याचमच्याच्या साहाय्यानं टेबलावर जेवणं, पिण्याच्या पाण्याऐवजीं साहेबाप्रमाणंच सोडा-व्हिस्कीच्या बाटल्यांचीं सटासट बुचं उडविणं, आपली जेवणाची पद्धत टाकाऊ ठरवून पावरोटी, मांसमच्छराचा रोजच्या जेवणांत उपयोग करणं ह्या साऱ्या गोष्टी त्यावेळच्या समाजानं अविचारानं नी आंधळेपणानं उचलल्या. घरांतला पोषाख वेगळा, बाहेरला पोषाख वेगळा, झोपण्याच्या वेळचा पोषाख वेगळा अशी पोषाखाच्या बाबतींतहि सुधारणा झाली. बायकांना घेऊन फिरायला जाणं, समाजांतील मोठमोठ्या समारंभाच्या वेळीं अग्रपूजेचा मान बायकांना देणं, आई, बाबा यासारख्या मराठी बोलींतील प्रेमळ हृदयस्पर्शी शब्दांना घरांतून अर्धचंद्र देऊन त्यांच्याऐवजीं पपा, ममा यांसारख्या परक्या भाषेंतील शब्दांची बालमनाला शिकवण देणं, अशांसारखे भयंकर क्रान्तिकारक प्रसंग ह्या बुद्धिजीवी वर्गातील धुरीणांच्या घरांत धुडगूस घालूं लागले. स्वतंत्र विचार करण्याची समाजांतील शक्तीच नाहींशी झाली होती. साहेब करतो तेंच बरोबर आणि त्याचं अनुकरण केल्यानंच आपल्या समाजाची सुधारणा होईल ही विचार-सरणी त्यावेळच्या समाजांत दृढमूल झालेली होती. साहेब रोजच्या जेवणांत काट्याचमच्यांचा उपयोग करतो ह्याचं कारण साहेबाच्या थंड देशांत उघड्या हातांनीं वावरणं कठीण असतं, हा विचारच कुणाच्या

डोक्यांत आला नाहीं. जेवतांना थंडगार पाणी पिणं शक्य नसल्यानं ज्या पेयानं अंगांत उष्णता निर्माण होईल अशी मादक पेयं घेणं त्यांना जरूर होतं, अशी सहज विचारसरणी त्या काळीं कुणाच्याच मनाला शिवली नाहीं. पायापासून डोक्यापर्यंत अंगाला चिकटून असणारा पोषाख पाश्चात्यांच्या देशांत जरी जरूर असला तरी आपल्या देशांत ह्या पोषाखाला स्थान देणं समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीनं घातक ठरेल असं कोणालाच वाटलं नाहीं. बालमनावर परकी भाषेचे संस्कार करून आपल्या परंपरेचा आपणच आपल्या हातांनीं सत्यानाश करीत आहोंत हें कुणाच्याच गांवीं नव्हतं. महिन्याच्या महिन्याला भरपूर वेतन घ्यावं, चोवीस तास आपल्या ह्या नवीन मालकाच्या सेवेंत रहावं, फावल्या वेळांत आपल्या समाजांतील इतर लोकांना पाश्चिमात्य संस्कृतीचं महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करावा आणि आपली प्रामाणिक समजूत आपल्या जवळपासच्या इतर लोकांच्या मनावर ठसवून सारा बहुजन समाज पाश्चात्यवादी बनविण्याचा प्रयत्न करावा हें तत्कालीन बुद्धिवाद्यांचं धोरण होतं. ह्या आपल्या विचारसरणीनं साऱ्या हिंदवासीयांना कायमचं गुलामगिरींत गाडून टाकण्याचं पाप आपल्या पदरीं पडतं आहे हें त्यांच्या ध्यानींमनींहि नव्हतं. इतका, आर्यावर्तांतील बुद्धिवादी वर्ग पाश्चात्य संस्कृतीच्या वरच्या लखलखाटानं दिपून गेला होता.

हिंदुस्थानांतील लढाऊ जातींचा अशाच तऱ्हेनं अधःपात झाला. इंग्रजांनीं इथं राज्यसंस्थापनेला सुरवात केल्याबरोबर इथल्या लढाऊ जातींतील लोकांत आपापसांत भांडणं लावून त्यांची शक्ति क्षीण झाल्यावर आपलं वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला हें मागं सांगितलंच आहे. वर्चस्व प्रस्थापित झाल्यानंतर बेकार झालेल्या ह्या लढाऊ जातींतील साऱ्या दर्जाच्या लोकांना त्यांनीं त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणं आपल्या पदरीं नोकऱ्या दिल्या. इस्लामी अमलाखालीं देखील हिंदुस्थानांतील क्षत्रिय त्यांच्या पदरीं त्यांच्या हाताखालचे सरदार म्हणून रहात असत. पण हे इस्लाम रियासतींतील हिंदू सरदार आपापल्या परीनं स्वतंत्र म्हणून वावरत असत. आपल्या हाताखालील प्रांतांतून कर वसूल करून त्यांतून आपल्या प्रांताचा खर्च भागवून त्यांतला कांहीं हिस्सा ते बादशहाला

खंडणी म्हणून देत. लढायांच्या वेळीं आपल्या सैन्यासह ते सम्राटाला मदत करीत. धन्याची नोकरी इमानेंइतबारें करून आपापल्या इतमामा-प्रमाणं ते रहात असत. इंग्रज साम्राज्यशाहींत हलके हलके देशांतील चलन इंग्रजांनीं आपल्या हातीं घेतलं आणि ह्या लढवय्ये जातींना पगारी नोकऱ्या दिल्या. ह्या सरदारांची प्रांतांतील इतर सर्व जबाबदारी कमी झाल्यानं त्यांनाहि हेंच आयुष्य सुखाचं वाटूं लागलं. हाताखालच्या लोकांचे पगार, राज्याची व्यवस्था, प्रजेच्या सुखसोयी, करवसुली, वगैरे साऱ्या गोष्टी साम्राज्यसरकारनीं आपल्या हातीं घेतल्यानं सैन्यांतील लोकांना शिक्षण देऊन जय्यत तयार ठेवणं एवढी एकच जबाबदारी ह्या लष्करी अधिकाऱ्यांना सांभाळावी लागत असे. एवढ्याकरितां त्यांना भरपूर तनखा मिळून त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणं बढती पण मिळत असे. ती मात्र मासिक वेतनांत आणि छातीवर लटकावयाच्या पदकांत, नाहींतर खांद्यावर चिकटवायच्या फितींत. सारे लहानथोर लढवय्ये इंग्रजांची नौकरी हौसेनं नी मनोभावानं करूं लागले. आर्यसंस्कृतीचा हाच एक विशेष आहे. एकादी गोष्ट करायची हें एकदां मनानं ठरविल्यावर वंश-परंपरागत मानसिक शिकवणीनं आर्यावर्तांतील लोक पत्करलेलं काम एकनिष्ठपणानं प्राण पणाला लावून करीत राहतात. विशेषतः हिंदुस्थानांतील लढाऊ जातींत हा गुण प्रामुख्यानं दिसून येतो. युरोपखंडांत झालेल्या युद्धांतून हिंदुस्थानांतील लोक ज्या ज्या समरभूमीवर गेले त्या त्या ठिकाणीं ते निर्भयपणानं नी जिवाची तमा न राखतां लढले. सोळा रुपयांचा पगारी बारगिर एकदां रणमैदानावर उतरला कीं हरहर महादेवाच्या जयघोषानं किंवा श्री एकलिंगजी की जय ह्या घोषणेनं किंवा दीन दीन ह्या आरोळ्यांनीं शत्रूवर निकरानं तुटून पडून रणमर्दिनीशीं एकरूप होतो असा अनुभव आहे. अशा तोलाचे एकनिष्ठ शिपाई पाश्चात्य साम्राज्यशाहीच्या पदरीं नोकरीला राहिल्यानं पाश्चात्यांची सत्ता हिंदु-स्थानांत हां हां म्हणतां स्थिरावली.

व्यापारी लोकांची तर ह्या नव्या अमदानींत चंगळच झाली. देशां-तल्या देशांत मालाचा क्रयविक्रय करण्यानं मालाला भरमसाट तेजी कधींच येत नाहीं. जरी एकाद्या वेळीं तशी तेजी आलीच तर देशांतील

सार्वत्रिक तेजीमुळं खरेदीविक्रीच्या गाळ्यांत बेसुमार फरक कधींच पडत नाहीं. पण परदेशांशीं व्यापार करतांना अवाच्यासव्वा गाळा राहिल्यानं व्यापाऱ्यांवर पैशाचा पाऊस पडत राहतो. व्यापाऱ्यांना भरमसाट फायदा दिसावा आणि त्यामुळं हिंदुस्थानांतल्या कच्च्या मालाचा इथंच पक्का माल बनविण्याची त्यांना इच्छा होऊं नये म्हणून पक्का माल तयार झाल्यानंतर त्यांत मिळणाऱ्या फायद्यापेक्षां कच्च्या मालाच्या विक्रींतच व्यापाऱ्यांना वाजवीपेक्षां जास्त फायदा मिळावा असं सरकारचं धोरण असल्यानं कच्च्या मालाच्या निर्यातीवरच व्यापाऱ्यांचं लक्ष खिळून राहिलं. शिवाय इथं येणारा पक्का माल चढ्या भावांत विकण्याची ह्याच व्यापाऱ्यांना सवलत मिळाल्यानं दोन्ही व्यवहारांत डोळे दिपून जातील इतका फायदा व्यापाऱ्यांना होऊं लागला. हिंदुस्थानांतील व्यापारी श्रीमंत झाले, पण त्यामुळं हिंदुस्थानांतील उद्योगधंदे खालावत गेले. फार प्राचीन काळीं व्यापाऱ्यांनीं किती फायदा घ्यावा ह्यावर नियंत्रण असे; पण आतां सारीं नियंत्रणं नाहींशीं झाल्यानं व्यापाऱ्यांना उदंड द्रव्य दिसूं लागलं आणि त्यामुळं ही परकी साम्राज्यशाही व्यापाऱ्यांना सुद्धां हवीशी वाटूं लागली. व्यापारी गबर झाले, पण कला मारली गेली. कच्च्या मालाला भाव येऊं लागल्यामुळं व्यापाऱ्यांच्याप्रमाणंच हिंदुस्थानांतील नव्वद टक्के शेतकऱ्यांना सुद्धां पैसाच पैसा दिसूं लागला. पण ‘ लंकेंत सोन्याच्या विटा ’ ह्या न्यायानं पैसा येतो तसाच तो जातोहि, ह्याचा प्रकाश न पडल्यानं त्यांनाहि ही आमदानी फायद्याचीच वाटूं लागली. अशा रीतीनं हिंदुस्थानांतील समाज मिळणाऱ्या धनाच्या तेजानं दिपून गेला. पण राष्ट्रांतील चलन साम्राज्य सरकारच्या हातीं असल्यानं कांहीं व्यक्तींना जरी फायदा दिसत असला तरी राष्ट्राच्या संपत्तीला बेसुमार ओहोटीच लागलेली होती.

सहा हजार मैलांवरून हिंदुस्थानांत आलेले हे पाश्चात्य चाळीस कोटि हिंदवासियांवर सत्ता गाजवूं शकले हें जगांतील सात आश्चर्यांनंतरचं आठवं आश्चर्य आहे असं कित्येक लोकांना वाटतं. पण ह्या सरकारनं ह्याच्या राष्ट्राच्या नाड्या सुखशांतीच्या देखाव्यानं एकत्र बांधून त्या आपल्या हातांत ठेवल्या हें त्याचं खरंखुरं कारण आहे. समाजांतील

सान्या आवश्यक गोष्टींचं केंद्रीकरण हें ह्यांतलं मुख्य गमक आहे. पाणी सरकारच्या ताब्यांत, उजेड सरकारच्या ताब्यांत, वाहतूक सरकारच्या ताब्यांत, थोडक्यांत सांगायचं म्हणजे इथल्या व्यक्तींच्या ताब्यांतच नव्हे तर समाजाच्या ताब्यांत सुद्धां ह्यांतली कोणतीच गोष्ट राहिली नाहीं. सुरवाती सुरवातीला ह्या गोष्टींचं समाजमनाला कौतुक वाटलं खरं, पण त्याच वेळीं समाजांतील कांहीं शात्यांना आपल्या भयाण परावलंबनाची जाणीव झाली.

नुसत्या समाजाच्या आधिभौतिक नाड्याच तेवढ्या आखडून सरकार स्वस्थ बसलं नाहीं, तर समाजांतील बालमनाच्या रक्तवाहिन्यांवर सुद्धां त्यांनीं आपलं दडपण आणलं. आपल्या ह्या परोपकारी सरकारनं हिंदुस्थानांतील समाजाला ज्ञान देण्याकरितां म्हणून पाश्चात्य धर्तीवर शिक्षणसंस्थांची उभारणी केली. हिंदुस्थानांतील बालमनांना शिक्षण देण्याकरितां एकाच पद्धतीच्या सार्वजनिक शिक्षणाच्या शाळा हिंदुस्थानांत प्रथम पाश्चात्य धर्मप्रसारकांनीं सरकारच्या अनुज्ञेनं सुरू केल्या. शाळांच्या वेळा दुपारच्या झाल्या. इंग्रजी शिक्षणाला ह्या शाळांतून अवास्तव महत्त्व दिलं गेलं. ख्रिस्ती धर्मपुस्तकाचं शिक्षण सुद्धां आपल्या हिंदवी बालमनांवर लादलं गेलं. शिक्षणाचं ध्येय पार बदलून गेलं. ज्ञानदानाची ही गंगा हिंदवीसमाजाला ज्ञान देण्याकरितां सुरू झाली, कां आपल्या साम्राज्यशाहीचा पाया हिंदुस्थानांत दृढमूल करण्याकरितां, आपल्या शिक्षणानं गुलामीवृत्तीचं बाळकडू पाजून स्वाभिमानशून्य नोकरशाहीच्या निर्मितीकरितां सुरू झाली हा प्रश्नच आहे. परिणामावरून ठरवायचं तर ह्या शाळांतून शिक्षण घेतलेला विद्यार्थी खाकोटीला अर्जांचं भेंडोळं घेऊन नोकरीसाठीं वणवण करीत असलेलाच दृष्टीस पडतो. स्वतंत्र उद्योग करून पोट भरण्याची ताकद नाहीं, स्वाभिमान नाहीं, शाळाकॉलेजांत शिक्षण घेत असेपर्यंत नजरेच्या टप्प्यांत कोणतंच ध्येय नाहीं असा हा असहाय नी दुबळा विद्यार्थी जन्माची गुलामगिरी पत्करण्याकरितां जिवाचं रान करीत असतो. बालमनाची अशी कुचंबणा झालेल्या पिढ्या राष्ट्राच्या इतिहासांत जसजशा अधिकाधिक होऊं लागल्या त्या त्या प्रमाणांत आर्थि-

यतींतील एकेकाळचा बुद्धीनं प्रगल्भ समाज अधोगतीच्या गर्तेत अधिकाधिक खोल रुतूं लागला.

समाजाला कितीहि दुरवस्था आली तरी प्रत्येक पिढींत कांहीं विचारवंत आत्मे जनहिताकरितां धडपड करीत असतातच. ह्या विचारवंतांना चौभिंतींत कोंडून ठेवा, पारतंत्र्यांत डांबून टाका, गुलामगिरीच्या वातावरणांत ह्यांचा कोंडमारा करा, आपल्या मानसिक शक्तीच्या जोरावर ह्यांचं सामर्थ्य उफाळल्याशिवाय रहातच नाहीं. ह्यांच्या दिव्य दृष्टीला आपल्या समाजाची अवनती पहावतच नाहीं. स्वार्थत्यागाची पेटती ज्योत ह्यांना स्वस्थ बसूंच देत नाहीं. समाजमनावर आघात करण्याची ह्यांची इच्छाशक्ति आंतल्याआंत धुमसतां धुमसतां एकदम पेट घेते; आणि सभोंवार पसरलेला अंधार नाहींसा करण्याचा आटोकाट प्रयत्न करते. समाजाच्या अनवस्थेच्या कालांतील ह्या विचारवंत महात्म्यांना ही बालमनाची कुचंबणा पाहवली नाहीं. पाश्चात्य देशांतले हे धर्मप्रसारक आपल्या गोड भुलथापांनीं बालमनाला ग्रासून टाकताहेत हें त्यांना सहन झालं नाहीं. राष्ट्राची उभारणी बालमनावरच करतां येते हें तत्त्व त्यांना माहीत होतं. समाजांतील सारे प्रौढ पूर्णपणें परकी सत्तेच्या कच्छपीं लागले आहेत ह्याची यांना पुरेपूर जाणीव होती. बालमनावरचा हा पाश्चात्य धर्माचा पडदा वेळींच दूर सारला गेला नाहीं तर वैदिक धर्माच्या थडग्यावर बसून अश्रू ढाळण्याखेरीज आपल्याला कांहींच करितां येणार नाहीं, ह्या भीतीनं त्यांनीं ह्या धर्मप्रसारकी शाळांना पहिला तडाखा देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच धर्तीवर, तितक्याच त्यागी वृत्तीनं बालमनाला शिकवण देण्याच्या शाळा काढून त्यांनीं विद्यादेवीच्या मंदिरांत धडाडीनं सवता सुभा निर्माण केला.

पण हा शैक्षणिक प्रयत्न फक्त मिशनऱ्यांच्या शाळांवर तोडगा म्हणूनच होता. अखिल हिंदवीसमाजाची उठावणी करण्याचा विश्वप्रयत्न ह्यांत नव्हता. चारदोन स्वार्थत्यागी विचारवंतांनीं नव्या शाळा काढून बालमनं आपल्याकडं खेचण्याचा फक्त एक क्षीण प्रयत्न केला. हा प्रयत्न फक्त वरच्या थरापुरताच होता. हा वरवरचा लाटांचा खळखळाट समाजसमुद्राच्या तळच्या पाण्यांत खळबळाट करूं

शकला नाहीं. तो त्यांचा प्रयत्नहि नव्हता. मिशनऱ्यांच्या शाळांतून शिक्षण घेणारे विद्यार्थी ज्या दर्जाचे होते त्या विद्यार्थ्यांना ह्या नव्या शाळांचं आकर्षण वाटणं शक्य नव्हतं. राष्ट्रीय वृत्तीची जोपासना, हिंदुधर्माचं रक्षण, गुलामगिरीचा तिटकारा ह्या गोष्टींचं सहजस्फूर्त आकर्षण समाजाच्या तळच्या थरांत जितकं असतं त्या मानानं तें बुद्धिवादी वर्गात कमी असतं. म्हणून हे प्रयत्न यावे तितके यशालाभाला आले नाहींत. ज्या कांहीं थोड्या व्यक्तींनीं आपलीं मुलं ह्या शाळेंत पाठविण्याचं धाडस त्यावेळीं केलं त्यांना सरकारकडून थोडा धाकदपटशा मिळतांच त्यांचंहि धाडस विरघळलं आणि हा प्रयत्न जवळ जवळ फसला. त्या वेळच्या समाजहितवाद्यांनीं समाजांतील अगदीं खालच्या वर्गाच्या मनाचा कयास घेण्याचा प्रयत्न केला असता तर? पण त्या वेळीं तसा प्रयत्न झाला नाहीं व हें लोण खालपर्यंत पोहोंचूं शकलं नाहीं. हें जरी खरं असलं तरी ह्या पाश्चात्य शिक्षणसंस्थांवर घाव घालण्याचं धाडस मात्र त्या वेळच्या समाजवेत्यांनीं केलं.

तत्कालीन नेत्यांनीं समाजाची उठावणी करण्याचा अन्य मार्गानंहि प्रयत्न केला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या प्रारंभीं शासनसंस्थेच्या अनन्वित छळांची चीड येऊन ह्या शासनसंस्थेला नामोहरम करण्याकरितां, व्यक्तिनिष्ठ सूडानं बेभान झालेलीं मनं प्राणावर उदार होऊन जुलमी अधिकाऱ्यांचे खून करण्याला प्रवृत्त झालीं. अधिकाऱ्यांना दहशत बसावी म्हणून झालेले कांहीं प्रयत्न वाया गेले व कांहीं प्रयत्न यशस्वी झाले. एक व्यक्ति मारली गेली त्या ठिकाणीं दुसरी आली आणि दुसरी मारली गेली त्या ठिकाणीं तिसरी आली. व्यक्तींच्या खुनांनीं संघटित साम्राज्याला हादरा बसणं शक्य नसतं. ह्या क्रान्तिकारकांनीं गुप्तसंस्थांची उभारणी केली, आणाशपथा घेतल्या. अगदीं तापलेल्या सळया हातीं घेऊन किंवा दिव्याच्या तापलेल्या कांचा शांत मनानं नी हंसतमुखानं हातीं धरून त्यांनीं आपापली निष्ठा सिद्ध केली होती. आपण केलेले गुप्तकट उघडकीला येऊं नयेत म्हणून या कटवाल्यांच्या सभा कुठं भरत असत ह्याचा कुणालाच पत्ता नसे. कधीं एकाद्या जंगलांत एकत्र जमावं तर कधीं एकाद्या भुताटकीनं पछाड-

लेल्या पडक्या घरांत रात्रींच्या वेळीं सगळ्यांनीं एकत्र यावं, कधीं नावेंत बसून नदीच्या मध्यावर जाऊन त्या ठिकाणीं आपल्या कटाची उभारणी करावी तर कधीं पुस्तकाच्या पोटांत पिस्तूल घालून शस्त्राची आयात करावी, अशा निरनिराळ्या मार्गांनीं साम्राज्यशाहीला घाबरवून सोड-ण्याचे प्रयत्न ह्या क्रान्तिकारकांच्या इतिहासांत कांहीं थोडेथोडके नाहींत. कागद नाहीं, लिखाण नाहीं, ठराव नाहींत, अगदीं ह्या कानाचं त्या कानाला सुद्धां कळूं नये इतकी खबरदारी हे क्रांतिकारक घेत असत. दुर्दै-वानं पकडला गेलेला कटवाला हातीं धर्मपुस्तक घेऊन फांसावर चढा-यला कधींच कचरत नसे. एकादा कटवाला फुटणार आहे असा सुगावा लागतांच त्याचा त्या क्षणाला खून पडत असे, असं असून सुद्धां कांहीं कटवाले फितुर झाले, कांहीं कट बाहेर फुटले, कटवाल्यांचे गटच्या गट फांसावर लटकले. अशा तऱ्हेची व्यक्तिव्यक्तींची झुंज बरेच दिवस चालू होती. कधीं अधिकाऱ्यांचे खून झालेले ऐकूं येत तर कधीं कटवाल्यांना फांसावर चढविल्याच्या रोमांचकारी प्रसंगांच्या हकीगती कानावर येत. कांहीं असलं तरी हे प्रयत्न मूठभर व्यक्तींचे होते. ह्यांना समाजमनाचा पाठिंबा नव्हता. क्रान्तिकारकांच्या जोमदार प्रयत्नांबद्दल आम्हाला आदर आहे. भारतीय इतिहासांत साऱ्या क्रान्तिकारकांचीं नांवं त्यांनीं स्वतःच्या रक्तानं केलेल्या सह्यांच्या रूपानं अजरामर झालीं आहेत. साऱ्या हुता-त्म्यांच्या पुढं आदरानं मस्तक नमविणं हें आम्हा हिंदवासियांचं आद्य कर्तव्य आहे. पण आज इथं, उद्यां तिथं, परवां आणखी कुठंतरी असे अलग अलग प्रयत्न झाल्यानं आणि खालपासून वरपर्यंत सारा समाज खडबडून एकाच वेळीं प्रयत्नाला न लागल्यानं हे क्रान्तिप्रयत्न आग-गाडीच्या एंजिनांतून उडणाऱ्या ठिणग्यांप्रमाणं हवेंत मिसळून गेले. साऱ्या समाजाचीं मनं नुकत्याच झालेल्या सत्तावन सालच्या प्रयत्नांतून होरपळून निघालीं होतीं. सत्तावन सालीं पेटलेल्या क्रान्तीच्या वणव्यांतून चुकून-माकून इतस्ततः विखुरल्या गेलेल्या ह्या एकाकी ठिणग्या होत्या.

ह्या मानानं सत्तावन सालचा क्रान्तीचा प्रयत्न अधिक जोरकस होता. साम्राज्य सरकारच्या कुटिल कारवायांनीं दुखावलेले राजे त्यांत होते. हातची सार्वभौम सत्ता नुक्तीच दृष्टीआड झालेले पेशव्यांचे वंशज त्यांत

सामील होते. चरबी लावलेल्या, बंदुकीच्या, दातानं वापरायच्या काडतु-सांनीं धर्मभावना दुखवले गेलेले शिपाई त्यांत होते. त्याचप्रमाणं माय-देशाच्या पारतंत्र्यानं अंतर्बाह्य पेटलेले हिंदभूचे सुपुत्र त्यांत सामील होते. सत्तावन सालचं समर चोहोंबाजूंनीं अचानक पेटलं होतं. परकी सत्तेचा डोलारा कोसळून पाडण्याचा तो भगीरथ प्रयत्न होता. त्या प्रयत्नांत प्रत्यक्ष भाग घेतलेल्या हिंदवीरांचीच नुस्ती राखरांगोळी झाली नाहीं तर त्या रणधीरांचं नांव सांगणाऱ्या त्यांच्या वंशजांना सुद्धां अन्नासाठीं वण वण करीत फिरतां फिरतां पुरेवाट झाली.

ह्या लढ्यांत जवळ जवळ सगळं एतद्देशीय सैन्य फितुर झालं होतं. हा लढा यशस्वी झाला असता तर ह्या लढ्यांतले विजयी वीर हिंदुपद-पातशाहीचे संस्थापक म्हणून मिरवले असते. प्रयत्न फोल ठरला म्हणून त्याला बंड हें नांव दिलं गेलं. पण हें बंड नसून स्वातंत्र्याकरितां तळमळ-णाऱ्या वीरांचा हा लढा होता. आपलं गेलेलं स्वातंत्र्य परत मिळविण्या-करितां केलेलं हें युद्ध होतं. शत्रूला आह्वान देऊन युद्धाचा पुकारा केला गेला होता. हिंदुस्थानच्या बंदराबंदरांतून शासनकर्त्यांच्या बोटी सज्ज होत्या. बंडवाले यशस्वी होताहेत असं दिसतांच बोटींत पाय ठेवून मायदेश गांठायची त्यांची तयारी होती. ह्या प्रयत्नांत आपल्या वीरांना यश आलं नाहीं ह्याचं कारण पुरती उठावणी झालेली नव्हती. गांवागांवांतून, घराघरांतून, देशाच्या कोपऱ्याकोपऱ्यांतून जो आवाज एकमनानं उठायला पाहिजे होता तो आवाज उठला नव्हता. समाजांतील इतर घटक भय-भीत होऊन काय होतंय तें पहात तटस्थ उभे होते. आपल्या देश-बांधवांचा जय झाला असता तर त्या विजयांत त्या सर्वांनीं आनंदानं भाग घेतला असता. पण आपले बांधव धाडसी प्रयत्न करीत असतांना त्यांच्या प्रयत्नांत सामील होणं हें एकच आपल्या जीविताचं ध्येय आहे अशा तऱ्हेची समाजमनाची उठावणी करण्याचं कार्य त्यावेळीं झालेलं नव्हतं. म्हणूनच रणरागिणीला वीरांच्या तुंडांची मुंडावळ बांधून सुद्धां ह्या स्वातंत्र्यसमरांत रणरागिणी संतुष्ट झाली नाहीं आणि मनोभावानं केल्या प्रयत्नांना अपयशच आलं. ह्या अपयशाचे परिणाम मात्र फारच भयंकर झाले. जिकडं तिकडं संशयाचं वातावरण पसरलं. धरपकडीला ऊत

आला. ह्या युद्धांतले वीर जिथं सांपडतील तिथं निष्ठुरपणानं चिरडले गेले. समाजाला इतकी दहशत बसली कीं सगळीकडं अगदीं सामसूम झालं. तोंडांतून ब्र काढायची कोणांतहि ताकद नव्हती. ह्याचं अनवस्थेचा परिणाम मागं वर्णिलेल्या क्रान्तिकारकांच्या चळवळीवर झाला होता. क्रान्तिकारकांना समाजाकडून भरपूर साहाय्य मिळालं नाहीं ह्याचं कारण नुकत्याच झालेल्या उठावणीचा भेसुर शेवट अद्याप त्यांच्या नजरे-समोर होता.

समाजांत जसं संशयाचं वातावरण वाढीला लागलं होतं त्याचप्रमाणं शासनसंस्थेंत सुद्धां समाजाबद्दल कमालीचा संशय प्रत्ययाला येत होता. आजवर साम्राज्याचे शास्ते कोणाहि इंग्रजी जाणणाऱ्या माणसाला त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणं लहानमोठया विश्वासाच्या नोकऱ्या मोकळेपणानं देत असत. पण आतां कोणत्याहि एतद्देशीय माणसाला नोकरी देतांना ते बराच विचार करूं लागले. विशेषत: बुद्धिवादी वर्गांतील व्यक्तींना अधिकाराच्या नोकऱ्या देतांना त्याच्या नातेवाइकांच्या, त्याच्या इष्ट-मित्रांच्या प्रामाणिकपणाबद्दल नी इमानदारीबद्दल विचार करणं त्यांना जरूर झालं. येथील लोकांना नोकऱ्या न देतां सरकारचं कामकाज चालणं शक्य नव्हतं. इथले लोक नोकरींत घेतल्यास ते आपल्या विरुद्ध केव्हां उठतील ह्याचा नेम नव्हता. अशा वेळीं शास्ते आणि शासित ह्यांच्यामध्यें परस्परविश्वासाचं नातं असणं जरूर होतं. सत्तावन सालचा स्वातंत्र्यसंग्राम ज्याप्रमाणं शास्ते नी शासित ह्यांच्या मनांत परस्पर-संशय उत्पन्न करण्याला कारणीभूत झाला त्याचप्रमाणं हिंदुस्थानांतील ज्या राष्ट्रसभेनें आज हिंदुस्थानाला स्वातंत्र्याच्या पहिल्या पायरीवर आणून उभं केलं आहे त्या राष्ट्रसभेच्या स्थापनेलाहि हाच संग्राम कारणीभूत झाला. कधीं कधीं वाईटांतून चांगलं निघत असतं. सत्ता-वनच्या स्वातंत्र्यसंग्रामानंतर निर्माण झालेलं संशयाचं वातावरण नाहींसं करण्याच्या उद्देशानं शास्ते आणि शासित ह्यांचा त्यावेळचा जोडदुवा म्हणजेच आजची आपली राष्ट्रसभा. राष्ट्रसभेची मूळ कल्पना नोकर-शाहींतील एका बड्या परकीय अधिकाऱ्याची आहे. शासनाचं काम करीत असतांना, संशयाच्या वातावरणामुळं प्रत्यक्ष अनुभवानं राज्य-

शासनांत निर्माण होणाऱ्या अडथळ्यांचा हिंदी राष्ट्रसभा हा परिपाक आहे. शास्ते नी शासित ह्यांच्यांतील अविश्वास कळसाला पोंचण्यापूर्वी शासितांचा समझोता करण्याकरितां त्या वेळच्या गव्हर्नर जनलरनीं स्वतः परिश्रम घेऊन हिंदी जनतेंत विश्वास निर्माण करण्याकरितां ह्या राष्ट्रीय सभेचा आराखडा तयार केला. आपण गव्हर्नर जनरल असेपर्यंत आपलं नांव पुढं आणायचं नाहीं असं त्यांनीं त्यावेळच्या कार्यकर्त्यांना स्पष्ट बजाविलं होतं. सरकारशीं भांडणारा विरोधी गट राष्ट्रांत असल्याशिवाय राज्ययंत्रांतील दोष शासनसंस्थेच्या नजरेपुढं येत नाहींत ह्या कल्पनेनं सनदशीर मार्गानं राज्ययंत्रांतील दोष दाखविण्याकरितां ह्या संस्थेचा पाया आपल्या राज्यकर्त्यांनींच घातला आहे.

ह्या आपल्या राष्ट्रसभेची कामगिरी अवर्णनीय आहे. ‘आम्ही सरकारला भीत नाहीं’ असा पुकारा प्रथम राष्ट्रसभेनंच केला. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे’ हें ध्येयवाक्य राष्ट्रसभेंतच उच्चारलं गेलं. ‘जुलमी नोकरशाहीला विरोध करून आपलं गेलेलं स्वातंत्र्य परत मिळाल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाहीं’ असं राज्यकर्त्यांना निक्षून सांगण्याचं धाडस ह्याच राष्ट्रसभेनं केलं. विपुलतेच्या आणि समृद्धीच्या शिखरावर असलेल्या हिंदुस्थान देशाला दरिद्री नी कंगाल बनविण्याचं सारं पाप ह्या परकी राज्यकर्त्यांनींच केलं आहे असं सरकारला उघड उघड बजाविण्याची अवघड कामगिरी ह्याच राष्ट्रसभेनं केली आहे. आमच्यांतील तंट्याचं मूळ वाढीला लावून त्या दुहीच्या जिवावर आपल्यावर परकी सत्ता अम्मल गाजविते म्हणून साऱ्या हिंदवासियांना एकीच्या चौथऱ्यावर आणून उभं करण्याचा भगीरथ प्रयत्न ह्या राष्ट्रसभेनंच केला. हिंदुमुसलमानांचं शतकानुशतकं चालत आलेलं हाडवैर नाहींसं करून दोघांनीं एकदिलानं नी एकआवाजानं स्वातंत्र्याची मागणी केल्याशिवाय आपल्याला आपलं ध्येय गांठतां येणार नाहीं म्हणून ह्याच राष्ट्रसभेनं हिंदुमुसलमानांच्या एकीचा पुकारा केला. शस्त्रानं शरीरावर ताबा मिळवितां येतो, पण मनावर ताबा मिळवायचा असेल तर त्याला मानसिक गवसणीच घालावी लागेल हें ह्या आपल्या राष्ट्रसभेनंच सिद्ध केलं. सत्य जगापुढं मांडून तें पटवून देण्याकरितां सत्याग्रहाचं निशाण

हातीं घेऊन सशस्त्र राजसत्तेशीं निःशस्त्र समाजाला यशस्वी रीतीनं झगडतां येतं हा मार्ग ह्याच राष्ट्रसभेनं शोधून काढला. अहिंसेनं हिंसेवरहि मात करतां येते हें तत्त्व ह्याच राष्ट्रसभेनं जगाला पटवून दिलं.

आज आपल्या देशांत राष्ट्रसभेच्या चिकाटीच्या प्रयत्नांनीं, राष्ट्रभक्तांच्या अलोट स्वार्थत्यागानं, आणि समाजाच्या तळच्या थरापर्यंत पोंचलेल्या जागृतीनं स्वराज्याचा सूर्य क्षितिजावर आलेला दिसतो आहे. पण हा सूर्य क्षितिजावर येतो न येतो इतक्यांत त्याला आपसांतील दुहीचं खग्रास ग्रहण लागतं आहे कीं काय अशी भीति वाटते आहे. अशा वेळीं राष्ट्रधुरीणांचं लक्ष हिंदुस्थानच्या ऐक्यावर खिळणं साहजिक आहे. पण राष्ट्राचे पुढारी जों जों ऐक्याचे प्रयत्न अधिक उत्साहानं करताहेत तों तों दुहीचे वारे अधिकाधिक जोरानं घोंघावूं लागले आहेत. हिंदुमुसलमानांच्या ऐक्याच्या प्रयत्नांतून जातीय तेढ वाढीला लागते आहे. हरिजनांच्यावर आजवर होत आलेले अन्याय दूर करण्याकरितां इकडं बिलं पास होत आहेत, तर तिकडं हरिजन विरोधाचीं निदर्शनं करीत आहेत. हिंदुमहासभावाले, रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष, कम्युनिस्ट, कॉंग्रेस सोशॅलिस्ट, साऱ्यांनीं राष्ट्रसभेला विरोध करण्याचं कंकणच हातीं बांधलं आहे. शासनसंस्थेला विरोधाची जरुरी असते हें जरी खरं असलं तरी आपलं राष्ट्रीय सरकार हाणून पाडून त्या ठिकाणीं पुन्हां परकी सरकारची स्थापना करण्याच्या प्रयत्नानं आपलं कोणतं उद्दिष्ट साध्य होणार आहे हें समजत नाहीं.

कारण फक्त एकच आहे. प्रत्येक नेत्याला अधिकाराची आणि मोठेपणाची हांव असल्यानं जो तो आपला मोठेपणा सिद्ध करण्याच्या प्रयत्नांत आहे. पण अशा ह्या व्यक्तिनिष्ठ मोठेपणाच्या प्रयत्नांत समाजाचीं शकलं झाल्यास फिरून गुलामगिरीचे हाल ह्या निरनिराळ्या पक्षप्रमुखांसकट साऱ्या समाजाला भोगावे लागतील ह्याचा विचार कोणीच करीत नाहीं. अशा ह्या विरोधी वाऱ्यांच्या वातावरणांत राष्ट्रसभेचं तारू फॅसिझमकडे वाहवत जाणार आहे, का यादवीच्या खडकावर आदळून फुटणार आहे, कांहींच समजत नाहीं.

अलिकडे राष्ट्रांत खून, मारामाऱ्या, जाळपोळ, लुटालूट, संप ह्या साऱ्या गोष्टींनीं धुमाकूळ घातला आहे. मी मी म्हणणारे राष्ट्रसभावाले काळ्या

बाजाराच्या अंधारांत पैसा कमवून राष्ट्रघातकीपणाचा कडेलोट करीत असल्याबद्दल गवगवा झाला आहे. राष्ट्रसभेच्या नांवावर मतं मिळवून निवडून आलेले आमदार लाचलुचपतीला आळा घालण्याच्या प्रयत्नांत स्वतःचे हातच लाचलुचपतीनं बरबटून घेत आहेत कीं काय अशी समाजाला शंका येऊं लागली आहे. मजूरकिसानांना स्वातंत्र्य मिळवून देऊं इच्छिणारे पुढारी मोठमोठ्या अधिकारांच्या जागांवरं विराजमान होऊन, आपल्या राज्यशासनाविरुद्ध ओरड करणाऱ्या लोकांना स्थानबद्ध करताहेत, हद्दपार करताहेत, गोळ्या घालताहेत. परकीय सत्तेच्या अमदानींत भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, समाजस्वातंत्र्य अशा न्याय्य हक्कांची मुक्तकंठानं मागणी करणारे हेच समाजाचे कैवारी वर्तमानपत्रां-कडून हजारांनीं जामीन घेताहेत.

हा दोष आपल्या प्राचीन हिंदवी संस्कृतीचा नसून आजची हिंदु-स्थानांतील प्रौढ जनता विद्यार्थीदशेंत ज्या वातावरणांत वावरत होती त्या वातावरणांतील अनिष्ट संस्कारांचा आहे. आपणा सर्वांच्या मनावर बालपणीं पाश्चात्य संस्कृतीची नी शिक्षणाची छाप पडल्यामुळं त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आपण आक्रमीत असलेला हा मार्ग आपल्याला कधींहि हितावह होणार नाहीं. आजच्या प्रौढ समाजाचीं मनं स्वार्थानं भारलेलीं आहेत हें आपल्याला नाकबूल करतां येणार नाहीं. अशा वेळीं प्रौढ जनतेवर नियंत्रण घालण्याचे जितके जितके जोरदार प्रयत्न होत जातील तितकी तितकी आपल्या राष्ट्राची बसत आलेली ही घडी अधिकाधिक विसकटत जाणार आहे. ह्याकरितां प्रौढ मनं कांहीं काळ आहेत त्या स्थितींतच सोडून बालमनाची म्हणजे हिंदुस्थानच्या भावी पिढीची जोपासना करण्याचा आजच्या राष्ट्रीय सरकारनं प्रयत्न केला पाहिजे. सध्यांच्या विद्यार्थ्यांची पिढी बुद्धिवान, सामर्थ्यवान नी ध्येयनिष्ठ बनविण्याचं सामर्थ्य आजच्या सरकारांत आहे. अशा तऱ्हेचे प्रयत्न आज कसोशीनें झाल्यास आजपासून सुमारें दहा वर्षांतच आपल्या चाळीस कोटींच्या राष्ट्राला उज्ज्वल भवितव्य आहे.

गुंडविरोधी बिलं पसार करणं, एकपत्नीव्रताचा कायदा करणं, कूळ-कायदा अमलांत आणणं, घटस्फोटाचा कायदा करणं वगैरे गोष्टींना आज

खरंखुरं महत्त्व नसून समाजातील ज्या दोषांमुळं अशा तऱ्हेचे कायदे करणं जरूर पडतं ते समाजांतील दोष मुळापासून उखडून काढण्याकरितां बालमनांची निर्दोष जोपासना करण्याचा सारं सामर्थ्य एकवटून धडाडीनं प्रयत्न करणं, हें आजच्या सरकारचं खरंखुरं कर्तव्य आहे. हल्लींच्या शाळाकॉलेजांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची दिशा बदलून आजच्या हिंदुस्थानांतला विद्यार्थी उद्यांच्या हिंदुस्थानांतला आदर्श नागरिक बनविण्याकडं आजच्या राष्ट्रीय सरकारनं आपली नजर ताबडतोब वळविली पाहिजे. विरोधाच्या वागुलबोवानं भेदरून जाण्याचं कारण नाहीं. आज पसार होणाऱ्या राष्ट्रीय सरकारच्या प्रत्येक बिलाला विरोध होतोच आहे. पण आजच्या विद्यार्थ्यांतून उद्यांचा बलवान हिंदुस्थान निर्माण करण्याच्या ध्येयानं आजच्या शाळाकॉलेजांतून तातडीनं योग्य बदल केल्याशिवाय स्वतंत्र हिंदुस्थानचं चिरस्थायी सरकार बनवितां येणार नाहीं आणि स्वतंत्र हिंदुस्थान सरकारला आदर्श आर्यसंस्कृतीच्या सुस्थितीचे धडे पाश्चात्य राष्ट्रांना देतां पण येणार नाहींत. फांद्यांना पाणी घालून झाडाला खराखुरा तजेला येत नाहीं. कच्च्या पायावर उभारलेली इमारत कोसळल्याशिवाय रहात नाहीं. त्याचप्रमाणं ज्या राष्ट्रांतील बालगोपालांच्या मनांची घडण सामर्थ्यवान बनत नाहीं त्या राष्ट्राचा चिरकालीन उत्कर्ष कधींच होत नाहीं. म्हणून आजच्या विद्यार्थीसृष्टींत नवचैतन्य आणणं हें आजच्या राष्ट्रीय सरकारचं कर्तव्य आहे.

राष्ट्रांतील बालमनांतून नवचैतन्य उत्पन्न करण्याकरितां कोणत्या गोष्टींचा विचार करणं जरूर आहे ह्याचाच उहापोह महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानच्या उज्ज्वल वैदिक इतिहासाला साजेल अशी पिढी तयार करावयाची झाल्यास बालमनाच्या जोपासनेची दिशा आमूलाग्र बदलली पाहिजे. मानवजातींतला प्रत्येक माणूस महात्मा बनला पाहिजे, प्रत्येक व्यक्ति स्वयंपूर्ण झाली पाहिजे, प्रत्येक राष्ट्राच्या जयिष्णु वृत्तीवर वर्धिष्णु वृत्तीची छाप पडायला पाहिजे. अशा तऱ्हेचीं बालमनं तयार करण्याचा चंग आर्यावर्तातील लोकांनींच बांधला पाहिजे. महात्माजींसारखे आजन्म फकिरी पत्करून संन्याशाच्या संसाराची उभारणी करणारे कर्तव्यनिष्ठुर यती आज आपल्याला नेते म्हणून लाभले आहेत. महात्माजींना

नांवं ठेवणारे लोक कैक आहेत. पण आज आपण ज्या मार्गानं यशाच्या पहिल्या पायरीवर येऊन उभे राहिलों आहोंत तो अनत्याचारी अहिंसेचा मार्ग ज्यांनीं आपल्याला दाखविला, इतकंच नव्हे तर सत्य–अहिंसेच्या प्रतिकारानं पाशवी शक्तीवर यशस्वी रीतीनं मात करतां येते, हें उदाहरण ज्या शिकवणुकीनं आपल्याला सुलभ रीतीनं प्रत्यक्ष सोडवून दाखविलं त्या महात्म्याच्या तत्त्वज्ञानाचा विचार केल्याशिवाय मानवीमनाच्या सामर्थ्याचा उहापोह अपुराच राहील.

महात्माजींच्या शिकवणुकींत तयार झालेले भालदार नी शिलेदार आज हिंदुस्थानावर राज्य करताहेत. विमानांतून लंडनला जाऊन मुख्य प्रधानाशीं चर्चा करताहेत. पण ज्या महात्म्याच्या पुण्यप्रसादानं, अविश्रांत श्रमानं, मानसिक एकतानतेच्या सामर्थ्यानं आज राष्ट्रीय सभेचा झेंडा डौलानं फडकत राहिला आहे त्या महात्म्यानं अत्याचारानं व्याप्त झालेल्या खेड्यांतून समाजमनाचा गेलेला तोल सांवरून धरण्याकरितां, जनताजनार्दनाची कायावाचामनेंकरून सेवा करण्याकरितां निःशस्त्र, असहाय, एका वस्त्रानिशीं आपलीं प्रार्थनागीतं गात पायीं प्रवासहि केला. महात्माजींच्या एका शब्दावर टाटा–बिर्लांच्या शेंकडो मोटारी त्यांच्या दाराशीं उभ्या राहिल्या असत्या. त्यांच्याकरितां, त्यांना प्रवास करावयाच्या प्रदेशांतून, छप्पन्न आगगाड्यांच्या शिट्या फुंकल्या गेल्या असत्या. आगगाड्या नसलेल्या ठिकाणीं महात्माजींच्या पुढं पुढं नवीन आगगाड्यांचे रूळ टाकले गेले असते. त्यांना विमानांतून प्रवास करायचा असता तर सरकारी विमानं त्यांच्या निवासस्थानाभोंवतीं घिरट्या घालीत राहिलीं असतीं. ह्या आर्यावर्ताच्या अनभिषिक्त राजाकरितां वाटतील त्या गोष्टी केल्या गेल्या असत्या. सरकारला महात्माजींच्या सुरक्षिततेची भीति वाटत होती, म्हणून त्यांनीं महात्माजींना संरक्षण देण्याचं ठरविलं. पण महात्माजींचं मानसिक सामर्थ्य इतकं जबरदस्त कीं, त्यांची मरणाची भीतिच नाहींशी झालेली. 'तुझ्या हृदयाचं प्रेम मला दे' अशी प्रेमाची भिक्षा मागत महात्माजी जगाला मनाच्या मिलाफाचे पाठ देण्याची शिकस्त करीत. ह्या एकांतिक ध्येयनिष्ठेंतून साऱ्या जगावर प्रेमाचं

अधिराज्य स्थापन करणारं तत्त्व स्फूर्त होणार आहे असा आमचा विश्वास आहे आणि म्हणूनच ह्यापुढील प्रकरणांत गांधीवादाचा विचार करून ह्या नव्या' शिकवणुकींतून दृग्गोचर होणारा ध्येयतारा मानवीमनाला कोणता प्रकाश देणार आहे ह्याचा विचार करून त्यानंतर आज आपली स्थिति काय आहे व पुढं ती कशी व्हायला पाहिजे ह्याची रूपरेखा आखणं सुलभ होणार आहे.

—*—

१० : स्वयंपूर्णता

ह्या पृथ्वीच्या पाठीवर मानवीसमाज आज हजारों वर्षं नांदत आलेला आहे. ह्या हजारों वर्षांत मानवजातीच्या कित्येक पिढ्या आल्या नी कित्येक पिढ्या नामशेष झाल्या. यापुढं सुद्धां ही मानवजात आणखी किती वर्षं ह्या पृथ्वीतलावर वावरणार ह्याचं भविष्य कोणत्याहि ज्योतिषानं वर्तविलेलं नाहीं. ज्योतिषांचं ज्योतिष हेंच मुळीं सूर्यचंद्रादिकांच्या गतींवरून वर्तविलं जात असल्यानं ह्या सूर्यमालेचा शेवट केव्हां होईल हें गणित ह्या ग्रहांच्या गतींवरून टाकणं अशक्य आहे. ह्या मानवजातीचीं आजवरचीं अनेक स्थित्यंतरं पाहिलीं म्हणजे भविष्यकालांत अशाच प्रकारची घडामोड मानवजातींत होत राहणार असं मात्र अनुमानानं सिद्ध होतं.

वैदिक परंपरा तुटली, ग्रीक तत्त्वज्ञान लयाला गेलं, बहुतेक धर्मप्रणेत्यांचं धार्मिक शासन फक्त त्या त्या धर्ममतांच्या प्रार्थनामंदिरांतूनच शिल्लक राहिलं. रोमन साम्राज्य उधळलं गेलं, अशोकाचे फक्त शिलालेखच शिल्लक राहिले, नेपोलिअन इतिहासजमा झाला, मराठेशाहीचा ऱ्हास झाला, मोगल पातशाही जमीनदोस्त झाली, पेशवाई धुळीला मिळाली. जुने गेले, नवे आले, नवे आले ते जुने होऊन लयाला गेले. पण मानवीसमाज मात्र रोज नव्या तेजानं आणि ताज्या दमानं जगाच्या पाठीवर वावरतो आहे. समाजांत व्यक्ति जन्माला येते, कांहीं काल समाजांत तारुण्यानं बहरते, त्यानंतर ती व्यक्ति उताराला लागते, म्हातारी होते आणि अखेर पंचमहाभूतांशीं समरस होऊन नाहींशी होते. पण समाज मात्र मानवतेच्या उत्पत्तीपासून आतांपर्यंत अधिकाधिक बहरतच चालला आहे. सुरवातीला जगाच्या पाठीवर बाल, तरुण, वृद्ध असे पांचपंचवीस लोकच वावरत असतील तर आज मात्र जगाच्या पाठीवर कोट्यवधि माणसं वावरताहेत. पण माणसांची संख्या वाढत असली तरी मानवजात मात्र जगाच्या सुरवातीपासून बाल, तरुण, वृद्ध स्त्रीपुरुषांचीच बनलेली आहे. जगाच्या सुर-

वातीच्या मानवजातींत आणि आजच्या मानवजातींत आकारविकारांच्या बाबतींत कोणताच विशेष फरक झालेला नाहीं. फक्त जगाच्या पाठीवर अफाट पसरलेल्या समाजमनाच्या ध्येयांत मात्र संकुचितपणा आल्या-सारखा वाटतो.

जगांत वावरणाऱ्या मानवेतर जीवमात्रांना बुद्धीची देणगी नसल्यानं त्यांतील आई आपल्या मुलाचा संबंध विसरते, बापाचा तर पत्ताच नसतो आणि त्यामुळं त्या जीवमात्रांतील बापलेक, बहीणभाऊ अगर आईमुलगा कांहीं दिवसांनीं जर अचानकपणें एकत्र आले तर त्यांची ओळख पटत नाहीं व कांहीं काळ ते परस्परांना शत्रुत्वाच्या नात्यानं पाहतात. एकदोन दिवस गेल्यावर त्यांना सुद्धां सहवासानं फिरून एकमेकांबद्दल आपलेपणा वाटूं लागतो. मानवजात ही त्यांच्यापेक्षां बुद्धीनं कितीतरी श्रेष्ठ आहे. आई-बाप, बहीणभाऊ ह्यांचीं नातीं तर आपण सहजासहजीं विसरत नाहींच, पण एकदां थोडी ओळख झाली म्हणजे ती सुद्धां बरेच दिवस टिकून राहते. कांहीं कांहीं वेळां अगदीं किरकोळ कारणानं जडलेली मैत्री एक-मेकाच्या जिवाला जीव देण्याइतकी निकट बनते. मानव हा जात्याच जर इतका समाजप्रिय आहे तर वैर, द्वेषभाव, अगदीं एकमेकाच्या जिवावर उठण्याच्या हीन मनोवृत्ती मानवीसमाजांत कां व कुठून आल्या ह्याचा अभ्यास मनोरंजक नी मूलगामी आहे.

एकदां एक माकडीण आपल्या पिलासकट एका हौदांत पडली. माकडीण न बुडण्याइतकं पाणी त्या हौदांत होतं; पण पिलूं मात्र पाण्यांत बुडूं लागलं. त्यावेळीं तें पिलूं दोन्ही हातांत धरून त्या आईनं त्या पिलाचा प्राण वाचविला. तिचा मालक जवळच होता. त्यानं त्या हौदांत हलकें हलकें जास्ती पाणी ओतण्याला सुरवात केली. पाणी जसजसं वर येऊं लागलं तसतसं त्या आईनं तें पिलूं आधीं कडेवर, मग खांद्यावर आणि त्यानंतर डोक्यावर घेतलं. जसजसं पाणी अधिकाधिक वाढूं लागलं तसतसं त्या माकडिणीच्या नाकातोंडांत पाणी जाऊन तिचा जीव गुदमरूं लागला. तिनं खूप खटपट केली पण अखेर आपल्या जिवावर बेतणार ही स्पष्ट कल्पना येतांच तिनं तें पिलूं आपल्या खालीं घालून स्वतःचा जीव

वाचविण्याकरितां ती त्याच्यावर उभी राहिली. मानवीसमाजाची तंतोतंत हीच परिस्थिति आहे.

सारी मानवजात समाजप्रिय आहे. आपल्या बरोबरीच्या माणसांत वावरावं, त्यांच्याबरोबर हसावं, खिदळावं, त्यांच्या अडचणींत आपण त्यांना मदत करावी, आपल्या अडचणीच्या वेळीं आपण दुसऱ्यांची मदत घ्यावी आणि जगांत सुखासमाधानानं नांदावं, अशा गुण्यागोविंदाच्या नी समतेच्या तत्त्वावरच प्रथम मानवीसमाजाला सुरवात झाली. कांहीं काळानंतर समाजांत स्वार्थावरून किरकोळ भांडणं सुरू झालीं. स्त्री, पैसा नी मोठेपणा ह्या त्रयीच्या स्वार्थपर विचारप्रवाहांतून छोटीं छोटीं युद्धंहि मानवीसमाजांत होऊं लागलीं. ह्या युद्धांचा शेवट कसाहि होवो, पण एकाचा जय नी दुसऱ्याचा पराजय झाल्यानंतर सुद्धां मानवजातीचे हे वेगवेगळे संघ फिरून खेळीमेळीनं रहात असत. आणखी कांहीं काळ गेल्यानंतर समृद्ध प्रदेश नी ओसाड प्रदेश ह्यांच्यांतील मानवजातींत विषमतेच्या कारणावरून लढाया होऊं लागल्या. ह्या लढायांतून दोन्ही समाज समपातळीवर आल्यानंतर फिरून समाजांतील वैरभाव विरून जाई. इथपर्यंत परिस्थिति बरीच आटोक्यांत होती.

यापुढं समाजांत यंत्रयुगाला सुरवात होतांच सारा मनु पालटला. यंत्रांच्या मदतीमुळं मानवीजीवन अधिकाधिक सुखी होऊं लागल्यानं यंत्र मानवतेचा मित्र बनलं. अधिक यंत्रं, अधिक सुख ह्या समप्रमाणाच्या अनुरोधानं जिकडं तिकडं यंत्रांची बेसुमार वाढ झाल्यानं राष्ट्रांत बेकारी माजूं लागली. ह्या यंत्रयुगांतून उद्भवलेल्या बेकारीवर इलाज म्हणून वाटल्यास मानवजातीनं खुशाल एकदोन महिने आपापसांत युद्ध करावं आणि साचलेले सांठे ओसरल्यावर फिरून सुखानं, समतेनं नी आनंदानं नांदावं. पण ह्याच्याऐवजीं आपल्या राष्ट्रांतील बेकारीला आळा घालण्याचा इलाज म्हणून एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला गांजूं लागलं. इथूनच यंत्रयुगाच्या दुष्परिणामाला सुरवात झाली.

आज जगाच्या पाठीवरील एकजात लहानमोठ्या राष्ट्रांतून यांत्रिक सामर्थ्याला महत्त्व दिलं जात असतांना जगाच्या पाठीवरील एका माय-

सलेल्या राष्ट्रानं यांत्रिक सुधारणा झुगारून देणं वेडेपणाचं आहे असं गांधीवादाचे विरोधक स्पष्ट बजावीत आहेत. त्यांची ही विचारसरणी अचूक आहे. पण गांधीवाद यांत्रिक सुधारणेविरुद्ध नाहीं हेंच आम्हांला त्यांना नम्रपणानं सुचवायचं आहे. यांत्रिक सुधारणा त्याज्य नसून यांत्रिक सुधारणांतून नाइलाजानं वाढीला लागलेली समाजांतील जयिष्णु वृत्ति त्याज्य आहे हें गांधीवादाचं अधिष्ठान आहे.

आम्हांला आगगाड्या पाहिजेत, आगबोटी पाहिजेत, तारायंत्रं पाहिजेत, विमानं पाहिजेत, रेडिओ पाहिजेत, सगळीं यंत्रं आम्हांला पाहिजे आहेत. पण हीं सारीं यंत्रं आम्हांला आमचे नोकर म्हणून पाहिजेत, मालक म्हणून नकोत. हिंदुस्थानची स्वयंपूर्णता जशीजशी वाढत जाईल त्या त्या प्रमाणांत हल्लीं उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीपेक्षां अधिक सामर्थ्यवान यंत्रसामुग्रीची देखील आम्हांला जरूर लागेल. पण एका राष्ट्रांतील यांत्रिक प्रगतीमागं लिहिला जाणारा दुसऱ्या राष्ट्राच्या गुलामगिरीचा इतिहास मात्र आम्हांला अट्टाहासानं टाळावयाचा आहे.

अखिल जगांतील मानवजातीच्या सुखसोयी कळसाला नेऊन भिडविण्याकरितां जास्तींत जास्त यांत्रिक सुधारणांची आम्हांला आवश्यकता आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक खेडं विजेच्या लखलखाटानं सुशोभित व्हावं अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. खेड्यांतील प्रत्येक घरांत रेडिओवरील कर्णमधुर आलापांची खैरात झाली पाहिजे असं आम्हांला वाटतं. आजकालच्या शहरांतून समाजाला मिळणाऱ्या सुखसोईंपेक्षां अधिक यांत्रिक सुखसोई प्रत्येक खेडुताला मिळाल्या पाहिजेत असा आमचा आग्रह आहे. पण ह्या यांत्रिक सुधारणांमुळं समाजांत प्रमाणाबाहेर विषमता फोफावत असेल, एका राष्ट्राला आपलं वर्चस्व दुसऱ्या राष्ट्रावर प्रस्थापित करण्याची जरूरी भासत असेल, यांत्रिक उत्पादनानं एका राष्ट्रांत तयार होणारा जादा माल दुसऱ्या राष्ट्रावर जुलमानं लादण्याची आवश्यकता उत्पन्न होत असेल तर आपलं राष्ट्र स्वयंपूर्ण करण्याकरितां लागणाऱ्या किमान यांत्रिक सुधारणांपेक्षां अधिक यांत्रिक सुधारणा आम्हांला नको आहेत असं गांधीवादाचं ठाम धोरण आहे. टकळी हें यंत्रच आहे, चरखा हें यंत्रच आहे, कापड विणण्याचा

माग हें यंत्रच आहे, तेलाचा घाणा हें यंत्रच आहे, तरफ नी कप्पी हीं यंत्रंच आहेत. ह्या साध्यासुध्या यंत्रांवर भागत नसेल तर यांहिपेक्षां सामर्थ्यवान यंत्रांचा खुशाल उपयोग करा. पण स्वतःच्या राष्ट्राला स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनंच फक्त ह्या यांत्रिक सुधारणांची मर्यादा आखली गेली पाहिजे हाच खरा गांधीवादाचा प्राण आहे. ह्या तत्त्वाला गांधीवाद म्हणा, समाजहितवाद म्हणा, स्वयंपूर्णतावाद म्हणा, कांहींहि म्हणा. महत्त्व नांवाला नसून विचारसरणीला आहे.

आज ह्या पाश्चात्य यांत्रिक सुधारणांनीं पुढारलेल्या राष्ट्रांची गुलामगिरी पत्करण्याचं पृथ्वीच्या पाठीवरील कित्येक मागसलेल्या राष्ट्रांच्या नशिबीं आलं. त्यांतच आपला हा आर्यावर्त आतांपर्यंत होता.

आर्यावर्तांतील समाजाच्या पायांतील गुलामगिरीच्या शृंखला तोडून टाकण्याचे प्रयत्न, पायीं शृंखला पडल्यापासूनच सुरू झाले होते. पाशवी सत्तेविरुद्ध पाशवी प्रयत्न झाले. अर्जविनंत्या झाल्या, पण कोणत्याहि मार्गांनीं परिस्थितींत सुधारणा होण्याचीं चिन्हं दिसेनात. ताकद नाहीं म्हणून सशस्त्र विरोध करितां येत नाहीं, आणि गुलामगिरींत तर चैन पडेना अशा विवंचनेंत हिंदवीसमाज असतांना आपल्या राष्ट्रीय सभेंत एका अभिनव विचारसरणीचा उदय झाला. ह्या नव्या विचारसरणींतलं सामर्थ्य आफ्रिकेंतील जुलमाविरुद्ध कसाला लागलेलं असल्यानं ही विचारसरणी चुकीची आहे असंहि म्हणतां येईना. पण ही विचारसरणी विसाव्या शतकांतील मानवीमनाशीं अगदींच विसंगत असल्यानं तिचा एकदम अंगीकार करण्याचं राष्ट्रीय सभेला धाडसहि होईना. ही विचारसरणी पूर्ण तर्कशुद्ध होती. ‘अन्यायानं, अनीतीनं, जुलमानं माझ्यावर सत्ता गाजविण्याचा प्रत्यक्ष परमेश्वराला देखील अधिकार नाहीं ’ हें ह्या नव्या विचारसरणीचं ब्रीदवाक्य आहे. मानवीमनांत धैर्याचा मेरु उभा करणारं हें ब्रीदवाक्य आहे. आपल्या हातीं सत्ता नाहीं, आपल्याजवळ पैसा नाहीं, आपल्याजवळ शस्त्रास्त्रं नाहींत; आपल्याजवळ मनुष्यबळ नाहीं. अशा परिस्थितींत एका मनाच्या आत्यंतिक तळमळीनं जेव्हां हें ब्रीदवाक्य उच्चारलं गेलं असेल त्यावेळीं त्या मनांत केवढं धैर्य उभं राहिलं असावं ह्याची कल्पनाच करवत नाहीं. हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेपुढं हें वाक्य उच्चारतांना कदा-

चित् आफ्रिकेंतील अनुभवानं त्या विभूतीच्या पाठीशीं आत्मविश्वासाचं सामर्थ्य असेल. पण हेंच ब्रीदवाक्य पहिल्या प्रथम ज्यावेळीं आफ्रिकेंतील जुलमी अधिकाऱ्याविरुद्ध उच्चारलं गेलं त्यावेळीं त्या मनांत सामर्थ्य कोठून आलं ?

सुसज्ज आणि संघटित राजसत्तेविरुद्ध एका व्यक्तीनं बंड पुकारणं ही घटनाच मुळीं असंभाव्य वाटते. त्याच वेळीं विरुद्ध बाजूच्या पाशवी शक्तीनं ह्या बंडखोर व्यक्तीवर गोळी झाडली असती, तर हें ब्रीदवाक्य उच्चारणाऱ्या व्यक्तीच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्या असत्या. पण कदाचित् त्या एका व्यक्तीऐवजीं शंभर मानवी व्यक्तींनीं निर्भय मनानं ह्याच ब्रीदवाक्याचा फिरून पुकारा केला असता. मनुष्य हा मरणाधीन असला तरी ह्या मानवदेहांत वावरणारं सत्तत्त्व चिरकाल टिकणारं आहे, ही विचारसरणी जरी बिनतोड असली तरी मनाला खंबीरपणा आणण्याला जी तपश्चर्या लागते ती तपश्चर्या पाठीशीं असल्याशिवाय अशा तऱ्हेचं असामान्य मनोधैर्य निर्माणच होऊं शकत नाहीं.

गौतमबुद्धानं ही तपश्चर्या बोधिवृक्षाखालीं केली. श्रीसमर्थांनीं 'सुमुहूर्ते सावधान' हे शब्द कानीं पडतांच बोहल्यावरून पळून जाऊन तपश्चर्या केली. पण आपल्या ह्या नव्या विचारसरणीच्या प्रवर्तकानं ही तपश्चर्या जगांत राहून, समाजांत मिसळूनच केली. वैदिक परंपरेंत उत्पन्न झालेल्या कर्मकांडाच्या अवास्तव महत्त्वावर चिडून जाऊन गौतमबुद्धानं वैदिक विचारसरणीविरुद्ध समाजमनाची आघाडी उभारली. समर्थांनीं हिंदवी-समाजाचा गेलेला तोल सावरून धरण्याकरितां समाजमनाची उठावणी केली. पण पृथ्वीच्या पाठीवरील सारा समाज एक आहे, समाजांत आज प्रचलित असलेला श्रेष्ठकनिष्ठभाव समाजानंच समाजाच्या सुखाकरितां उपयोगांत आणलेल्या अनवश्यक यंत्रसामुग्रींतूनच उपस्थित झालेले आहेत, ह्या यांत्रिक सामर्थ्यावर योग्य ते निर्बंध घातल्यास जगाच्या पाठीवरील सारा मानवीसमाज फिरून वेदकालीन समाजाप्रमाणं गुण्यागोविंदानं नांदूं लागेल, समाजाची मनोवृत्ति जयिष्णु नसून वर्धिष्णु आहे, हें वैदिकपरंपरेंतील आद्यतत्त्व ह्या विसाव्या शतकांत ज्या महात्म्यानं मांडलं तो महात्मा तपश्चर्येकरितां रानावनांत जाऊन राहिला नव्हता,

त्या महात्म्यांत जन्माला आल्यापासून कांहीं विशिष्ट श्रेष्ठपणाहि दिसून आला नव्हता; उलट सर्वसाधारण समाजांतील व्यक्तीपेक्षां त्या महात्म्यांत थोडाबहुत कमीपणाच होता. बुद्धि बेताची, शरीरसामर्थ्य बेताचं, चारित्र्यहि बेताचं, असं असून सुद्धां म्हणजे सर्वसाधारण मनुष्यापेक्षां ह्यांच्या अंगीं कांहीं मौलिक सद्गुण नसतांना सुद्धां ह्या एका व्यक्तीनं ह्या विसाव्या शतकांत मानवीसमाजांत जीं प्रचंड आंदोलनं घडवून आणिलीं त्यामुळं ह्या असाधारण व्यक्तीबद्दल आपल्याला अधिकच जिव्हाळा वाटतो. इंग्लंडमधील एकाद्या शास्त्रज्ञाला नोबेल प्राइझ् मिळाल्यापेक्षां हिंदुस्थानांतील एकाद्या शास्त्रज्ञाला तें मिळाल्यास आपल्याला अधिक आपलेपणा वाटतो. आपल्या वर्गांत असलेल्या एकाद्या व्यक्तीला तें मिळाल्यास त्याहूनहि अधिक जिव्हाळा वाटतो आणि आपल्या रोजच्या बैठकींतल्या एकाद्या दोस्ताला तें मिळाल्यास आपणा स्वतःला बक्षीस मिळाल्याइतका आपल्याला आनंद होतो. त्याचप्रमाणं महात्मा गांधींना मिळालेलं हें प्रचंड यश आपलंच आहे. आपणासारख्या साध्या माणसांना सुद्धां हें मिळवितां येण्यासारखं आहे. कारण शाळेंत असतांना महात्मा गांधी आपल्यापेक्षां कमी बुद्धिवान् होते, त्यांचा जन्म सुद्धां बुद्धिवादी वर्गांतला नाहीं, आपल्याइतकेच किंवा कदाचित् आपल्याहिपेक्षां अधिक मोहाला बळी पडणारे ते होते. थोडक्यांत सांगायचं म्हणजे त्यांच्यांत मुळांत अतिमानवतेचा कोणताहि अंश नव्हता. इतकंच नाहीं तर कांहीं कांहीं बाबतींत ते अमानव होते आणि म्हणूनच त्यांच्याबद्दल आपल्याला म्हणजे समाजांतील सर्वसामान्य व्यक्तींना आत्यंतिक आपलेपणा वाटतो.

महात्माजींनीं कोणतीहि अवघड योगसाधना केलेली नाहीं, तरीहि जगाच्या पाठीवर ते अद्वितीय योगी ठरले. नुसत्या चालण्याखेरीज इतर कोणताहि महत्त्वाचा व्यायाम त्यांना माहीत नसतांना सुद्धां जगांतील अत्यंत सामर्थ्यवान राष्ट्रांशीं उघड्या छातीनं ते सामना देऊं शकले. मेलेलीं माणसं उठविणं, नुसत्या हस्तस्पर्शानं रोग बरे करणं असा कोणताहि चमत्कार जगाला करून न दाखवितां साऱ्या मानवजातीचा अढळ विश्वास त्यांनीं संपादन केला. अशा तऱ्हेनं त्यांनीं सामान्यत्वांतून असा-

मन्यताला दिलेल्या उठावणीचं राहून राहून आश्चर्य वाटतं. ह्या त्यांच्या सामान्यपणांतच गांधीवादाचं सारसर्वस्व सामावलेलं आहे. समाजाचा साधेपणा हेंच खऱ्या सुखाचं साधन आहे. 'खोटें कधीं बोलूं नये, चोरी कधीं करूं नये, शिवी कोणा देऊं नये, कोणासंगें भांडूं नये,' इतकं त्यांचं तत्त्वज्ञान साधं आहे. प्रत्येक बालाच्या तोंडीं असलेल्या वरील सामान्य तत्त्वज्ञानाच्या सामर्थ्यावर त्यांनीं साऱ्या जगाला गवसणी कशी घातली हें कोडं मात्र अद्याप उलगडलेलं नाहीं. पाशवी शक्तीवर अधिष्ठित झालेल्या साऱ्या राष्ट्रांचे डोळे आज गांधीवादाकडं लागलेले आहेत. यांत्रिक सुधारणांमुळं त्रासून गेलेली अखिल जगांतील मानवजात स्वयंपूर्णतावाद यावर कोणता तोडगा करणार आहे ह्याकडं आशाळभूतपणानं पहात आहे. महात्माजींच्या नव्या शांतता-प्रयोगाला हिंदुस्थानांत भरपूर वाव मिळावा म्हणूनच कीं काय आपल्या साम्राज्यसरकारनं हिंदुस्थानच्या लोकांना संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचं टरविलं. उद्देश हा कीं खरोखरच ह्या नव्या विचारसरणीचा हिंदुस्थानच्या स्वयंपूर्णतेच्या दृष्टीनं उपयोग झाला तर त्याच विचारसरणीच्या जोरावर साऱ्या जगांत शांतता प्रस्थापित करावी. ह्याच्या उलट हें तत्त्व निकामी ठरलं तर फिरून हिंदुस्थानांत आपलं साम्राज्यवादी धोरण अमलांत आणावं. अशा तऱ्हेनं साऱ्या जगावर प्रेमाची मोहिनी टाकण्याचं कोणतं प्रबल तत्त्व गांधीवादांत आहे ह्याचा विचार महत्त्वाचा आहे.

मानवीसमाजाचं आत्यंतिक सुख हें गांधीवादाचं अधिष्ठान आहे. हें ध्येय नुसत्या शारीरिक सामर्थ्यानं साधलं जात नाहीं, हा आधुनिक जगाचा अनुभव जमेला धरून शरीरसामर्थ्यापेक्षां श्रेष्ठ असलेल्या मानसिक सामर्थ्यावरच ह्याची उठावणी करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. ज्या देवाणघेवाणीच्या तत्त्वावर प्राचीन काळीं समाज शांततेनं राहून आत्यंतिक सुखसाधना करीत होता त्याच तत्त्वावर आजहि मानवजातीला सुखी करितां येईल ह्यांत नवीन कांहींच नाहीं. मानवीसमाजांतील कांहीं व्यक्तींचं आत्यंतिक सुख म्हणजेच समाजांतील इतर कांहीं व्यक्तींचं आत्यंतिक दुःख ही विचारसरणी गाडून टाकणं फक्त प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक मोठेपणावरच अवलंबून आहे; इथपर्यंत विचारसरणी आल्यानंतर समाज-

मनाला सुखी करण्याकरितां व्यक्तीनं आपल्या आचरणाची कोणती दिशा ठरविली पाहिजे ह्याचा निश्चय करणं क्रमप्राप्त आहे.

दुसऱ्याला सुखी करण्याकरितां स्वतःला कष्ट झाले तरी ते कष्ट भोगण्यांत मनाला एक तऱ्हेचा आनंद होत असतो. ह्याच्या उलट स्वतःला सुखी करण्याकरितां दुसऱ्याला होणारे कष्ट आपल्याला पाहवत नाहींत. महात्माजींच्या विचारसरणींतील मर्म ह्यांतच आहे. दुसऱ्याला सुखी करण्यांत स्वतःला कष्ट पडले तरी आनंदच होतो आणि दुसऱ्याला सुखी करतांना आपल्याला कष्ट पडले नाहींत तर अधिकच आनंद होतो; म्हणून दुसऱ्याला सुखी करणं हें समाजांतील प्रत्येक व्यक्तीचं, निदान स्वतःच्या आनंदाच्या दृष्टीनं तरी, आद्यकर्तव्य आहे. मनानं सुद्धां हिंसा करूं नका ह्याचा अर्थ दुसऱ्याच्या शरीराला तर नाहींच, पण मनाला सुद्धां इजा होणार नाहीं असंच आपलं वर्तन ठेवा.

महात्माजींचं हें तत्त्वज्ञान पाळण्याचा त्यांनीं आमरण प्रयत्न केला. कट्टर विरोधकांना देखील महात्माजींनीं मानसिक अगर शारीरिक कष्ट कधींहि दिले नाहींत. त्यांना पकडायला आलेला अधिकारी असो, त्यांचा जीव घेण्याला उद्युक्त झालेला बॉम्बवाला मारेकरी असो किंवा हिंदवी स्वातंत्र्याच्या मार्गांतील एक काटा असो, प्रत्येकाचं त्यांनीं प्रेमानं, हंसतमुखानं आणि मित्र म्हणूनच स्वागत केलं. गांधी आणि आयर्विन ह्यांच्यामध्यें झालेल्या कराराला दोन सभ्य व्यक्तींमधील करार अशी असंभाव्य कलाटणी जरी राजकारणांत वेड्यावाकड्या कोलांट्या उड्या मारणाऱ्या राजकारणपटूंनीं दिली तरी सुद्धां महात्माजी चिडले नाहींत, त्यांचं रक्त उसळलं नाहीं, त्यांचा चरख्यावरील हात ढिला पडला नाहीं. त्यांनीं ह्या राजकीय डावांचं सुद्धां प्रेमानं, शांत मनानं नी हंसतमुखानंच स्वागत केलं. अहिंसा, सहनशीलता, क्षमा हे सद्गुण भेकड माणसांच्या लपण्याच्या जागा आहेत असं ज्यांना मानायचं असेल ते खुशाल मानोत; पण हंसतमुखानं आलेले आघात सहन करून तोंडच्या शब्दानं, रागाच्या नजरेनं अगर त्रासलेल्या मनानं सुद्धां शत्रूवर उलट आघात करायचा नाहीं हें पवित्र आचरण मरणाला

सुद्धां न भिणाऱ्या बेडर मनोवृत्तींतच उत्पन्न होणं शक्य आहे. शारीरिक सामर्थ्यानं आपण ज्या ज्या व्यक्तींना किंवा ज्या ज्या समाजांना जिंकतो त्या त्या व्यक्तींना किंवा त्या त्या समाजांना आपण आपले अधिकाधिक कडवे शत्रू बनवीत असतो. पण ज्यांना आपण मनानं जिंकतो ते आपले कडवे शत्रू असले तरी ते अधिकाधिक आपल्या जवळ आल्यानं आपण त्यांना आपले मित्र बनवीत असतो.

आयुष्यांतील कोणत्याहि सत्याग्रहाचे वेळीं महात्माजींनीं आपला सत्याग्रह सोडला नसला तरी आपल्याला विरोध करणाऱ्या साम्राज्यशाहीचं, आपल्यावर लाठी चालविणाऱ्या अज्ञानी शिपायाचं, कुत्सितपणानं गांधी तत्त्वज्ञानाची हेटाळणी करणाऱ्या आपल्याच समाजांतील विरोधकांचं त्यांनीं हंसतमुखानं स्वागतच केलं. अमुक गोष्ट सत्य आहे असा ठाम निश्चय झाल्यावर त्या सत्याबद्दल आग्रह धरण्याकरितां त्यांनीं मरणाची सुद्धां पर्वा केली नाहीं. प्राणावर पाणी सोडण्याची मनाची तयारी साधायची असेल तर माणसानं पूर्वतयारी म्हणून त्याग करायला शिकलं पाहिजे. महात्माजींनीं संसारांत राहूनच हलकें हलकें त्यागाचा अभ्यास केला हें आपणां सर्वांना माहीतच आहे. त्यांनीं अगोदर पैशाचा त्याग केला, त्यानंतर साऱ्या विषयोपभोगांवर पाणी सोडलं, शरीर जगविण्यापुरतं अन्न आणि लाज राखण्यापुरतं वस्त्र ह्याच्याखेरीज बाकी सर्व अनावश्यक गोष्टींना त्यांनीं तिलांजली दिली. सत्ता आपल्या पायीं लोळण घेत आली असतांना ह्या आर्यावर्तांतील अद्वितीय त्यागवीरानं सत्तेचा सुद्धां अभिलाष धरला नाहीं आणि आपलं शक्तिसर्वस्व मानवीसमाजाच्या उन्नतीकरितांच वेचण्याचा निश्चय केला. ज्या ज्या वेळीं आपल्या मनाचं सामर्थ्य अपुरं पडतं आहे असं वाटून महात्माजींचा आत्मविश्वास डळमळत असे, त्या त्या वेळीं आपलंच कुठं तरी चुकतं आहे, आपल्या मनाची अद्याप पूर्ण शुद्धि झाली नाहीं असं वाटून त्यांनीं केवळ मनःशुद्धीकरितां एक दिवसापासून तों एकवीस दिवसांपर्यंतचे उपवास यशस्वी रीतीनं केले. हे प्रायोपवेशनाचे कायाकल्प करतांना सुद्धां दुसऱ्यावर चिडून त्राग्यानं अगर दुसऱ्यावर अनिष्ट दडपण आणण्याकरितां केले नसून केवळ आत्मशुद्धीकरितांच केले असं त्यांनीं वेळोवेळीं सांगितलेलं आहे. ह्या प्रत्येक

कायाकल्पानंतर गांधींचं मनःसामर्थ्य अधिकाधिक वाढत गेल्यानं ते आत्मतेजानं झळाळत.

गांधींच्या आंतल्या आवाजाकडं आपण निरुत्साहानं पाहतो याचं कारण स्वतःच्या आंतल्या आवाजाच्या सामर्थ्याचा आपणाला पूर्ण विसर पडला आहे. आंतला आवाज प्रत्येक व्यक्तीला आहे. आयुष्यांत आपल्या मनाला पटत नसलेलं कोणतंहि काम करण्यापूर्वी प्रत्येक व्यक्तिमनाला हा आंतला आवाज धडाधड धक्के देत असतो. ह्या आंतल्या आवाजाची गळचेपी करून जगांत वावरायला आपण निर्ढावलों म्हणजे ह्या आंतल्या आवाजाचा जोर कमी कमी होत जाऊन अखेर हा आवाज असणं हेंसुद्धां असंभाव्य वाटूं लागतं. पण महात्माजींनीं प्रत्येक वेळीं ह्या आंतल्या आवाजाच्याच अनुरोधानं आपल्या आचरणाची रूपरेखा आंखल्यानं त्यांच्या आंतल्या आवाजाचं सामर्थ्य त्यांनीं वाढीला लावलं. हीच तपश्चर्या आहे. ह्यालाच मानसिक एकतानता म्हणतात. ह्यालाच ध्यान म्हणतात. ज्या हिटलरला आधुनिक जगांतील पाशवीशक्तीचं आपण श्रेष्ठतम प्रतीक मानतों त्या हिटलरला सुद्धां ह्या आंतल्या आवाजाची जरुरी भासत होती. ह्या आंतल्या आवाजाच्या आज्ञेनुसार महात्माजींनीं आपल्या आयुष्यांत झालेल्या चुका मोकळ्या मनानं कबूल केल्या. प्रत्येक चूक कबूल करतांना त्यांच्यावर होत असलेल्या शिव्याशापांचा नी तळतळाटांचा वर्षाव त्यांनीं हंसतमुखानं सहन केला. झालेली चूक कबूल करणं ह्याला असामान्य मनोधैर्य लागतं. बहुतेक माणसांच्या हातून चुका ह्या होतातच. ज्या चुका कबूल करायची आपल्याला लाज वाटते त्या चुका आपण आपल्या मनाच्या खोल भुयारांत गाडून टाकतो. ज्या चुकांबद्दल आपल्याला तितकीशी लाज वाटत नाहीं त्या चुकांचं आपण समर्थन करीत असतों आणि ज्या चुकांचं प्रदर्शन केल्यानं आपला समाजांतील दर्जा वाढेल असं आपली मनोदेवता आपल्याला सांगत असते त्या चुका चवाठ्यावर मांडून त्यांच्याबद्दल आपण वर्तमानपत्रांतून जाहीर माफी मागतों. पण महात्माजींनीं आपल्या आयुष्यांत विषयोपभोग, अभक्ष्यभक्षण, असत्य-भाषण, राजकीय प्रमाद वगैरे बाबतींत त्यांच्या हातून ज्या ज्या लहानथोर चुका झाल्या त्या सान्या चुका त्यांनीं समाजसमुद्राचे असह्य तडाखे निमूटपणें

सहन करीत खुल्या दिलानं नी आनंदी वृत्तीनं वेळीं अवेळीं पदरांतच घेतल्या. म्हणूनच महात्माजींच्या आंतल्या आवाजाला प्राचीन कालच्या ऋषिमुनींच्या सामर्थ्याप्रमाणं तेज चढलं.

महात्माजींच्या सायंप्रार्थनेच्या वेळचे हृदयस्पर्शी बोल पाहिले म्हणजे प्रत्येक बोलाची हृदयांत कायमची सांठवण करून ठेवावी, प्रत्येक बोल म्हणजे एक सुभाषित आहे, प्रत्येक बोल आज पृथ्वीमोलानं विकत घेण्याच्या योग्यतेचा आहे असं वाटतं. 'तुझ्या हृदयाचं प्रेम तूं मला दे' 'प्रत्येक माणसानं आत्मशुद्धीकरितां रोज एक तास मौन पाळावं' 'प्रार्थनागीत म्हणत असतांना चित्तवृत्तींचा लय होतो' अशासारखीं, हजारों सुभाषितं महात्माजींच्या मुखावाटे ओझरलीं. असं असून सुद्धां समाजांतील लहानथोर व्यक्तींना त्यांचं विशेष महत्त्व वाटत नाहीं. ह्याचं कारण महात्माजींचा अतिपरिचय. हेच महात्माजी आयुष्यांतील दहापांच वर्षं गिरिकंदरांत जाऊन तपश्चर्या करीत राहिले असते तर तपश्चर्येतून बाहेर पडल्यावर त्यांच्याकडं आपण सर्वजण वेगळ्या नजरेनं पहात राहिलों असतों. पण महात्माजींनीं आपल्या आचरणानं आपल्याला असं सिद्ध करून दाखविलं आहे कीं समाजांत राहूनच आपल्याला समाजहिताकरितां आमरण उग्र तपश्चर्येचं साधन करितां येतं. 'प्रत्येक माणसाला माझ्यासारखं होतां येईल. आयुष्याच्या सुरवातीला मी तुमच्यापैकींच एक होतों. तुमच्यामाझ्यांत बिलकूल फरक नाहीं. तुम्ही जसे समाजाचे एक घटक आहांत, तसाच मीसुद्धां समाजाचा एक घटक आहें. तुम्ही आम्ही सर्वजण आपापली व्यक्तिगत मानसिक उन्नति साधण्याचा यत्न केल्यास अखिल मानवजातीचं पुनरुत्थापन व्हायला वेळ लागणार नाहीं,' असा महात्माजींचा आग्रह होता.

चकमकीच्या दगडांतून एक ठिणगी उडते. ती कापसावर पडतांच कापसांतील धाग्यांच्या संघटनेच्या जोरावर ती ठिणगी आपलं तेज प्रत्येक धाग्याला देते. प्रत्येक धागा स्वतःला जाळून घेण्याच्या त्यागाच्या तयारीनं त्या ठिणगीचं तेज आत्मसात् करूं लागतो. अशा त्यागाच्या सामर्थ्यावर धगधगलेला अंगार साऱ्या जगाला भस्मसात् करूं शकतो. एका

ठिणगीचं जगाला भस्म करूं शकणाऱ्या सर्वभक्षक अग्नींत रूपांतर होऊं शकतं ह्याच तत्त्वावर महात्माजींची समाजमनाची उभारणी आधारलेली आहे. अगोदर सत्प्रवृत्ति आणि असत्प्रवृत्ति ह्यांच्या संघर्षावर मानवी-मनांत सत्याची ठिणगी निर्माण करा. त्या ठिणगीला त्याग, प्रेम, प्रार्थना ह्या सत्प्रवृत्तींच्या धाग्यांवर स्थिर होऊं द्या. मग जगाच्या पाठीवरील साऱ्या जीवज्योतींना ह्या सत्प्रकाशानं पावन करून घेतल्यावर सारा समाज स्वयंप्रकाशित व्हायला वेळ लागणार नाहीं, ही गांधीवादाची बैठक आहे. ही ठिणगी पडली आहे. समाजमनाच्या धाग्यांनीं पेट घ्यावा ह्या दृष्टीनं महात्माजींची अविश्रांत खटपट चालू होती.

महात्माजींचं आयुष्य अखिल मानवजातीच्या सुखाकरितां वेचलं जात होतं. जगाच्या पाठीवरील यच्चयावत् धर्मप्रणालींचं समाजधारणा हेंच ध्येय आहे. कांहीं धर्मांतून सूर्याला महत्त्व आहे तर सूर्याच्या प्रखर किरणांनीं होरपळणाऱ्या वालुकामय प्रदेशांत सुरू झालेल्या धर्मांत चंद्राला महत्त्व आलेलं आहे. सूर्याच्या तापानं अंगांतून घामाच्या धारा निघत असलेल्या, पण पाणी विपुल असलेल्या समशीतोष्ण प्रदेशांत ज्या धर्माचा उदय झाला त्या धर्मांत रोजच्या स्नानाला महत्त्व आहे, तर उन्हाचा असह्य ताप असलेल्या पण निर्जल अशा प्रदेशांत ज्या धर्माचा उदय झाला त्या धर्मांत निदान आठ दिवसांनीं एकदां तरी स्नान करण्याची धर्माज्ञा आहे. ज्या देशांत सूर्याचं दर्शन घडणं हा दिवस महत्त्वाचा नी आनंदाचा मानला जातो अशा कडक थंडीच्या प्रदेशांत पाणी नसलं तरी चालेल, पण मन पवित्र ठेवण्याच्या प्रार्थनेच्या वेळीं शक्य तों शरीर स्वच्छ ठेवण्याकरितां साधे नी स्वच्छ कपडे करून प्रार्थनामंदिरांत प्रवेश करावा अशी धर्माज्ञा आहे. प्रत्येक धर्मप्रणेत्यानं आपल्या धर्मांत मनःशुद्धीकरितां उपवासाला प्राधान्य दिलं आहे. कुणीं उपवासाचे दहा दिवस नेमले, कुणी चांद्रमानाचा एक महिना उपवास पाळायची आज्ञा केली, तर कुणीं उपवासाचे दिवस प्रत्येक महिन्यांत एक दोन, एक दोन असे विखुरले आहेत, तर कुणीं जीवहत्येच्या भीतीनं सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वी भोजन करणं निषिद्ध मानलं आहे.